**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर होणेबाबत**

**(१) * १३१०७ श्री.रामनाथ मोते , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो गाणार , श्री.संजय केळकर , श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.मनीष जैन , श्री.विक्रम काळे , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ९१०५ ला दिनांक ४ डिसेंबर, २०१० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**

सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर सर्व प्रवर्गांना नवीन वेतनश्रेण्या दिनांक १ जानेवारी, १९९६ पासुन लागु करण्यात आलेल्या असल्या तरी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना त्या दिनांक १ मार्च, २००० पासून लागू केल्यामुळे झालेला भेदभाव संपुष्टात आणण्याच्या विचाराधीन प्रश्नावर शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) तसेच उच्च माध्यमिक विभागातील शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी दिनांक १ मार्च, २००० ऐवजी दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून लागू करण्याच्या संदर्भात माहिती संकलनाचे काम पूर्ण झाले आहे काय,

(३) असल्यास, हा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यासंदर्भात काय कार्यवाही झाली आहे,

(४) विदर्भ ज्युनिअर कॉलेज टिचर्स असोसिएशनचे अध्यक्ष व सचिवांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक १५ सप्टेंबर, २००८ रोजी किंवा त्या दरम्यान शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांच्या मार्फत एक निवेदन देऊन ही बाब लक्षात आणून दिली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(६) उपरोक्त प्रकरणासंदर्भात अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नसल्यास, वा शासनाचा निर्णय झालेला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता :** (१) नाही.

(२) होय.

(३) प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) होय.

(५) व (६) उत्तर १ चे संदर्भात प्रश्न उद्भवत नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, हा प्रश्न माझ्या नावावर लागलेला आहे. परंतु या प्रश्नाचे प्रारुप मी दिलेले नाही. मागच्या वेळी देखील हा प्रश्न आला होता त्यावेळी मी आपणास विनंती केली होती की, साधारणत: अन्य सन्माननीय सदस्यांची नावे प्रश्नाला जोडताना ज्या सन्माननीय सदस्यांचा प्रश्न स्वीकृत होतो त्यांचे प्रारुप यावयास पाहिजे अशा प्रकारचे निर्देश आपण दिले होते. त्याची अंमलबजावणी झालेली नाही. मी दिलेल्या प्रश्नाच्या प्रारुपामध्ये बदल झालेला आहे. याची दखल घेण्याच्या संदर्भात आपण निर्देश द्यावेत ही विनंती.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, राज्यातील उच्च माध्यमिक शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या संदर्भात गेल्या 10 वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. सातत्याने कोणत्या ना कोणत्या आयुधाच्या माध्यमातून या सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित होतोय. विशेषत: लक्षवेधी सूचना, नियम 93ची सूचना, तारांकित प्रश्न या आयुधाच्या माध्यमातून या विषयावर चर्चा झालेली आहे. विषय साधा, सरळ आणि सोपा आहे. 5व्या वेतन आयोगामध्ये ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षकांना जी 6500ची वेतनश्रेणी दिली ती चुकीची होती. त्यांना 7225 ही वेतनश्रेणी मिळायला हवी होती. हा विषय या सभागृहामध्ये पुन्हा येणार नाही म्हणून या विषयाला थोडा वेळ देण्याची आवश्यकता आहे. 3 जून 2000 ला शासनाने फेर विचार केला. ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षकांना 7225 ही वेतनश्रेणी देण्याचे मान्य केले. परंतु ही वेतनश्रेणी मार्च 2000 पासून लागू केली. राज्यातील इतर सर्व प्रवर्गाना नवीन वेतनश्रेणी दिनांक 1 जानेवारी 1996 पासून लागू करण्यात आल्या. म्हणून 1.1.1996 ते 1 मार्च 2000 पर्यंतची वेतनश्रेणीतील तफावत दूर करण्याच्या संदर्भातील हा प्रश्न आहे.

किमान 15 ते 16 वेळा हा प्रश्न या वभागृहामध्ये येऊन गेला. 25 मार्च 2010 रोजी या प्रश्नाच्या संदर्भात डिटेल चर्चा झाली. सभापती महोदय, आपणही या संदर्भात आदेश दिले होते. पीठासीन अधिका-यांच्या दालनामध्ये एप्रिल 2008मध्ये झालेल्या बैठकीत जो निर्णय झालेला असेल त्याबरहुकूम त्या निर्णयाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी, अशा प्रकारचे निर्देश आपण दिले होते. त्या निर्देशाची अंमलबजावणी झालेली नाही. आता या प्रश्नाला मंत्री महोदयांनी दिलेले उत्तरही दिशाभूल करणारे आहे. अजूनही "प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे" अशा प्रकारचे दिशाभूल करणारे, या सभागृहाचा आणि सभापती महोदय, आपण दिलेल्या निर्देशाचा अवमान करणारे आहे. तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री महोदय श्री. बाळासाहेब थोरात यांनी असे स्पष्ट उत्तर दिलेले आहे की, "अधिवेशन संपण्यापूर्वी मंत्रिमंडळामध्ये या विषयासंबंधी आम्ही निर्णय घेऊ." दिनांक 25 मार्च 2010 रोजी शिक्षण मंत्री महोदयांनी हे स्टेटमेंट केलेले होते. आता "कार्यवाही सुरु आहे" अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. हा विषय पुन्हा पुन्हा या सभागृहामध्ये येत आहे. सभापती महोदय, शासन आपण दिलेल्या निर्देशांचे पालन करीत नाही. म्हणून माझी विनंती आहे की,कोणत्याही परिस्थितीमध्ये हे अधिवेशन संपण्यापूर्वी या विषयाच्या संदर्भात शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. तो निर्णय मंत्री महोदय घेतील काय ?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13107...

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे नागपूरच्या अधिवेशनामध्ये असे सांगितले होते की, आम्ही कॅबिनेटमध्ये प्रस्ताव घेऊन जाऊ.

...नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यानुसार कॅबिनेटपुढे प्रस्ताव नेण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेकरिता फाईल सादर केली होती. मुख्यमंत्र्यांची मान्यता मिळण्यापूर्वीच मंत्रिमंडळ बदलले. आता नवीन मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव सादर करण्यासाठी पुन्हा फाईल मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्याची कार्यवाही केली आहे. लवकरच मुख्यमंत्र्यांची मान्यता घेऊन कॅबिनेटपुढे प्रस्ताव नेण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, हा राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील 45 हजार शिक्षकांचा प्रश्न आहे. या प्रश्नासंबंधी विधानसभेचे माजी अध्यक्ष श्री.बाबासाहेब कुपेकर यांच्या दालनात बैठक झाली होती. तत्कालीन विधानसभा अध्यक्षांनी स्वत: निर्देश दिले होते. त्यानंतर या राज्यात दोन मुख्यमंत्री झाले, तीन अर्थमंत्री झाले. प्रत्येक वेळी बैठका घेतल्या जातात आणि असे सांगितले जाते की, प्रस्ताव कॅबिनेटपुढे नेण्यात येईल. शासनाने शिक्षकांची चेष्टा चालविली आहे. हे प्रकार थांबविण्यासाठी अधिवेशन संपण्यापूर्वी हा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात येईल काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांच्या प्रश्नाला उत्तर देण्यापूर्वी मी स्पष्ट करु इच्छिते की, दिनांक 6.10.2010 रोजी कॅबिनेटपुढे प्रस्ताव नेण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेकरिता फाईल सादर केली होती. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये असे आश्वासन दिले होते की, लवकरच कॅबिनेटपुढे प्रस्ताव घेऊन जाऊ. त्यानंतर संघटनेच्या प्रतिनिधींनी विभागाच्या स्तरावर भेट घेतली व त्यांनी नवीन कॉम्प्रोमाईज सुचविले.....(गोंधळ).....

**सभापती** : माननीय राज्यमंत्र्यांचे उत्तर अपूर्ण असेल किंवा तांत्रिकदृष्टया उत्तर मान्य नसेल तर पुरवणी प्रश्नाद्वारे स्पष्टता करुन घेता येईल. परंतु अशा प्रकारे एकाच वेळी अनेक माननीय सदस्यांनी प्रश्न विचारण्याची भूमिका स्वीकारली तर मला पुढील प्रश्न पुकारावा लागेल.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, माझी सभागृहाला विनंती आहे की, माझे उत्तर पूर्ण ऐकून घ्यावे. माननीय सदस्यांच्या भावनेचा मी अनादर करु इच्छित नाही. समस्येचे निवारण करण्याची शासनाची भूमिका आहे. या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी मला उत्तर पूर्ण करु द्यावे. शासन या प्रश्नाच्या विरोधात आहे अशी भावना करुन घेऊ नये. आपल्याला या प्रश्नाबाबत मार्ग काढावयाचा आहे. त्यासाठी माझे ऐकून घ्यावे अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13107...

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, हा प्रश्न अनेकदा सभागृहात उपस्थित होऊनही अद्याप सुटलेला नाही. दिनांक 15 एप्रिल, 2010 रोजी माननीय शिक्षणमंत्र्यांच्या दालनात बैठक झाली होती. या बैठकीला शिक्षणमंत्री, वित्त मंत्री आणि पाच-सहा आमदार व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. मागील बैठकीचे प्रोसिडिंग मागितले ते अद्याप मिळालेले नव्हते. आता प्रोसिडिंग प्राप्त झालेले आहे.

नंतर सी.1..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13107..... श्री. वसंतराव खोटरे.....

आणि त्यामध्ये असे म्हटले आहे की, याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, सदर कार्यवाही तातडीने करावी असे वित्तमंत्री व शिक्षण मंत्र्यांनी म्हटले आहे. म्हणून याबाबतचा निर्णय शासन येत्या आठ दिवसात घेणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : महोदय, सन्माननीय सदस्यांना जे सांगायचे आहे त्याच संदर्भात मला उत्तर द्यावयाचे होते. शासनाने याबाबत एक नवीन फॉर्म्युला सुचविला आणि त्यानुसार शासनावर किती आर्थिक भार पडेल.....अडथळा.....सन्माननीय सदस्यांनी प्रथम माझे उत्तर ऐकून घेतल्याशिवाय ते चूकीचे आहे की बरोबर, हे त्यांना कसे समजणार ? ठीक आहे, नवीन फॉरम्युल्याबद्दल मी सांगत नाही तर सभागृहाच्या असे निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, शिक्षण विभागाचे, शिक्षण सेवकांच्या मानधन, मूल्यांकन तसेच वरिष्ठ वेतनश्रेणीचे प्रश्न, असे काही महत्वाचे प्रश्न आहेत. अशा सर्व प्रश्नांचा भार शासनावर किती पडणार आहे हा विचार करुन तसेच हे प्रश्न सोडविण्यासाठी माननीय उप मुख्यमंत्र्यांकडे .....अडथळा.....मी सभागृहाला काहीच चुकीची माहिती देत नाही तर केवळ प्रश्न सुटावा म्हणून हा निर्णय घेतला आहे. या प्रश्नांचे निवारण कसे करता येईल यासाठी शासनही प्रयत्नशील आहे. अशा प्रकारे या सर्व प्रश्नांचा शासनावर 44 कोटीचा भार पडणार आहे. त्याशिवाय अन्य दुसरे प्रश्नही आहेत त्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय शिक्षण मंत्री आणि मी एकत्रितपणे चर्चा करुन हे सर्व प्रश्न लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर कसे नेता येतील याचा विचार केला. तसेच आर्थिक भाराच्या संदर्भात देखील एकत्र बसून चर्चा केली व यातून मंत्रिमंडळासमोर लवकरात लवकर हा प्रश्न नेण्याबद्दल सकारात्मक चर्चा झालेली आहे. या चर्चेच्या वेळेस माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सुध्दा सकारात्मक दृष्टीकोन ठेवला आहे. तसेच हा संपूर्ण खर्च कॅलक्युलेट करुन शालेय शिक्षण विभागाचा इतर जो अनावश्यक खर्च आहे तो कमी करण्याबाबत कठोर निर्णय घेण्याबाबत सुध्दा चर्चा झाली. अशा प्रकारे एकत्रितपणे सर्वच प्रश्न मंत्रिमंडळासमोर नेण्याचा शासनाने विचार केला आहे.

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13107....

श्री. कपिल पाटील : महोदय, मूळ प्रश्नापासून बाजूला जाऊन प्रश्न विचारला तर सन्माननीय सदस्यांना अडविले जाते पण मंत्री महोदया मात्र प्रश्नाचे उत्तर न देता विना अनुदानित आणि कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतनश्रेणीबाबतचे उत्तर देत आहेत. हा प्रश्न मुळात वेतनाच्या संदर्भात आहे. या सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेरही वेतन आयोगाचा प्रश्न निर्माण झाला त्या त्यावेळेस केंद्राप्रमाणे राज्यातही वेतन आयोग लागू करण्यात येईल, असे माननीय मुख्यमंत्री सांगतात. प्रत्यक्षात मात्र शासनाने कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक वगळून निर्णय घेतला. आता केवळ सन 1996 ते 2001 या कालावधीतील थकबाकीच्या संदर्भातीलच प्रश्न शिल्लक राहिलेला आहे. जो शासनानेच मान्य केला असल्याने आता अमान्य करण्याचे कारण नाही. फक्त ही रक्कम शासनाकडून वसूल करण्यासंबंधीचा प्रस्ताव आपल्याला मंत्रिमंडळाकडे पाठवावयाचा आहे. तसा प्रस्ताव न पाठविता आपण सभागृहाला सांगत आहात की, आम्ही प्रस्ताव पाठविला होता पण मधल्या काळात मंत्रिमंडळ बदलले, नंतर पाठविण्यात येईल. अशा प्रकारे मूळ विषय बाजूला ठेवून बाकीचे विषयच येथे घेत आहेत. मागचा जो मूळ प्रस्ताव होता तो मंत्रिमंडळासमोर आजच्या आज पाठविणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 13107....**

श्री. कपिल पाटील...

सर्वांना समान न्यायाने वेतन दिले जाईल असे आश्वासन या शासनाने दिले होते त्यासंदर्भातील स्पेसिफिक उत्तर आम्हाला मंत्री महोदयांकडून हवे आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, या अगोदरच मी सांगितले आहे की, या विषयाच्या संदर्भात मार्ग काढण्यासाठी कॅबिनेट पुढे जाण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित करीत आहेत त्याच संदर्भातील प्रस्ताव देण्यात आलेला आहे. यासंदर्भातील सर्व निर्णय लवकरात लवकर व्हावेत यासाठी एकत्रितपणे काम केले जात आहे हे सांगण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्य आता जे काही विचारीत आहेत त्याबाबतीत मी सांगू इच्छिते की, ...

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. नारायण राणे : सन्माननीय सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्री या प्रश्नाच्या संदर्भात सविस्तर उत्तर देत आहेत. सन्माननीय सदस्य जो काही प्रश्न विचारीत आहेत, त्यांना अभिप्रेत असलेले उत्तर मंत्री महोदयांकडून हवे आहे. परंतु त्यांना हवे असलेले उत्तर शासनाला देता येणार नाही. या प्रश्नाच्या संदर्भात जी तफावत आहे ती शासनाने मान्य केलेली आहे. ही तफावत केव्हा द्यावयाची हा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, याबाबतीत शासन लवकरात लवकर निर्णय घेणार आहे. सन्माननीय सदस्यांना वाटते की, हा विषय आजच कॅबिनेट समोर आणा, आजच निर्णय घ्या परंतु अशा प्रकारचा निर्णय शासनाला त्वरित घेता येणार नाही. मी शासनाच्या वतीने सांगू इच्छितो की, ज्यूनियर कॉलेजच्या शिक्षकांवर जो अन्याय झालेला आहे त्यासंदर्भातील निर्णय लवकरात लवकर घेण्यासाठी शासन तशा प्रकारची योग्य ती तरतूद करेल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसून प्रश्न विचारावेत.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील पहिला प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विचारला होता. त्या प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तर देत असताना विभागाच्या राज्यमंत्र्यांनी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 13107....**

**सभापती** ...

त्यांच्या परीने उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या प्रश्नाच्या संदर्भातील एक उप प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी विचारला होता. 96-97 या दरम्यान फरक दिला गेला नाही त्यामुळे त्या फरकाचे काय असा त्यांचा प्रश्न होता. या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांनी या मुद्यावर अचूक बोट ठेवून त्यांनी सांगितले की, एखाद्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सदस्यांना अपेक्षित असलेले उत्तर दिले जावे असे वाटत असले तरी अपेक्षित उत्तर दिलेच पाहिजे असे काही नाही.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13107.....

श्री.विनोद तावडे : आमची तशी अपेक्षासुध्दा नाही.

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने स्पष्टीकरण केलेले आहे. त्या संदर्भात मी त्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य हा प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करीत आहेत परंतु तो प्रश्न सुटत नाही म्हणून माननीय शिक्षण मंत्री श्री.राजेद्र दर्डा व माननीय उद्योग मंत्री श्री नारायण राणे आणि आपण सर्वानी एकत्रित बसून हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला तर हा प्रश्न नक्की सुटेल. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांची जी सार्वजनिक मागणी आहे त्या बाबतीत मी स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर व्यक्तिगत बोलेन .

श्री.विनोद तावडे : हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा.

**सभापती** : हा प्रश्न मी राखून ठेवणार नाही.

श्री.कपिल पाटील :सभापती महोदय, आपण निर्णय दिल्यानंतर त्या बाबतीत मी पुन्हा बोलणे बरोबर नाही आपण न्यायपूर्ण भूमिका घेतलेली आहे. सान्माननीय मंत्री श्री नारायण राणे यांनी उत्तर देतांना असे सागितले की, शासनाला ही थकबाकी देणे मान्य आहे. मात्र ही थकबाकी कधी द्यावयाची आहे हे आम्हाला ठरवू द्यावे. याबाबतीत माझी एवढीच विनंती आहे की, जर शासनाला थकबाकी देणे मान्य असेल तर आपल्या दालनात आजच माननीय मुख्यमंत्री , वित्त मंत्री तसेच माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांची बैठक घ्यावी आणि या प्रश्नाला न्याय द्यावा.

**सभापती** : सन्माननीय मंत्री श्री नारायण राणे यांनी याबाबतीत पुढाकार घ्यावा व शालेय शिक्षण मंत्री, शालेय शिक्षण राज्य मंत्री, वित्त मंत्री या सर्वानी एकत्रितपणे चर्चा करण्याकरिता बसावे . या बाबतीत मी माननीय मुख्यमंत्र्यांना आपली बाजू गांभीर्याने सांगतो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विनाअनुदानित काळातील सेवा वरिष्ठ/निवड श्रेणीसाठी व कालबद्ध पदोन्नतीसाठी ग्राह्य धरण्याबाबत**

**(२) * १२७३८ श्री.वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.विक्रम काळे , श्री.रामनाथ मोते , श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो गाणार, श्री.संजय केळकर, श्री.मनीष जैन, डॉ.रणजित पाटील , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.केशवराव मानकर : तारांकित प्रश्न क्रमांक ९०२३ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१० रोजी दिलेल्या उत्तरांच्यासंदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मान्यता प्राप्त प्राथमिक, उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विना अनुदान काळातील सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबतचा प्रस्ताव मंत्री मंडळापुढे सादर केल्यानंतर काही मुद्यांवर त्रुटी आढळल्यामुळे मुख्य सचिवांशी चर्चा करुन त्याबाबतची नस्ती सादर केल्यानंतर तो पुन: मंत्रीमंडळापुढे सादर करण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची सन २००३ ची याचीका क्रमांक ५०५६ तसेच सन २०१० मधील याचिका क्रमांक २६९२, ५७१७, ५३६१, ५७१६, ५७३२, ५७७०, ६१४२, ६०४०, ६०४१, ६०३८, ६०३९ नुसार मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार त्याचा लाभ एकूण ५४३ याचिकाकर्त्यांना देण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांचे महामंडळ यांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०१० रोजी तसेच लोकप्रतिनिधी (अमरावती पदवीधर) यांनी दिनांक १४ डिसेंबर, २०१० रोजी वा त्या सुमारास माध्यमिक शिक्षणाधिकारी, अकोला तसेच प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना याबाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता :** (१) मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) नाही.

(३) होय.

(४) या संदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.वसंतराव खोटरे :सभापती महोदय, विनाअनुदानित काळातील सेवा वरिष्ठ./ कनिष्ठ श्रेणीसाठी व कालबध्द पदोन्नतीसाठी ग्राहय धरण्यासंबंधीचा हा प्रश्न आतापर्यंत या सभागृहामध्ये 15 ते 16 वेळा आला होता. सभापती महोदय, या प्रश्नाबाबत शासनाने ताबडतोब निर्णय घ्यावा अशा प्रकारचे निदेश आपणही दिले होते. परंतु अजूनही शासनाने या बाबतीत निर्णय घेतलेला नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिनांक 28 नोव्हेंबर 2000 रोजी जो शासन निर्णय काढला होता त्यामध्ये माध्यमिक शिक्षकांचा उल्लेख करण्यात आला होता परंतु चुकून त्या ठिकाणी प्राथमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक राहून गेले होते. त्यांना या सेवेचा लाभ मिळाला नाही म्हणून काही शिक्षक कोर्टात गेले होते त्यावेळी कार्टाने जो निर्णय दिला त्या संदर्भात 13.12.2010 रोजी असे उत्तर देण्यात आले होते की, संबंधित शिक्षकाने दाखल केलेल्या सदर याचिकेच्या निकालात माननीय उच्चन्यायालयाने विनाअनुदानित काळातील सेवा वरिष्ठ /निवड श्रेणीसाठी ग्राह धरण्याचे आदेश दिलेले आहेत. याबाबतीत कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा आणि शिक्षकेतर कर्मचा-याचा प्रश्न आहे. शिक्षकेतर कर्मचारीसुध्दा हायकोर्टात गेले असून त्यांनी याचिका सादर केली होती त्या संदर्भात. 543 शिक्षकांना पदोन्नतीचा लाभ मिळावा म्हणून कोर्टाने आदेश दिला होता परंतु शासनाने तसे न करता ही बाब विचाराधीन आहे अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. कोर्टाचा अवमान न होता या बाबतीत शासन धोरणात्मक निर्णय घेऊन येत्या आठ दिवसामध्ये विनाअनुदानित काळातील सेवा उच्च माध्यमिक शिक्षकासाठी तसेच शिक्षकेतर कर्मचा-याच्या कालबध्द पदोन्नतीसाठी ग्राहय धरणार आहे काय व तसा आदेश निर्गमित करणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनात माननीय शिक्षण मंत्र्यांनी आश्वासन दिले होते. या प्रश्नाच्या बाबतीत विभाग सकारात्मक विचार करीत आहे हे सुध्दा त्यावेळी सांगितले होते त्यानुसार फाईल देखील मुव्ह केली असून यासंबंधीचा निर्णय कॅबिनेटच्या बैठकीमध्येच होणार आहे. त्याकरता फाईल मूव्ह करण्यात आली असून काही त्रुटी वित्त विभागाने काढल्या असून ती फाईल आता प्रोसेसमध्ये आहे.

नंतर श्री.सारफरे .

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

तसेच, ही सुध्दा आर्थिक बाबीशी निगडीत बाब असल्यामुळे लवकरात लवकर मंत्रिमंडळापुढे हा विषय आणून त्यावर निर्णय घेण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

**राज्यातील खाजगी विनाअनुदानित शाळांनी फी मध्ये भरमसाठ केलेली वाढ**

**(३) * १३०५० प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.मनीष जैन, श्री.वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.एम.एम.शेख , श्री.विक्रम काळे , श्री.अमरनाथ राजूरकर , श्री.सुभाष चव्हाण , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.हुसेन दलवाई , डॉ.सुधीर तांबे , श्री.विजय सावंत , श्रीमती दिप्ती चवधरी , डॉ.दिपक सावंत , श्री.रामदास कदम , श्री.दिवाकर रावते , डॉ.निलम गोऱ्हे , श्री.हेमंत टकले , श्री.प्रकाश बिनसाळे , श्रीमती उषाताई दराडे , श्री.रमेश शेंडगे , श्री.दिपकराव साळुंखे , श्री.परशुराम उपरकर , श्री.भगवान साळुंखे , श्री.महादेवराव महाडिक , श्री.सुरेशदादा देशमुख : तारांकित प्रश्न क्रमांक ९१११ ला दिनांक ४ डिसेंबर, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी विनाअनुदानित शाळांनी भरमसाट फी वाढ करुन हजारो विद्यार्थी व पालक यांच्या करीत असलेल्या पिळवणूक प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अधिनियमाद्वारे विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित शाळांतील शैक्षणिक शुल्क इत्यादींचे विनियमन करण्याबाबत राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) नवीन पनवेल (जि.रायगड) येथील डि.ए.व्हि. पब्लिक स्कूलने ५०% फी वाढ केल्याने त्या विरोधात पालकांनी केलेले आंदोलन शाळेने उधळून लावले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळेने मनमानीपणे फी वाढ केल्यास पालकांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शाळेच्या मुख्याद्यापकास तुरुंगात पाठविण्याबाबतचा कायदा शालेय शिक्षण विभाग करीत असल्याची माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) व (३) नुसार कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(५) नसल्यास, या प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता :** (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क विनियमन अधिनियम विधेयक विधिमंडळात सादर करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

नवीन पनवेल (जि.रायगड) येथील डि.ए.व्हि.या शाळेने २८ टक्के फी वाढ केलेली आहे. तथापि, याविरोधात पालकांची तक्रार प्राप्त झालेली नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १३०५०...

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क विनियमन अधिनियम विधेयक या अधिवेशनामध्ये मांडण्याचा हे राज्य शासन प्रयत्न करणार आहे काय? तसेच, संस्था चालकांनी २८ टक्के केलेली फी वाढ योग्य आहे काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या संदर्भात शासनाने यापूर्वी एक जी.आर. काढला होता परंतु तो कोर्टामध्ये रद्दबातल ठरविण्यात आला. त्यामुळे सदरचे विधेयक आणण्याच्या दृष्टीने विभागाने कार्यवाही सुरु केली आहे. या विधेयकाचे प्रारुप तयार करण्यात आले असून ते सर्वांसाठी वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे जनतेकडून सुध्दा त्या संदर्भात ओपिनियन मागविण्यात आले असून संचालकांच्या स्तरावर असलेल्या समितीमार्फत त्यांचे संकलन करुन शासनाला सादर करण्यात येईल. विधेयकाच्या प्रारुपामध्ये त्या सूचनांचा समावेश करुन लवकरात लवकर संबंधित विधेयक या अधिवेशनामध्ये आणण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या अधिवेशनामध्ये लवकरात लवकर हा कायदा संमत केला जाईल असे सांगितले. शासनाने यापूर्वी काढलेला जी.आर कोर्टाने रद्दबातल ठरविला. तो ठरवितांना कोणती कारणे सांगण्यात आली होती? तसेच, येऊ घातलेले विनियमन अधिनियम विधेयक हे सर्व दृष्टीने परिपूर्ण असेल याची आपण ग्वाही देणार काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, जी.आर. रद्दबातल ठरविण्याची अनेक कारणे आहेत. त्याबाबत सुप्रीम कोर्टाचे जज्जमेंट आहे. सदरहू संस्थाचालक आपले अधिकार प्रोटेक्ट करण्यासाठी कोर्टामध्ये गेले होते म्हणून कोर्टाने त्यांना दिलासा दिला होता. परंतु फी नियमन करणे आवश्यक असल्यामुळे अनेक राज्यांमध्ये त्या कायद्याचा अभ्यास करण्यात आला, इंटरनॅशनल कायद्याचा अभ्यास करण्यात आला. त्यानंतर आपण परिपूर्ण प्रारुप तयार करण्याचा प्रयत्न केला असून त्यामुळे कुणाच्याही अधिकारावर बाधा येणार नाही. याबाबत लोकांकडून ओपिनियन मागविले असून ते सभागृहासमोर येईल त्यावेळी आपण त्याबाबत विचार करु. त्यामुळे हा कायदा नक्कीच परिपूर्ण असेल असा मला विश्वास वाटतो. माननीय सदस्य प्रा. नवले साहेबांनी २८ टक्के फी वाढ योग्य आहे काय? असा प्रश्न विचारला होता. एकदम २८ टक्के फी वाढविणे योग्य नाही म्हणून फी वाढ करण्याचे प्रमाण ठरविण्याचे काम या कायद्यामध्ये करण्यात आले आहे.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीकाची नाही

ता.प्र.क्र. १३०५०....

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये "महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क विनियमन अधिनियम विधेयक विधिमंडळात सादर करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे" असे सांगितले आहे. या विधेयकामध्ये सर्वसाधारणपणे कोणती तरतूद करण्यात आली आहे?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या कायद्यामध्ये शैक्षणिक संस्थांना सुविधा देण्याचा आणि त्यानुसार फी आकारणीचा अधिकार दिला आहे. त्याला पालक-शिक्षक संघटनेने मान्यता द्यावी आणि त्यांच्या काही ऑब्जेक्शन्स असतील तर त्यांनी संस्था चालकांच्या मिटींगमध्ये त्या मांडाव्यात. त्यामध्ये जनरल बॉडी, पीपीए राहणार असून प्रत्येक पालक हा तिचा सभासद असणार आहे. या जनरल बॉडीच्या मिटींगमध्ये संस्थेचे रेव्हेन्यू आणि एक्सपेंडीचर अकाऊंटचे वाचन करावयाचे आहे. पीपीए ही एक एक्झिक्युटिव्ह बॉडी असून त्यामध्ये प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांचे पालक आणि शिक्षक हे ५०-५० टक्के सभासद रहाणार आहेत. जर त्यांनी काही आक्षेप घेतला तर मॅनेजमेंटला त्याप्रमाणे बदल करावा लागेल आणि संस्थेने काही बदल केला नाही तर पीपीएच्या आक्षेपाची नोंद घेण्यासाठी डिव्हिजनल पातळीवर एक समिती नेमली आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13050 . . . .

प्रा.फौजिया खान . . . .

त्याठिकाणी एक रिटायर डिस्ट्रीक्ट जज्ज यांच्या अध्यक्षतेखाली ही डिव्हीजनल लेव्हलची कमिटी असेल आणि त्यामध्ये दुसरेही सदस्य असतील. ज्याच्यामध्ये एस.एस.सी.बोर्ड किंवा एच.एस.सी. बोर्डचे चेअरमन डिव्हीजनल हेड असतील. एक चार्टर्ड अकाऊंटन्ट असेल, एक सी.बी.एस.सी. किंवा आय.सी.एस.सी.किंवा दुसऱ्या बोर्डाचे मेंबर देखील असतील आणि डिव्हीजनल डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन हे एक्स-ऑफीशो मेंबर असतील. जर तक्रारी असतील तर पी.टी.ए.ला अधिकार रहातील आणि बाकीच्या सर्व शाळांनी या डिव्हीजनल कमिटीला इन्फर्मेशन साठी त्यांचे फी बाबतचे जे स्ट्रक्चर आहे, ते उपलब्ध करुन द्यावे. पण जर आक्षेप असेल तर मग त्यांच्याकडे याबाबतीत हिअरींग होईल आणि मग ते यासंबंधातील फी ठरविण्याचे आणि त्याबाबत निवारण करण्याचा प्रयत्न करतील. जर तिकडे निवारण झाले नाही तर मग स्टेट लेव्हलवर देखील कमिटी आहे. ही स्टेट लेव्हलवरील कमिटी एका रिटायर हाय कोर्ट जज्ज यांच्या अध्यक्षतेखाली रहाणार आहे.त्याच्यामध्ये एस.एस.सी आणि एच.एस.सी. बोर्डचा एक नॉमिनेटेड गर्व्हमेंट मेंबर अध्यक्ष रहाणार आहे. एक चार्टर्ड अकाऊंटन्ट रहाणार आहे आणि डायरेक्टर ऑफ एज्युकेशन असतील, अशा प्रकारची ही समिती असेल. जर राज्य स्तरावरील कमिटीमध्ये जरी निवारण झाले नाही तर मग त्यांना शिक्षा होऊ शकते आणि ती म्हणजे 5 लाख रुपयापर्यंत दंड आणि 1 ते 3 वर्षापर्यंत शिक्षा असेल आणि या निर्णयामध्ये जे-जे सहभागी आहेत त्यांना अशा प्रकारे ती शिक्षा होऊ शकते अशा प्रकारचा कायद्याचा ड्राफ्ट आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, यामध्ये एकंदरीत पाच प्रश्न होते आणि माननीय मंत्री महोदयांनी एकत्रितपणे उत्तर दिलेले आहे. माननीय मंत्री महोदया आपल्या पध्दतीने चांगल्या प्रकारे उत्तर देण्याचा प्रयत्न करतात. पण सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे साहेब पुढचा जो भाग आहे, तो जास्त महत्वाचा आहे आणि त्याचे योग्य उत्तर दिलेले नाही. याठिकाणी छापील उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "तथापि या विरोधात पालकांची तक्रार प्राप्त झालेली नाही." पण असे कसे म्हणता येईल. या महाराष्ट्रामध्ये फी वाढीच्या विरोधात मुंबई, पनवेल, ठाणे, पुणे इ. ठिकाणी अनेक आंदोलने झाली.माननीय मंत्री महोदया असे सांगत आहेत की,याबाबत तक्रारी आलेल्या नाहीत.पनवेल येथील शाळेबाबत जो प्रश्न आहे आणि आपण 28 टक्के फी वाढीबाबत जे उत्तर दिलेले आहे त्याबाबतच मी बोलत आहे.मी आपल्याला दोष देत नाही परंतु तुमचे अधिकारी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप . . . .

ता.प्र.क्र.13050 . . . .

तुम्हाला कशी चुकीची माहिती देतात ते सांगत आहे. आपण याठिकाणी प्रश्नाचे जे उत्तर दिलेले आहे, त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "नवीन पनवेल (जि.रायगड) येथील डी.ए.व्ही.या शाळेने 28 टक्के फी वाढ केलेली आहे. तथापि या विरोधात पालकांची तक्रार प्राप्त झालेली नाही." याचा अर्थ आपले अधिकारी तुम्हाला पूर्णपणे माहिती देत नाहीत. या शाळेच्या बाबतीत जे आंदोलन झाले, ते तुम्ही आणि आम्ही सर्वांनी टी.व्ही.वर पाहिले. असे असतानाही संबंधित अधिकारी माननीय मंत्री महोदयांना माहिती देऊन तोंडघशी पाडतात याची कुठेतरी नोंद घ्यावयास पाहिजे हा माझा पहिला मुद्दा आहे.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा प्रश्न असा की, याठिकाणी 28 टक्के जी फी वाढ झाली आहे, ती आपण त्वरित थांबविणार आहात काय ? असा माझा स्पेसिफीक प्रश्न आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आज देखील नियम अस्तित्वात आहे. त्यानुसार कारवाई करणे हे सुध्दा अपेक्षित आहे. पण जर आपल्याकडे औपचारिक तक्रारच आलेली नाही तर डायरेक्टर त्यावर ॲक्शन . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मी येथे जे सांगत आहे, ती तक्रार आहे असे समजून त्यावर कारवाई करावी.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हे सर्व प्रश्न जे आहेत, त्याच्यासाठीच आपण कायदा आणत आहोत. तसेच सदनामध्ये या कायद्याच्या बाबतीत चर्चा होणार आहे.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : तक्रारीबाबत काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, याबाबतीत तपासणी करुन कारवाई करण्यात येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**सभापती** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी या विशिष्ट शाळे बाबत प्रश्न विचारत असताना जे सांगितले आहे, ती तक्रार आहे असे समजून चौकशी करावी.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले, ती तक्रार समजून आम्ही चौकशी करणार आहोत आणि तशी ती केलेली आहे. माझ्याकडे याची माहिती आहे. या शाळेतील फी वाढीबाबतचा प्रस्ताव 2009 ते 2010 या दरम्यान सादर केला होता. पण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . ..

ता.प्र.क्र.13050 . . . .

फी मध्ये वाढ झालेली नाही म्हणजे त्यांनी आपल्याकडे जी माहिती दिलेली आहे, त्यामध्ये . . . ...

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, याठिकाणी लेखी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "नवीन पनवेल (जि.रायगड) येथील डि.ए.व्हि.या शाळेने 28 टक्के फी वाढ केलेली आहे"

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13050.....

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात )

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, एखाद्या मंत्री महोदयांनी उत्तर दिल्या नंतर एखाद्या सन्माननीय सदस्यांनी वस्तुस्थिती सांगितली असेल तर ती तपासून त्यासंबंधात दुरुस्ती करण्यात येईल असे उत्तर देण्यात येते. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी पनवेलच्या शाळेमध्ये फी वाढ झालेली आहे असे संगितलेले आहे. त्याबद्दलच्या कारवाई संबंधी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, यासंबंधीची तक्रार आली आहे काय यासंबंधीची चौकशी करण्यात येईल आणि योग्य ती कारवाई करण्यात येईल, यामध्ये काय चुकीचे संगितले आहे. तक्रार आली आहे काय, हे पाहिले पाहिजे. फी वाढीला स्थगिती देण्याचा शासनाला अधिकार आहे काय ही बाब कायदेशीर दृष्टया तपासली पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर लगेच स्थगिती दिली पाहिजे, असे होणार नाही.

( अनेक सदस्य एकाचवेळी बोलत असतात )

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य चुकीचे बोलत आहेत काय, याबाबतीत मंत्री महोदयांना समज देणार काय? मंत्री महोदय श्री. राणे साहेब या सभागृहात उत्तर देण्यासाठी उभे रहाणार आणि काही तरी उचापती करणार हे चालेल काय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी काहीही बोलावयाचे आणि आम्ही ते काहीही ऐकावयाचे काय? असे असेल तर आम्ही या सभागृहात बसणार नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सभागृहात एक प्रश्न विचारला आणि त्या अनुषंगाने काही माहिती दिली, त्यावेळी मी मंत्री महोदयांना असे सूचित केले की, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी जी माहिती दिलेली आहे ती तक्रार आहे असे समजून त्यासंबंधीची चौकशी करण्यात यावी. मंत्री महोदयांनी या ठिकाणी माहिती देण्याचा प्रयत्न केला. तसेच या अनुषंगाने त्यांनी असेही सांगितले की, या सभागृहामध्ये या संबंधीचा व्यापक कायदा करावयाचा आहे. त्या कायद्याच्या अनुषंगाने या सभागृहात चर्चा होणार आहे. या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी त्यांचे मत व्यक्त करावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13050.....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ज्यावेळी आम्ही एखादा विषय सभागृहात आग्रहाने मांडतो, त्यावेळी त्यामध्ये तथ्य असते. मंत्री महोदय, श्री. राणे साहेबांसारख्या एका वरिष्ठ मंत्र्यांनी सहकारी मंत्र्यांना मदत करणे हे आवश्यक आहे, अशी मदत करावी. पण माननीय सभापतींनी तपासून चौकशी करण्यात यावी असे सांगितल्यानंतर मंत्री महोदया थांबल्या असत्या तर तो विषय संपला असता. पण त्यानंतर मंत्री महोदयांनी त्यांच्याकडे आलेली फाईल वाचून दाखविली. असे दोन प्रस्ताव आले होते, पण त्यामध्ये वाढ झालेली नाही, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे आम्ही असे म्हटले की, या प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात 28 टक्के फी वाढ केलेली आहे असे म्हटले आहे. सभापती महोदय, या विषयावर आम्ही बोललो आणि मंत्री महोदयांनी असे म्हटले की, बोलूच नका तर आम्ही सभागृहात चुकीचे रेकॉर्ड होऊ द्यावयाचे काय, दर वेळी श्री. राणे साहेबांनी येऊन मंत्री महोदयांना वाचवावयाचे आणि आम्ही गप्प बसावयाचे काय, आमचे म्हणणे चुकीचे आहे काय? सभापती महोदय, एखाद्या विषयाची माहिती नसेल तर आम्ही समजू शकतो. पण ज्या वेळी मंत्री महोदयांनी असे सांगितले की, दोन वेळा असे प्रस्ताव आले पण फी वाढ झालेली नाही. पण लेखी उत्तरात फी वाढ झालेली आहे असे म्हटले आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी यासंदर्भातच मुद्दा उपस्थित केला होता. आमचे म्हणणे सुध्दा तेच आहे. जर आम्हाला या बाबतीत बोलू दिले जाणार नसेल तर आमची अडचण होते.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, फी वाढ झालेली नाही. मी या संदर्भात चुकीचे सांगितलेले नाही. त्यांनी फी वाढ केली होती परंतु शासनाने हस्तक्षेप केल्यानंतर त्यांनी ती परत घेतली आहे.

श्री. विनोद तावडे : फी वाढ केलेली आहे असे लेखी उत्तरात दिलेले आहे.

श्री. नरायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री उत्तर देत असतांना सन्माननीय सदस्य जर एखाद्या ठिकाणची वस्तुस्थिती सांगत असतील तर या सदनाची अशी परंपरा आहे की, त्या संबंधी चौकशी करुन, तपासून, योग्य कारवाई करावी. या पलीकडे जाऊन मी काही म्हटलेले नाही.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप पनवेलची घटना सांगत असतील, त्यासंबंधी तक्रार आली असेल, त्याची दखल घेतली नसेल तर त्या संदर्भात मंत्री महोदयांनी सांगितले की, त्यासंबंधी तपासणी करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल. त्यामध्ये चुकीचे काहीच नाही. त्यांनी दखल घेतली नाही असे नाही. त्या नंतर माननीय मंत्री महोदया असे म्हणाल्या की, यासंबंधी काही मुद्दा उपस्थित केला असेल तर योग्य ती तपासणी करुन त्या शाळेसंबंधात कारवाई करावयाची आहे. सभापती महोदय, माननीय मंत्री महोदया वारंवार त्या शाळेचा उल्लेख करुन सांगत आहेत. त्या शाळेने फी वाढ केली होती, प्रस्ताव आला होता तो परत घेतला, यापेक्षा सदस्यांनी वेगळी माहिती दिली तर चौकशी करुन कारवाई करणे हे शासनाचे काम आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आदरणीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे साहेबांना सांगू इच्छितो की, माझे जे म्हणणे होते त्यासंदर्भात माननीय सभापतींनी ती तक्रार समजून मंत्री महोदयांनी कारवाई करावी असे आदेश दिले. त्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले. सदस्य म्हणून माझी ही दुसरी टर्म आहे. येथील प्रथा परंपरा मला माहीत आहेत. परंतु सगळे सन्माननीय सदस्य वेड्यासारखे प्रश्न विचारतात असा संदेश जाता कामा नये. या प्रश्नाला शासनानेच या ठिकाणी उत्तर दिलेले आहे. आपल्या खात्याने या ठिकाणी चुकीचे उत्तर दिलेले आहे, हे मान्य करता. तेच जर आम्ही दाखवून दिले तर तो आमचा उद्धटपणा होत असेल किंवा आमचे म्हणणे अयोग्य असेल तर आपणच न्याय द्यावा. त्यांचे उत्तर चुकीचे आहे हे सभागृहात लक्षात आणून दिले तर ते अयोग्य आहे काय, याबाबत आपण आम्हाला सांगावे म्हणजे पुढच्या वेळी आम्ही असे प्रश्न विचारणार नाही.

**सभापती** : सन्माननीय राज्यमत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, आपण नंतर असे उत्तर दिले की, जी 28 टक्के फी वाढ केली होती ती त्यांनी परत घेतली. आपल्या उत्तरामध्ये अशी फी आकारणी झाली नाही असे उत्तर यावयास पाहिजे होते किंवा ती आकारलेली फी त्याचवेळी परत घेतली असे म्हणावयास पाहिजे होते. तसे म्हटले असते तर ते बिनचूक उत्तर झाले असते. या दृष्टीने आपण काटेकोरपणे काळजी घेणे जरुरीचे आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, होय.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## रस्ता सुरक्षेबाबतचा विषय शालेय अभ्यासक्रमात घेणेबाबत

**(४) * १३६२७ श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे , श्री.सय्यद पाशा पटेल , डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवसेंदिवस वाढते रस्ते अपघात हा केवळ वाहतुक पोलिसांचा विषय न राहता आम जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न बनल्याने त्यावर तोडगा काढण्यासाठी "रस्ता सुरक्षा" हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात यावा अशी विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता :** (१) हे खरे आहे.

(२) राज्य अभ्यासक्रम आराखडा समिती समोर सदर विषय ठेवण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, रस्ता सुरक्षेबाबतचा विषय शालेय अभ्यासक्रमामध्ये घेण्याबाबतचा माझा प्रश्न आहे. दिवसेंदिवस वाढणारी वाहनांची संख्या, प्रचंड प्रमाणात होत असलेले अपघात, वाढणारी प्रवाशांची संख्या अशा अनेक गोष्टी सगळ्यांना भेडसावत आहेत. शालेय अभ्यासक्रमामध्ये त्याचा अंतर्भाव झाला तर निश्चितपणे रस्ता सुरक्षा करता यावी या दृष्टीने त्याचा उपयोग होईल. या ठिकाणी शासनाने असे उत्तर दिले आहे की, राज्य अभ्यासक्रम आराखडा समितीसमोर सदर विषय ठेवण्यात आलेला आहे. राज्य अभ्यासक्रम आराखडा समितीसमोर हा विषय ठेवण्यात आला असला तरी अपघात वाढत जातील, अनेक गोष्टी होत होतील त्यामुळे हा विषय पुढील शालेय अभ्यासक्रमामध्ये येईल का ? राज्य अभ्यासक्रम आराखडा समितीसमोर हा विषय ठेवण्यात आलेला आहे म्हटल्यानंतर अनेक वर्षे तो विषय तसाच राहू शकतो. त्यामुळे निश्चितपणे पुढील शैक्षणिक वर्षाच्या शालेय अभ्यासक्रमामध्ये हा विषय येईल का ? या ठिकाणी शासनाने दिलेले उत्तर सकारात्मक आहे पण त्याचा अंतर्भाव करावयाचा असेल तर तातडीने हा विषय अभ्यासक्रमामध्ये घेण्याची आवश्यकता आहे. याबाबत शासन कार्यवाही करणार का ?

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13627 .....

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या प्रश्नाला दिलेले उत्तर स्पष्ट आहे. सन्माननी सदस्यांनी सकारात्मक सूचना केली की, अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना याची माहिती होणे आवश्यक आहे. आपण राज्य अभ्यासक्रम आराखडा, 2010 तयार करीत आहोत. त्याचा मसुदा संकेतस्थळावर ठेऊन याबाबत लोकांची मते मागितलेली आहेत. पण या सारखे इतर विषय सुध्दा महत्वाचे आहेत की, जे अभ्यासक्रमामध्ये अंतर्भूत करणे गरजेचे आहे. ते करताना अवश्य याचा विचार होईल. शासन त्या प्रक्रियेमध्ये आहे.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

**राज्यातील अनुदानित शाळांचे बंद करण्यात आलेले वेतनेत्तर अनुदान पुन्हा सुरु करण्याबाबत**

**(५) * १३६३३ श्री.सतीश चव्हाण , श्री.एम.एम.शेख, श्री.विक्रम काळे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.रामनाथ मोते, श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो गाणार, श्री.संजय केळकर , श्री.दिपकराव साळुंखे , श्री.रमेश शेंडगे , श्रीमती उषाताई दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.धनंजय मुंडे , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.अमरीशभाई पटेल , श्री.सुरेशदादा देशमुख , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.जयप्रकाश छाजेड , डॉ.सुधीर तांबे , श्री.सुभाष चव्हाण , श्री.हुसेन दलवाई , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.महादेवराव महाडिक , श्री.कपिल पाटील , श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १२१३५ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे बंद करण्यात आलेले वेतनेतर अनुदान पुन्हा सुरु करण्याबाबत मंत्रिमंडळ उपसमितीचा अहवाल आता शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(२) असल्यास उक्त अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांचे वेतनेतर अनुदान मागील ७ वर्षापासून शासनाने बंद केल्याने त्या निधी अभावी अडचणीत आल्या आहेत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यांना आतापर्यंत प्रदान न केलेला निधी तातडीने देऊन निधी अभावी शाळा बंद पडू नयेत म्हणून शासन स्तरावर काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, प्रश्न भाग (२) व (४) नुसार होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता :** (१) मंत्रिमंडळ बैठक दि.२४/११/२००९ मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सन २००४-०५ पासून वेतनेतर अनुदान बंद करण्यात आलेले आहे.

(२), (३), (४) व (५) धोरणात्मक बाब असून विभागाचा प्रस्ताव मंत्रिमंडळास सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनामध्ये असेच उत्तर आले होते. वेतनेतर अनुदान सुरु करण्याबाबत किती दिवसात शासन निर्णय घेणार आणि हा विषय मंत्रिमंडळासमोर केव्हा आणणार ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13633.....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा देखील महत्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाचे निवारण होणे अत्यंत आवश्यक आहे असे मला स्वत:ला वाटते. हा विषय सुध्दा मंत्रिमंडळासमोर ठेवलेला आहे. सुरुवातीला मी सांगितले आहे की, 4-5 महत्वाचे प्रश्न आहेत ते एकत्रितपणे सोडविण्यासाठी शासनाच्या माध्यमातून प्रयत्न होत आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये विसंगती आहे. पहिल्या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आले आहे की, "मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सन 2004-05 पासून वेतनेतर अनुदान बंद करण्यात आलेले आहे." मा.हायकोर्टात व या सभागृहात निधीच्या उपलब्धतेनुसार निर्णय घेतला जाईल असे सांगितले होते. हा निधी केव्हा दिला जाणार आहे, एवढाच प्रश्न आहे. मंत्रिमंडळाने वेतनेतर अनुदान बंद केलेले आहे असे लेखी उत्तरात नमूद केले असल्यामुळे वस्तुस्थिती काय आहे ? शासनाने वेतनेतर अनुदान बंद केल्यामुळे राज्यातील 80 टक्के शाळा चालू शकणार नाहीत. कारण त्यांच्याकडे उत्पन्नाचा अन्य कोणताही स्त्रोत नाही. त्या शाळा केवळ शालेय कामकाज चालवू शकतील. परंतु खडू, फळा, प्रयोगशाळा, इमारत दुरुस्ती, देखभाल याबाबतचे प्रश्न सुटणार नाही. मंत्रिमंडळाने कोणता निर्णय घेतला, मा.हायकोर्टासमोर काय सांगण्यात आले आणि या शाळा कशाप्रकारे चालविल्या जाणार आहेत या तिन्ही प्रश्नांची उत्तरे मंत्री महोदयांनी द्यावीत.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, दिनांक 22 जानेवारी, 2008 रोजी मंत्रिमंडळासमोर आला होता. त्यावेळी मंत्रिमंडळ उपसमितीने याबाबतचे निकष तयार करण्याचा निर्णय घेतला गेला. पाचवा वेतन आयोगानुसार 4 टक्के वेतनेतर अनुदान व 1 टक्के इन्फ्रास्ट्रक्चरसाठी अनुदान असावे असे उपसमितीने निकष सुचविले. उपसमितीने निश्चित केलेले निकष मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात आले असून उपसमितीच्या निकषानुसार हे अनुदान द्यावे की आणखी काय करावे हे मंत्रिमंडळाच्या बैठकीतच ठरविले जाणार आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

ता.प्र.क्र.13633.....

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, शिक्षण विभागातील जे कर्मचारी आहेत. विशेषत: अवर सचिव, उप सचिव हे अतिशय कार्यक्षम आहेत. त्यांनी कदाचित हिंदी गाणे ऐकलेले असावे. 'एक सवाल तुम करो, एक सवाल हम करे. हर सवाल का जवाब सवाल ही हो.' कशातून काही निघणार नाही आणि आम्ही काही झाले तरी काम करणार नाही असा त्यांचा पण आहे. गरीब वर्गातील सर्व मुले शिक्षण घेऊ शकणार नाही अशी व्यवस्था ही मंडळी करीत आहेत. या लोकांना गरिबांचे काही घेणे देणे नाही. शाळांना वेतनेतर अनुदान देणार नाही, ग्रंथालयांना अनुदान देणार नाही, शाळांच्या इमारतीचे भाडे देणार नाही, वीज बिल देणार नाही, खेळासाठी काही देणार नाही, मग या शाळा कशा चालविणार ? म्हणजे श्रीमंतांकडून पैसे उकळून शाळा चालवाव्या नाही तर शाळा चालवू नका असा संदेश यातून दिला जात आहे असे माझे म्हणणे आहे. यासंबंधी मी मंत्री महोदयांना दोष देणार नाही, त्या चांगल्या प्रकारे उत्तरे देतात. कारण त्या स्वत: शाळा चालवितात. पण कोठे तरी सरकारचे धोरण बदलणे आवश्यक आहे. बाकीच्या सर्व गोष्टींसाठी सरकारजवळ पैसे आहेत. साखर कारखाने बंद पडले तर 300 कोटी रुपये देण्याबाबत सरकार निर्णय घेते. परंतु शाळांना अनुदान दिले जात नाही. यासंबंधी शासन ताबडतोब निर्णय घेणार आहे का, प्रत्येक शाळांचे अनुदान दिले जाणार आहे का, त्यासंबंधी निर्णय होणार आहे का ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी मी स्वत: सहमत आहे. यासंबंधी ताबडतोब या प्रश्नासंबंधी निर्णय व्हावा यासाठी मी सुरुवातीलाच सांगितले आहे. हे जे 5-6 महत्वाचे प्रश्न आहेत ते प्रश्न सोडविण्याची शासनाची इच्छा आहे. त्यामुळे आज सकाळी माननीय वित्त मंत्री व उप मुख्यमंत्री यांच्याबरोबर माननीय मंत्री श्री.दर्डा साहेब आणि मी एकत्रित बसून चर्चा केली आहे. या सर्व विषयासंबंधी एकत्रितपणे निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. हा प्रश्न सोडवित असताना शासनावर किती आर्थिक भार पडणार आहे, त्यासाठी काय करावे लागेल.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर श्री.शिगम.....

या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री उप मुख्यमंत्री आणि विभागाचे मंत्री, आम्ही एकत्रपणे दोन-तीन बैठका घेऊन हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहोत. ज्या सन्माननीय सदस्यांना या बैठकीस हजर राहावे असे वाटत असेल त्यांना देखील बैठकीसाठी बोलावण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : माननीय मंत्री महोदया मघाच पासून बैठका घेऊ, बैठका घेऊ असे म्हणत आहेत. किती बैठका त्या घेत आहेत ? त्यांनी कधी तरी जोर देखील मारावेत. जिल्हा परिषदेच्या शाळांना विजेचे कमर्शियल बिल आकारले जात आहे हे मंत्री महोदयांना माहीत आहे काय ? जिल्हा परिषदेच्या शाळातील वीज खंडित आहे. ही परिस्थिती केवळ जिल्हा परिषदांच्याच शाळामध्ये नाही तर अन्य शाळांमध्ये देखील आहे. आपले अर्थमंत्री हेच ऊर्जा मंत्री आहेत. या शाळांना कमर्शियल बिल आकारु नका एवढा तरी दबाव त्यांच्यावर आणावा. वेतनेतर अनुदान का दिले जात नाही असे विचारले असता सांगितले जाते की, हे सामाजिक काम असल्यामुळे समाजाकडून यासाठी निधी उभा करावयास पाहिजे. मग हे सामाजिक काम असेल तर माननीय ऊर्जा मंत्री हे सामाजिक काम आहे असे का मानत नाहीत, ते कमर्शियल बिल का लावतात, या बाबतीत आपण निर्णय घेणार आहात काय, की पुन्हा बैठका घेणार ? मंत्रिमंडळापुढे जाण्याची कार्यवाही काय असते हे देखील एकदा आम्हाला समजून सांगावे. ही कार्यवाही 2 महिन्याची असते की 6 महिन्याची असते ?

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांची वीज आकरणीबाबत जी काही माहिती दिली ती तपासून पाहून त्याबाबतीत निर्णय घेऊ. कॅबिनेटपुढे जाण्यासाठी प्रक्रिया सुरु केलेली आहे. म्हणून मी हे सांगितलेले आहे की, माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री आणि शिक्षण मंत्री यांची बैठक झाल्यानंतर तो प्रस्ताव लवकर मंत्रिमंडळापुढे येईल.

डॉ. नीलम गो-हे : प्रश्न भाग (1)ला दिलेल्या उत्तरातील वाक्याचा अर्थबोध होत नाही. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "मंत्रिमंडळ बैठक दि. 24.11.2009 मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सन 2004-2005 पासून वेतनेतर अनुदान बंद करण्यात आलेले आहे." सन 2009च्या बैठकीमध्ये 2004-2005 पासूनचा निर्णय कसा काय घेण्यात आला या खुलासा मंत्री महोदय करतील काय ? माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी या प्रश्नाच्या उत्तरावर थोडासा प्रकाश टाकावा.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : उत्तराच्या भाग (1) मधील दिनांक 24.11.2009 नसून तो 24.11.2001 असा आहे.

श्री. नारायण राणे : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी माझ्या नावाचा उल्लेख केला म्हणून मी एवढेच सांगू इच्छितो की, याबाबतीत शासनाची चूक आहे. या ठिकाणी वारंवार उल्लेख होत आहे म्हणून मी निदर्शनास आणू इच्छितो की, मंत्रिमंडळासमोर एखादा ठराव येतो असा उल्लेख प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये केला जात नाही. तसेच उत्तर देताना मंत्री हे शासन म्हणून उत्तर देतात. "त्यामुळे शासन निर्णय घेईल" असे उत्तर यावयास पाहिजे. या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये वारंवार मंत्रिमंडळाचा उल्लेख होतोय. परंतु "शासन यासंबंधीचा निर्णय घेईल" असे छापील उत्तर यावयास पाहिजे होते. सन्माननीय सदस्यांनी जी बाब येथे निदर्शनास आणली ती देखील बरोबर आहे. प्रशासकीय उत्तरामध्ये झालेल्या चुकांच्या बाबतीत मी अधिका-यांना सभागृहाच्या बाहेर गेल्यानंतर सांगणारच होतो. प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये "मंत्रिमंडळा समोर सादर करण्यात येत आहे" असा उल्लेख करण्यात आलेला आहे. विधिमंडळात अहवाल सादर केल्याचा उल्लेख देखील प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये येतो. सभापती महोदय, असे घडता कामा नये, असे वाटते.

श्री. विक्रम काळे : शिक्षणासारख्या महत्वाच्या प्रश्नाकडे सरकार किती गांभीर्याने पहात आहे हे आपल्या लक्षात आलेले आहे. सन 2008मध्ये तत्कालीन शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाने उपसमिती नेमली.

...नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

या उपसमितीमध्ये डॉ.पंतगराव कदम, श्री.दिलीप वळसे-पाटील, श्री.जयंत पाटील हे तत्कालीन शासनामधील वजनदार मंत्री होते. या उपसमितीने 2008 मध्ये ज्या शिफारशी केल्या त्या शिफारशींच्या अनुषंगाने वेतनेतर अनुदान सुरु करण्याचा निर्णय हे अधिवेशन संपण्यापूर्वी घेण्यात येऊन शासनाकडून या राज्यातील ग्रामीण भागातील मराठी शाळांना न्याय देण्यात येईल काय?

प्रा.फौजिया खान : या विषयाला न्याय देण्यासाठी शासन जे काही करणार आहे ते यापूर्वीच मी सभागृहात सांगितले आहे. सभागृहाची जी भावना आहे तीच शासनाची देखील आहे.

**सभापती** : मी आता पुढील प्रश्न पुकारीत आहे.

....(गोंधळ)...

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हा गंभीर प्रश्न आहे. वेतनेतर अनुदान न मिळाल्यास शाळा बंद पडतील.

**सभापती** : अशा पध्दतीने माननीय सदस्यांकडून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न केला जातो त्यामुळे प्रश्नोत्तराच्या संपूर्ण तासाभरात चार प्रश्न देखील उत्तरित होत नाहीत. कृपया माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री.कपिल पाटील : ग्रामीण भागातील हजारो शाळांना वेतनेतर अनुदान मिळालेले नाही. शासन यासंबंधी ठोस उत्तर द्यायला तयार नाही, याबद्दल आम्ही शासनाचा निषेध करुन सभात्याग करीत आहोत.

(माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, वसंतराव खोटरे यांनी बहिर्गमन केले)

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**घुंगशी (ता.मुर्तिजापूर,जि.अकोला) येथील भाऊसाहेब देशमुख कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याबाबत दिलेली नियमबाह्य मान्यता**

**(६) * १३३५६ डॉ.रणजित पाटील , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.केशवराव मानकर , श्री.भगवान साळुंखे** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील वऱ्हाड बहुउद्देशीय संस्था, अकोला या संस्थेला सन २००८-०९ घुंगशी (ता.मुर्तिजापूर,जि.अकोला) येथील भाऊसाहेब देशमुख कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याची दिनांक २३ जुलै, २००९ रोजी नियमबाह्य मान्यता देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाविद्यालय सुरु करण्यासाठी शासनास सादर केलेल्या प्रस्तावातील अनुक्रमांक ६,७,८ आणि ११ नुसार खोटी माहिती दिल्याचे तसेच दिनांक २९ एप्रिल, २००८ आणि १५ मे, २००८ च्या शासन निर्णयाचे उल्लंघन करण्यात आले असून, १० कि.मी. ची शासनाची अट पूर्ण करण्यात आल्या नसल्याच्या तक्रारी शिक्षणाधिकारी (माध्य) अकोला यांच्याकडे करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) तसेच सदर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदर महाविद्यालयाची मान्यता रद्द करण्यासंबंधी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

(२) या संदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अकोला यांच्याकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) अध्यक्ष, पयोष्णी शिक्षण संस्था, घुंगशी, ता.मुर्तिजापूर,जि.अकोला यांनी मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात या संदर्भात रिट याचिका दाखल केली होती. या याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सुनावणी घेऊन निर्णय घेण्यात आला आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन २००८-०९ मध्ये कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्यासाठी शासनाकडे अर्ज प्राप्त झाले होते. सदर अर्जात वादातीत अर्जामधील रकाना क्रमांक ६, ७, ८ व ११ मध्ये जी माहिती नमूद केली आहे ती खरी आहे काय? या प्रस्तावात दिलेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी समुचित अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडले होते काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, वऱ्हाड बहुउद्देशीय शिक्षण संस्था, मूर्तिजापूर, जि.अकोला यांना प्रोसीजर फॉलो करुन महाविद्यालय सुरु करण्यास रितसर परवानगी देण्यात आली आहे. पयोष्णी शिक्षण संस्थेने कोर्टात केस दाखल केली. त्या केसमध्ये कोर्टाने असे आदेश दिले होते की, सचिव स्तरावर सुनावणी घेऊन दिलेली मान्यता योग्य आहे की नाही हे

..३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठरविण्यात यावे. त्यानुसार प्रधान सचिवांनी दिनांक २७.९.२०१० व ४.१०.२०१० रोजी दोन्ही संस्थांच्या अध्यक्षांना बोलावून सुनावणी घेतली आणि कनिष्ठ महाविद्यालयाची मान्यता त्यांनी कायम ठरविली. दोन्ही कॉलेजमध्ये १४ कि.मी.चे अंतर आहे असे गृहित धरले आहे. किमान १० कि.मी.अंतर असले पाहिजे. शिक्षण उपसंचालक, अमरावती व शिक्षणाधिकारी, अमरावती यांचा रिपोर्ट असा आहे की, दुसऱ्या कॉलेजवर याचा परिणाम होत नाही. दोन्ही जिल्हा समिती आणि राज्य समिती यांचे अहवाल पॉझिटिव्ह आहेत. यासाठी त्यांनी ती परवानगी रिटेन केली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रणजित पाटील यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो ते ज्या ठिकाणी राहतात त्या मूर्तिजापूर तालुक्यातील आहे. कॉलेजचा प्रस्ताव सादर करीत असताना त्या प्रस्तावातील अ.क्र.६,७,८ व ११ या कॉलममध्ये खोटी माहिती दिली गेली. त्याचबरोबर १० कि.मी.अंतराची शासनाची अट होती, त्या अटीची पूर्तता करण्यात आली नाही.

नंतर एम.१..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आम्ही सभागृहात अत्यंत जबाबदारीने विधान करीत आहोत. यासंबंधी अनेक वेळा तक्रारी झाल्या पण कोणतीच कारवाई झालेली नाही. खालपासून वरपर्यंत पैशाचा दुरुपयोग करुन अशा प्रकारे खोटी प्रमाणपत्रे मिळविण्यात आली आहेत. आम्ही माहितीच्या अधिकारामार्फत माहिती घेतल्यानंतर सेक्शन 6, 7, 8 व 11 अन्वये दिलेली माहिती बोगस असल्याचे सिध्द झालेले आहे. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सन्माननीय सदस्य श्री. रणजित पाटील यांच्या गावातीलच ही संस्था असून त्यांनी दिलेली माहिती सत्य समजून या प्रकरणाची पुन्हा विशेष अधिकाऱ्यामार्फत शासन चौकशी करुन त्यात तथ्य आढळून आले अथवा सिध्द झाले तर या संस्थेवर शासन कारवाई करणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, आपण सभागृहात नेहमीच सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती सत्य समजून कार्यवाही करीत असतो. आता देखील सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी आहे असे समजून पुन्हा एकदा विभागामार्फत चौकशी करुन ....अडथळा.....

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, अगोदरची चौकशी ही विभागानेच केलेली असल्याने पुन्हा विभागामार्फत चौकशी केल्यानंतर त्यात काहीच आढळून येणार नाही व या प्रकरणाला न्याय मिळणार नाही. मी विशेष अधिकाऱ्यामार्फत चौकशी करण्याची मागणी केलेली आहे.

प्रा. फौजिया खान : महोदय, सन्माननीय सदस्यांनी माहिती दिल्याप्रमाणे जे सेक्शन चुकीचे अथवा बोगस आहेत त्यांच्या संबंधीची चौकशी विभागामार्फत करण्यात येईल आणि आवश्यकता वाटली तर पुन्हा हिअरिंग घेऊन या प्रकरणाला न्याय मिळेल यादृष्टीने प्रयत्न करण्यात येईल. कारण आम्ही जी आकडेवारी मागितली आहे त्यात सन्माननीय सदस्य ज्या संस्थेबद्दल बोलत आहेत त्या संस्थेत सन 2008-09 मध्ये 164 एवढी पट संख्या होती, सन 2009-10 मध्ये 162 एवढी पटसंख्या होती तर सन 2010-11 मध्ये 165 एवढी पट संख्या होती. सन 2008-09 मध्ये जी पट संख्या होती त्यावेळेस जवळपास दुसरे कोणतेच कॉलेज नव्हते. नंतर कॉलेज झाल्यावर देखील या पट संख्येवर परिणाम झालेला नाही हे प्रायमाफेसी दिसून येते. म्हणून ही संपूर्ण माहिती तपासून घेण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---

....2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**प्रश्नोत्तराच्या तासासंबंधी**

**सभापती** : माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये किमान 10 ते 12 प्रश्नांवर चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते. पण गेल्या दोन तीन दिवसांचे कामकाज पाहिले तर असे दिसून येते की, एक-दोन प्रश्नावरील चर्चेला 20-20 मिनिटांचा कालावधी लागतो, त्यामुळे संपूर्ण तासात फक्त 5-6 प्रश्नच चर्चेला येतात. त्यानंतरचे प्रश्न कितीही महत्वाचे असले तरी ते चर्चेला येऊ शकत नाहीत, आपण त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतो पण तोपर्यंत वेळ संपून जातो. या अनुषंगाने नियम समितीची बैठक बोलावून तेथे या बाबतची चर्चा करावी लागेल. तसेच कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत देखील हा प्रश्न उपस्थित करुन यातून मार्ग काढणे क्रमप्राप्त ठरते. त्याशिवाय आपल्याला प्रश्नोत्तराच्या यादीतील 10-12 प्रश्नांपर्यंत जाणे शक्य होणार नाही. आज या सभागृहात काही बाबींचा उल्लेख झालेला आहे की, प्रश्नोत्तराच्या तासाला अन्य प्रश्नाच्या अनुषंगाने अथवा एखाद्या बाबीसंबंधी शासनाकडून येणारी माहिती बिनचूक असली पाहिजे 100 टक्के करेक्ट असली पाहिजे. याची जबाबदारी खरे तर त्या विभागाच्या अधिकाऱ्यांचीच असते. एखादी माहिती चुकीची आहे असे दिसून आले तर त्या अनुषंगाने संबंधित मंत्री महोदयांनी अशी चुकीची माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. कारण सभागृहाचा बराच वेळ अशा विषयात वाया जात असतो. म्हणून विभागाकडून बिनचूक माहिती मिळेल याची काळजी घेण्याची गरज आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

मघाशी सन्माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांनी सूचित केले आहे ते खरे आहे. शासनाचा कोणताही निर्णय असेल तर तो येथे सांगितला गेला पाहिजे. मंत्रिमंडळाचा निर्णय किंवा अन्य निर्णयाच्या संदर्भात तुम्ही तुमच्या पध्दतीने बघा. परंतु शासनाचा हा निर्णय अद्यापि झालेला नाही, होतो आहे, प्रयत्न चालू आहेत अशा प्रकारे जे सांगितले जाते त्याकडे सुध्दा आपण लक्ष देण्याची आवश्यकता आहे.म्हणून सन्माननीय मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, त्यांनी सुध्दा यासंदर्भात काळजी घेणे महत्वाचे आहे.

डॉ. दीपक सावंत : आदरणीय सभापती महोदय, आपण भाष्य केल्यानंतर त्यावर पुन्हा भाष्य करणे योग्य नाही, हे जरी खरे असले तरी मी आपल्या निदर्शनास एक गोष्ट आणून देऊ इच्छितो की, सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यासाठी सन्माननीय सदस्य 40 दिवस अगोदर प्रश्न देत असतात, यासंदर्भात सर्व तयारी केली जाते. जर सदस्यांना प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांकडून व्यवस्थित मिळाले नाही तर या प्रश्नाची तड कशा प्रकारे लागेल या संदर्भात लोकप्रतिनिधीकडे लोक बघत असतात. खरे म्हणजे त्याचसाठी आमचा आग्रह आणि अट्टाहास असतो, मंत्र्यांना अडचणीत आणण्याचा आमचा अट्टाहास नसतो. त्यामुळे आम्ही आपल्याकडून अशी अपेक्षा करतो की, कमीतकमी ज्या मंत्र्यांकडून अशा प्रकारची उत्तरे सभागृहात येतात त्यांना समज देण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या व आरोग्याच्या प्रश्नाच्या बाबतीत हा प्रकार सातत्याने घडत आहे. त्यामुळे या विषयासंदर्भात आपण आम्हाला संरक्षण द्यावे अशी विनंती आहे.

**सभापती** : मी सर्व मंत्री महोदयांना सांगितले आहे की, सन्माननीय सदस्य जो प्रश्न विचारतात त्या प्रश्नाचे उत्तर अचूक असले पाहिजे, बिनचूक असले पाहिजे. या ठिकाणी सन्माननीय राज्य मंत्र्यांनी जी उत्तरे दिलेली आहेत त्या अनुषंगाने मी त्यांना समज देणार नाही. परंतु त्यांना मी जरुर सूचना देईन की, सभागृहात उत्तर देत असतांना विभागाचे लेखी उत्तर देखील बिनचूक असण्यासाठी मंत्री महोदयांनी सुध्दा काळजी घेण्याची आवश्यकता आहे. संबंधित मंत्री काळजी घेतील असे मला वाटते.

श्री. विनोद तावडे : प्रश्नोत्तराच्या संदर्भात आपण नियम समितीच्या बैठकीमध्ये विचार करणार आहात. परंतु या बैठकीच्या आधी विरोधी पक्षाकडून व मंत्र्यांच्या अपु-या उत्तरामुळे प्रश्नोत्तराचा वेळ किती



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

वाया गेलेला आहे याचीही माहिती घेतली तर चांगले होईल. आमच्याकडून काही चूक होत असेल तर आम्ही ती चूक दुरुस्त करु परंतु मंत्री महोदयांकडून चूक होत असेल तर ती सुध्दा दुरुस्त होण्याची आवश्यकता आहे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आज इंडिया टूडेच्या मेल टूडे मध्ये एक आर्टीकल छापून आलेले आहे. या आर्टीकलमध्ये हसन अलीचा उल्लेख असून त्यामध्ये 3 माजी मुख्यमंत्र्यांची बदनामी करण्यात आलेली आहे. महाराष्ट्राच्या तीन माजी मुख्यमंत्र्याचा पैसा हसन अलीने हवाला द्वारे शेअर बाजारात आणला आहे असे अर्टीकलमध्ये म्हटले आहे. हसन अली म्हणतो की, हजारो कोटी रुपये स्वीस बँकेत व अन्य बँक खात्यात ठेवण्यात आलेले आहेत. राज्यकर्ते, नोकरशहा यांचे पैसे आहेत. यामध्ये महाराष्ट्राच्या 3 मुख्यमंत्र्यांच्या पैशाचा समावेश आहे. 90 च्या दशकाच्या शेवटी व सन 2000 च्या सुरुवातीला शेयर मार्केटमध्ये मोठया प्रमाणात पैसा आला असे हसन अलीचे म्हणणे आहे. हसन हली पुढे असे म्हणतो की, मी काही राज्यकर्ते व सनदी अधिका-यांच्या संपर्कात आलो व नंतर त्यांचे-माझे घनिष्ट संबंध झाले मी अनेक वेळा राज्यकर्ते व सनदी अधिका-यांचा पैसा माझा नफा घेऊन शेयर बाजारात गुंतवला. या आर्टीकलची एक प्रत मी आपल्याला देणार आहे. हसन अलीने जे वक्तव्य केलेले आहे ते महाराष्ट्राच्या सनदी अधिका-यांच्या तसेच महाराष्ट्राच्या माजी तीन मुख्यमंत्र्यांच्या संदर्भात केलेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या माध्यमातून महाराष्ट्राच्या राजकारण्यासंबंधी वाईट मेसेज गेलेला आहे. तेव्हा हे तीन मुख्यमंत्री, राज्यकर्ते आणि सनदी अधिकारी कोण आहेत यासबंधी शासनाच्या वतीने खुलासा करण्यात आला पाहिजे. या लोकांचे हजारो कोटी रुपये हसन अलीच्या माध्यमातून शेअर मार्केटमध्ये पैसे आलेले असतील व स्वीस बॅकेत गेले असतील तर महाराष्ट्राच्या दृष्टीने ही बाब अत्यंत नामुष्कीची आहे म्हणून या औचित्याच्या मुद्याबाबत आपण शासनाला खुलासा करण्याबाबत आदेश द्यावेत अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय,सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी औचित्याचा मुद्दा मांडला आहे. काल रात्रभर मला सारखा प्रश्न पडत होता की,श्री. देशभ्रतार सारख्या अतिशय चांगल्या व मागासवर्गीय अधिका-याविरुध्द अत्यंत तडकाफडकी कारवाई करण्याचे कारण हेच आहे काय ?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी औचित्याचा मुद्दा मांडला असतांना त्यावर सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे पुन्हा कसे बोलू शकतात ?

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी दिली होती.वास्तविक सर्वसाधारण पध्दत अशी आहे की ,ज्या सन्माननीय सदस्यांना औचित्याचा मुद्दा मांडावयाचा असतो त्यांच्याकडून त्याबाबतीत अगोदर सभापतींना कळविले जाते आणि त्यानंतरच सन्माननीय सदस्य औचित्याचा मुद्दा मांडतात.सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना काही वेळा मी येथे डायरेक्ट औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी देतो त्याप्रमाणे येथे त्यांनी औचित्याचा मुद्दा मांडला आहे. आता त्यावर कोणी भाष्य करणे बरोबर होणार नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : माझ्या औचित्याच्या मुद्याबाबत आपण शासनाला सूचना द्यावी.

**सभापती** :सन्माननीय मंत्री श्री. राजेंद्र दर्डा यांनी खुलासा करावा.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी या ठिकाणी काही आरोप केले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर :मी आरोप केलेले नाहीत.

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा : मला बोलू द्यावे.हा विषय महत्वाचा आहे परंतु त्या बाबतीत मी विरोधी पक्ष नेत्याकडून काही माहिती घेत आहे.

( गोंधळ )

श्री.विनोद तावडे : माजी मुख्यमंत्री लुटत आहेत.

श्री.राजेंद्र दर्डा :या विषयाच्या डिटेलमध्ये मी गेलो नाही या विषयाच्या संदर्भात मला त्यांच्याकडून काही माहिती हवी आहे....सन्माननीय विरोधी पक्ष नेते या ठिकाणी काही बोलले आहेत. "त्यांनी आरोप केले होते हे शब्द " मी मागे घेतो व माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माहिती दिली असे मी म्हणतो. या प्रकरणामध्ये महाराष्ट्राचे तीन माजी मुख्यमंत्री गुंतलेले आहेत. असे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी वाचून दाखविले . मी त्यांच्याकडून माहिती घेऊ इच्छितो की ही माहिती त्यांना कोठून मिळाली ? त्यांनी जे वाचून दाखविले ते शासकीय डॉक्युमेन्टमधील आहे काय ? एखाद्या मासिकामध्ये, एखाद्या साईटवर वा एखाद्या वृत्तपत्रात बातमी आली की त्या अनुषंगाने कोणावरही आरोप करणे हे कितपत योग्य आहे.?

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात ).

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पाइंट ऑफ आर्डर है. जिस तरह से माननीय विरोधी पक्ष के माननीय सदस्य अपनी बात कह रहे हैं, वह तरीका गलत है.

( गोंधळ )

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जमा यांचा हरकतीचा मुद्दा आहे. तो त्यांनी मांडावा.

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पाइंट ऑफ आर्डर है, मेरा कहना है कि विरोधी पक्ष के माननीय सदस्यों को हमारी बात भी सुननी पड़ेगी. इस तरह से उनकी दादागिरी सभागृह में नहीं चलेगी. विरोधी पक्ष का इस तरह का व्यवहार सभागृह में नहीं चलेगा.....

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

(गोंधळ)

(विरोधी पक्षाकडील माननीय सदस्य "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, सभागृहापुढे महत्वाचे कामकाज असतांना विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांकडून सभागृहाचा विनाकारण वेळ घेतला जात आहे. तेव्हा आपण लक्षवेधी सूचनेवरील चर्चेला सुरुवात करावी अशी मी विनंती करतो. याठिकाणी वर्तमानपत्रामध्ये छापून आलेली बातमी वाचून दाखविली गेली, या बातमीला कोणताही वस्तुस्थितीचा आधार नाही. वर्तमानपत्रामध्ये छापून आलेली बातमी वाचून दाखवून सभागृहाचा अमूल्या वेळ घेण्याऐवजी माननीय सदस्यांनी पुरावे सादर करावेत अशी मी विनंती करतो.

(गोंधळ)

**सभापती** : अशा परिस्थितीत कामकाज चालविणे अशक्य असल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(दुपारी 1.16 ते 1.31 पर्यंत सभागृह स्थगित)

---

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी याठिकाणी औचित्याच्या मुद्याव्दारे "इंडिया टुडे" या वर्तमानपत्राचा उल्लेख करुन हसन अलीच्या वक्तव्याबाबत सदनात माहिती दिली. ही अत्यंत गंभीर बाब आहे की, या राज्यातील माननीय तीन मुख्यमंत्र्यांबाबत, राज्यकर्त्यांबाबत आणि प्रशासनिक अधिकाऱ्यांबाबत जे म्हटलेले आहे, ते या राज्यातील अधिकाऱ्यांची आणि राज्यकर्त्यांची बदनामी करणारे वृत्त आहे. याबाबत आम्हाला असा संशय येत आहे की, यामध्ये टगेगिरी, दादागिरी, माफिया, अमुक-तमुक हे जे प्रकार महाराष्ट्रात चालू आहेत. त्यामुळे महाराष्ट्राची बदनामी होत आहे. यामध्ये कोणाचे कट-कारस्थान तर नाही ? म्हणून हा विषय अत्यंत गंभीर आहे. यामध्ये माननीय तीन मुख्यमंत्र्यांची बदनामी झालेली आहे. म्हणून मी आपल्याकडे इंडिया टुडे मध्ये आलेल्या आर्टीकलची प्रत पाठविलेली आहे आणि आपण याबाबतीत निर्देश द्यावेत अशी मी आग्रहाची विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याच्या माध्यमातून सदनासमोर माहिती दिली. मी मघाशीच सन्माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा साहेबांना याबाबत सांगितले होते. माझ्याकडे जे पत्र देण्यात आलेले आहे, ते मी आपल्याकडे पाठवितो. आपण त्याची संपूर्ण शहानिशा करावी आणि याबाबत ज्यांच्याकडून माहिती घेणे आवश्यक आहे, ती संपूर्णपणे घेण्यात यावी आणि याची खात्री करुन घ्यावी.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, होय.

---

. . . .क्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन 2010-2011 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : आर्थिक पाहणी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

---

. . . .क्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत पाटील वि.प.स.यांनी "मुंबईतील अंधेरी, कुर्ला जोडरस्ता रुंदीकरणाचे काम अपूर्ण राहिल्यामुळे व तेथील अतिक्रमण निष्कासित न केल्यामुळे त्या परिसरातील 4 मोठ्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडताना वाटत असलेले भय तसेच अपघाताचे वाढलेले प्रमाण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील वि.प.स.यांनी "अशासकीय अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयातील पदव्युत्तर अर्हता असलेल्या शिक्षकांना डिप्लोमा धारक तंत्र शिक्षकांपेक्षाही खालची वेतनश्रेणी दिल्यामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर वि.प.स.यांनी "अप्पर विक्रीकर आयुक्त, ठाणे विभाग कार्यालयातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी विशेष भरती मोहिमेंतर्गत शिपाई या पदासाठी मागविलेले अर्ज, 3183 अर्जदारांपैकी केवळ 138 उमेदवार पात्र होणे, परिणामी मागासवर्गीय उमेदवारांमध्ये पसरलेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री. रामनाथ मोते, भगवान साळुंखे, संजय केळकर, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील वि.प.स.यांनी "दिनदयाळ हायस्कूल, लालठाणे, ता.पालघर, जि.ठाणे या आदिवासी विभागातील शासनमान्य माध्यमिक शाळांना शासनाचे अनुदान मिळत नसल्यामुळे शिक्षक वर्गामध्ये पसरलेला असंतोष, अनुदान न मिळाल्यास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सामुहिक आत्मदहनाचा दिलेला इशारा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार वि.प.स. यांनी "दारिद्र्य रेषेखालील तसेच केसरी शिधापत्रिका असलेल्या नागरिकांना कर्करोग, हृदयविकार, मुत्रपिंड, मेंदू, मज्जासंस्था यासारख्या



सभापती . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आजारांवर उपचारासाठी शासनाने जाहीर केलेली "राजीव गांधी जीवनदायी योजना" गेल्या वर्षी जाहीर करुनही ती अद्याप सुरु न होणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर कु.थोरात . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.....

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "पुणे शहरातील हनुमान टेकडी, तळोजाई टेकडी, चतुश्रृंगी टेकडी आणि वेताळ टेकडी व पिंपरी चिंचवड परिसरात प्रेमी युगुलांना धाक दाखवून धमकावण्याचे सुरु झालेले प्रकार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी " दि. 21/3/2011रोजी दादर व एलफिन्स्टन रोड स्थानका दरम्यान एका अनोळखी महिलेचा आढलेला मृतदेह, गेल्या 15 दिवसात मुंबई शहरात 4 मृतदेह आढळल्याच्या घडलेल्या घटना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील,धनंजय मुंडे, भगवान साळुंखे, विनोद तावडे यांनी "कोल्हापूर जिल्ह्यात सुमारे 1800 च्या आसपास प्राथमिक शाळा व 850 हून अधिक माध्यमिक शाळा असणे, परंतु यावर पूर्णपणे देखरेख करण्यासाठी शिक्षण अधिकारी नसणे, परिणामी जिल्ह्यातील मुलांच्या शिक्षणावर होत असलेला विपरीत परिणाम" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "मुंबईतील परेल येथील डी.पी.रुपारेल, महर्षि दयानंद आणि पार्ले येथील डहाणूकर महाविद्यालयात दि.21/3/2011 रोजी विद्यार्थ्यांना हॉल तिकिटांवर लागणारा फोटो आणि स्वाक्षरीसाठी बोलावण्यात येणे, परिणामी विद्यार्थ्यांना ऐन परीक्षेच्या क्षणी होत असेला त्रास" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जव्हार-मोखाडा परिसरातील शिक्षक शाळेत जात नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे वाढलेले गळतीचे प्रमाण

**मु. शी.** : जव्हार-मोखाडा परिसरातील शिक्षक शाळेत जात नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे वाढलेले गळतीचे प्रमाण याबाबत डॉ. दीपक सावंत वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेंद्र दर्डा( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, डॉ. दीपक सावंत यांनी "जव्हार-मोखाडा परिसरातील शिक्षक शाळेत जात नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे वाढलेले गळतीचे प्रमाण" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, जव्हार-मोखाडा हा आदिवासी भाग आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे अशी शासनाची खूप इच्छा आहे. आदिवासी मुलांच्या शिक्षणावर करोडो रुपये खर्च केले जात आहेत. असे असताना सुध्दा विद्यार्थी आणि विद्यार्थीनींचे गळतीचे प्रमाण फार मोठे आहे.

सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, मोखाडा गटातील दिनांक 9-2-2011 ते 5-3-2011 म्हणजे जवळ जवळ महिनाभर 150 शिक्षक जनगणनेच्या कामासाठी होते. तर 176 शिक्षक हे दिनांक 7-3-2011 ते 12-3-2011 या कालावधीत अधिवेशनासाठी गेले होते. तर जव्हार गटामध्ये याच कालावधीमध्ये म्हणजे एका महिन्यासाठी 242 शिक्षक जनगणनेच्या कामासाठी होते. तर दिनांक 7-3-2011 ते दिनांक 12-3-2011 या कालावधीमध्ये 409 शिक्षक अधिवेशनासाठी होते. म्हणजे जवळ जवळ एक हजार शिक्षक जनगणना आणि अधिवेशन यासाठी बाहेर होते. माझा प्रश्न असा आहे की, त्यावेळी या आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षण कसे झाले? विद्यार्थ्यांमध्ये गळतीचे प्रमाण विशेषत: इयत्ता 8 वी नंतर विद्यार्थीनीमध्ये आणि इयत्ता 10 वी नंतर विद्यार्थ्यांमध्ये आहे. आदिवासी भागातील हे गळतीचे प्रमाण कसे कमी करणार, जनगणनेच्या कामापासून शिक्षकांची मुक्तता करणार काय?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जी माहिती दिली ती माहिती माझ्या निवेदनामध्ये अगोदरच दिलेली आहे. हे सत्य आहे की, पंचायत समिती मोखाडा अंतर्गत 158 शाळा आहेत आणि त्या ठिकाणी 435 प्राथमिक शिक्षक कार्यरत आहेत. त्यापैकी 150 शिक्षक जनगणनेच्या कामासाठी नियुक्त करण्यात आले होते. शासनाची हीच भूमिका आहे की, शक्यतो शिक्षकांना अशैक्षणिक कामे देऊ नये पण त्यामधून जनगणना आणि निवडणुका या दोन गोष्टी वगळलेल्या आहेत, हे सत्य आहे. जनगणना करीत असताना सुध्दा त्या शिक्षकांनी जनगणनेचे काम संपल्यानंतर शिकविण्यात सांगण्यात आले होते. ही गोष्ट सुध्दा खरी आहे की, 7 मार्च ते 12 मार्च या कालावधीमध्ये सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मोखड्यामध्ये 176 शिक्षक आणि जव्हार गटामध्ये 409 शिक्षक अधिवेशनाला गेले होते. सुरुवातीला एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, जे शिक्षक अधिवेशनासाठी गेले होते त्यावेळी त्यांच्या खात्यामध्ये शिल्लक असलेली रजा घेऊनच त्यांना जाण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यासाठी त्यांना कोणतीही विशेष रजा मंजूर करण्यात आली नव्हती. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारला. जव्हार-मोखाडा हा संपूर्ण आदिवासी भाग आहे. त्या ठिकाणी गळतीचे प्रमाण इतर ठिकाणांपेक्षा जास्त आहे, हे मी मान्य करतो. महाराष्ट्रामध्ये इतर ठिकाणी गळतीचे प्रमाण 2.68 टक्के असेल तर जव्हार किंवा मोखाड्यामध्ये ते प्रमाण जवळपास 10 टक्के आहे. म्हणूनच मोखाडा येथे तीन वर्षापूर्वी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सुरु केले. मुलींना अधिक चांगले शिक्षण मिळावे म्हणून हे विद्यालय सुरु केले. मी आपल्या माध्यमातून आणि या सभागृहाच्या माध्यमातून सांगू इच्छितो की, 1 एप्रिलपासून जव्हार येथे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सुरु करण्यात येणार आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, जव्हारमध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सुरु करु. अधिवेशन आणि जनगणना या दोन्ही काळामध्ये त्या विद्यार्थ्यांना जो अभ्यासक्रम फुकट गेलेला आहे तो कसा पूर्ण करणार, परीक्षा जवळ आलेली आहे त्यामुळे परीक्षेपूर्वी त्या विद्यार्थ्यांची तयारी कशी करणार, आपण मुलींसाठी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सुरु करणार असाल तर त्यासाठी शिक्षकांची सोय केली आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, ही गोष्ट सत्य आहे की, ज्यावेळी जनगणना सुरु होते त्यावेळी काही अभ्यासक्रम बाजूला राहतो तसेच ज्यावेळी शिक्षक अधिवेशनाला जातात त्यावेळी सुध्दा काही अभ्यासक्रम बाजूला राहतो. परंतु या बाबतीत सर्व केंद्र प्रमुखांना आणि मुख्याध्यापकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत की, त्या काळात बाजूला पडलेला जो अभ्यासक्रम असेल तो त्यांनी परीक्षेच्या अगोदर जास्त वेळ वर्ग घेऊन पूर्ण करावा. त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यात येईल यावर सन्माननीय सदस्यांनी विश्वास ठेवावा. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सुरु करणार त्यासाठी शिक्षकांची नेमणूक झाली आहे काय असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. त्यासाठी शिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : इयत्ता 12 वी वाणिज्य शाखेच्या ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट या विषयाच्या इंग्रजी माध्यमाच्या प्रश्नपत्रिकेतील चुकांमुळे विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान

**मु. शी.** : इयत्ता 12 वी वाणिज्य शाखेच्या ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट या विषयाच्या इंग्रजी माध्यमाच्या प्रश्नपत्रिकेतील चुकांमुळे विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान याबाबत सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, धनंजय मुंडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेंद्र दर्डा ( शालेय शिक्षणमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, धनंजय मुंडे यांनी "इयत्ता 12 वी वाणिज्य शाखेच्या ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट या विषयाच्या इंग्रजी माध्यमाच्या प्रश्नपत्रिकेतील चुकांमुळे विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, या वर्षी इयत्ता 12 वी वाणिज्य शाखेच्या ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट या विषयाच्या इंग्रजी माध्यमाच्या प्रश्नपत्रिकेत अभ्यासक्रमाच्या बाहेरचे प्रश्न आल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाले. त्यामुळे मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, 2007 ते 2011 या कालावधीसाठी शासनाची पुस्तके तयार न झाल्यामुळे काही खाजगी एजन्सीची पुस्तके इन्ट्रोड्युस केली होती. 2010-2011 या चालू वर्षी शासनाची पुस्तके आलेली आहेत त्यामुळे स्वाभाविकपणे खाजगी एजन्सीची पुस्तके बाद झाली परंतु प्रश्नपत्रिकेमध्ये जे प्रश्न आलेले आहेत ते आधीच्या पुस्तकाच्या आधारे आलेले आहेत.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील.....

एकाच वेळी दोन्ही पुस्तके कशी असू शकतात ? सन 2010-11 मध्ये शासनाने पुस्तके आणलेली आहेत. त्याच्या बाहेरचे प्रश्न असल्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय होईल, त्यामुळे शासनाने या विद्यार्थ्यांना न्याय द्यावा.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन 2010-11 मध्ये शासनाने पुस्तके प्रसिध्द केलेली आहेत त्या पुस्तकांच्या बाहेरचे प्रश्न आहेत असे सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे. पण वस्तुस्थिती तशी नाही. मला त्यांना सांगितले पाहिजे की, पाठ्य घटकाचे महत्व व इयत्ता 12 वीच्या विद्यार्थ्यांची अपेक्षित क्षमता लक्षात घेऊनच यावर्षी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी 'ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट' या विषयाच्या प्रश्नपत्रिकेची योजना करण्यात आली आहे. त्याबाबत मी अधिक माहिती देत आहे. या सूचनेमध्ये असे नमूद केले आहे की, प्रश्न क्रमांक 2 मध्ये फरक आहे, त्याचप्रमाणे आपण प्रश्न क्रमांक 5 चा सुध्दा उल्लेख केलेला आहे. माझ्याकडे शासकीय 'ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंटचे' पुस्तक आहे. प्रत्येक प्रश्न पुस्तकावर आधारित आहे हे मी दाखवू शकतो. सभागृहाच्या माध्यमातून सांगू इच्छितो की, इयत्ता 12 वीचा विद्यार्थी शिक्षण घेत असतो त्यावेळी पुस्तकावर आधारित असलेल्या अभ्यासक्रमाचा अभ्यास करीत असतो. परंतु त्याच्या पलिकडे जाऊन अभ्यास करण्याचा विद्यार्थ्यांचा कल असणे आवश्यक आहे. या प्रश्नपत्रिकेतील सर्व प्रश्न पुस्तकांवर आधारितच आहेत.

---

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : हडपसर येथील अमनोरा पार्क टाऊनमध्ये पवार पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्याचा बसमधून पडून झालेला मृत्यू

**मु. शी.** : हडपसर येथील अमनोरा पार्क टाऊनमध्ये पवार पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्याचा बसमधून पडून झालेला मृत्यू याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.गुलाबराव देवकर ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "हडपसर येथील अमनोरा पार्क टाऊनमध्ये पवार पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्याचा बसमधून पडून झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : पुणे शहरातील हडपसरमध्ये शिवेन नावाचा मुलगा बसच्या चाकाखाली चिरडून जागीच ठार होण्याची घटना घडलेली आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये लक्षावधी मुले शाळेच्या बसेसमधून सगळीकडे प्रवास करतात. यापूर्वीही पनवेलमध्ये शाळेची बस जळून मुले मृत झाल्याची घटना घडली होती. दोन दिवसापूर्वी चिखली येथे शाळेची बस उलटून 27 मुले जखमी झालेली आहेत. परिवहन विभागाने शालेय बसेससाठी एक नियमावली केली होती. या निवेदनात असे नमूद केले आहे की, "सदरहू नियमावली दिनांक 28.9.2010 रोजीच्या अधिसूचनेन्वये प्रसिध्द केली आहे." ही नियमावली प्रत्यक्षात अंमलात आणण्यासाठी पाहणी करुन स्कूल बसेससाठी नियम तयार केले आहेत. त्यामध्ये शाळेच्या बसवर स्कूल बस लिहिणे, आपत्कालीन दरवाजाची व्यवस्था असणे, अग्निरोधक व्यवस्था असणे, ड्रायव्हरबरोबर एक काळजी घेणारी महिला सुध्दा त्या बसमध्ये असणे गरजेचे आहे. ही नियमावली शासन कधी लागू करणार आहे ? ही जी घटना घडली आहे त्यामध्ये या स्कूल बसचा दरवाजा उघडला गेल्यामुळे तो मुलगा बाहेर पडला व दगावला. म्हणजे काळजीवाहू व्यक्ती त्या बसमध्ये असती तर ही दुर्घटना घडली नसती. बसच्या मालकाला व पवार पब्लिक स्कूल बस बरोबर करार केलेल्या व्यक्तींना शासनाने क्लीन चिट दिलेली आहे. या नियमावलीचा भंग झाला आहे. ज्यांची बस सेवा सुरु आहे त्यांच्यावर सुध्दा शासन गुन्हा दाखल करणार का ?

श्री.गुलाबराव देवकर : दिनांक 16.3.2011 रोजी पवार पब्लिक स्कूलच्या बसला अपघात झाला. त्यामध्ये शिवेन संतोष गुप्ता नावाचा साडेतीन वर्षाचा विद्यार्थी बसचा दरवाजा उघडला गेल्यामुळे बसच्या बाहेर पडला व चाकाखाली येऊन चिरडला गेला. त्यामुळे त्याचा मृत्यू झाला आहे. या बसचा दरवाजा लावलेला होता. शेजारीच सर्व्हिस देणाऱ्या दोन महिला बसल्या होत्या. हा मुलगा दरवाजाजवळ उभा होता. गाडीने ब्रेक लावल्यानंतर दरवाजा उघडला गेला आणि तो मुलगा खाली पडून मेला. यामध्ये सेविकेंचे दुर्लक्ष झालेले आहे, त्यांनी मुलाची काळजी घ्यावयास पाहिजे होती. त्या मुलाकडे लक्ष देणे आवश्यक होते, तो मुलगा दरवाजाकडे उभा राहणार नाही याची काळजी घ्यावयास पाहिजे होती.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर....

हा अपघात झाल्यानंतर ताबडतोबीने महिला कर्मचारी आणि ड्रायव्हरवर गुन्हा दाखल केलेला असून तिघांना अटक केलेली आहे. गाडी नवीन असल्यामुळे ती सुस्थितीत होती. आर.टी.ओ.मध्ये गाडीची तपासणी केल्यानंतर गाडीत कोणताही फॉल्ट सापडला नाही. या प्रकरणी तेथील कर्मचा-यांनी दुर्लक्ष केल्यामुळे ही दुर्दैवी घटना घडली. स्कूल बसच्या संदर्भात नवीन धोरण तयार केलेले असून ते प्रिंट होऊन डिक्लरेशनसाठी गेलेले आहे. हे धोरण आज किंवा उद्यापासून जाहीर होईल.

डॉ.दीपक सावंत : शासनाचे धोरण उद्यापासून लागू होणार असेल तर ते या सदनाला समजणे आवश्यक आहे.

श्री. गुलाबराव देवकर : या धोरणाला राज्य मंत्रिमंडळाने व माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिलेली असून विविध प्रक्रिया करुन या धोरणाचे प्रारुप तपासण्यासाठी विधी व न्याय विभागाकडे पाठविले. विधी व न्याय विभागाकडून त्यास मान्यता मिळालेली आहे.

**सभापती** : हे धोरण निश्चित झाले असेल तर विधान मंडळाचे अधिवेशन चालू असल्यामुळे ते धोरण सभागृहाच्या पटलावर ठेवणे उचित होईल.

श्री. गुलाबराव देवकर : हे धोरण सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>सभागृहाच्या कामकाजाबाबत</u>**

**सभापती** : सन्माननीय मुख्यमंत्री हे नियम 47 अन्वये वैयक्तिक स्पष्टीकरण करणार आहेत. तसेच आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा दाखविण्यात आलेली आहे. मुख्यमंत्री महोदयांचे स्पष्टीकरण झाल्यानंतर अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल. कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना व अन्य कामकाज अल्पकालीन चर्चेनंतर घेण्यात येईल. या अल्पकालीन चर्चेसाठी एका तासाची वेळ देण्यात आलेली आहे. त्यापैकी चर्चेसाठी 45 मिनिटे आणि मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तरासाठी 15 मिनिटे वेळ देण्याचे निश्चित ठरलेले आहे. आता मुख्यमंत्री महोदयांनी आपले वैयक्तिक स्पष्टीकरण करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: केंद्रीय मुख्य दक्षता आयुक्तांच्या नियुक्ती संबंधी

**मु.शी.**: केंद्रीय मुख्य दक्षता आयुक्तांच्या नियुक्ती संबंधी

श्री. पृथ्वीराज चव्हाण, मुख्यमंत्री यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

श्री. पृथीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो.

सभापती महोदय, केन्द्रीय मुख्य दक्षता आयुक्तांच्या नियुक्ती विषयी माझ्या भूमिकेबद्दल मी निवेदन करण्याचे मान्य केले होते. हा संपूर्ण विषय केन्द्र सरकारच्या प्रशासकीय अखत्यारीत येतो हे सन्माननीय सदस्यांना ज्ञात आहे. मुख्य दक्षता आयुक्तांच्या निवडीच्या वेळी विचारविनिमयानंतर मी भारत सरकारचे 2 सेवानिवृत्त सचिव व 1 कार्यरत सचिव अशा 3 अधिका-यांची यादी या पदाच्या निवडीसाठी नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीकडे सादर करण्यासाठी तयार केली. या 3 अधिका-यांच्या नावांचा औपचारिक प्रस्ताव केन्द्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने संबंधितांच्या सेवाविषयक तपशिलासह माझ्याकडे सादर केला. माझ्याकडे सादर केलेल्या कागदपत्रामध्ये श्री. पी.जे. थॉमस यांच्या विरुध्द दक्षता विषयक प्रतिकूल शे-याचा किंवा प्रलंबित असलेल्या दाव्याचा कोणताही उल्लेख नव्हता. त्यामुळे ती धारिका मी मान्य केली व निवड समितीच्या बैठकीचा अजेंडा समितीच्या 3 सदस्यांना आदल्या दिवशी वितरित करण्यात आला. मुख्य दक्षता आयुक्ताच्या नेमणुकीचा विषय माननीय उच्च न्यायालयात गेल्यानंतर मी श्री. पी.जे.थॉमस यांच्या संबंधीची माहिती घेतली.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / परिशुद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

मला असे आढळले की, तत्कालीन मुख्य दक्षता आयुक्तांनी 2007 मध्येच श्री.पी.जे.थॉमस यांच्या बाजूने स्पष्ट निर्वाळा दिला होता. त्यासंबंधीच्या मुख्य दक्षता आयोगाने भारत सरकारच्या कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाला पाठविलेल्या दिनांक 25 जून, 2007 च्या पत्राची प्रत मी माननीय सभापतींना सादर केली आहे.

भारत सरकारने 17 ऑक्टोबर, 2008 च्या पत्रान्वये जेव्हा केरळ सरकारला श्री.पी.जे.थॉमस यांच्या भारत सरकारच्या सचिव या पदावरील केंद्रीय प्रतिनियुक्तीसाठी उपलब्धता विचारली होती तेव्हा केरळ सरकारने त्यांच्या 2 डिसेंबर, 2008 च्या पत्रान्वये अशी उपलब्धता मान्य केली होती. या दोन्ही पत्रांची प्रत सुध्दा मी माननीय सभापतींना सादर केली आहे. त्यामुळेच श्री.पी.जे.थॉमस यांची सचिव, संसदीय कार्य व त्यानंतर सचिव, दूरसंचार या पदावर केंद्र शासनाने केलेली नियुक्ती शक्य झाली होती. माननीय केंद्रीय गृहमंत्र्यांनी सुध्दा तत्कालीन मुख्य दक्षता आयुक्तांना श्री.पी.जे.थॉमस यांना दक्षताविषयक मंजुरी प्रदान केल्याचे स्पष्ट केले आहे. श्री.पी.जे.थॉमस यांची 2007 मध्ये केरळ सरकारचे मुख्य सचिव व त्यानंतर 2008 मध्ये भारत सरकारचे सचिव या पदावर नियुक्ती झाल्यामुळे त्यांचा दक्षताविषयक दर्जा शंकास्पद असेल असे वाटण्याचे काहीच कारण नव्हते. मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, कोणाचीही दिशाभूल करण्याचा कोणताही प्रयत्न झालेला नाही. सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणावर निर्णय दिला आहे. त्यानंतर माननीय पंतप्रधान यांनी आपण स्वत: न्यायालयाचा निर्णय स्वीकारला असल्याचे आणि निवडीत चूक झाली असल्याचे संसदेत म्हटले आहे. त्यामुळे या विषयाबद्दलचे स्पष्टीकरण मी केलेले आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## कामकाजपत्रिकेतील अल्पकालीन चर्चेसंबंधी

**सभापती** : आता म.वि.प.नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल. या चर्चेसाठी एक तासाची वेळ निश्चित केली आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरासह एका तासाच्या वेळेत ही चर्चा पूर्ण करावयाची आहे. त्यामुळे ज्या माननीय सदस्यांनी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे त्यांना आपली भाषणे 45 मिनिटाच्या वेळेत पूर्ण करावी लागतील, याची नोंद घ्यावी. माझ्याकडे सत्तारुढ पक्षाकडून या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी काही सदस्यांची नावे सुचविण्यात आली आहेत. एकंदरीत 45 मिनिटांचा अवधी लक्षात घेता सत्तारुढ पक्षाला वेळ देता येईल असे मला वाटत नाही. माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर हे आता चर्चेला सुरुवात करतील.

---

नंतर डब्ल्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कुलाबा येथील आदर्श गृहनिर्माण संस्थेत उघडकीस आलेले विविध घोटाळे

**मु.शी.**: कुलाबा येथील आदर्श गृहनिर्माण संस्थेत उघडकीस आलेले विविध घोटाळे या विषयावर श्री. पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, वि.स.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 97 अन्वये पुढीलप्रमाणे अल्पकालीन चर्चा उपस्थित करीत आहे :--

"अनेक अनियमितता असलेल्या आदर्श गृहनिर्माण संस्थेची द्विसदस्यीय समितीद्वारा चौकशी करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्र्यांनी गत हिवाळी अधिवेशनात करणे, मा.मुख्यमंत्र्यांनी सभागृहात घोषणा करुन देखील द्विसदस्यीय समितीची नेमणूक विलंबाने करणे, घोषणेला तीन महिने होऊन देखील चौकशी कासवगतीने सुरु असणे, केंद्रीय गुन्हे अन्वेषण संस्थेद्वारे होणारी चौकशी दीड महिन्यात पूर्ण करावी असे संकेत असताना या घोटाळयामध्ये सामिल असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची परवानगी मागण्यासाठी राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे कोणताही पाठपुरावा न होणे, या घोटाळयामध्ये 20 पेक्षा जास्त अधिकारी व पदाधिकाऱ्यांचा समावेश असताना केंद्रीय गुन्हे अन्वेषण संस्थेद्वारा नोंदलेल्या प्रथम पाहणी अहवालामध्ये केवळ 13 जणांचा समावेश असणे व नुकताच 14 वे आरोपी म्हणून श्री.जयराज फाटक यांचे नाव समाविष्ट करणे, तत्कालीन दोन माजी मुख्यमंत्र्यांचा समावेश असूनही त्यांच्यावर कोणतीही कारवाई न होणे तसेच तत्कालीन मुख्यमंत्री यांचे नाव प्रथम पाहणी अहवालामध्ये असून देखील त्यांचे संदर्भात कोणतीच ठोस कारवाई न होणे, या सर्व बाबींमुळे आदर्श घोटाळा प्रकरणी शासन जाणीवपूर्वक चालढकल करीत असल्याचे चित्र जनतेसमोर निर्माण झाल्याने याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना".

महोदय, आदर्श गृहनिर्माण संस्थेचा घोटाळा उघडकीस आला व त्यामुळे केवळ राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशाच्या राजकारणात प्रचंड वादळ निर्माण झाले. या गोष्टीला चार महिन्यांचा काळ उलटला आहे. या आदर्श सोसायटी घोटाळ्यात सरसकट अनेक नियमांचे उल्लंघन झालेले आहे. मग त्यात जागेचा मालकी हक्क, सीआरझेडचे उल्लंघन, समुद्र किनाऱ्याच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह अशा अनेक बाबी समाविष्ट आहेत. सन 2010 च्या हिवाळी अधिवेशनात सभागृहात यासंबंधीची चर्चा झाली व त्या चर्चेच्या माध्यमातून झालेल्या अनियमिततांची माहिती शासनाला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

दिली. त्या चर्चेला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, या प्रकरणात कोणाचीही गय न करता शासनाच्या वतीने ठोस कारवाई करण्यात येईल. गेल्या चार महिन्यात या आदर्श सोसायटी घोटाळ्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली अथवा कोणती पावले उचलली अशी चर्चा जनतेत होऊ लागली आहे, त्याचे स्पष्टीकरण शासनाने करावे, यासाठीच आज पुन्हा सभागृहात ही चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे.

महोदय, या प्रकरणाची पार्श्वभूमी सांगायची झाली तर 7 फेब्रुवारी, 2000 पासून हे प्रकरण सुरु झालेले आहे. 7 फेब्रुवारी, 2000 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमूख यांच्याकडे एक निवेदन देण्यात आले होते. त्या निवेदनावर श्री. विलासराव देशमुख यांनी "Call for proposal & put up immediately." असा शेरा मारुन मुंबई जिल्हाधिकाऱ्यांकडे ही फाईल पाठविली. माननीय मुख्यमंत्र्यांनी शेरा मारल्यानंतर 23 सप्टेबर, 2005 पर्यंत अनेक अनियमितता झाल्या. प्रथम ही जागा कोणाची आहे असा जागेसंबंधीचा वाद प्रथमदर्शनी उत्पन्न झाला होता. त्या अनुषंगाने मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, सन 1950 च्या दरम्यान लष्कराने हाय-वे बांधण्यासाठी राज्य शासनाला सांताक्रूझ रायफल रेंजची जमीन दिली होती. दि. 13 जुलै, 1958 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री आणि संरक्षण मंत्री यांच्यात झालेल्या चर्चेमध्ये लष्कराच्या सांताक्रूझ रायफल रेंजच्या जमिनीच्या मोबदल्यात कुलाबा येथील जागा लष्कराला द्यावी किंवा आर्थिक नुकसान भरुन काढावयाचे असे ठरले होते. त्यानंतर दि. 13 जानेवारी, 1984 रोजी लष्कराच्या मुख्यालयाने कुलाबा जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून त्यात स्पष्टपणे उल्लेख केला होता की, बेस्ट बस डेपोच्या दोन्ही बाजूला लष्कराची जागा असून ती सर्वच जागा लष्कराच्या ताब्यात आहे आणि लष्कराच्या प्रशिक्षणासाठी ती जागा वापरत असल्याने ती रिक्तच ठेवण्यात यावी. नंतर त्याच पत्रामध्ये दि. 12 जानेवारी, 1984 लाच लेफ्टनंट कर्नल श्री. आर बीडकीकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्राने कळविले की, ही जमीन लष्कराची असून त्यावर अतिक्रमण होऊ नये म्हणून त्यावर कम्पाऊंड वॉल व फेन्सिंग करण्यात आले आहे व ही जमीन पूर्वीपासून लष्कराच्या ताब्यात आहे. सन 1980 मध्येच लष्कराने त्या जागेवर वृक्षांची लागवड केली. दि. 27 ऑक्टोबर, 1996 रोजी तत्कालीन मेजर जनरल श्री. करिअप्पा यांच्या हस्ते या

....3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

जागेवर ईको-पार्कचे उद्‌घाटन करण्यात आले. तसेच दि.16 जून,003 रोजी श्री. सौरव रे (डिफेन्स इस्टेट ऑफिसर, मुंबई सर्कल) यांनी जिल्हाधिकारी, मुंबई यांना पत्र लिहून त्यात स्पष्ट म्हटले की, राज्य शासनाने देखील या जागेवर कधीही अधिकार सांगितलेला नाही. तसेच मेजर जनरल करीअप्पा यांचे हस्ते ईको-पार्कचे उद्‌घाटन होऊनही राज्य शासनाने कोणतीच तक्रार केली नाही. तसेच सद्य:स्थितीत या जागेवर इको-पार्क असून निवासी इमारत बांधणे योग्य होणार नाही, अशा प्रकारचे अभिमत लष्कराने व्यक्त केल्यानंतरही राज्य शासन त्याबद्दल काहीच बोलले नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

या परिसरात बांधलेली इमारत सुरक्षेच्या दृष्टीने हानीकारक आहे. या सर्व बाबीचा विचार करुन या जागेवर निवासी इमारत बांधू नये असे त्यांनी स्पष्ट कळवले होते. दिनांक 8 मार्च, 2004 रोजी विना मैत्रा, डायरेक्टर जनरल ऑफ डिफेन्स यांनी आर्मी कमांडरला पत्रान्वये कळविले की, ही जागा संरक्षण विभागाच्या अधिपत्याखाली असून त्यावर ताबा म्हणून संरक्षण विभागाने कंपाऊड वॉल सुध्दा उभारलेली आहे. यावरुन ही जागा लष्कराचीच होती व आहे हे सिध्द होते. सीबीआयला देखील ही बाब मान्य असल्याचे वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेले आहे. लष्कर प्रमुख एन.सी.वीज, लेफ्टनंट जनरल शंतनु चौधरी हे दोन्ही लष्कराचे पूर्व अधिकारी होते व ते दोन्ही आता आदर्श सोसायटीचे सदस्य आहेत. हे सभासद कसे झाले हे त्यांच्या पदावरुन सहज लक्षात येते.

सभापती महोदय, ही जागा संरक्षण विभागाच्या ताब्यात असल्याने ही जागा निवृत्त सैनिक व सैनिकांच्या विधवा यांच्यासाठी राखीव ठेवून त्यांच्यासाठी घर उभारण्याचा प्रस्ताव सादर झाला. हा भूखंड लवकर ताब्यात मिळवण्यासाठी व केंद्रीय पर्यावरण विभागाकडून परवानगी मिळत नसतांना लवकर परवानगी मिळण्यासाठी सैनिकांच्या विधवांसाठी ही गृहनिर्माण योजना आहे असे सांगितले गेले. प्रत्यक्षात मात्र प्रभावी मंत्री सनदी अधिका-यांनी यामध्ये घरे लाटली. सद्य:स्थितीत भूखंडावरील सेना दलाचा ताबा व ही जमीन सेना दलास देण्याबाबतचे सरकारने ग्वाही दिल्याची कागदपत्रे गहाळ झालेली आहे. महत्वाची कागदपत्रे गहाळ होणे हा महत्वाचा मुद्दा आहे. मंत्रालयातून महत्वाची कागदपत्रे गहाळ होणे ही बाब राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब आहे. ही जी कागदपत्रे गहाळ झाली होती ती परत मिळाली की, नाही ? माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातल्यानंतर त्यांना कागदपत्रे गहाळ झाल्याचे आढळून आले होते. राज्य सरकारच्या ताब्यात असलेली महत्वाची कागदपत्रे या कार्यालयातून गायब होत असतील तर ती राज्याच्या दृष्टीने अत्यंत गंभीर अशी बाब आहे. त्यामुळे गहाळ कागदपत्रांची शहानिशा होण्याची गरज आहे. आदर्श सोसायटीच्या संदर्भातील महत्वाची कागदपत्रे गहाळ होतात याचा अर्थ यामध्ये काही तरी काळेबेरे आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

या प्रकरणामध्ये सीआरझेडच्या कायद्याचे सुध्दा उल्लंघण झालेले आहे. सीआरझेडच्या नियमानुसार 5 कोटी रुपयांपेक्षा जास्त प्रकल्पासाठी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजींग ॲथोरिटी तसेच केंद्रीय वन-पर्यावरण मंत्रालयाची परवानगी आवश्यक होती. परंतु ही परवानगी घेतली गेली नाही. सीआरझेडच्या नियमानुसार कोणतीही इमारत समुद्राच्या दिशेने रस्त्याला लागून बांधता येत नाही. उंचीला बंघन घालून जमिनीच्या दिशेने इमारत बांधता येते परंतु तसेही या प्रकरणात झालेले नाही. उलट पर्यावरण मंत्रालयाने परवानगी दिली नसतांना तत्कालीन नगरविकास उपसचिव श्री. देशमुख व सचिव श्री. तिवारी यांनी, पर्यावरण विभागाने परवानगी दिलेली आहे अशी खोटी माहिती दिली. केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाने पर्यावरण सचिवांना या इमारतीच्या कागदपत्रांची तपासणी करण्यास सांगितलेले आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री. जयराम रमेश यांनी, आदर्श सोसायटीची इमारत पाडून टाकण्यात यावी असा आदेश दिला होता. बांधकामासाठी आवश्यक त्या परवानग्या घेतल्या का, घेतल्या नसल्यास त्यावर काय कार्यवाही केली, अशी विचारणा त्यांनी केली होती. परंतु ही कागदपत्रे गहाळ झाल्याची माहिती आम्हाला मिळालेली आहे. ही फार गंभीर बाब आहे. ही कागदपत्रे कोणी गहाळ केली हे लक्षात न आल्याने सीबीआयने कुणावरही आजपर्यंत गुन्हा दाखल केलेला नाही. या प्रकरणाच्या संदर्भात अनास्था का आहे याची आम्हाला माहिती हवी आहे.

या प्रकरणामध्ये सेनादलाचेही नाहकरत प्रमाणपत्र घेण्यात आले नव्हते. बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी सेना दलाकडून नाहरकत प्रमाणपत्र घ्यावे अशी अट एमएमआरडीएने प्रकल्पाला मंजूरी देतांना घातली होती. कारण सेनादलाच्या इमारतीपासून 1000 मीटरच्या परिसरात कोणतेही बांधकाम करता येत नाही. तसेच संरक्षण दृष्टया 30 मीटर पेक्षा जास्त उंचीची इमारत बांधू नये अशा प्रकारचे बंधन घालण्यात आले होते.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, बांधकाम सुरु करण्यासाठी द्यावयाचे ना हरकत प्रमाणपत्र सेना दलाने ऑगस्ट 2010 पर्यंत दिले नव्हते. मूळ सहा मजल्याची सोसायटीची इमारत होती त्या इमारतीची उंची 100 मीटरने वाढवून म्हणजेच जवळपास 31 मजल्यांची करण्यात आली होती या संदर्भात श्री. विनित सिंग, (कर्नल, पीआयओ) यांनी मेजर श्री.एस.के.लॉम्बा यांना दिनांक 16 ऑगस्ट 2010 रोजी लिहिलेल्या पत्रात स्पष्ट उल्लेख आहे.नौदलाने सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ही इमारत हानीकारक असल्याने या सोसायटीला ओ.सी. देऊ नये अशी तक्रार अनेक ठिकाणी व सरते शेवटी एमएमआरडीए यांच्याकडे केली होती. तक्रार करुनही एमएमआरडीएने या इमारतीला ऑक्युपन्सी सर्टिफिकेट त्यावेळी दिले होते. या इमारतीसाठी बेस्टचा एफ.एस.आय. वापरला होता.या इमारतीच्या बाजूला बेस्टचा भूखंड आहे त्याचा एफएसआय वापरुन त्या ठिकाणी जो रस्ता आहे त्या रस्त्याची रुंदी 60 मिटररवरुन 18 मिटरवर आणली गेली. सभापती महोदय, त्या ठिकाणी
बरेच गैरव्यवहार झालेले आहेत बस डेपोच्या एफएसआय प्रकरणी बेस्टने केवळ चौकशी सुरु करण्याची तयारी दाखवली आहे.बेस्टसुध्दा सरकारच्या अखत्यारात असल्यामुळे त्यांनी कारवाई सुरु केलेली नाही त्यांनी केवळ चौकशी सुरु करण्याची तयारी दाखवली असून ही चौकशी अजून सुरु झालेली नाही त्यामुळे या चौकशीत काय निष्पन्न झाले हे अजूनही गुलदस्त्यातच आहे.

सभापती महोदय, ज्यांच्या हातामध्ये या सोसायटीची फाईल गेली त्यांनी एक एक फ्लॅट लाटला आहे. येथे मी काही अधिका-यांची नावे सांगणार आहे. श्री.रामानंद तिवारी, सचिव, नगरविकास यांनी आपला मुलगा ओंकार तिवारी याच्या नावाने फ्लॅट घेतला आहे.श्री. व्ही.देशमुख,उप सचिव, नगर विकास यांनी स्वत:च्या नावाने फ्लॅट घेतला आहे. श्री.उत्तम खोब्रागडे,जनरल मॅनेजर, बेस्ट यांच्याकडे बेस्टचा एफएसआय वापरण्यासंबंधीची फाईल गेली त्यामुळे त्यांनी देवयानी खोब्रागडे या आपल्या मुलीच्या नावाने फ्लॅट घेतला आहे. श्री. बी के.शंकरन्, महसूल, सचिव यांनी संजोय शंकरन् या आपल्या मुलाच्या नावाने फ्लॅट घेतला आहे.श्री. इदझेस अग्मो कुंदन, जिल्हाधिकारी यांनी स्वत:च्या नावाने फ्लॅट घेतला आहे. श्री.प्रदिप व्यास, जिल्हाधिकारी यांनी आपली पत्नी श्रीमती सीमा व्यास यांच्या नावाने फ्लॅट घेतला आहे. श्री. चिंतामणी संगीतराव, सचिव, परिवहन विभाग यांनी रणजित संगीतराव यांच्या नावाने फ्लॅट घेतला आहे.श्री.जयराज फाटक यांच्या विरुध्द मागच्या आठवडयात केस दाखल झाली होती त्यांनी सुध्दा

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

आपल्या मुलाच्या नावाने फ्लॅट घेतला आहे. श्री.अभ्यंकर,शिक्षण संचालक यांनी स्वत:च्या नावाने फ्लॅट घेतला आहे. श्री.राजेशकुमार दास, उपाध्यक्ष, एमएमआरडीए यांनी स्वत:च्या नावाने फ्लॅट घेतला आहे. श्री.बर्वे,सह पोलीस आयुक्त,वाहतूक यांनी वडिलांच्या नावाने फ्लॅट घेतला आहे.श्री.सुभाष लाला, प्रधान सचिव, तत्कालीन मुख्यमंत्री यांनी श्रीमती सुमिला सेठी, मुलगी व सुशीला शालीग्राम ,आई यांच्या नावाने फ्लॅट घेतला आहे.या सर्व अधिका-यांकडे आदर्श सोसायटीची फाईल गेली होती आणि त्यावर त्यांची सही आवश्यक होती.या संधीचा व आपल्या अधिकाराचा वापर करुन स्वत:साठी त्यांनी सदनिका मिळवली होती. वास्तविक एका अधिका-याने जर ही फाईल अडवली असती तर हे प्रकरण उद्‌भवलेच नसते. परंतु कोणत्याही अधिका-याने ही फाईल अडवली नाही.

ज्यांनी शिफारशी केल्या होत्या अशा मंत्रिमंडळातील अनेक जणांची नावे या प्रकरणामध्ये आहेत.श्री.सुशीलकुमार शिंदे, श्री.विलासराव देशमुख, श्री.शिवाजीराव पाटील निलंगेकर, श्री अजित दादा पवार,श्री.नारायण राणे, डॉ.पतंगराव कदम श्री. आर. आर. पाटील,श्री.अनिल देशमुख, श्री बाबासाहेब कुपेकर श्री जितेंद्र आव्हाड यांची देखील नावे आहेत. श्री.बाबासाहेब कुपेकर आणि श्री जितेंद्र आव्हाड यांनी तर स्वत:च या सोसायटीमध्ये फ्लॅट घेतलेले आहेत. हे सर्व प्रकरण आम्ही मागच्या अधिवेशनात सभागृहात मांडले होते. त्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी व्दिसदस्यीय समिती नेमली असून ही घोषणा केल्यापासून आजपर्यंत तीन महिने होऊन गेले आहेत. डिसेंबर महिन्यामध्ये समिती नेमण्याची घोषणा झाली असून आता मार्च महिना संपणार आहे. परंतु अद्यापपर्यंत या समितीचे कामकाज सुरु होऊ शकलेले नाही. या समितीच्या कर्मचा-यांचे पगार देण्यासाठी पैसे नाहीत, समितीला कार्यालय नाही , समितीसाठी कर्मचारी नेमलेले नाहीत, समितीने आता स्टाफची मागणी केलेली आहे अशा प्रकारे वर्तमानपत्रात त्यासंबंधीच्या वेळोवेळी काही बातम्या छापून आल्या होत्या. अशा परिस्थितीमध्ये दोन तीन महिन्याचा कालावधी निघून गेला आहे.दिनांक 8 जानेवारी 2011रोजी समितीची स्थापना करण्यात आली होती त्यावेळी तीन महिन्यात समितीने आपला अहवाल सादर करावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती परंतु त्या प्रमाणे काही झालेले नाही.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

तीन महिन्यामध्ये अहवाल येईपर्यंत या समितीचे काम हळू हळू कासव गतीने सुरु झाले आहे. हा विषय एवढयावरच मर्यादित राहिलेला नाही. मला माननीय मुख्यमंत्र्यांबद्दल अतिशय आदर आहे. परंतु माननीय मुख्यमंत्री नांदेडला गेले, त्याठिकाणी ते व्यासपीठावर बोलले नसते तर बरे झाले असते. आपण त्याठिकाणी असे म्हणाला की, "अशोकरावजी तुम्ही एकटे नाही, तुमचे वाईट दिवस निघून जातील आणि तुम्हाला चांगले दिवस येतील, कॉग्रेस पक्ष तुमच्या पाठीशी आहे". परंतु आपल्या या म्हणण्याचा वेगळा अर्थ निघाला. एका बाजूला सीबीआयची चौकशी सुरु असतांना आणि दुसऱ्या बाजूला आपण नेमलेल्या त्रिसदस्यीय चौकशी समितीमार्फत चौकशी सुरु असताना व्यासपीठावरुन आपण केलेल्या वक्तव्यामुळे चौकशी करणाऱ्या यंत्रणेवर एकप्रकारचा दबाव टाकल्याचा मेसेज गेला

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी अतिशय चांगल्या पध्दतीने आपले म्हणणे मांडले आहे. परंतु ते मांडीत असतांना सभागृहाच्या बाहेर घडलेल्या घटनांचे रिफ्लेक्शन सभागृहामध्ये आणले. ते आणल्याबद्दल दुमत नाही हेच तर लोकशाहीचे वैभव आहे. परंतु हे होत असतांना दुसऱ्या बाजूला कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री श्री. येडियुरप्पा यांना त्यांच्याच पक्षाचे अध्यक्ष पेढा भरवीत असल्याचे वर्तमानत्रामध्ये छापून आलेले फोटो आम्ही पाहिले आहेत...

(गोंधळ)

आणि म्हणून माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी पक्षाच्या व्यासपीठावरुन काय बोलावे याबद्दल जर कुणी याठिकाणी मार्गदर्शन करीत असेल तर ते चालणार नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांना क्लीन चीट दिलेली नाही. या प्रकरणाची सीबीआय मार्फत चौकशी सुरु आहे आणि कोर्टामध्ये सुध्दा प्रकरण सुरु आहे. या बाबतीत सर्व तपास यंत्रणा काम करीत असतांना माननीय मुख्यमंत्री हे आपल्या पक्षाचे एक कलीग, आपल्या पक्षाचे एक आमदार, माजी मुख्यमंत्री यांची जर पाठराखण करीत असतील तर ते योग्य आहे. याठिकाणी येडियुरप्पाविषयी बोलल्यानंतर सभागृहाच्या विरोधी पक्षाच्या सदस्यांना एवढे वाईट कां वाटावे? या येडियुरप्पांनी स्वत:च्या नातलगांची जमीन गडप केली. त्यांनी फार मोठा पराक्रम केला अशा आविर्भावामध्ये आपल्या पक्षाचे प्रमुख आणि या सभागृहाचे सदस्य माननीय श्री. नितीन गडकरी हे पेढा भरवीत आहेत हे आपल्याला चालते कां हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे मुद्दाम चालले आहे...

**सभापती** : माननीय सदस्यांनी शांत रहावे आणि आपापल्या जागेवर बसावे.

श्री. भाई जगताप : येडियुरप्पाचे नाव घेतल्यानंतर तुम्ही एवढे डिस्टर्ब होता. तर मग तुम्हाला माझा हरकतीचा मुद्दा तरी कसा कळणार?

(गोंधळ)

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या सभागृहाचे सदस्य नसलेले परंतु विधानसभेचे सदस्य असलेले माननीय सर्वश्री अशोक चव्हाण, बाबासाहेब कुपेकर, जितेंद्र आव्हाड यांच्या नावाचा उल्लेख केला. त्या संदर्भात आपण निर्णय देऊ शकता.....

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : सीबीआय च्या चार्जशीटमध्ये त्यांची नावे आल्यानंतर ती वाचून दाखवायची नाहीत काय?

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, माननीय सदस्य मध्येच कशासाठी बोलत आहेत, मला याठिकाणी बोलू दिले पाहिजे. मी शांतपणे बोलत आहे, तुमच्यासारखे आकांड तांडव करीत नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई . . . .

तुम्ही जरा शांतपणे घ्यावे. अजून बऱ्याच गोष्टी पुढे येणार आहेत. माझा एवढाच हरकतीचा मुद्दा आहे की, जे या सभागृहामध्ये उपस्थित नाहीत आणि जे विधानसभेचे सन्माननीय सदस्य आहेत त्यांची नावे घेण्यासाठी परवानगी आहे काय ? याची मला माहिती हवी आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,आता याठिकाणी नांदेडला काँग्रेस पक्षाच्या जनजागरण अभियानाच्या सभेबाबतचा उल्लेख झाला आणि मी त्या कार्यक्रमामध्ये अध्यक्षस्थानी होतो. त्याठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, श्री.अशोकराव चव्हाण हे काँग्रेस पक्षाचे एक सदस्य आहेत. काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आहेत, नेते आहेत. ते माननीय मुख्यमंत्री असले तरी सुध्दा काँग्रेस पक्षाचे एक नेते आहेत. अशा वेळी जर काँग्रेसच्या नेत्यांनी दुसऱ्या कार्यकर्त्यांना असे सांगितले की, आम्ही तुमच्या पाठीमागे आहोत तर ते काही गैर नाही. त्याठिकाणी माननीय मुख्यमंत्री जे बोलले आहेत, ते काँग्रेसचे नेते म्हणून बोलले आहेत आणि ते योग्य आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, . . . .

**सभापती** : मी आता रुलींग देत आहे. सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी खाली बसावे.

श्री.भाई जगताप : माझा हरकतीचा मुद्दा आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जर समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्य अशा पध्दतीने वागत असतील तर आम्ही देखील त्यांच्या बोलण्यामध्ये अडथळे आणू.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझा हकरतीचा मुद्दा असा आहे की, . . ..

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आमचाही हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, आपल्या सभागृहाचे काही नियम, संकेत आणि परंपरा आहेत. त्यानुसार येथे ज्या गृहस्थाचा उल्लेख केला जात आहे, ते या सदनाचे सदस्य नाहीत ही पहिली गोष्ट आहे. तसेच त्यांना या सदनामध्ये खुलासा करण्याची संधी नाही, असे असताना त्या सर्वांच्या नावाने सर्रास सारखा उल्लेख केला जात आहे हे बरोबर नाही. माझी येथे आपल्याला विनंती आहे की, आपण याबाबत आदेश द्यावेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे सर्व आम्ही म्हणत नाही तर सी.बी.आय.सांगत आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी या सदनामध्ये सदरहू विषयावर चर्चा करीत असताना सार्वभौम सभागृहामधून या राज्यातील जनतेला काहीतरी महत्वाची माहिती मिळेल अशी अपेक्षा वाटत होती. पण सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी ज्या सन्माननीय नेत्यांची नावे घेतलेली आहेत, त्यातील भावना पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, त्यांना या चर्चेतून कोणावर तरी राजकीय आरोप करावयाचे आहेत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांचे नाव घेतले.त्यांच्या बाबतीत पेपरमध्ये असे छापून आले की, त्यांनी संबंधितांच्या बाबतीत शिफारस केली. परंतु प्रत्यक्षात संबंधितांनी प्रतिज्ञापत्र दिलेले आहे की, त्यांचा यादीमध्ये समावेश झाला आहे कारण ते भटक्या आणि विमुक्त जमातीचे आहेत. त्यांचा दर महिन्याचा इन्कम कमी आहे म्हणून समावेश झाला आहे. म्हणून माननीय विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांचे नाव घेऊ नये अशी मला विनंती करावयाची आहे. तसेच सन्माननीय नेत्यांची नावे घेण्याऐवजी सदस्यांची नावे . .. .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय . . ..

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बेलतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्हाला बोलू द्यावयाचे नाही काय ? ही दादागिरी आहे.

**सभापती** : याठिकाणी नियम 97 अन्वयेच्या प्रस्तावावर अत्यंत चांगल्या प्रकारे चर्चा सुरु होती.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आम्हाला देखील संधी देण्यात यावी.

**सभापती** : सर्वांनी शांत रहावे.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

श्री.भाई जगताप (खाली बसून) : सन्माननीय सदस्यांना वाटेल ते बोलावयाची सवय आहे.





**सभापती** : मला या विषयाच्या संबंधातील चर्चा व्यवस्थित होण्याच्या दृष्टीकोनातून दोन्ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाजूच्या सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, माननीय विरोधी पक्षनेते हे एका राजकीय पक्षाचे सदस्य आहेत आणि त्यांचे अन्य सहकारी सुध्दा दुसऱ्या एका राजकीय पक्षाचे सदस्य आहेत. तसेच दुसऱ्या बाजूला काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य आहेत. आपण आज याठिकाणी नियम 97 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी मागच्या सोमवारी नियम 289 अन्वये अशा प्रकारची चर्चा उपस्थित करण्यासाठी परवानगी मागितली होती.

यानंतर कु.थोरात . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.....

त्यावेळी माझ्या दालनात चर्चा करुन असे ठरविले होते की, या चर्चेसाठी एक तास वेळ देण्यात यावा. त्यापैकी विरोधी पक्षाला 45 मिनिटे आणि माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तराच्या भाषणाला 15 मिनिटांचा वेळ देण्यात यावा.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या चर्चेमध्ये भाग घेण्याची आम्हाला देखील संधी मिळाली पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी ही चर्चा शांततेने करावी. या सदनाच्या प्रथा, परंपरेनुसार कोणत्याही प्रस्तावावर दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य बोलत असतात. या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी विरोधी पक्षाला 45 मिनिटे इतका वेळ देण्यात येईल आणि सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांसाठी 15 ते 20 मिनिटे इतका वेळ देण्यात येईल. त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तराचे भाषण होईल.

या चर्चेच्या निमित्ताने आवश्यक नसलेल्या गोष्टींचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आलेला आहे. या सभागृहाचे काही संकेत, प्रथा , परंपरा आहेत. त्यानुसार विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख या सभागृहात कोणत्याही माध्यमातून येण्याची पध्दती नाही, म्हणून मी तो उल्लेख कामकाजातून काढून टाकतो. तसेच या प्रस्तावावर चर्चा करीत असताना आपल्या शेजारच्या कर्नाटक राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा या ठिकाणी उल्लेख करणे हे देखील या सभागृहाच्या एकंदरच परंपरेला धरुन नाही म्हणून दोन्ही बाजूच्या सदन्माननीय सदस्यांकडून त्यांच्या संदर्भात झालेला उल्लेख कामकाजातून काढण्यात येत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी या ठिकाणी शांतपणे ऐकले असते तर त्यांना पॉइंट ऑफ ऑर्डर उपस्थित करण्याची गरज भासली नसती. मी मुख्यमंत्र्यांचा आदर ठेवून बोललो आहे. "माननीय मुख्यमंत्री जर हे बोलले नसते तर बरे झाले असते" एवढेच मी म्हटले होते. मी त्याबाबतीत फार आक्षेप घेतला नव्हता. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांच्याबद्दल आम्हाला आदर आहे. त्यांनी या ठिकाणी पॉईंट ऑफ ऑर्डरच्या माध्यमातून मुद्दा उपस्थित केला नसता तर एक चांगला मेसेज गेला असता. पण ठीक आहे. माननीय उच्च न्यायालयाने राज्य सरकारवर टीका करताना ज्या ज्या विभागात व ज्या ज्या

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

अधिकाऱ्यांकडे ही 'आदर्श'ची फाईल गेली त्या सर्वांना 'आदर्श'मध्ये सदनिका मिळाल्याचे सांगितले आहे. "आता चौकशी पुरे झाली" असे कोर्टाने म्हटले होते. "त्यावर दंडात्मक कारवाई करा असे माननीय उच्च न्यायालयाने आदेश देऊन सुध्दा सी.बी.आय.ने प्रथम पाहणी अहवाल नोंदवला आणि हा प्रथम पहाणी अहवाल केवळ 13 जणांच्या विरोधात नोंदवण्यात आला होता. प्रत्यक्षात या घोटाळयामध्ये 20 पेक्षा अधिक अधिकारी गुंतलेले असताना जाणीवपूर्वक उर्वरित अधिकाऱ्यांना का संरक्षण देण्यात आले हे अजूनही समजलेले नाही. माजी मुख्य सचिव श्री. डी. के. शंकरन, प्रधान सचिव, उत्तम खोब्रागडे आणि मी थोडयावेळापूर्वीच जी नावे सांगितली, त्यांच्यावर अद्याप कुठलीही कारवाई झालेली नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी मला चार-पाच गोष्टी विचारावयाच्या आहेत. गहाळ झालेली कागदपत्रे सापडली काय? श्री. अशोक चव्हाण यांच्या सारख्या माननीय मुख्यमंत्र्यांना राजीनामा देण्याची वेळ आली. या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागतो पण सनदी अधिकाऱ्यांवर कुठलीही कारवाई केली जात नाही. आज ते त्याच तोऱ्यात आपापल्या खुर्च्यांवर बसलेले आहेत आणि त्या ठिकाणी काम करीत आहेत. सनदी अधिकारी त्यांच्या पदावर असल्यामुळे या चौकशीमध्ये अडथळे निर्माण होतील. म्हणून त्यांच्यावर शक्य तेवढया लवकर कारवाई व्हावयास पाहिजे होती, त्यांना आवश्यक त्या रजेवर पाठवावयास पाहिजे होते. पण ते झाले नाही. म्हणून जनतेच्या मनामध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झालेले आहे. हे संभ्रमाचे वातावरण निर्माण होऊ द्यावयाचे नसेल तर ज्या पारदर्शीपणाने माननीय मुख्यमंत्र्यांनी कारभार सुरु केला, त्या माननीय मुख्यमंत्र्यांकडून आमच्या काही अपेक्षा आहेत.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाही नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

आपण त्यावेळेला असे विधान केले होते की, या बाबतीत कठोर कारवाई करु आणि यातून कोणालाही सोडणार नाही. कितीही मोठा असला तरी सोडणार नाही. या अपेक्षा माननीय मुख्यमंत्र्यांनी पूर्ण करण्यासाठी गेली तीन महिने ज्या कासवगतीने ही चौकशी सुरु आहे त्याला गती देऊन याबाबत ताबडतोबीने कारवाया झाल्या तर निश्चितपणे महाराष्ट्राच्या जनतेमध्ये चांगला मेसेज जाईल हीच अपेक्षा या चर्चेच्या माध्यमातून आम्ही करतो आणि माझे वक्तव्य संपवितो.

---

**सभापती** : आपल्या प्रथेप्रमाणे विरोधी पक्षातील एका सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिल्यानंतर सत्ताधारी बाजूकडील एका सन्माननीय सदस्यांना संधी दिली जाते. त्यानुसार आता सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी बोलतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आदर्श सोसायटीची चर्चा ही केवळ महाराष्ट्रापुरतीच सीमित राहिलेली नाही तर सबंध हिदुस्थानामध्ये आदर्श सोसायटीची चर्चा आहे इतकेच नव्हे तर जगापर्यंत आदर्श सोसायटीच्या संदर्भातील घटना गेलेली आहे. यामध्ये चूक कोणाची, यामध्ये कोण बरोबर तसेच राजकीय पक्ष कोणते याला इतके महत्व देण्याची गरज नाही, असे मला वाटते. मघाशी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, 2 फ्लॅट दिल्यानंतर राज्याच्या मुख्यमंत्री पदाला मुकावे लागते, राजीनामा द्यावा लागतो. पण अधिकारी मात्र आहे त्याच ठिकाणी राहतात, हा या चर्चेचा गाभा असावा, हा त्याचा मुद्दा असावा असे मी मानतो. यामध्ये मालकी कोणाची हे अजून कळत नाही. ताबा कोणाचा हे निश्चित आहे. एफएसआय आणि अलॉटमेंट ऑफ फ्लॅट असे चार मुद्दे माझ्या दृष्टीकोनातून महत्वाचे आहेत. मालकी कोणाची हे माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तराच्या भाषणातून लक्षात येईल. पण ताबा मात्र मिल्ट्रीचा होता, ही वस्तुस्थिती आहे. ज्याच्या हातात फाईल गेली त्या प्रत्येकाने एक-एक मजला वाढवून दिला आणि एक-एक फ्लॅट घेतला, ही वस्तुस्थिती देखील नाकारता येत नाही. एक प्रश्न असा निर्माण होतो की, इतक्या उच्च श्रेणीचे जे अधिकारी आहेत त्यांच्या संदर्भात महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झालेले आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्यांच्यावर अंकुश ठेवण्यामध्ये सरकार कमी पडले की, काय हा त्यातील दुसरा भाग महत्वाचा आहे. आपण सांगितले की, 8 मार्च 2004 ला लष्कराचा ताबा होता व त्यांनी कंपाऊंड भिंत देखील करुन घेतली होती. त्यांचा ताबा होता याबाबत कोणाला काही म्हणता येणार नाही. शेजारी बीईएसटीचा प्लॉट होता आणि बीईएसटीच्या त्या प्लॉटचा एफएसआय देखील त्या ठिकाणी वापरण्यात आला अशा पध्दतीची माहिती वृत्तपत्रामध्ये आलेली आहे. नेमके काय आहे ते आपल्याला चौकशीतून कळेल.

सभापती महोदय, कागदपत्रे गहाळ होणे हा एक मुद्दा देखील अत्यंत गंभीर आहे. त्या कागदपत्रात काय होते ही बाब वेगळी पण मंत्रालयातून एखादी फाईल गायब होणे, त्या फाईलमधील काही कागदपत्रे गहाळ होणे, पुढच्या काळामध्ये असे होणार नाही यासंदर्भात शासनाने जागरुक राहिले पाहिजे, असे मला म्हणावयाचे आहे. यामध्ये सीआरझेडचे उल्लंघन झाले. केंद्रीय मंत्री श्री. जयराम रमेश यांनी असे विधान केले होते की, ही संपूर्ण इमारत पाडून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

टाका. याबाबत सीबीआयची चौकशी चालू आहे तसेच कोर्टाची सुध्दा चौकशी आहे. यामध्ये केंद्र शासनाचा संबंध आहे, यामध्ये राज्य शासनाचा सबंध आहे तसेच यामध्ये एमएमआरडीए आणि मुंबई महानगरपालिकेचा संबंध आहे. या आदर्श सोसायटीचा आपण विचार केला तर यामध्ये या चार संस्थांचा संबंध येतो. म्हणून या चार संस्थांनी नेमके यामध्ये काय घडले आणि हे कसे घडत गेले हे पाहिले पाहिजे. गेल्या 25-30 वर्षापासून मी देखील या सभागृहात आणि विधानसभा सभागृहात काम करीत आहे. परंतु अशा पध्दतीची उच्च श्रेणीच्या आयएएस अधिका-यांच्या माध्यमातून झालेली जी काही घटना आहे ती वेगळी आणि फार बोलकी घटना आहे. आपण मघाशी सांगितले तसेच मागे चर्चेत देखील आपण म्हटले होते की, 2 फ्लॅट दिले म्हणून एका मुख्यमंत्र्याला जावे लागते. त्यांना जावे लागते कारण ही लोकशाही आहे. पण मुख्यमंत्र्यांना किंवा इतर मंत्र्यांच्या बाबतीत हे सर्व होत असताना आपले जे सनदी अधिकारी आहेत त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार हे अत्यंत महत्वाचे आहे. यामध्ये आयएएस अधिकारी आहेत, आयपीएस अधिकारी आहेत. ते काही केवळ आपल्या राज्य शासनाचे नाहीत. त्यांच्यावर केंद्र शासनाचे नियंत्रण आहे. या संदर्भात आपण माहिती द्यावी. सभापती महोदय, आपण वेळ संपल्याची घंटा वाजविल्यामुळे मी माझे भाषण येथेच संपवितो.

---

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि आम्ही सर्वांनी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, या चर्चेसाठी बऱ्याच सुसंवादानंतर आपण या चर्चेला मान्यता दिली. सन्माननीय मुख्यमंत्री आणि सन्माननीय उप मुख्यमंत्री यांनी सुध्दा चर्चेला उत्तर देण्याची तयारी दाखविली आहे. ही चर्चा घडविणे व त्यावर तोडगा शोधणे हाच आमचा हेतू आहे. ही एका अर्थाने संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेचे आज विधिमंडळाकडे लक्ष आहे. आपण असे बऱ्याच वेळा म्हणतो की, वेगवेगळया माध्यमातून लोकांपर्यंत माहिती पोहोचते किंवा नाही. परंतु जसा 'आदर्श' चा घोटाळा बाहेर आला त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मग पुणे असेल, पिंपरी-चिंचवड असेल, मुंबईत मालाड असेल, नागपूर असेल अनेक ठिकाणी ज्या ज्या सनदी अधिकाऱ्यांनी स्वत: तेथे एक ॲथोरिटी म्हणून काम करीत असताना स्वत:च्याच फायद्यासाठी जागा घेतल्या, जागांना परवानग्या दिल्या. या सर्वच्या सर्व बाबतीतील चर्चा समोर आलेली आहे. यामध्ये 12 आयएएस अधिकारी, 2 आयपीएस अधिकारी, 1 आयएफएस अधिकारी, 6 जिल्हाधिकारी, 1 उपायुक्त व 1 उप सचिव अशी एकूण 21 जणांची नावे आहेत. आम्ही नियम 97 सूचना दिली होती त्यामध्ये 14 व्यक्तींची नावे सारखी चर्चेला येत आहेत असे नमूद केले होते. परंतु 21 अधिकाऱ्यांपैकी 6 जिल्हाधिकारी आहेत, उपायुक्त व उप सचिव आहेत आणि ते आज सुध्दा ते वेगवेगळ्या अधिकाराच्या जागेवर काम करीत आहेत. 21 फेब्रुवारीची घटना मी सभागृहासमोर सांगते. आरटीआय ॲक्टीविस्ट संतोष दौंडकर यांनी हे प्रकरण बाहेर काढण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली होती. त्यांच्यावर हल्ला झालेला आहे. त्याचबरोबर या सोसायटीला पर्यावरण विभागाची नोटीस बजावण्यात आली आहे. या प्रकरणाची सीबीआय चौकशी सुरु आहे, त्यांना पाहिजे ती व्यवस्था मिळाली नाही.

नागपूरच्या अधिवेशनामध्ये या प्रकरणातील 9 मुद्यांबाबत चौकशी करण्यासाठी 2 सदस्यांची नावे जाहीर झाली. त्या चौकशी समितीचे टर्मस ऑफ रेफरन्सेस पटलावर आलेले नाहीत. त्याची सभागृहाला माहिती नाही. ही चौकशी समिती कोणत्या मुद्यांना घेऊन काम करणार आहे, जागेच्या मालकीबरोबरच कारगिलच्या युध्दातील लाभधारक होते काय, प्रकाश पेठे रस्त्याची रुंदी कमी करण्यात आली आहे, बेस्टने आरक्षण बदलणे कितपत योग्य होते. इमारतीची उंची वाढविणे योग्य

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

डॉ.नीलम गोऱ्हे....

होते काय, सीआरझेडच्या कायद्याचा भंग झाला काय, या सोसायटीत फ्लॅट घेणारे किती लोक राजकारणी लोकाशी संबंधित आहेत आणि त्यांच्या कशा पध्दतीने शिफारशी झालेल्या आहेत, लोकप्रतिनिधींची भूमिका काय आहे, सर्व्हिस रुल्सचा भंग झाला आहे काय, हे सर्व मुद्दे चौकशी समितीसमोर आहेत.

डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये मी औचित्याचा मुद्दा मांडला होता. त्यावेळी या अधिकाऱ्यांना शासनाने नोटिसेस पाठविल्याचे सांगितले होते. या अधिकाऱ्यांना शासनाने शो कॉज नोटीस पाठविल्या की नाही याबाबतचे चित्र अजून स्पष्ट झालेले नाही. सीबीआयच्या चौकशीत ज्या ज्या व्यक्तीची नावे आलेली आहेत त्यामध्ये सीबीआयने सुध्दा सांगितले होते की, या व्यक्तींविरुध्द ताबडतोब आरोपपत्र दाखल करावे. त्यानुसार आरोपपत्र दाखल करावे लागले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी जी समिती नेमली होती त्या समितीला 3 महिन्यांची मुदत दिली होती. ही मुदत आता संपत आलेली आहे. या समितीमध्ये कोणाचे नाव असावे की नसावे यापेक्षा हे अधिकारी आज सुध्दा त्याच पदावर काम करीत आहेत. त्यांना वेगवेगळया प्रकारे संरक्षण दिले जात आहे. यापूर्वीच्या 'प्रतिभा' इमारतीचे काय झाले ते सगळयांना माहीत आहे. 'आदर्श' ही इमारत पाडली गेली पाहिजे अशी लोकांची अपेक्षा आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी ऐतिहासिक परिस्थितीत कार्यभार स्वीकारला आहे, त्यामुळे जनतेच्या अपेक्षा खूप वाढलेल्या आहेत. प्रेमाचे प्रतिक म्हणून 'ताजमहाल' कडे पाहिले जाते. त्याप्रमाणे भ्रष्टाचाराचा 'आदर्श' ताजमहाल म्हणून या सोसायटीकडे पाहिले जाईल. शासनाने राजकरणातील लोकांची नावे घेतली नाही तरी, ही नावे जनतेला माहिती आहेत. या सगळया लोकांची सीबीआयची चौकशी पूर्ण होऊन व त्याबाबत पुढील अधिवेशनात चर्चा होईपर्यंत हे अधिकारी त्याच जागेवर जर राहिले तर असे घोटाळे दडपण्यासाठी प्रयत्न होतील की नाही याची कोणीही हमी देऊ शकत नाही. म्हणून आमची अपेक्षा आहे की, यातील जे अधिकारी राज्यात आजही काम करीत आहेत त्यांना ताबडतोब कार्यमुक्त करावे यासाठी पावले उचलावीत. चौकशी समितीचा अहवाल येण्यासाठी आणखी सहा महिने लागले आणि हे अधिकारी कार्यरत राहिले तर मधल्या काळात सर्व पुरावे नष्ट होतील. यादृष्टीने या चर्चेसंबंधी शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला जाईल असे माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सदनाला आश्वासित करावे अशी मी अपेक्षा व्यक्त करते आणि येथेच थांबते.

---

यानंतर श्री.शिगम...

अशुद्धलिखित प्रत / शीघ्रलिपी नोंदी

श्री. हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आदर्शच्या संदर्भात या सभागृहामध्ये एकदा चर्चा होऊन गेलेली आहे. मंगळवार दिनांक 15 मार्च रोजी या विषयावर चर्चा झाली. ही चर्चा पुन्हा पुन्हा उपस्थित का केली जाते हे मला समजत नाही. या आदर्शच्या संबंधी सरकारने कणखरपणे पावले टाकलेली आहेत. आमच्या मुख्यमंत्र्यांना श्रेष्ठींनी राजीनामा देण्यास सांगितल्यानंतर त्यांनी ताबडतोबीने राजीनामा दिला. या आधी श्री. अे.आर.अंतुले साहेबांनी राजीनामा दिला होता. श्री. निलंगेकर साहेबांनी राजीनामा दिला होता. नैतिकतेच्या प्रश्नावर काँग्रेस पार्टी किंवा हे आघाडी सरकार केव्हाही मागे राहिलेले नाही. कसलेही आरोप सिध्द झालेले नसताना केवळ चर्चा झाली. ही चर्चा पर्सेप्शनची झाली. या चर्चेमध्ये सत्यासत्यता पुढे न येता केवळ आकलनच्या, पर्सेप्शनच्या माध्यमातून चर्चा झाली. जनतेच्या समाधानासाठी आमच्या आधीच्या तीन मुख्य मंत्र्यांनी राजीनामे दिलेले आहेत. याप्रकरणी माननीय मुख्यमंत्र्यांनी चौकशी आयोग नेमलेला आहे. त्या चौकशी आयोगाला 13 अटी घातलेल्या आहेत. त्या 13 मुद्यांच्या संदर्भात स्पष्टीकरण यावयास पाहिजे. त्याबाबतीत उशीर झाला असेल. त्यासंबंधात आपण तक्रार करु शकता. चौकशी आयोग कशा प्रकारे चालतात याची आपणा सर्वांना कल्पना आहे. गुजराथ मधील चौकशी आयोग किती दिवस सुरु आहे, कशा प्रकारे काम चालू आहे याची आपणास माहिती आहे. त्या आयोगाला बाहेरही काम करावे लागते हे आपणास माहीत आहे. याबाबतीत थोडा विलंब झाला हे खरे आहे. परंतु यासंबंधी डिटेल माहिती घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न चाललेला आहे.

सभापती महोदय, केन्द्रीय अन्वेषण विभागा तर्फे या प्रकरणी चौकशी सुरु आहे. या विषयासंबंधी पीआयएल दाखल झालेला आहे. मुख्यमंत्री नांदेडला जे काही म्हणाले तो त्यांचा अधिकार आहे. ते काँग्रेस पक्षाचे देखील नेते आहेत. काँग्रेस पक्षाच्या एखाद्या नेत्यावर किंवा एखाद्या कार्यकर्त्यावर अन्याय झाला आणि त्याचा उल्लेख केला म्हणून काही बिघडत नाही. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना मी अशासाठी सांगत आहे की, नैतिकतेच्या बाबतीत आपण कोणत्या पायरीवर आहात हे देखील आपण पहावे. मी कुणाचे नाव घेतलेले नाही. नाही तर मला उगाचच उखाणा म्हणावा लागेल. ही जमीन मिलिटरीची, लष्कराची नाही. त्यांच्या नोंदवहीमध्ये तशी नोंद नाही हे त्यांनी दिलेल्या ॲफिडेव्हिटमध्ये सांगितलेले आहे. त्यानंतर 1991 मध्ये मुंबईच्या संबंधात जो डीपी झाला त्यामध्ये त्या जमिनीसंबंधीचा उल्लेख नाही. उलट ती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई...

जमीन महाराष्ट्र सरकारची आहे असा उल्लेख आलेला आहे. महाराष्ट्र सरकारच्या नोंदणीमध्ये ही जमीन महाराष्ट्र सरकारची आहे हेही आलेले आहे. राज्य शासनाने न्यायालयामध्ये जे ॲफिडेव्हिट केलेले आहे त्यामध्ये देखील अशा प्रकारची स्पष्ट भूमिका घेण्यात आलेली आहे. 1999चा जी.आर. युती शासनाच्या काळात काढलेला आहे. त्यामध्ये या जमिनीच्या संदर्भात स्पष्ट भूमिका घेतलेली आहे.

सभापती महोदय, मी एका गोष्टीचा उल्लेख करणार आहे. अशा प्रकारे हाऊसिंग सोसायट्या होतात आणि त्या सोसायट्यामध्ये वेगवेगळे लोक सभासद होतात हे महाराष्ट्रामध्ये काही नवीन नाही. कर्नाटकामध्ये नवीन आहे की नाही हे माहीत नाही. परंतु महाराष्ट्रामध्ये असे प्रकार होतात. महाराष्ट्रातील ब-याच अधिका-यांनी वेगवेगळया ठिकाणी जागा घेतलेली आहे. इतकेच नव्हे तर न्यायाधीशांनी देखील वेगवेगळया ठिकाणी जागा घेतलेल्या आहेत. त्यांनी त्या जागा भ्रष्टाचार करुन घेतलेल्या आहेत असा त्याचा अर्थ होत नाही. त्यांनी जर जागा घेतलेल्या आहेत तर मग आताच हा प्रश्न का निर्माण व्हावा ?

..नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई.....

सभापती महोदय, संरक्षण खात्याची मालाड येथील जागा अथर्व या संस्थेला दिली गेली आहे. त्या संदर्भात याठिकाणी कोणी काही बोलले नाही. त्या जागेवर एक मोठी इमारत उभी राहिली आहे. मुख्य भाग असा की, वरळी येथे आमदारांची गृहनिर्माण सोसायटी उभी राहिली आहे. त्या जागेवर पूर्वी पोलिसांची वस्ती होती. पोलिसांच्या वसाहतीसाठी ती जागा राखीव ठेवलेली होती. माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना माहिती आहे. त्यांची एक कार्यकर्ती ही पोलिसाची मुलगी असून पूर्वी ती त्या ठिकाणी रहात होती. आम्ही त्या जागेवर प्रत्यक्ष जायचो त्यावेळी तेथे पत्र्याची घरे असल्याचे आम्ही पाहिले होते. आम्ही त्या घरांची अवस्था पाहून म्हणत होतो की, काय पोलिसांची अवस्था आहे? कालांतराने ती वस्ती हटविली गेली. तेथे आमदारांची गृहनिर्माण सोसायटी उभी राहिली आहे. सगळे छानपणे रहात आहेत. सर्वच पक्षाचे आमदार या गृहनिर्माण सोसायटीचे सभासद आहेत.

सभापती महोदय, या आदर्श इमारतीसंबंधी एकदा मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात भूमिका स्पष्ट केलेली असताना पुन्हा या विषयावर चर्चा करणे चुकीचे आहे असे मला वाटते. विरोधकांनी नैतिकतेचा मुद्दा उपस्थित करु नये. चौकशी समिती नेमण्यात आली आहे. चौकशीमधून सर्व गोष्टी बाहेर येतील. या प्रकरणात भयानक काहीतरी सुरु आहे असे भासविले जात आहे. याठिकाणी सांगण्यात आले की, अधिकारी कसे वागले, कोणी कोणी किती फ्लॅट घेतले आहेत या सर्व प्रकरणाची चौकशी सुरु आहे. मुख्यमंत्री महोदय, या प्रश्नासंबंधी गप्प आहेत असे समजण्याचे कारण नाही. जे अधिकारी या प्रकरणात दोषी असतील त्यांच्यावर कारवाई होणार आहे. थोडा धीर धरावा. कासवाच्या गतीने चौकशी सुरु आहे असे म्हटले जात असले तरी चौकशी ठामपणे सुरु झालेली आहे हे लक्षात घ्यावे. सशाच्या वेगाने जाऊन नंतर झोपी गेले असे होणार नाही. याबाबत विरोधकांनी निश्चिंत रहावे. या संदर्भात तुम्ही फार काळजी करण्याचे कारण नाही. पुन्हा पुन्हा हा विषय सभागृहात उपस्थित करुन चर्चा करण्यात येऊ नये एवढीच मला विनंती करावयाची आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अतिशय प्रामाणिकपणे ही अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अनेक बाबींचा उल्लेख केला आणि माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांनी अतिशय मॅच्युअर्ड भाषण केले आहे. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात या प्रकरणी चर्चा झाली होती. राजकीय स्वरुपाची चर्चा खूप झाली. आम्हाला याठिकाणी त्याची पुनरावृत्ती करावयाची नाही. त्या नंतरच्या घटना क्रमातून जे प्रश्न सामान्य माणसांच्या मनामध्ये निर्माण झाले ते प्रश्न विरोधी पक्ष म्हणून आम्ही अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून सभागृहात मांडणार आहोत. त्यासाठी आपण आम्हाला परवानगी दिली त्याबद्दल मनापासून आपले आभार मानतो.

हिवाळी अधिवेशनात माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते की, तीन महिन्यात चौकशी पूर्ण केली जाईल. तीन महिने उलटून गेले आहेत. चौकशी आयोगाला जागा कुठे द्यायची? पगार किती द्यायचा? यापुरतीच चौकशी झालेली आहे. बाहेर अशी चर्चा होत आहे की, उप मुख्यमंत्री हे शेताच्या बांधावर चालणारे असून मुख्यमंत्री फाईलवर चालणारे आहेत. ते फाईल लवकर क्लिअर करतील. चौकशी आयोग लवकर नेमला जाईल असे आम्हाला अपेक्षित होते. केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.जयराम रमेश यांनी सांगितले होते की, इमारत पाडली गेली पाहिजे. दूरचित्रवाहिन्यांवर मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत प्रतिक्रिया दिली की, त्यांनाच करु द्या. इमारतीला परवानगी एमएमआरडीएने दिली असल्यामुळे इमारत पाडण्याचे काम त्यांचे आहे. तुमच्या पक्षाचे प्रवक्ते सांगतात की, हे मुंबई महापालिकेचे काम आहे. या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांची तडफदारी दिसली पाहिजे. जी चूक झाली ती चूकच आहे. नांदेडच्या भाषणाचा उल्लेख केला. ते तुमच्या पक्षाचे कार्यकर्ते असतील. त्यांना व्यक्तिगत घरी जाऊन भेटून सांगावे.

नंतर 2जी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

पण राज्याचे प्रमुख म्हणून आपण जी समिती नियुक्त केली त्यासंदर्भात सीबीआयने म्हटले आहे की, असे जाहीर करु नये, because it will impact the inquiry, म्हणून आमचा कन्सर्न आहे. आपण त्या पक्षाचे प्रमुख आहात, कार्यकर्त्यांचे मनोधैर्य वाढले पाहिजे, हे देखील मला मान्य आहे कारण जे आपण केले तेच आम्हीही करतो, त्याबद्दल माझे म्हणणे नाही. पण जाहीरपणे जे करतो त्यामुळेच अशी कागदपत्रे गहाळ करण्याची हिंमत वाढते. कारण त्यांचे म्हणणे असते की, मुख्यमंत्री जर समर्थन करतात तर आपण कशाला विचार करायचा ? पण हे पुन्हा कधी तरी बाहेर येऊ शकते, आपण कशाला लटकायचे ? अशी भीती मंत्रालयाच्या कॉरिडॉरमध्ये व्यक्त केली जात आहे. ही भीती घालवावयाची असेल तर प्रामाणिकपणे तसा प्रयत्न शासनाने केला पाहिजे. If you Love it, show it. जर सीबीआय चौकशी करीत आहे असे उत्तर आले पण सीबीआय सुरक्षेसंबंधीची चौकशी करीत आहे, बाकीच्या विषयांची नाही. जयराज फाटक यांनी प्रेस कॉन्फरन्स घेऊन कालही आपल्या नाकावर टिच्चून म्हटले की, ज्या आयएएस अधिकाऱ्यांनी आदर्श गृह निर्माण संस्थेत फ्लॅट घेतलेले नाहीत त्यांनी सुध्दा या गृह निर्माण संस्थेला वारेमाप मदत केली आहे. मग आपल्या चौकशीतून असे लोक सुटत असतील तर त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात, हा महत्वाचा प्रश्न आहे. हे सर्व सुटतात आणि अगदी "चुन-चुन कर" काही राजकीय नेत्यांना मात्र पकडले जाते. मग या माध्यमातून समाजात व जनतेत असा मेसेज गेला पाहिजे की शासनाने यामध्ये सर्वच दोषींवर कारवाई केली.

महोदय, या राज्यात नवीन माननीय मुख्यमंत्री यांनी पदभार स्वीकारल्यानंतर जाहीर सांगितले होते की, ब्युरोक्रसी, बिल्डर्स आणि राजकीय नेते मिळून ही मुंबई लुटायला लागले. त्यावेळेस आम्हाला खरोखरच असे वाटले होते की, या मुख्यमंत्र्यांमध्ये दोषी लोकांना खेचून बाहेर काढण्याची हिंमत दिसते. पण प्रत्यक्षात मात्र आतापर्यंत आदर्श संस्थेच्या संदर्भात कोणतीच कारवाई झाल्याचे दिसून येत नाही, याचा खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच या निमित्ताने माझा असा सवाल आहे की, या प्रकरणात जे जे आयएएस अधिकारी गुंतलेले आहेत त्यांना सर्वांनाच शिक्षा होणार आहे काय ? आम्ही आजही मंत्रालयात गेल्यानंतर आम्हाला या आयएएस अधिकाऱ्यांकडे आशेने विचारणा करावी लागते. वास्तविक ज्या आयएएस अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

मोठमोठे हात मारले त्यांच्याकडे आम्हाला विनंती करावी लागते. यासंदर्भात सीबीआयचे जे वर्डिंग आहे त्यानुसार खरोखरच या राज्यात असे चालले आहे, असा त्याचा अर्थ होतो, " The Officials and functionaries of Government of Maharashtra and others with intention of illegally getting land allotted in favour of Adarsh Co-operative Housing Society. The concerned public servants abused their official position...." अशा ॲब्यूज केलेल्यांची आम्हाला हाजी हाजी करावी लागते. एखाद्या ठिकाणचे संजय गांधी निराधार योजनेचे काम करा म्हणून त्यांची मनधरणी करावी लागते, याचीच आम्हाला लाज वाटते. ज्यांनी या राज्यात चोरी केली आहे, दरोडा घातला त्यांची हाजी हाजी करावी लागणे हे आमचे दुर्दैव आहे. मग ते सांगतात की, बघतो, आपण निवेदन द्या, हा कुठला न्याय आहे ? याची मुख्यमंत्र्यांनी दखल घेतली पाहिजे. या सभागृहात माजी मुख्यमंत्री बॅ. अंतुले हजर नसताना त्यांचा नुकताच उल्लेख झाला. तसेच माननीय माजी मुख्यमंत्री श्री. शिवाजीराव निलंगेकर यांचाही त्यांच्या अनुपस्थितीत उल्लेख करण्यात आला.....अडथळा.....मी स्वत: त्या आंदोलनात होतो आणि आपण सुध्दा आमच्याच बाजूने होता, हे विसरु नये. आपल्यासाठी आयबीएन किंवा स्टार माझा या वाहिन्या मोकळ्याच आहेत, मंत्री नसल्याने आपल्याला तेवढेच काम आहे. "The Public Servants of Government of Maharashtra also joined the conspiracy in terms of share and distorted the entire concept.." याचेच वाईट वाटते की, सीबीआयने त्यानंतर क्र. 10 वर "While functioning as Revenue Minister of Government of Maharashtra...."असे सगळे म्हटले आहे. राजकीय बाबीमध्ये मला जायचे नाही पण परिस्थिती अशी आहे की,"..The Government of Maharashtra had constituted a High Rise Committee which is chaired by retired judge of High Court.." म्हणून जयराज फाटक यांना त्यामध्ये घेतले आहे.....

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

आणि या विषयामध्ये महाराष्ट्र शासन वेगळी समिती नेमून चौकशी करीत आहे त्यामुळे त्या मध्ये आम्ही जात नाही. महाराष्ट्र शासनाने जी समिती नेमलेली आहे. त्या समितीला जागा नाही, खुर्च्या नाहीत, टेबल नाही,पगार नाही त्यामुळे ही समिती बरखास्त करण्यात यावी आणि सगळया प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे देण्यात यावी. एखादा राजकारणी जर चोर असेल तर त्याला शिक्षा होईल एखादा सनदी अधिकारी जर चोर असेल तर त्याला शिक्षा होईल अशा प्रकारचा संदेश एकदा बाहेर जाणे आवश्ययक आहे. अन्यथा आम्ही काहीही करु असेच या अधिका-यांना वाटत आहे. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु होण्यापूर्वी जी काही चर्चा होत आहे त्या चर्चेचे आपण निरीक्षण करावे. कोण कोणते सदस्य नोकरशाहीवर काय काय बोलतात आणि त्यांच्या फाईली

माझ्या समोर आल्यानंतर मी बघतो, त्यांची कामे माझ्याकडे आल्यानंतर मी बघतो, त्यांना अशा ठिकाणी अडकवतो की ते पुन्हा आवाज करणार नाहीत अशा प्रकारची वक्तव्ये केली जात आहेत. केवळ नोकरशाहच्या ब्रिफींगवर सरकार चालविले जात असल्यामुळे ते अशा प्रकारची वक्तव्ये करीत असतात.लोकप्रतिनिधी राजकारण सोडून सुध्दा खरे सांगत असतात यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी विश्वास ठेवला पाहिजे तसेच जो कोणी अधिकारी जबाबदार असेल तर त्याच्या विरुध्द कारवाई देखील करण्यात आली पाहिजे. नोकरशाहच्या जोरावर राज्य चालविता येणार नाही तर जनतेचे विषय घेऊन राज्य चालवावयाचे असते. आज जे काही घडले असेल ते आपण सोडून देऊ या. परंतु येथून पुढच्या काळात तरी दोषी असणा-या अधिकाराच्या विरुध्द शासन ठोस कारवाई करणार आहे काय, विविध अधिका-यांमध्ये अशा प्रकारची चर्चा का केली जात आहे? आदर्श सोसायटीच्या प्रकरणामध्ये काहीही होणार नाही असे देखील बोलले जाते. सुप्रीम कोर्टाने निर्णय दिल्यानंतर एका केन्द्रीय मंत्र्यांना बढती दिली गेली त्यामुळे श्री.चव्हाण यांचेसुध्दा असेच होईल.अशा प्रकारची चर्चा अधिका-यामध्ये होत असते त्याचबरोबर अधिका-याचे तर काहीही बिघडत नाही. ही इमारत पाडून टाकण्यात येईल असे श्री रमेश जयराम यांनी म्हटलेले होते त्या बाबतीत असो किंवा सीबीआयच्या चौकशीसबंधी असो किंवा श्री. जयराज फाटक परवा उघडपणे जे बोलले होते त्या संबंधी असो अशा कोणत्याही वक्तव्या बाबत ठोस कृती होत असल्याचे दिसून येत नाही त्यामुळे या सगळया विषया बाबत सरकार कारवाई करणार आहे काय आणि जर

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

करणार नसेल तर तेरी भी चूप आणि मेरी भी चूप असे बोलून पुढे आणखी गैरव्यवहार करण्यासाठी सगळेजण मोकळे राहतील अशा प्रकारे चित्र उभे राहता कामा नये असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप ( मुबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय,सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विषयावर सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या पूर्वी चर्चा उपस्थित केली होती परंतु त्याच विषयावर आता पुन्हा चर्चा उपस्थित केलेली आहे अर्थात ही चर्चा उपस्थित करणे आवश्यकही आहे हे मला मुद्दाम या ठिकाणी सांगावयाचे आहे. या संदर्भात मी हरकतीचा मुद्दा उपस्थित करीत होतो. आपण मघाशी असे म्हणाला होता की सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे भाषण झाले की लगेच उत्तर सुरु होईल परंतु आम्हाला सुध्दा चर्चेची संधी मिळाली पाहिजे हाच माझा हरकतीचा मुद्दा होता आणि आपण तो मान्य केला याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, सर्वच दृष्टीने हे प्रकरण फार गंभीर आहे या विषयाची जेव्हा यापूर्वी चर्चा झाली होती त्यावेळी देखील मी हाच मुद्दा मांडला होता हे मला चांगले आठवते. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही परंतु काळ सोकावता कामा नये असे मी त्यावेळी म्हणालो होतो. आज काळ सोकावत चालला असून ज्याच्या आधारावर देशाचे आणि राज्याचे प्रशासन चालते, जगातील सर्वात मोठया लोकशाही देशाकडे संपूर्ण जगातून पाहिले जात आहे त्या प्रशासकीय अधिका-यांनी आदर्श सोसायटीमधील आणि इतर तत्सम घोटाळयांमध्ये गैरव्यवहार केलेला असून त्यामध्ये त्याची नावे आलेली आहेत. आम्ही कवच कुंडले घेऊनच आलेले आहोत, आमचे कोणी काहीही वाकडे करु शकत नाही. असा त्यांचा समज झालेला आहे. आदर्श सोसाटीच्या संदर्भात आज जी काही चौकशी सुरु आहे ती करीत असताना आपण एक गोष्ट लक्षात ठेंवली पाहिजे की, आदर्श सोसायटीच्या प्रकरणाची चौकशी सीबीआय कडून करण्यात यावी अशा प्रकारची सुरुवातीला मागणी करण्यात आली होती त्याप्रमाणे सीबीआय चौकशी करीत असून त्यांनी काही पावले देखील टाकलेली आहेत त्याचबरोबर त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी जी समिती गठीत केलेली आहे त्या समितीचे सुध्दा काम सुरु आहे. या सगळया ॲडज्युरिकेट झालेल्या ज्या गोष्टी आहेत त्याबाबतीत मी वक्तव्य करणारच नाही. या ठिकाणी मी अतिशय वाईट शब्द वापरतो.श्री रामानंद तिवारी यांनी या सरकारला फाटयावर मारुन राजीनामा दिला नाही.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

मी याठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करतो त्यांनी अतिशय कणखर भूमिका स्वीकारुन त्यांना तात्काळ निष्कासित केले. परंतु हे प्रकरण एवढयावरच थांबणार आहे काय? माझ्या मते ते थांबता कामा नये.त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले पाहिजेत. जर या देशाच्या पंतप्रधानांवर गुन्हा दाखल होतो, या देशाच्या मुख्यमंत्र्यांवर गुन्हा दाखल होतो, या देशाच्या खासदार आणि आमदारांवर गुन्हा दाखल होतो, इतकेच नव्हे तर नगरसेवक किंवा ग्रामपंचायतीच्या सदस्यांवरही गुन्हा दाखल होतो तरमग या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल कां होत नाही? तो झाला पाहिजे ही माझी त्यावेळी मागणी होती ती आजही कायम आहे. आजच्या चर्चेचा हाच गाभा आहे. आपण आपल्या पक्षाची राजकीय भूमिका आपल्या पध्दतीने मांडतो. आमच्या पक्षाच्या व्यासपीठावर घेतलेल्या भूमिकेचा याठिकाणी उल्लेख झाल्यानंतर मला उभे रहावे लागले. त्यापूर्वी मी माननीय विरोधी पक्षनेत्यांचे भाषण शांतपणे ऐकत होतो. यामध्ये सर्वात महत्वाचा मुद्दा असा की, शासनाने काही तत्कालीन बाबी संबंधी निर्णय घेतले त्यामध्ये वरळीच्या सोसायटीचा असेल, आमदार निवासाचा असेल. त्याबाबतीत शासनाकडे असलेला अधिकार शासनाने सोसायटीला दिला असेल. म्हणून मला याठिकाणी माननीय मुख्यमत्र्यांना विनंती करावयाची आहे की, आपण आपल्या कामाची अनेक वेळा चुणूक दाखविली आहे. त्यामुळे आपल्याला एक गोष्ट विसरता येणार नाही. ती म्हणजे या राज्याच्या दृष्टीने माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांनी काल एक ऐतिहासिक निर्णय घेऊन विदर्भ पॅकेजमध्ये दोषी असलेल्या 405 अधिकाऱ्यांवर कारवाई करुन त्यांना निलंबित करण्यात आले आहे. माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या या कारवाईचे मी स्वागत करीत आहे हे करीत असतांना त्यावेळी प्रशासनामध्ये जयराज फाटक असतील, उत्तमराव खोब्रागडे असतील किंवा तत्सम कुणी अधिकारी असतील त्यांच्या बाबतीत माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी व्यक्त केलेल्या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे. हे अधिकारी इतके मुजोर स्वभावाचे आहेत की, ते लोकप्रतिनिधींबरोबर अशाप्रकारे वागत असतात. त्यांना वाटत असते की, त्यांच्याकडे आपले काही तरी इल्लीगल काम आहे. परंतु तसे समजण्याचे कारण नाही. आमचे जे काही काम आहे ते आपण करण्यासाठी बसलेले आहात. कोणताही प्रशासकीय निर्णय घेत असतांना तो योग्य नव्हता तर मग आपण त्याला संमती कशी दिली? आणि म्हणून या संपूर्ण प्रकरणामध्ये जे कुणी राजकीय दृष्टया सहभागी असतील त्यांना सजा होऊन त्यांच्या सर्व गोष्टी जनतेसमोर येऊ द्या.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

तसेच, यामध्ये आयएएस किंवा आयपीएस अधिकारी ज्या आविर्भावामध्ये वागत आहेत त्यांच्यावर सुध्दा कारवाई झाली पाहिजे अशी या चर्चेच्या माध्यमातून मागणी करीत आहे.

मुख्यमंत्री महोदय, आपण आपल्या दोन-तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये लोकोपयोगी निर्णय घेतले, महाराष्ट्रातील जनतेच्या भविष्याचे, भवितव्याचे आणि त्यांच्या दृष्टीने आवश्यक असलेले निर्णय घेतले. त्याचप्रमाणे मुंबईच्या कष्टकऱ्यांसाठी निर्णय घेतला, सीआर झेडचा निर्णय घेतला, राज्याच्या विकासाचा निर्णय घेतला, तो घेणे आवश्यक होते. ज्या पध्दतीने श्री. रामानंद तिवारी यांना आपण निष्कासित केले त्यांच्यावर सुध्दा गुन्हा दाखल झाला पाहिजे. एवढेच नव्हेतर यामध्ये ज्या 12 अधिकाऱ्यांचा समावेश आहे त्यांना सुध्दा शो-कॉज नोटिस देणे वगैरे कायद्याच्या चौकटीमधील गोष्टी झाल्या पाहिजेत आणि त्या सभागृहासमोर आल्या पाहिजेत. त्यांच्यावर आपण कोणती कारवाई केली हे सुध्दा आम्हाला जाणून घेणे गरजेचे वाटते. म्हणून या चर्चेच्या निमित्ताने मी विनंती करतो की, यामध्ये ज्यांचे कुणाचे राजकीय लागेबांधे आहेत व त्यांचे चार्जशीटमध्ये नाव आहे अशी काही प्रकरणे कोर्टामध्ये सुरु आहेत. It will take its own course. त्या पध्दतीने त्यावर निर्णय होईल. परंतु या अधिकाऱ्यांच्या बाबतीत सरकारने गंभीरता दाखविली पाहिजे अशी मी नम्रपणे विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला याठिकाणी आपली बाजू मांडण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी जी चर्चा उपस्थित केली आणि ज्या चर्चेकडे आपल्या सर्वांचेच नव्हे तर महाराष्ट्रातील जनतेचे लक्ष आहे की, "आदर्श"च्या बाबतीत नेमके काय होणार आहे. तसेच माननीय मुख्यमंत्री महोदयांकडून जनतेच्या या विषयाच्या बाबतीत फार मोठ्या अपेक्षा आहेत. याबाबत सी.बी.आय.मार्फत चौकशी सुरु आहे. तसेच या विषयाच्या संबंधातील कागदपत्रे गहाळ होत आहेत. आय.ए.एस.अधिकारी आपल्या खूर्चीमध्ये बसून एअरकंडीशनची मजा घेत आहेत आणि राजकारणी माणसे मात्र तुमचे काय, माझे काय, आम्ही काय केले, तुम्ही काय केले, असे भांडत आहेत. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी साहेबांचे कौतुक करीन की, त्यांनी खरोखरच या सभागृहामध्ये मॅच्युअर्ड स्टेटमेंट केले आणि ते आम्हाला सर्वांना भावले. तसेच सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप सुध्दा सुरुवातीला खूप छान बोलले. नंतर थोडेसे . . . .मी काही बोलत नाही. श्री.रामानंद तिवारी यांनी काय केले ते सन्माननीय सदस्यांनी सांगितले. पण ही दुर्दैवाची गोष्ट आहे की, त्यांनी आमच्या माननीय मुख्यमंत्र्यांना अडचणीमध्ये आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांना पुन्हा माननीय राज्यपाल यांच्याकडे जावे लागले. ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, मात्र एक गोष्ट पाहिली की, राजकारणी एकमेकांवर सडेतोड आरोप करतात, एकमेकांचे कपडे काढावयास कमी करीत नाहीत. पण ज्यावेळी दोन ब्युरोक्रॅट अडचणी मध्ये येतात, त्यावेळी एक दुसऱ्याला तो सांभाळून घेतो आणि हे आपल्यापैकी प्रत्येकाला शिकावयास पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.हुसेनभाई यांनाही हे लागू होते. श्री.सुभाष लाला यांचे काय झाले ? तसेच श्री.जयराज फाटक यांचे तर मला मोठे आश्चर्य वाटते की, त्यांनी मुलाखतीच्या वेळी सरळ हायराईटस् कमिटीकडे बोट दाखविले आणि स्वत:ची सुटका करुन घेतली. त्यांनी सांगितले की,"माझा मुलगा अमुक-अमुक आहे, माझी सून अमुक-अमुक आहे" अशा प्रकारचे त्यांनी एक्सप्लनेशन दिले. ज्यावेळी श्री.जयराज फाटक म्युनसिपल कमिशनर होते, त्यावेळी ते फार कडक शिस्तीचे आहेत असे म्हटले जात असे आणि जर आम्ही त्यांच्याकडे एखादे काम घेऊन गेलो तर ते आम्हाला नियमावर बोट दाखवून सांगावयाचे की,"डॉ.सावंत या-या कारणामुळे हे काम होणार नाही."पण त्यांनी स्वत: काय केले? या सभागृहामध्ये श्री.रामानंद तिवारी यांचे 18 फ्लॅट कुठे-कुठे आहेत त्याची नावे सांगण्यात आली.पण आजपर्यंत त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. कदाचित माननीय मुख्यमंत्री महोदय हे आपल्या ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

उत्तराच्या भाषणामध्ये सांगतील की, सदरहू अधिकारी हे केंद्र शासनाकडून आलेले आहेत. तसेच श्री.जयराज फाटक हे प्रतिनियुक्तीवर दिल्ली येथे कार्यरत आहेत आणि घटनेतील अमुक-अमुक नियमाप्रमाणे आपल्याला त्यांच्यावर कारवाई करता येणार नाही हे उत्तर अपेक्षित आहे. पण त्याच्याच पुढे जाऊन त्यांना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी जरी त्यांच्यावर केंद्र शासनाचा अंकुश असला तरी राज्य शासनाचा देखील काहीतरी अंकुश असण्यासाठी जे काही नियमामध्ये बदल करणे आवश्यक आहे, ते करण्यासाठी आपण केंद्र शासनाला शिफारस करणार आहात काय ? याचे आम्हाला आपल्याकडून उत्तर अपेक्षित आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय हे केंद्र शासनामध्ये कार्यरत होते. त्यामुळे आपल्याकडून जास्त अपेक्षा आहे आणि त्यातल्यात्यात आपण पी.एम.ओ. कडून आलेले आहात. त्यामुळे आपल्याकडून जास्त अपेक्षा आहे.

सभापती महोदय, श्री.उत्तम खोब्रागडे यांच्याबाबत सांगावयाचे तर ते कोणालाच मोजत नाहीत.ते "बेस्ट"चे चेअरमन असतानाही तसेच होते आणि आता आदिवासी विभागामध्ये असतानाही तसेच आहेत. त्यांच्याकडे जर एखादे पत्र पाठविले तर त्याचे उत्तर देण्याची देखील ते तसदी घेत नाहीत आणि सौजन्य दाखवत नाहीत. तसेच आपण मध्यंतरी जी.आर.काढला आहे, तो देखील त्यांनी केराच्या टोपलीत टाकला आहे. सत्ताधारी बाकीवरील सन्माननीय सदस्य असू देत किंवा विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य असू देत, आमची सर्वांची एकच अपेक्षा आहे की, श्री.कुंदन यांचे काय होणार, श्री.प्रदीप व्यास यांचे काय होणार, श्री.देशमुख यांचे काय होणार ? हे सर्व अधिकारी आहेत आणि आज देखील कार्यरत आहेत.

सभापती महोदय, यातील 14 जणांची जी यादी आहे त्या सर्वांवर एफ.आय.आर.दाखल होणार आहे काय ? तसेच हे सगळेजण सडेतोडपणे मीडियासमोर जाऊन सांगत आहेत की, आम्ही कसे निर्दोष आहोत. हे प्रकार कुठेतरी थांबणार आहेत काय, माननीय मुख्यमंत्री महोदय याला ब्रेक लावणार आहेत काय ? एवढेच आम्हाला विचारावयाचे आहे. आम्हाला आपल्याकडून फार अपेक्षा आहेत. यासंबंधातील उत्तर हे संदिग्ध नसावे. त्यामध्ये कोणालाही आणखी तर्कवितर्क करण्यासाठी वाव राहू नये, सडेतोड अशा प्रकारचे उत्तर असावे. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या बाजूला माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार देखील बसलेले आहेत. त्यांनी देखील आपल्याला मदत करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

यानंतर कु.थोरात . . . .

अशोधित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री एस. क्यु.जमा ( महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित ) : सभापति महादेय, विधान परिषद नियम 97 के अंतर्गत आदर्श गृहनिर्माण संस्था से संबंधित विषय पर माननीय विरोधी पक्ष नेता को चर्चा उपस्थित करने की जो अनुमति आपने दी है, वह स्वागत योग्य है. उसी चर्चा पर अपने विचार रखने के लिए मैं यहां पर खड़ा हुआ हूं.

सभापति महोदय, आदर्श सोसायटी की जानकारी अब पूरे देश को हो गयी है और अब यह मामला एक राष्ट्रीय मुद्दा बन गया है. यह बात सही है कि माननीय विरोधी पक्ष नेता एवं अन्य माननीय सदस्यों को इस बारे में शासन से जानकारी लेने तथा संबंधित कार्यवाही तेज करने के लिए कहने का अधिकार है. किन्तु मेरा इतना ही कहना है कि भ्रष्टाचार के मामले को किसी एक पार्टी से जोड़कर देखना उचित नहीं है.

अभी तीन-चार महीने पहले ही हमारी यह नयी सरकार आयी है. इस सरकार को सत्ता में आए हुए बहुत थोड़ा समय हुआ है. इसलिए हमारे माननीय मुख्य मंत्री या उप मुख्य मंत्री महोदय की निष्ठा के बारे, या काम करने के तरीके के बारे में शंका करने की कोई आवश्यकता किसी को नहीं है.

माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी साहब ने अभी यहां पर कहा कि इस विषय का संबंध केंद्र सरकार के कई विभागों से है, एमएमआरडीए, यहां की महानगर पालिका तथा महाराष्ट्र सरकार के कई विभाग भी इसमें इन्वॉल्व हैं. एक माननीय सदस्य ने यहां पर कहा कि सरकार ने एक कमेटी बनायी है लेकिन मैं कहना चाहूंगा कि यह कमेटी नहीं है. This is a Commission appointed under the Commissions of Inquiry Act. This is a statutory Commission. मेरा कहना है कि कुछ समाचार पत्रों में पढ़कर या किसी चॅनल के माध्यम से कुछ सुनकर यह कह देना कि इस तरह की भावना जनता की है, यह बात ठीक नहीं है. क्योंकि हम भी तो जनता का ही एक भाग हैं. कांग्रेस जन भी जनता में भी आते हैं. दूसरे कार्यकर्ता भी तो जनता का ही एक भाग है. मुझे नहीं लगता कि सभी लोग सरकार के प्रति कोई गलत भावना रखते हैं. सरकार भी यही चाहती है कि न तो किसी तरह के गुनाह हों और न

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा...

ही किसी गुनाहगार को संरक्षण मिले. सरकार तो गुनाहगारों को सजा दिलाना चाहती है. इसलिए मीडिया की सभी बातों पर विश्वास नहीं किया जाना चाहिए. अभी जो कमीशन बना है, वह स्वागत योग्य है. यदि उनके सामने कोई कुछ कहना चाहता है तो एफिडेविट फाइल करके वे अपना वक्तव्य वहां पर दे सकते हैं. हमारी वर्तमान सरकार और माननीय मुख्यमंत्री जी ने पिछले तीन-चार महीनों में जो निर्णय लिये हैं, वे बहुत ही स्वागत योग्य हैं.

एक बात मैं यहां पर यह भी कहना चाहूंगा कि हमारे मुख्य मंत्री जी संसद में और केंद्र सरकार में काम कर चुके हैं और अभी कुछ समय पहले ही महामहिम राष्ट्रपति महोदय का भाषण संसद में हुआ है. माननीय प्रधानमंत्री ने भी अपना वक्तव्य दिया है, हमारी नेता और यूपीए की चेयर पर्सन श्रीमती सोनिया गांधी जी ने भी भ्रष्टाचार के विरोध में अपना वक्तव्य दिया है. इसलिए मुझे नहीं लगता कि महाराष्ट्र की वर्तमान सरकार पर या मुख्यमंत्री महोदय या उप मुख्यमंत्री महोदय पर किसी को किसी तरह की शंका करने की जरुरत है. किसी को यह समझने की जरुरत नहीं कि हमारी सरकार भ्रष्टाचार से नहीं लड़ना चाहती. मैं साफ तौर पर कहना चाहूंगा कि हम भ्रष्टाचार के खिलाफ हैं और हमारी सरकार भ्रष्टाचार से पूरी ताकत से लड़ना चाहती है.

सभापति महोदय, मैं कामगार क्षेत्र में काम करता हूं और वहां पर इस तरह की व्यवस्था है कि यदि किसी मजदूर के काम के बारे में कोई शंका हो तो उसको चार्जशीट दी जाती है और प्राथमिक तौर पर यह लगता है कि उसकी गलती है तो उसको सस्पेंड भी किया जाता है. इसलिए माननीय विरोधी पक्ष के माननीय सदस्यों की इस भावना से मैं सहमत हूं कि यदि प्राथमिक तौर पर यह लगता है कि किसी अधिकारी ने कुछ गड़बड़ की है और उसके खिलाफ जो इंक्वायरी चल रही है उस इंक्वायरी में उस अधिकारी की वजह से कोई रुकावट आ सकती है तो फिर वह अधिकारी कितना भी बड़ा हो, उस अधिकारी को उसके वर्तमान पद से हटा देना चाहिए या उसको सस्पेंड कर देना चाहिए. सभी माननीय सदस्यों की भावना यही है कि इंक्वायरी निष्पक्ष ढंग से होनी चाहिए.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ D/ 15:10

श्री सय्यद जमा....

सभापति महोदय, माननीय मुख्य मंत्री जी से मैं अनुरोध करुंगा कि जो इंक्वायरी कमीशन नियुक्त किया गया है, उसकी एक निश्चित समय सीमा होनी चाहिए, ताकि सही परिस्थिति जल्द से जल्द जनता के सामने आ सके. इतना ही मुझे कहना है. धन्यवाद.

-0-

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रस्ताव सभागृहापुढे चर्चेसाठी आणलेला आहे, त्या अनुषंगाने एका अतिशय महत्वाच्या विषयावर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या एकूणच प्रकरणाचा शोध घेतलेला आहे. या निमित्ताने या प्रकरणाच्या संदर्भात आतापर्यंत झालेल्या कामाचा आढावा सभागृहासमोर आलेला आहे. 'आदर्श' ही या राज्यावर आलेली एक दुर्घटनाच आहे, असे मी मानतो. अशा घटनांमधून काही तरी चांगले घडण्याची शक्यता सुध्दा असते. आज आदर्श हा शब्द बदनाम झाल्यासारखा आपल्याला दिसतो.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

त्याची प्रतिष्ठा पुन्हा आणण्याची जबाबदारी, ते उत्तरदायित्व आताच्या शासनकर्त्यांवर आलेली आहे. या निमित्ताने मला असे सूचित करावेसे वाटते की, आपल्याला काही गोष्टींमध्ये लवकर निर्णय हवे असतात, लवकर कारवाई हवी असते आणि ही जी आपली अपेक्षा असते त्यामध्ये निश्चित काही तरी चौकटीची बंधने असतात. त्या चौकटीच्या बंधनामध्ये राहून ज्या ज्या कारवाया होणे आवश्यक आहेत त्या निश्चितपणे होतात की नाही याकडे बारकाईने लक्ष देण्याची जबाबदारी या राज्याचे प्रमुख म्हणून काम करणारे माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्यावर असते. आपण असे का गृहीत धरुन चालतो की, जे स्पष्टपणे समोर आलेले आहे आणि ज्या बाबतीत लोकांच्या काही भावना आहेत त्याबद्दल काहीच होत नाही ? मला वाटते की, या सभागृहामध्ये चर्चा होत असताना आपण असा समज करुन घेणे हे आपल्या दृष्टीने समजावून घेण्याची गरज आहे, असे मला वाटते.

तत्कालीन मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. एकूणच लोकशाही व्यवस्थेमध्ये काही गोष्टी करीत असतो. ज्याला इंग्रजीमध्ये सिम्बॉलिक गेश्चर म्हणतो त्या पध्दतीने आपण काही तरी प्रतिकात्मक गोष्टी करीत असतो. त्यामुळे या सर्व प्रशासनाची जबाबदारी असणाऱ्या मुख्य माणसाला त्या पदापासून मुक्त करण्याचा निर्णय त्या पक्षाच्या नेत्यांनी घेतला आणि तो निर्णय लोकभावनेचा आदर करुनच घेतलेला होता. त्यानंतर आज मुख्यमंत्री म्हणून जे या राज्याची सूत्रे सांभाळत आहेत त्यांच्यावर हे उत्तरदायित्व आहे की, ही यंत्रणा आणि या यंत्रणेमधील दोष या सर्व बाबतीत पूर्ण आढावा घेऊन त्यांच्या समृध्द अशा अनुभवाच्या ज्ञानावर आधारित एक नवी चौकट आणि एक नवी प्रशासन व्यवस्था निर्माण करावी. ज्या फाईल्स गायब झाल्या, जी कादपत्रे मिळत नाहीत त्या विषयात सध्याचे माननीय मुख्यमंत्री हे तांत्रिकदृष्ट्या सुध्दा अतिशय सक्षमपणे काम करणारे सद्गृहस्थ आहेत त्यामुळे ही सगळी माहिती एकदा आपल्या इनपुटमध्ये गेल्यानंतर कोणतीही फाईल गहाळ झाली तरी सुध्दा ती माहिती सरकारच्या हातातून जाणार नाही इतकी चांगली व्यवस्था आता करता येण्याची शक्यता आहे. ज्या ज्या प्रकरणांबद्दल अशा प्रकारचा संशय असेल त्याबाबत हे करता येईल. कदाचित एक धडा यामधून राज्यकर्त्यांना निश्चितपणे मिळालेला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

आहे की, जनता आता या सगळ्या गोष्टीकडे अधिक बारकाईने पाहते. मग माहितीचा अधिकार असेल किंवा अन्य माध्यमे असतील त्यामधून त्यांना अधिकार मिळालेला आहे. त्यामुळे अतिशय चोख प्रशासन देण्याची जबाबदारी या शासनावर आहे. मला या चर्चेच्या निमित्ताने निश्चितपणे विश्वास वाटतो की, भविष्यातील या राज्याची जी काही वाटचाल नवीन मुख्यमत्र्यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे त्यामध्ये या सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय राहणार नाही. या व्यवस्थेमध्ये काही तरी गोंधळ निर्माण करणाऱ्या, स्वत:च्या स्वार्थासाठी त्याचा उपयोग करुन घेणाऱ्या प्रशासनातील कोणत्याही अधिकाऱ्याला यामधून सवलत दिली जाणार नाही आणि यामध्ये जी नवी व्यवस्था येईल ती निश्चितपणे आदर्श असेल अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो. याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तराच्या भाषणातून सभागृहाला निश्चित असे मार्गदर्शन मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, आज राज्याच्या दृष्टीने एका अत्यंत महत्वाच्या विषयावर आपण या ठिकाणी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा घेतलेली आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी अतिशय अभ्यासपूर्ण पध्दतीने या विषयाची मांडणी केली तसेच अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये उपयुक्त सूचना केल्या, काही शंका व्यक्त केल्या तसेच काही चिंता व्यक्त केल्या. मला असे वाटते की, राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या प्रश्नावर ही चर्चा होणे उपयुक्त आहे आणि त्यामध्ये आजची असलेली परिस्थिती आणि उचित दिशा याची माहिती देणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून आपण ही चर्चा स्वीकारल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

सभापती महोदय, पहिल्यांदा सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी या प्रकरणाच्या मेरिटमध्ये जाण्याचा प्रयत्न केला. या सोसायटीचे गुणदोष, कोण दोषी आहेत. जमीन कोणाची आहे, कोणी, किती कोणाला जमीन दिली, इमारतीची उंची वाढविण्यासाठी परवानगी कोणी दिली, बेस्ट डेपोचा एफएसआय कोणी दिला, या सहकारी गृहनिर्माण सोसायटीचे सदस्यत्व देताना कोणी कोणी त्यावर निर्णय घेतले, सीआरझेडबाबत पर्यावरण विभागाच्या परवानगीचे नेमके काय झ ाले असे विचारण्यात आले. मला त्यांना असे नम्रपणे सांगावयाचे आहे की, हा अतिशय किचकट विषय आहे. यासंबंधी तडकाफडकी निर्णय घेता आले असते तर शासनाने ते घेतले असते. मुळातच जी जमीन कोणाची होती याबद्दल वाद आहे. एका बाजूला सैन्य दलाकडून सांगण्यात येते की, ही जमीन आमच्या मालकीची आहे. दुस-या बाजूला राज्य सरकारचे असे ठाम मत आहे की, ही जमीन आमच्या मालकीची आहे. तशाप्रकारचे निवेदनही मी हिवाळी अधिवेशनामध्ये केले होते. याच एका कारणामुळे दिल्लीतील संरक्षण खात्याने चौकशी करण्यासाठी हे प्रकरण सीबीआयकडे सोपविले होते. जमिनीच्या मालकीचा विषय घेऊन सीबीआयने आपले काम सुरु केले होते. त्यानंतर या प्रश्नाची व्याप्ती वाढत गेली. अजूनही सीबीआयने त्याचे स्पष्ट उत्तर दिलेले नाही. सैन्य दलाने त्यासंबंधीची काही ॲफिडेव्हिट्स दाखल केलेली आहेत. ही जमीन सैन्य दलाच्या अधिपत्याखाली होती हेही सगळयांना माहीत आहे. त्याचबरोबर राज्य सरकारचे असे ठाम मत आहे की, ही जमीन आमची होती. ही जमीन राज्य शासनाची होती की सैन्य दलाची होती हे स्पष्ट झाल्यावर त्यातून अनेक पर्याय निघत जातील. हा मुद्दा अतिशय तांत्रिक व किचकट असल्यामुळे शासनाने त्याबाबत गंभीरपणे विचार केला आहे. एका बाजूला सनदी अधिकाऱ्यांना प्रोटेक्शन देण्याबाबतचे नियम घटनेने दिलेले आहेत. जे भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी आहेत त्यांच्याविरुध्द शासनाला तडकाफडकी निर्णय घेता येत नाहीत. कारण घटनेच्या कलम 311 अनुसार त्यांना संरक्षण प्राप्त झ ालेले आहे. हे संरक्षण योग्य की अयोग्य आहेत याबाबत भिन्न मते असू शकतील. पण आज देशाच्या घटनेमध्ये जी मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत ती आपल्यासमोर आहेत. त्यामध्ये मूलभूत बदल केले पाहिजेत असेही मत व्यक्त केले गेले. यासंदर्भात समाजामध्ये, सभागृहामध्ये तीव्र स्वरुपाची भावना आहे याबद्दल कोणाचेही दुमत नाही.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

सनदी अधिकाऱ्यांबाबत शासनाने कोणती भूमिका घेतली आहे असाही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. त्यापूर्वी राज्य शासनाने जवळजवळ महिनाभर विचार केला. जर पोलिसांमार्फत चौकशी सुरु केली तर त्यातून काही निष्पन्न होणार नाही. केवळ कोर्ट कचेऱ्या सुरु होतील असे शासनाचे मत झाले. म्हणून सर्व संबंधितांशी, विधिमंडळाच्या सदस्यांशी, माननीय सभापतींशी आणि माननीय अध्यक्षांशी चर्चा करुन या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्याचा शासनाने निर्णय घेतला. या चौकशीला कदाचित वेळ लागेल हे शासनाला माहीत होते. परंतु यातील विविध पैलू आहेत. जमीन कोणाची होती यापासून ते कोणी काय काय केले, या सर्व व्यवस्थेमध्ये बदल करण्याची गरज आहे काय, या सर्व विषयांची सर्वंकष चौकशी न्यायालयीन चौकशीच्या प्रक्रियेमध्ये होऊ शकेल असे शासनाचे मत झाले. न्यायालयीन चौकशी करण्याचा निर्णय घेतल्यावर या कामासाठी बऱ्याच न्यायमूर्तींनी नकार दिला. पण शासनाने बरेच प्रयत्न केले. त्यामुळे समिती नेमण्यास उशीर झाला. त्यानंतर एक न्यायमूर्ती आणि ज्यांना प्रशासन चालविण्याची माहिती आहे असे एक ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी या दोघांची समिती शासनाने नेमली. या समितीचे कामकाज चालू झालेले नाही, कासव गतीने कामकाज चालले आहे. शासनाने या समितीला मदतच केली नाही वगैरे वगैरे विषय उपस्थित करण्यात आले. काही गोष्टींबाबत टिप्पणीही करण्यात आली आहे. दिनांक 8 जानेवारी, 2011 रोजी आयोगाच्या निर्मितीची अधिसूचना निर्गमित करण्यात आल्यानंतर काय काय कार्यवाही करण्यात आली ते मी आपल्याला नम्रपणे सांगतो.

प्रथम 21 जानेवारी रोजी आयोगासाठी सचिवांची नेमणूक करण्यात आली. आयोगाला जागा पाहिजे होती. त्यांनी बऱ्याच जागा पाहिल्यानंतर जुने जकात घर येथील जागा निश्चित झाल्यावर त्यांनी कोर्ट रुम पाहिजे असे सांगितले. त्यामुळे सा.बां.विभागाने कोर्ट रुम तयार करुन दिली. हे काम आता त्या कोर्ट रुममध्ये सुरु झालेले आहे. त्याच बरोबर आयोगाला काम करण्यासाठी पद निर्मितीची गरज असल्याने 29 जानेवारीला त्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले. माननीय वित्त मंत्र्यांच्या मान्यते नंतर आयोगाला जेवढी पदे पाहिजे होती तेवढी पदे देण्यात आलेली आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अशोधित प्रत / शोधनेसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

नवे लेखाशीर्ष उघडलेले आहे. त्याच प्रमाणे अध्यक्ष आणि सदस्यांचे मानधन 1.60 लक्ष रुपये निश्चित करण्यात आलेले आहे आणि ते मानधनही देण्यात आलेले आहे. आकस्मिक निधीतून अग्रिम रक्कम घेण्यात आलेली आहे. पुढील वर्षासाठी एकूण 65 लक्ष रुपयाची तरतूद देखील करण्यात आलेली आहे. अर्थातच या प्रत्येक गोष्टीला परवागी लागते हे जरी मान्य असले तरी मला असे वाटते की आयोगाचे एकदा काम सुरु झाल्यानंतर त्यामध्ये फर्निचर, कॉम्प्युटर इत्यादी गोष्टींचा काही अडथळा आलेला नाही. त्यांना सगळे काही देण्यात आलेले आहे. त्यामुळे त्याचा जो काही उल्लेख झाला तो बरोबर नाही.

सभापती महोदय, या प्रकरणी न्यायालयीन चौकशी सुरु झालेली आहे, हा या प्रकरणाचा एक भाग झाला. ही बाब क्लिष्ट आणि न्यायप्रविष्ट झालेली आहे. उच्च न्यायालयामध्ये एकूण 6 दिवाणी दावे आणि 5 फौजदारी पीआयएल प्रलंबित आहेत. या प्रकरणाची चौकशी आणि जमिनीच्या मालकीचा प्रश्न संरक्षण खात्याने सीबीआयकडे चौकशीकरिता दिला आहे. त्यानंतर जी नस्ती गहाळ झाली होती त्याबद्दल महाराष्ट्र शासनाने मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविलेली होती. त्यासंबंधी चौकशी चालू होती. उच्च न्यायालयाने ती चौकशी देखील सीबीआयकडे सोपविलेली आहे. राज्य शासनाने सीबीआयला संपूर्णपणे सहकार्य केलेले आहे. राज्य शासनाने कोणकोणते सहकार्य केले हे मी आपणास सांगू शकेन. त्यांनी अधिका-यांची, वाहनांची मागणी केली. ती त्यांची मागणी पूर्ण केलेली आहे. त्याना फक्त जागा अधिक हवी आहे. जुन्या चौकशी करिता सीबीआयकडे राज्य शासनाचे 2 बंगले आहेत. त्यामुळे तेच बंगले त्यांनी वापरावेत असे काही आम्ही सांगत नाही. सीबीआयला आम्ही संपूर्णपणे सहकार्य केलेले आहे. सर्व खात्याच्या मूळ नस्त्या सीबीआयकडे दिलेल्या आहेत. आमच्याकडे त्या नस्त्या नाहीत. त्याच्या प्रती आम्ही ठेवलेल्या आहेत. सीबीआयला सर्व सहकार्य करण्याची भूमिका राज्य शासनाने घेतलेली आहे. या प्रकरणाशी किती अधिका-यांचा संबंध आहे ? आपणा सर्वांना माहीत आहे की, सकृतदर्शनी या प्रकरणामध्ये 21 शासकीय अधिका-यांचा संबंध असल्याचे दिसून येते. कदाचित त्यांना सदनिका मिळाली असेल किंवा त्यांनी काही निर्णय घेतलेले असतील. त्या अधिका-यांपैकी 14 अधिकारी हे अखिल भारतीय सेवेतील आहेत आणि 7 राज्यस्तरीय अधिकारी आहेत. आता सर्वच अधिका-यां

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

विरुध्द सीबीआयने एफआयआर का नोंदला नाही हे सीबीआयला विचारावे लागेल. पण सीबीआयने एकूण 14 अधिकारी आणि लोकप्रतिनिधी विरुध्द एफआयआर दाखल केलेला आहे हे आपणा सर्वांना माहीत आहे. त्यामध्ये सैन्य दलातील 7 अधिकारी आहेत, 2 लोकप्रतिनिधी आहेत, केन्द्रीय अधिकारी 4 आणि राज्य सरकारचे निवृत्त अधिकारी 1 आहे. अशा प्रकारे 14 जणांविरुध्द एफआयआर दाखल झालेला आहे. 14 पेक्षा अधिक लोकांविरुध्द एफआयआर नोंदले जाणार नाहीत असे काही नाही. या प्रकरणी आणखी काही माहिती मिळू शकली तर सीबीआय आणखी लोकांविरुध्द एफआयआर दाखल करु शकते.

सभापती महोदय, या ठिकाणी दुसरा एक मुद्दा उपस्थित करण्यात आला की राज्य शासनाने या अधिका-यांच्या विरुध्द काही केले नाही. याबाबतीत मला पुनश्च नियम आणि सरकारी कामकाजाच्या पध्दतीसंबंधी सांगावे लागेल. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की या अधिका-यांवर अखिल भारतीय सेवा शिस्त व अपील नियम 1969 च्या नियम 3 अनुसार आपल्याला कारवाई करावी लागेल. एखाद्या अधिका-याने प्रेस कॉन्फरन्स घेऊन काही सांगितले. भारताच्या घटनेनुसार प्रशासकीय सेवेतील अधिका-यांना काही संरक्षण दिलेले आहे. त्यामध्ये त्यांना काम करताना स्वातंत्र्य असावे, मुभा असावी, कुणी राजकीय हेतूने त्यांच्यावर कारवाई करु नये म्हणून हे संरक्षण दिलेले आहे. मी हे मान्य करतो की, आता पुन्हा 50-60 वर्षानंतर घटनेतील हे नियम बदलण्याची आवश्यकता आहे की नाही याचा गंभीरपणे विचार करावा लागेल. या अधिका-यांनी सदनिका मिळविली. आपणा सर्वांना माहीत आहे की, एखाद्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये सदस्य होणे हा काही गुन्हा नाही. हा जर आपण गुन्हा केला तर त्यामध्ये किती सन्माननीय सदस्य आणि किती प्रशासकीय अधिकारी असतील याचे वर्णन करणे अवघड होईल. मुद्दा असा आहे की, आपण फाईलवर जो काही निर्णय घेतला तो बेकायदेशीर होता, तो हितसंबंधांना मदत करणारा निर्णय होता आणि त्यासंबंधी आदर्शमध्ये सदनिका मिळाली असेल तर तो गंभीर मामला आहे. त्यादृष्टीने न्यायालयीन चौकशी चालू असून सीबीआय देखील तपास करीत आहे. ज्यांना 311 कलमाचे संरक्षण नव्हते अशा 2 अधिका-यांच्या विरुध्द राज्य शासनाने कारवाई केलेली आहे. फौजदारी खटला भरण्याच्या कारवाईस वेळ लागेल. त्याबाबतीत निश्चितपणे न्यायालयीन निर्णयाची अपेक्षा करावी लागेल.

..नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

तीन महिन्यांचा अवधी दिला होता. तीन महिन्यात कदाचित काम पूर्ण होईल असे वाटत नाही. न्यायालयीन चौकशी आणि कमिशन ऑफ इन्क्वॉयरी ॲक्ट अंतर्गत चौकशी आयोगाला संपूर्ण अधिकार दिले आहेत. कोर्टाप्रमाणे चौकशी आयोगामार्फत कोर्ट चालविले जाते. त्यांनी वर्तमानपत्रात जाहिरात दिली. जाहिरात दिल्यानंतर त्यांच्याकडे अनेक निवेदने प्राप्त झाली आहेत. त्यांचे चौकशीचे काम सुरु आहे.

सभापती महोदय, दुसरा एक मुद्दा असा होता की, आदर्श इमारत पाडणार का? मला नम्रपणे सांगावयाचे आहे की, केंद्रीय पर्यावरण खात्याने सीआरझेड नियमांचे उल्लंघन केल्यामुळे किंवा सीआरझेड कायद्यांतर्गत परवानगी न घेतल्यामुळे आदर्श इमारत पाडून टाकण्याची नोटीस दिनांक 16 जानेवारी, 2011 रोजी दिली होती. The building should be removed within 3 months. तीन महिन्यात आदर्श इमारत जमीनदोस्त करावी असा आदेश दिला होता. त्या आदेशाविरुध्द हाऊसिंग सोसायटी कोर्टात गेली. ही बाब आता कोर्टात प्रलंबित आहे. जर तीन महिन्याच्या आत आदर्श हाऊसिंग सोसायटीने स्वत:हून इमारत पाडली नाही तर केंद्रीय पर्यावरण खाते पर्यावरण संरक्षण अधिनियमाच्या कलम 15 अंतर्गत राज्य शासनाला आदेश देऊ शकते. मग राज्य शासनाची पुढील भूमिका त्यामध्ये सुरु होईल. जे एकूण 11 खटले प्रलंबित आहेत त्यापैकी हा एक खटला प्रलंबित आहे.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट म्हणजे याठिकाणी राजकीय मुद्दा उपस्थित करण्यात आला. मी नांदेड येथे गेलो असताना काही वक्तव्ये छापून आली. त्याठिकाणी मी जे बोललो होतो त्याबद्दल आक्षेप घेतला गेला. मला नम्रपणे सांगावयाचे आहे की, मी नांदेड येथे गेलो होतो, तेथे प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये अनेक सन्माननीय आमदार होते. त्यांनी आपापल्या विभागाच्या प्रलंबित कामांबाबत सूचना केली. प्रत्येक जिल्हयामध्ये कोणती चांगली कामे झाली, कोणती कामे प्रलंबित आहेत त्यासंबंधी आढावा घेतला जातो, त्याच धर्तीवर ही बैठक झाली होती. त्यानंतर काँग्रेस पक्षाचा जनजागरण मेळावा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या अध्यक्षतेखाली आयोजित केला होता, त्या मेळाव्यामध्ये सन्माननीय भूतपूर्व मुख्यमंत्री हे तेथील आमदार व नेते असल्यामुळे तेही मेळाव्यास उपस्थित होते. नांदेड जिल्हयामध्ये चांगली कामे झाली आहेत, तितकीच कामे प्रलंबित देखील आहेत. त्यांनी आपल्या व्यथा मांडल्या. आमच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

भागातील विकासाची कामे झाली पाहिजेत असे त्यांचे म्हणणे होते. त्या पक्षाच्या मेळाव्यामध्ये मी पक्ष बळकट करण्याकरिता तुमची कामे प्रलंबित राहणार नाहीत याकरिता शासन मदत करेल असे वक्तव्य केले होते. सभापती महोदय, आपल्याला माहिती आहे की, अशा प्रकारच्या वक्तव्याने कोणतीही चौकशी प्रभावित करण्याचा प्रयत्न असू शकत नाही आणि होणार नाही. सीबीआय वृत्तपत्र वाचून निर्णय घेत नाही. त्यामध्ये वेगळे काही पहायचा प्रयत्न कृपा करुन करु नये.

सभापती महोदय, नैतिकतेबद्दल बोलले गेले. नैतिकतेच्या गोष्टीबद्दल बोलावयाचे झाले तर काँग्रेस पक्षाची नैतिकतेची काय यार्डस्टीक आहे त्याबद्दल टिप्पणी करण्याचे कारण नाही. या राज्याचे चार माजी मुख्यमंत्री, काही जणांवर कोर्टाचे ताशेरे होते, काही जणांवर ताशेरे नसताना देखील नैतिकतेची जबाबदारी स्वीकारुन त्यांनी राजीनामा दिला होता. ही परंपरा या राज्यातच नव्हे तर काँग्रेस पक्षाचे लाल बहादूर शास्त्री ते माधवराव शिंदे यांच्यापर्यंत चालत आली आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांशी मी तुलना करु इच्छित नाही. त्यांचे रेकॉर्ड आपण आत्मपरीक्षण करुन तपासून घ्यावे. नैतिकतेचे धडे कोणी कोणाला द्यावेत?

सभापती महोदय, सीबीआयची चौकशी सुरु झाली आहे. एखाद्या व्यक्तीचे नाव सीबीआयने एफआयआरमध्ये गुंतविले तर ती व्यक्ती दोषी आहे असे जर आपण समजू लागलो तर मला नम्रपणे विचारावेसे वाटते की, या देशाचे ज्येष्ठ नेते, माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव सीबीआयने आरोपी म्हणून किती दिवसापासून ठेवले? लालकृष्ण अडवाणी यांचे नाव आहे. मुरली मनोहर जोशी आहेत. ही यार्डस्टीक त्यांच्याबद्दल लागू केली तर ते योग्य होणार नाही. जोपर्यंत व्यक्तीवर गुन्हा सिध्द होत नाही, उच्चतम न्यायालयात गुन्हा सिध्द होत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीला गुन्हेगार समजता येणार नाही. जो नियम महाराष्ट्राच्या माजी मुख्यमंत्र्यांना लावला जातो तोच नियम भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांना लावावा एवढीच माझी विनंती आहे. शेजारील राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी काय करावे याबद्दल मला बोलावयाचे नाही. त्यांची नैतिकता त्यांनी पाळावी. नैतिकता ही काँग्रेस पक्षातच नव्हे तर आमच्या सहकारी पक्षाने देखील गृहमंत्र्यांबद्दल निर्णय घेतला होता. नैतिकतेची ही परंपरा काँग्रेस पक्षाची आहे, त्याबद्दल कोणी शिकविण्याचा प्रयत्न करु नये एवढेच नम्रपणे सांगू इच्छितो. आपल्या सर्वांची एकच इच्छा आहे की, जे दोषी आहेत त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे.

नंतर 2पी.1...

अशुद्धीत प्रत/ शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

तडकाफडकी निर्णय घेऊन सर्वांना शिक्षा कशी होईल असे प्रयत्न करण्याचे आपण जरी ठरविले तरी कायदा असा किचकट आहे की त्याच्या कक्षेच्या बाहेर जाऊन काही करता येत नाही. आपल्याला जरी वाटत असले की जे दोषी आहेत त्यांना उचलून फासावर लटकवावे पण या देशाची लोकशाही तसे कधीच मान्य करणार नाही. अर्थात न्याय प्रक्रियेत एखाद्या वेळेस डिले होऊ शकतो हे मलाही मान्य आहे, पण आपण सर्वांनी मिळून याबाबतीत लोकमत तयार केले आणि जे दोषी आहेत त्यांच्यावरील गुन्हा सिध्द झाला तर त्याला नक्कीच शिक्षा करता येईल. कोणत्याही अधिकाऱ्याची बदली ही त्याची शिक्षा होऊ शकत नाही पण एवढे मात्र सांगू इच्छितो की, यातील बऱ्याच व्यक्ती सेवानिवृत्त झालेल्या आहेत. ज्या पदावर आहेत त्यांच्यापैकी कुठलीही व्यक्ती या चौकशीत अडथळे आणू शकेल अशा ठिकाणी नाही. तरी देखील एखादी गोष्ट यात सापडली तरी प्रशासकीय प्रक्रियेत त्यासंबंधीची चौकशी करुन योग्य ती कारवाई केली जाईल, एवढे बोलून माझे दोन शब्द पूरे करतो. धन्यवाद.

**सभापती** : अल्पकालीन चर्चा संपलेली आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4 वाजून 10 मिनिटांनी पुन: भरेल.

( 3.36 ते 4.10 मध्यंतर )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**लक्षवेधी सूचना व विशेष उल्लेखाच्या सूचना पुढे ढकलण्याबाबत**

**उप सभापती** : आजच्या लक्षवेधी सूचना तसेच विशेष उल्लेखाच्या सूचना आज न होता त्या नंतर घेण्यात येतील. आता पूरक मागण्यांवरील चर्चा घेण्यात येईल.

---

**पृ.शी./मु.शी.** : सन 2010-2011 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

**उप सभापती** : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर चर्चा आज मंगळवार, दिनांक 22 मार्च,2011 रोजी घेण्यात येत आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन व्दारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करतांना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहे. कार्यक्रम पत्रिकेवरील दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. या पूरक मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपले विचार थोडक्यात मांडावे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या

**उप सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील

1) मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक ए-1,ए-3,ए-4,ए-6, एफ-2,एफ -3,जे-1,जे-5, क्यु-1, क्यु-2,क्यु-3

2) उप मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक जी-2, जी-4, जी-5, जी-6, ओ-7,ओ-7 ए,ओ-9, ओ-16, ओ-29

3) उद्योग ,बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक झेडए-4

4) सार्वजनिक बांधकाम व पर्यटन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एच-6,एच-7,एच-8,एच-9

5) गृह मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक बी - 1

6) वन,पुनर्वसन,मदत कार्य,भूकंप पुनर्वसन मंत्र्यांच्या विभागाच्यापूरक मागण्या क्रमांक सी-2,सी-5सी-6,सी-7

7) सामाजिक न्याय, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण आणि व्यसन मुक्ती कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एन-1, एन- 2, एन -3,एन - 4

8) कृषी व पणन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक डी-3,व्ही-3,व्ही-5

9) ग्राम विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एल-2,एल-3,एल-4,एल-5

10) सहकार व संसदीय कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक व्ही -2

11) राज्य उत्पादन शुल्क आणि अपारंपारिक ऊर्जा मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक बी-2

12) महसूल व खार जमीन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक सी-4,सी-12,आय-5

13) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक वाय -1,वाय-2, वाय -4,वाय -5 व वाय 6

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधान सभेने निवडलेले) सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पूरक मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 51, पान नंबर 47 संबंधी मला प्रथम बोलावयाचे आहे.सार्वजनिक बांधकाम विभागासंबंधी ही पूरक मागणी करण्यात आली असून मुंबई येथील ऐतिहासिक वारसा प्राप्त इमारतीकरिता अतिरिक्त अनुदान देण्यासाठी 5 कोटी 46 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अनेक चांगली कामे केली जातात त्याबाबतीत मला एक सूचना करावयाची आहे.दादर येथे स्वातंत्र्य वीर सावरकरांचे " सावरकर सदन " या वास्तूला ऐतिहासिक वारसा प्राप्त करण्याविषयी मी यापूर्वी औचित्याचा मुद्दा देखील मांडलेला आहे या पूरक मागण्यांच्या निमित्ताने मी शासनाला अशी विनंती करतो की, दादर येथील सावरकर सदनला ऐतिहासिक वारसा प्राप्त करुन देण्यात यावा.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 22 पान नंबर 19 संबंधी मला बोलावयाचे आहे. महसूल व वन विभागाची ही पूरक मागणी असून अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे बाधा पोहोचलेल्या शेतक-यांना वित्तीय सहाय्य आणि राज्य आपत्ती प्रतिसाद निधीसाठी केन्द्रीय सहाय्य देण्यासाठी 737 कोटी 9 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे नुकसान झाल्यास संबंधित शेतक-याला नुकसान भरपाई दिली जाते परंतु ही नुकसान भरपाई देण्याच्या पध्दतीमध्ये काही त्रुटी असल्यामुळे बाधित शेतक-याला मदत मिळत नाही व तो शेतकरी लाभा पासून वंचित राहतो म्हणूनच नुकसानीचा सर्व्हे योग्य पध्दतीने होणे आवश्यक आहे. सध्याच्या पध्दतीमध्ये आवश्यक तो बदल करुन पीडित शेतक-यापर्यंत ही मदत लवकरात लवकर कशी पोहोचेल या दृष्टीने शासनाने उपाययोजना करावी असे मी या निमित्ताने मागणी करतो..

सभापती महोदय या संदर्भात मी या ठिकाणी काही उदाहरणे देऊ इच्छितो.कोकणामध्ये फयान वादळामुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने पंचनामे करण्यात आले होते . कुडाळमध्ये एका व्यक्तीच्या घराचे 35 हजार रुपयाचे नुकसान झाले अशाप्रकारचा पंचनामा करण्यात आला होता परंतु प्रत्यक्षात त्याला सहा हजार रुपयाची नुकसानभरपाई देण्यात आली होती. त्या संदर्भात संबंधित व्यक्तीने जी तक्रार केली होती ती तक्रार व आवश्यक ती कागदपत्रे मी माननीय मंत्र्याकडे दिली आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर..

सभापती महोदय, त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्ती आल्यामुळे काजू, आंबा, नारळ इत्यादीचे मोठया प्रमाणावर नुकसान होत असते. इतर शेतक-यांना ज्याप्रमाणे नुकसान भरपाई दिली जाते त्याप्रमाणे या शेतक-यांना नुकसान भरपाई न देता काजू, आंबा व नारळ इत्यादीचे नुकसान झाल्यास त्याकरिता वेगळा निकष लावण्यात यावा.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर...

शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान गृहीत धरुन त्यांना जो नुकसानीचा क्रायटेरिया लावता तो आंबा, काजू, नारळ या फळझाडांना लावता कामा नये. याचे कारण असे की, या झाडांचे एक रोपटे लावल्यानंतर त्याला फळधारणा होण्यासाठी पाच ते सात वर्षे जातात. त्यामुळे त्यांचे उत्पन्न हे पाच ते सात वर्षानंतर मिळते. त्यांच्या नुकसानीचा दिला जाणारा मोबदला हा एक वर्षाच्या उत्पन्नाएवढा असतो. त्यामुळे आंबा, काजू व नारळ या पिकांचे झालेले नुकसान हे एक वर्षाचे नसून कमीत कमी पाच वर्षाचे नुकसान असते हे आपण गृहीत धरले पाहिजे. अशाप्रकारे ही उद्ध्वस्त झालेली झाडे....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहामध्ये गृहमंत्र्यांच्या मागण्या असतांना माननीय गृहमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत हे बरोबर नाही.

**उप सभापती** : सर्व विभागाच्या मंत्री महोदयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत त्याप्रमाणे ते सभागृहामध्ये उपस्थित होतील तोपर्यंत त्यांच्या खात्याशी संबंधित असलेले मुद्दे सभागृहात आता उपस्थित असलेले मंत्री महोदय लिहून घेत आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या सभागृहामध्ये किती मंत्री उपस्थित आहेत? एक फूल तिकिट आणि बाकी सारे हाफ तिकिट आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, संबंधित खात्याचे मंत्री महोदय सभागृहात येईपर्यंत आपण हे सभागृह 10 मिनिटे तहकूब करावे अशी विनंती करतो.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, या सभागृहामध्ये मंत्री महोदयांना हाफ तिकिट म्हणणे चुकीचे आहे. मी याठिकाणी कोकणातील नैसर्गिक आपत्तीवर बोलत असताना, कोकणातील शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीच्या गंभीर विषयावर आपले दु:ख मांडीत असताना विरोधकांना या नैसर्गिक आपत्तीविषयी गांभीर्य वाटत नाही.

डॉ.दीपक सावंत : तिकडे गेल्यानंतर आपण दु:खी झालात काय?

श्री. किरण पावसकर : मी याठिकाणी सुखी आहे, आपण आपल्या जागेवर सुखी रहा. माझ्या सुख दु:खाचा आपण विचार करु नका.

डॉ. दीपक सावंत : दिल्या घरी तू सुखी रहा...

श्री. किरण पावसकर : सुख दु:खाचा विचार करुन मी याठिकाणी आलेलो नाही...

**उप सभापती** : सध्या तुम्ही दोघांनी माझा विचार करा.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मी कोकणातील नैसर्गिक आपत्तीच्या गंभीर विषयावर बोलत आहे. कोकणातील काजू, आंबा व नारळ पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत शासनाने गांभीर्याने विचार करावा आणि त्यांना जास्तीची नुकसान भरपाई देण्यात यावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या बाब क्रमांक 140 व पृष्ठ क्रमांक 171 मध्ये आपण 91 व्या अखिल भारतीय मराठी नाटय संमेलनास सहाय्यक अनुदान देण्याचे आश्वासन दिले होते व त्या प्रयोजनार्थ 25 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आली. कला व संस्कृती हा महाराष्ट्राचा आत्मा आहे, त्यामुळे या नाटय संमेलासाठी करण्यात आलेली पूरक मागणी मंजूर होण्यामध्ये अडचण येणार नाही. या निमित्ताने मला अशी विनंती करावयाची आहे की, अशाप्रकारे वार्षिक होणाऱ्या नाटय संमेलनासाठी आपण अनुदान देत आहोत, त्याचप्रमाणे दादर येथे रंगदेवतेचे मंदिर असलेली शिवाजी मंदिर ही ऐतिहासिक वास्तू उभी आहे, त्या वास्तूची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. तेव्हा या अनुदानामध्ये आणखी वाढ करुन शिवाजी मंदिरचे नूतनीकरण करुन त्या वास्तूचे रुप बदलावे अशी विनंती करतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर . . . .

सभापती महोदय, कृषी, पशुसंवर्धन विभागाच्या पान क्र.24, बाब क्र.26 बाबत सांगावयाचे तर पीक विमा निधी दाव्यापोटी देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाई बाबतच्या अंशदानासाठी तरतूद करण्यात आली आहे. अन्न व तेलबिया पिकांच्या बाबतीत 100 टक्क्यांपुढील दाव्यांच्या विमा हप्त्यांचा खर्च केंद्र सरकार व राज्य शासनाने सम प्रमाणात सोसावयाचा आहे असे याठिकाणी म्हटलेले आहे. त्याचप्रमाणे कोकणातील आंबा, काजू या फळपिकांनाही 100 टक्के विमा संरक्षण मिळावे. तसेच कोकणामध्ये सुरु असलेल्या इमो-फार्मिंगसाठी सुध्दा सवलती देण्यात याव्यात आणि त्याबाबतीत प्रशिक्षण देखील देण्यात यावे अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, पान क्र.10, बाब क्र.9 बाबत सांगावयाचे तर ही बाब गुन्हा अन्वेषण विभाग आणि दहशत विरोधी पथकाच्या संदर्भातील आहे.आपण नेहमी 26/11 रोजी दहशतवाद्यांकडून जो हल्ला झाला, तसेच 1993 मध्ये बॉम्बस्फोट झाला. त्यानंतर आपण या सर्व गोष्टींची सदनामध्ये तासन्तास चर्चा करतो. पण केवळ यासाठी पोलीस विभागाला केवळ पैशाचे पाठबळ देऊन चालणार नाही. परंतु अधिकाऱ्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी किंवा मधल्या काळामध्ये जे काही कर्तबगार अधिकारी आपल्या कार्यापासून वंचित झालेले आहेत. यामध्ये जॉईंट कमिशनर श्री.वगळ, श्री.दया नाईक किंवा श्री.आंग्रे यांच्यासारखे अधिकारी आहेत. त्यांच्यावर काही ना काही कारणामुळे केसेस झाल्या. पण त्यांची केसेसमधून निर्दोष मुक्तता झाल्यानंतरही अजूनही त्यांची पूर्वीच्या पदावर पुन्हा नेमणूक (Reinstate) झालेली नाही. मी गृह विभागाला याबाबत विनंती करतो की, आपण गुन्हा अन्वेषण विभाग, दहशत विरोधी पथक यांच्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर दिलेलs आहे. ते ज्या कार्यालयामध्ये काम काम करतात, तेथे त्यांना सुखसोयी मिळाल्या पाहिजेत अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पान क्र.11, बाब क्र.12 यामध्ये "शहर पोलीस आस्थापना" यात पेट्रोल, तेल व वंगण यासाठी दोन कोटी रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे. मी स्वत: ट्रान्सपोर्ट विभागामध्ये जाऊन आलो आहे. पोलीस ड्रायव्हरची जी रिक्त पदे आहेत, ती गेल्या चार वर्षापासून भरण्यात आलेली नाहीत. तेथील गाड्यांची कंडीशन पाहिली तर त्या फार जुन्या झाल्या असून वाईट परिस्थितीमध्ये आहेत. याठिकाणी ट्रान्सपोर्टसाठी केवळ दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन चालणार नाही तर पोलीस विभागासाठी जास्तीतजास्त निधी द्यावा लागेल तरच या विभागा-

. . . .2 एस-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर . . . .

तील ट्रान्सपोर्ट विभागामध्ये सुधारणा होऊ शकेल. कारण याठिकाणी मेकॅनिक, ड्रायव्हर, सुपरवायझ ारची संख्या कमी आहे एवढेच मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. धन्यवाद.

---

2एस-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, बाब क्र.2, पान क्र.4 बाबत सांगावयाचे तर स्पर्धा परीक्षांवरील अत्यावश्यक खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. याबाबत मला एक सूचना करावयाची आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे ज्या स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात, त्यासाठी जर टाईम टेबल तयार करण्यात आले तर त्या विद्यार्थ्यांना बाकीच्या स्पर्धा परीक्षांना बसण्यासाठी सोपे होईल. त्यामध्ये केंद्र शासनाच्या निरनिराळया विभागांच्या स्पर्धा परीक्षा असतात, बँकेतील भरतीसाठी परीक्षा असतात, रेल्वे भरतीसाठी परीक्षा असतात. मग अशा वेळी या सर्व परीक्षांच्या तारखा एकाच वेळी असतील तर मग विद्यार्थ्यांना सगळया परीक्षांना बसण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे इतर स्पर्धा परीक्षांच्या तारखा पाहून जर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने त्यांच्या स्पर्धा परीक्षांच्या तारखा ठरविल्या तर उमेदवारांचे नुकसान टळू शकेल आणि व्यावसायिक सेवा या अंतर्गत केलेली तरतूद कारणी लागेल.

सभापती महोदय, बाब क्र.39, पान क्र.36 ही नगरविकास विभागाशी संबंधित आहे. यामध्ये महानगरपालिकांच्या अग्निशमन सेवा व आपत्कालीन सेवांना बळकटी प्राप्त करण्यासाठी तरतूद करणे गरजेचे होते. त्याप्रमाणे येथे तरतूद केलेली आहे. परंतु भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता 2005 च्या भाग-4 च्या तरतुदीचे पालन अग्निशमन सेवा संस्थेकडून होत आहे काय ? याबाबत प्रत्येक ठिकाणी आढावा घेण्याची गरज आहे. कारण या इमारती बांधताना न्यायालयीन आदेशानुसार इमारतीचा जिना हा एफ.एस.आय.मध्ये धरला जाणार असल्याने फ्लॅटची संख्या व आकारमान कमी होईल व आपत्ती व्यवस्थापनामध्ये ते त्रासदायक ठरु शकेल. म्हणून आपत्कालीन सेवांच्या बळकटीकरणाबरोबरच त्यांनी पूर्ण कार्यक्षमतेने काम करावे अशा प्रकारच्या अधिनियमातील तरतुदींचे योग्य पालन होणे गरजेचे आहे आणि त्यासाठी देखील उपाययोजना कराव्यात.

सभापती महोदय, बाब क्र.44, पान क्र.37 बाबत सांगावयाचे तर नगर पंचायतींना निधी वितरित करण्यास विलंब झाल्यामुळे त्यावरील व्याजाचे प्रदान करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे, ती योग्य आहे. परंतु अशा नगर पंचायतींना त्यांच्या स्टाफींग पॅटर्नप्रमाणे कर्मचारी वर्ग भरण्यास मंजुरी देण्यात आलेली नाही. याबाबत उदाहरण द्यावयाचे तर ते दापोली नगर पंचायत बाबत देता येईल.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. संजय केळकर....

त्या स्टाफिंग पॅटर्नला मंजुरी न दिल्यामुळे या नगरपंचायती असल्या तरी तेथे ग्रामपंचायतीचाच स्टाफ असल्याने नवीन सुधारणा किंवा टेक्निकल कामे करणारी माणसे उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायतीचा नॉन टेक्निकल स्टाफ त्या ठिकाणी वापरला जातो. पर्यायाने निधी विनावापर पडून रहातो. म्हणून नगरपंचायतीचा स्टाफिंग पॅटर्न लवकर मंजूर करुन त्याच्यासाठी निधीची तरतूद करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 62, पान क्रमांक 77 वर मी बोलू इच्छितो. न्यायालयाच्या संगणकीकरणाच्या बाबतीत यामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. कल्याणच्या आजूबाजूचा परिसर धरुन 20 लाख लोकसंख्या असलेल्या कल्याण शहरामध्ये न्यायालयाच्या इमारतीची अतिशय वाईट परिस्थिती आहे. तीस ते चाळीस वर्षापूर्वी लोड बेअरिंगवर बांधलेली ती इमारत आहे. मी स्वत: त्या ठिकाणी दोन वेळा जाऊन आलो आहे. मी त्या ठिकाणी भेट दिल्यानंतर माननीय न्यायमूर्तींनी त्यांचे कामकाज थांबवून माझ्याकडे तक्रार केली आहे. त्या ठिकाणी काळोख आहे, त्यामुळे त्यांना काही लिहिता येत नाही, पाणी गळत होते, निरनिराळया प्रकारचा रेकॉर्ड त्या ठिकाणी भिजलेला आढळूला आला. तीस ते चाळीस वर्षापूर्वीची लोड बेअरिंगवर इमारत अजून त्या ठिकाणी आहे. या इमारतीची अनेकवेळा डागडुजी करुन सुध्दा ती मोडकळीस आलेली आहे. ती कधी डोक्यावर पडेल हे सांगता येत नाही. म्हणून या इमारती पाडून त्या ठिकाणी नवीन इमारतीचे बांधकाम होणे गरजेचे आहे. त्याकरिता निधीची आवश्यकता आहे. कल्याण सारख्या महत्वाच्या ठिकाणी असलेल्या न्यायालयाची इमारत जर पडीत अवस्थेत असेल तर ते योग्य नाही. या इमारतीमध्ये निरनिराळया प्रकारची कोर्ट चालतात. म्हणून त्या ठिकाणी संगणकीकरण करण्या बरोबरच कल्याण जिल्हा न्यायालयाचे नूतनीकरण सुध्दा करावे आणि त्यानंतर संगणकीकरण करावे अशा प्रकारची मी मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 95, पान क्रमांक 109 वर मी बोलू इच्छितो. या ठिकाणी झोपडपट्टीच्या संबंधामध्ये ठाणे जिल्ह्यामध्ये फार मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. कोर्टाच्या आदेशामुळे ठाणे जिल्ह्यातील 20 लाख लोक संकटात आलेले आहेत. यासंदर्भात 1995 ची डेडलाईन ठरविण्यात आली आहे.पण ही डेडलाईन 2000 पर्यंत ठरिवण्यात यावी याबाबतचे

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर.....

प्रकरण कोर्टात पेंडिग आहे. अशा परिस्थितीत झोपडपट्टी विभागातील माणसे भयग्रस्त आहेत. त्यामुळे त्याठिकाणी सुधारणा करण्याआधी शासनाने निश्चतपणे धोरण ठरवायला पाहिजे. शासनाने त्याला कायद्याचे स्वरुप देऊन लाखो बेघर होणाऱ्या झोपडपट्टीवासियांना वाचविले पाहिजे.

. सभापती महोदय, बाब क्रमांक 88 पान क्रमांक 104 वर मी बोलू इच्छितो. आज यासंदर्भात सकाळीच प्रश्नोत्तराच्या तासामध्ये पर्यटनाच्या संदर्भात चर्चा केलेली आहे. याबाबतीत मी शासनाच्या एकच गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो. महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळाच्या वेबसाईटवर सिंधुदुर्ग जिल्हयाची पुरेशी माहिती उपलब्ध नाही. जी माहिती उपलब्ध आहे ती इंग्रजीमध्ये आहे. म्हणून पर्यटन महामंडळाला मराठीचे वावडे आहे की काय? पर्यटनाला चालना देण्याकरिता निधी वेळेच्यावेळी दिला पाहिजे, त्याचे विकास आराखडे ठरविले पाहिजेत तरच या पर्यटन वर्षात हा पर्यटन जिल्हा विकसित होऊ शकेल.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 51, पान क्रमांक 47 वर मी बोलू इच्छितो. ऐतिहासिक दृष्टया व वास्तूशास्त्रीय दृष्टया पुरातन म्हणून ज्या वास्तू जाहीर करावयाच्या होत्या त्याबाबतीत कल्याण शहरामध्ये 80 वास्तू हेरिटेज म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये कित्येकांची राहती घरे समाविष्ट करण्यात आलेली आहेत. याबाबतीत हरकती घेतल्यावर या वास्तूंची सख्या 80 वरुन 49 वर आली आहे. राज्यात कित्येक वास्तू 200 वर्षांच्या जुन्या आहेत. पण त्याकडे शासनाचे लक्ष नाही. कल्याण शहरामधील वाढती लोकसंख्या व जागेचे भाव लक्षात घेता तेथील वास्तू पुरातन म्हणून घोषित करण्याचा शासनाचा हेतू दिसतो. याबाबत ज्या वास्तू पुरातन म्हणून घोषित करावयाच्या आहेत त्यांची शहानिशा करुन स्थानिक वास्तू मालकाचे मत विचारात घेऊनच त्या जाहीर कराव्यात, अशा प्रकारची मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 53, पान क्रमांक 48 वर मी बोलू इच्छितो. यामध्ये निरनिराळया तहसील कार्यालयाच्या इमारतींसाठी निधी देण्यात आलेला आहे. ठाणे शहरातील तहसील कार्यालयात नवी मुंबई आणि भाईंदर हा प्रचंड मोठा भाग येतो. या तहसील कार्यालयात तुटपुंजी जागा आहे असे असताना या ठिकाणीच टाऊन पोलीस स्टेशन देखील आहे. म्हणून माझी

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर.....

या निमित्ताने विनंती आहे की, या ठिकाणच्या प्रशासकीय इमारतींची त्याच जागेवर पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता आहे. ठाण्याबरोबरच जव्हार तालुक्याचे विभाजन करण्यात आले. युतीच्या काळामध्ये विक्रमगड तालुका झाला पण विक्रमगड तालुक्याच्या तहसील इमारतीची पुनर्बांधणी झालेली नाही त्यामुळे ठाणे तहसील ऑफिस आणि विक्रमगड तहसील ऑफिस यासाठी देखील तरतूद करण्यात यावी,अशी विनंती करतो.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ...

सभापती महोदय, यानंतर मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 52 वरील बाब क्रमांक 55 बाबत बोलणार आहे. राज्यात विशेषत: ग्रामीण भागामध्ये बरीच ग्रंथालये अशी आहेत की, ज्यांनी 50-50 वर्षे पूर्ण केलेली आहेत. परंतु ती ग्रंथालये अत्यंत दूरवस्थेमध्ये आहेत. अशा ग्रंथालयांना प्रोत्साहनपर विशेष निधी द्यावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 18 वरील बाब क्रमांक 21 बाबत बोलणार आहे. वृद्ध, अपंग व निराश्रित यांच्यासाठी प्रत्येक महानगरपालिकेमध्ये तरतूद केलेली असते. या दुर्लक्षित वर्गासाठी महापालिकेच्या माध्यमातून निधीची तरतूद केलेली असते पण तो निधी वापरला जात नाही. त्यामुळे शासनाने त्यांना याबाबत विचारणा करावी तसेच याबाबत चौकशी करावी. भिवंडी महानगरपालिकेच्या बाबतीत असे उत्तर आले की, अपंगांकरिता निधीची तरतूद केली होती परंतु त्यातील एक पैसाही वापरलेला नाही. जवळपास अनेक महानगरपालिकांमध्ये अशाच प्रकारची परिस्थिती आहे. त्यामुळे यासंदर्भातील निधी त्यांच्याकरिता वापरला जावा याकरिता शासनाने विशेष प्रकारचे आदेश द्यावेत अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

**उप सभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, प्रत्येक सन्माननीय सदस्याने पाच मिनिटांमध्ये आपले भाषण संपवावे जेणेकरुन मला सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देता येईल. यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत बोलतील.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल प्रथम मी आपल्याला धन्यवाद देतो. मी फक्त गृह विभागाच्या 2 बाबींवर बोलणार आहे. प्रथम मी गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 10 वरील बाब क्रमांक 8 बाबत बोलणार आहे. रस्ते सुरक्षा कार्यक्रमाकरिता तरतूद करण्यासाठी यामध्ये पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. आज आपण रस्त्यांवरील अपघात पाहिले तर असे दिसून येते की, अपघातांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. आजपर्यंत महाराष्ट्रामध्ये रस्त्यांवर काही हजार अपघात झालेले आहेत. हे अपघात वाहनांमुळे होतात, बेदरकार वाहन चालविल्यामुळे होतात तसेच दारु पिऊन वाहन चालविल्यामुळे होतात. राज्य शासनाच्या गृह विभागाकडे या संदर्भात अपुरा स्टाफ असल्यामुळे या वाहनांवर आपल्याला नियंत्रण ठेवता येत नाही. बऱ्याचदा ट्रकच्या पाठीमागे लाईट आहे की नाही हे तपासले जात नाही. असे ट्रक अंधारामध्ये उभे राहतात आणि त्यामुळे दुसरी वाहने त्यावर येऊन धडकतात. यासाठी राज्यामध्ये वेगळी मोहीम आखणे अत्यंत आवश्यक आहे. मुंबई-गोवा रस्त्यावर जे अपघात होतात ते सगळे फेटल अपघात आहेत. त्या अपघातातून कोणीही वाचत नाही. 3-4 दिवसांपूर्वी एक अपघात झाला. अशा प्रकारे अपघाताची मालिका चालू आहे. या मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने माझी राज्य शासनाला विनंती आहे की, अशा प्रकारचे अपघात रोखण्याबरोबरच त्या त्या ठिकाणी ट्रॉमा केयर युनिट उभारणे अत्यंत आवश्यक आहे. वडखळ नाक्याच्या ठिकाणी ट्रॉमा केयर युनिट उभारणे आवश्यक आहे. नाशिक-शिर्डी रस्त्यावर सिन्नर येथे ट्रॉमा केयर युनिट उभारणे आवश्यक आहे. अपघातामध्ये जे लोक जखमी होतात त्यांना हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी वेळ लागतो तसेच त्यांना वाचविण्याच्या दृष्टीने जवळपासच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये किंवा ग्रामीण रुग्णालयामध्ये सोय नसते. त्यामुळे त्या त्या ठिकाणी ट्रॉमा केयर युनिट उभारणे आवश्यक आहे. त्यासाठी येत्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करता आली तर जरुर करावी, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 10 वरील बाब क्रमांक 10 बाबत बोलणार आहे. दहशतवादविरोधी पथकासाठी लिज्ड लाईनची उभारणी करण्यासाठी तरतूद करण्याच्या संदर्भात ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. आज पोलिसांच्या बक्कलचा एक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

डॉ. दीपक सावंत ....

मुद्दा अतिशय मोठ्या प्रमाणावर गाजत आहे. आज जे बक्कल खरेदी केले जातात ते निकृष्ट दर्जाचे आहेत असे सांगितले जाते. पूर्वीचे बक्कल चांगले होते. आताचे बक्कल अतिशय वाईट आहेत आणि त्या बक्कलच्या खरेदीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. माझी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, या बक्कलचे नेमके काय गौडबंगाल आहे ते आपण या सभागृहामध्ये सांगावे. हे बक्कल पोलिसांच्या पट्ट्यामध्ये जात नाहीत. बक्कल लावण्याचा जो हूक असतो तो देखील अत्यंत कमकुवत आहे. हा एक मोठा विषय आहे. कारण पोलिसांचे पोट वाढत आहे. त्यामुळे त्यावर बक्कल टिकणे शक्य नाही. या बक्कलच्या संदर्भात माननीय मंत्री महोदय आपले विचार मांडतील किंवा आम्हाला योग्य ते मार्गदर्शन करतील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

---

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस. क्यु. जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, पूरक मांगणी पर बोलते हुए सब से पहले मैं नगर विकास विभाग के बारे में अपने विचार पेश करना चाहता हूँ. बाब क्रमांक 38 के अन्तर्गत महानगरपालिकाओं को ब्याज देने की तरतूद की गई है. नागपुर महानगरपालिका के 106 कर्मचारियों को पुनर्स्थापित करने का निर्णय तो किया गया है, लेकिन शासन ने इसके बारे में कोई प्रावधान नहीं किया है. इस बारे में प्रावधान किया जाए, ऐसा हमारा अनुरोध है.

सभापति महोदय, बाब क्रमांक 94 व 95 गृह निर्माण विभाग से संबंधित हैं. शासन ने मुंबई के गिरणी कामगारों को म्हाडा के फ्लॅट देने का प्रावधान किया है. हमारा शासन से अनुरोध है कि विदर्भ में भी जो गिरणी कामगार हैं, जो मिल बंद हो गए हैं, एम्प्रेस मिल, मॉडल मिल बंद हो गए हैं, इनमें काम करने वाले कामगारों को भी म्हाडा के फ्लॅट देने का प्रावधान किया जाए.

सभापति महोदय, बाब क्रमांक 87, 88 और 89 नियोजन विभाग से संबंधित हैं. आमदार अपना फंड कहां खर्च कर सकते हैं, इस बारे में आपने फरबरी में आदेश रिवाइज किए हैं, विस्तारित किए हैं. लेकिन इसमें एक कमी है कि जीवनदायी योजना में केवल बी.पी.एल. कार्डधारकों का ही इलाज होता है. काफी समय से बी.पी.एल. के कार्ड नहीं बन रहे, इसलिए बहुत से ऐसे गरीब लोग हैं, बहुत से ऐसे झोंपड़ी में रहने वाले लोग हैं, बहुत से ऐसे गरीब बुनकर हैं, जिनके पास बी.पी.एल का कार्ड नहीं है. ऐसे गरीब बुनकरों को आमदार फंड से इलाज कराने का प्रावधान होना चाहिए. इस प्रकार से आमदार अपने क्षेत्र के गरीब लोगों की मदद कर सकेंगे.

सभापति महोदय, बाब क्रमांक 19 महसूल व वन विभाग से संबंधित है. विदर्भ के 6 प्रमुख प्रकल्पों के पुनर्वसन के बारे में मैंने पिछली बार सभागृह में कहा था. इस पूरक मागणी में इस बारे में कोई प्रावधान नहीं किया गया है. शासन इस बारे में जल्दी निर्णय करे और आने वाले बजट में इन प्रकल्पों के पुनर्वसन के लिए प्रावधान करना चाहिए, ताकि मिहान में कार्गो हब और गोसीखुर्द जैसे हमारे रुके हुए प्रकल्प जल्दी पूरे हो सकें.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. एस. क्यु. जमा

सभापति महोदय, हमारे क्रीड़ा और युवा मंत्री यहां पर बैठे हुए हैं, लेकिन पूरक मागणी में इनके लिए कुछ प्रावधान नहीं है. आपने अभी नई खेल नीति बनाई है और एक नयी युवा नीति जाहिर करने वाले हैं. हमारा शासन से अनुरोध है कि जिन खिलाड़ियों को अर्जुन अवार्ड मिला है, राष्ट्रीय अवार्ड मिला है, उनको विशेष सुविधाएं और म्हाडा का फ्लॅट मिलना चाहिए. ये बहुत गिने-चुने खिलाड़ी हैं, इनका सम्मान होना चाहिए. आपने कॉमनवेल्थ खेलों और एशियाड खेलों में पदक लाने वाले खिलाड़ियों का सम्मान किया है, उसके लिए मैं शासन का धन्यवाद देता हूँ. जय हिंद, जय महाराष्ट्र.

---

. . . भाषण पूर्ण, नंतर खंदारे.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2010-11 च्या विवरण पत्रांवर बोलण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

वित्त विभागाच्या पान क्र.41 वरील बाब क्र.48 वर मी माझे विचार प्रथम मांडतो. आजपर्यंत राज्यातील आघाडी शासनाच्या सर्व सन्माननीय वित्त मंत्र्यांनी अधिवेशनामध्ये किंवा शिष्टमंडळांना वेगवेगळ्या पध्दतीने आश्वासन दिले आहे की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाला 25 कोटी रुपयांचा निधी देण्यात येईल. हे आश्वासन रेकॉर्डवर असताना या महामंडळाला अद्याप निधी देण्यात आलेला नाही. मी माननीय वित्त मंत्री श्री.अजित दादा पवार यांना विनंती करतो की, त्यांनी या महामंडळाला जाहीर करण्यात आलेला 25 कोटीचा निधी नजिकच्या काळामध्ये देण्यात यावा.

त्याचप्रमाणे राज्याला एक अभिमानास्पद बाब आहे. संपूर्ण राज्यामध्ये व देशामध्ये अनुसूचित जाती व जमातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आली आहे. अनुसूचित जातीसाठी 2 हजार कोटीपेक्षा जास्त व अनुसूचित जमातीसाठी 3 हजार कोटीपेक्षा जास्त निधी राखीव ठेवला आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

त्याच प्रमाणे या महाराष्ट्रामध्ये भटक्या विमुक्त समाजाचे 18 ते 20 टक्के लोक रहात असताना त्यांच्यासाठी राखीव निधीची तरतूद केलेली नाही. म्हणून या निमित्ताने मी शासनाला विनंती करतो की ज्या प्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठी राखीव निधीची तरतूद केलेली आहे तशा प्रकारे कमीत कमी 2 हजार कोटी रुपयाची तरतूद या भटक्या विमुक्त जातीच्या लोकांसाठी करावी आणि त्यांच्यासाठी वेगवेगळया योजना राबवाव्यात.

सभापती महोदय, वन विभागाच्या पान क्रमांक 19 वरील बाब क्रमांक 22 संबंधी बोलत असताना मी सांगू इच्छितो की, या राज्यामध्ये मेंढपाळाचा व्यवसाय करणारा मोठा वर्ग आहे. त्यांच्या शेळयामेंढ्याना चरण्यासाठी कुरणे नाहीत त्यामुळे हे लोक एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी आपल्या शेळयामेंढया घेऊन भटकत असतात. अशा प्रकारे भटकत असताना त्यांच्या शेळयामेंढ्या शेतक-याच्या शेतामध्ये जाऊन शेतीचे नुकसान करतात. अशा वेळी तो शेतकरी मेंढपाळाला जबर मारहाण करतो. कधी कधी तर खून पाडण्याच्या घटना देखील होतात. म्हणून वन विभागाकडे असलेली जमीन चराऊ कुरणासाठी मेंढपाळांना द्यावी अशी मी शासनाला वारंवार विनंती केलेली आहे. परंतु वनातील झडुपांचे या शेळयामेंढ्यामुळे नुकसान होते असे वनाधिका-याकडून सांगितले जाते. यासंदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी मी केलेली विनंती मान्य केली होती. जो वनाचा भाग 5 वर्षापेक्षा जुना झालेला आहे तेथील झुडुपे 5 वर्षात उंच झालेली असल्यामुळे शेळयामेंढ्या कडून त्याचे नुकसान होणार नाही. उलट शेळयामेंढ्यांच्या लेंडयामुळे वन जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होईल. तेव्हा याबाबतीत निर्णय घ्यावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, मी आणखी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आमच्या शेळीमेंढी विकास महामंडळाला स्वत:ची जागा नाही. महामंडळाकडे असलेली जागा काढून घेण्यात आलेली आहे. शेळयामेंढ्यांचे पालन कसे करावे यासंबंधी महामंडळा मार्फत प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण केन्द्र जेथे आहे ती जागा वन विभागाची आहे. महामंडळाचे कार्यालय भाड्याच्या इमारतीमध्ये आहे. तेथील काही जमीन वन विभागाकडे आहे. सभापती महोदय, महामंडळाचे प्रशिक्षण केन्द्र, महामंडळाचे 10-12 कर्मचारी रहात असलेल्या खोल्या ताबडतोबीने खाली करुन आपले बस्तान बांधून निघून जावे अशा प्रकारची नोटीस वन विभागाने 1-2 महिन्यापूर्वी दिलेली

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेशे शेंडगे...

आहे. सभापती महोदय, प्रशिक्षण केन्द्रामध्ये ग्रामीण भागातील लोकांना शेळयामेंढ्या पालनाचे प्रशिक्षण दिले जाते. त्या महामंडळामध्ये गेल्या 30-40 वर्षापासून काम करणारा तृतीय आणि चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी तेथे वर्षानुवर्षे रहात आहे. खरे म्हणजे ही जमीन कोणाला तरी देण्यासाठी खाली करुन देण्याची नोटीस दिलेली आहे. तेव्हा ही जागा दुस-या कोणाला देण्यापेक्षा ती आम्हाला द्यावी अशी आमची मागणी आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या पान क्रमांक 99 वरील बाब क्रमांक 83 मध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध लोकांसाठी घरकुल योजना राबविण्यासाठी तरतूद केलेली आहे. या निमित्ताने मला हे सांगावयाचे आहे की, भटक्या विमुक्त जातीचा समाज हा वर्षातील 8 महिने भटकंती करीत असतो. त्यांची भटकंती करण्याची ठिकाणे ठरलेली असतात. भटकंती करताना हा वर्ग आपल्या सोबत शेळयामेंढ्या घेऊन जात असतो. बरोबर एक घोडा आणि त्याचे कुटुंब असते. तेव्हा या भटकंती करणा-या लोकांसाठी देखील घरकुल योजना राबवावी अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय सन 2010-2011च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत जे विषय येतात त्यानुषंगाने मला एकच विषय येथे मांडावयाचा आहे. ज्या शैक्षणिक संस्थांना 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत, ज्या शिक्षण संस्थांनी शिक्षण क्षेत्राला 100 वर्षापेक्षा अधिक काळ योगदान दिलेले आहे अशा संस्थांना आर्थिक मदत करण्याचे शासनाचे धोरण आहे. मुंबईतील सोशल सर्व्हिस लिग हायस्कूल आणि जनरल एज्युकेशन सोसायटी या दोन्ही संस्थांनी 100 वर्षापेक्षा अधिक वर्षे शैक्षणिक कार्य केलेले आहे. मी या संदर्भात माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्र्यांना पत्र दिलेले आहे की, या 100 वर्षे पूर्ण झालेल्या संस्थांना आर्थिक मदत द्यावी.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 99, बाब क्रमांक 84 मनोविकलांग व्यक्तींसाठी ज्या शाळा आहेत त्या शाळांना अनुदान देण्यासाठी 1.88 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या शाळांना अनुदान देण्याबरोबरच ज्या सामाजिक न्याय विभागांतर्गत अशा प्रकारच्या मूक-बधिर, अपंगांच्या संस्था आहेत या संस्थांना सुरुवातीला विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिली जाते. कालांतराने या संस्थांना अनुदान मिळते. शालेय शिक्षण विभाग, तंत्रशिक्षण विभागातील विनाअनुदानित सेवा पेन्शन व अन्य लाभासाठी ग्राह्य धरली जाते. परंतु सामाजिक न्याय विभागाच्या ज्या कर्मशाळा आहेत तेथील कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू नाही. कर्मशाळेतील कर्मचाऱ्यांची विनाअनुदानित सेवा पेन्शनसाठी ग्राह्य धरली जात नाही. इतर विभागामध्ये ही सेवा ग्राह्य धरली जाते. हे नैसर्गिक न्याय तत्वाच्या विरुध्द आहे. सुरुवातीला 8-10 वर्षे विनाअनुदानित सेवा आणि शेवटची 4-5 वर्षे अनुदानित सेवा झालेली असली तरी अनेक कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळत नाही. उदाहरण द्यायचे झाले तर रत्नागिरी येथील आविष्कार या संस्थेतील 9 वर्षे विनाअनुदानित सेवा आणि शेवटची 4 वर्षे अनुदानित सेवा झालेल्यांना पेन्शन मिळत नाही किंवा इतर कोणतेही लाभ मिळत नाहीत. शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर सामाजिक न्याय विभागाने सुध्दा विनाअनुदानित सेवा पेन्शनसाठी ग्राह्य धरण्याबाबत व कर्मशाळांमधील कर्मचाऱ्यांना पेन्शन देण्याबाबत विचार करावा अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 36, बाब क्रमांक 41 वर नगरपरिषदांना अनुदान देण्यासाठी 1.84 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नगरपरिषदांच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळा आहेत. महानगरपालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळा आहेत. शालेय शिक्षण विभागामध्ये सहावा वेतन आयोग लागू झाला. नगरपालिका आणि महानगरपालिकेतील प्राथमिक शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू झाला. मात्र नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तीन वर्षे आग्रह धरुनही 2009 पासून मार्च, 2011 पर्यंत जीआर काढलेला नाही. शालेय शिक्षण विभाग म्हणतो की, नगरविकास विभागाने जीआर काढला पाहिजे. नगरविकास विभाग म्हणतो की, शालेय शिक्षण विभागाने जीआर काढला पाहिजे. विभागांच्या या भांडणामध्ये कर्मचारी सहाव्या वेतन आयोगाच्या लाभापासून वंचित आहेत. नगरविकास विभागाने पुढाकार घेऊन तातडीने निर्णय घ्यावा अशी विनंती करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

सभापती महोदय, नगरपालिकांच्या शाळांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासंदर्भात प्रश्न आहे. शासनाने कृषी विद्यापीठांना सुधारित वेतन देण्याच्या संदर्भात 13.05 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. कृषी विद्यापीठांतर्गत जी कृषी विद्यालये सुरु आहेत ती विनाअनुदान तत्वावर सुरु आहेत. यासाठी शासनाने व कृषी विद्यापीठांनी खरोखरच कृषी विद्यालयातील कर्मचाऱ्यांना लाभ दिला जातो की नाही याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 5, बाब क्रमांक 3 वर लोकसेवा आयोगासाठी 42 लाख रुपयांची पुरवणी मागणी सादर केली आहे. शासनाने मागणीपत्र सादर केल्यानंतर लोकसेवा आयोगाकडून दोन-दोन, चार-चार वर्षे दखल घेतली जात नाही. राज्यामध्ये अनेक पदे रिक्त आहेत. या सभागृहात उत्तर देत असताना मंत्री महोदयांकडून नेहमी सांगितले जाते की, शासनाने लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर केले आहे. परंतु त्यांच्याकडून निवड प्रक्रिया वेळेवर पूर्ण होत नाही. त्यामुळे वेळेवर यादी प्राप्त होत नसल्यामुळे पदे रिक्त राहतात. लोकसेवा आयोगाला अनुदान दिले ही चांगली बाब आहे. परंतु शासनाने मागणीपत्र सादर केल्यानंतर ताबडतोब रिक्त पदे भरण्याची कार्यवाही व्हावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

..3...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 10, बाब क्रमांक 10. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 26.11 ची घटना घडल्यानंतर 5 गस्ती नौका मंजूर करण्यात आल्या. या 5 गस्ती नौकांसाठी प्रशिक्षित कर्मचारी वर्ग देण्याची गरज आहे. 70 पदे अद्याप रिक्त आहेत. ही पदे भरण्याची कार्यवाही करीत असताना मच्छिमारांना प्राधान्य देण्यात यावे अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 12, बाब क्रमांक 14. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये दारु, मटका, जुगार आणि वेश्या व्यवसाय मोठया प्रमाणात सुरु आहे. दोन दिवसांपूर्वी कुडाळ तालुक्यातील एका लॉजवर वेश्या व्यवसाय सुरु असल्याची खबर मी स्वत: दिल्यानंतर पोलिसांनी धाड टाकली आणि त्याठिकाणी तीन परप्रांतीय मुलींना अटक केली. तेथील लॉज मालक फरार झाला. परंतु दुसऱ्या दिवशी हा लॉज मालक दिवसाढवळ्या बाजारपेठेत फिरत होता.

नंतर 2झेड.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

असे व्यवसाय बंद करण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी माझी विनंती आहे. तसेच सुहाना माडकर, सुजाता तळोलेकर आणि रोशनी गवस या मुलींच्या खुन्यांना पकडण्यात अद्यापही पोलिसांना यश मिळाले नाही, त्याचा शासनाने विचार करावा. रोशनी गवत या मुलीच्या बाबतीत उच्च न्यायालयाने निर्देश सुध्दा दिलेले आहेत तरीही गुन्हेगार सापडले नाहीत. त्याचप्रमाणे अंकुश राणे यांच्यासंबंधीचा तपास सीआयडीकडे वर्ग होऊनही तपास पूर्ण झालेला दिसत नाही. तसेच रमेश गोवेकर जे बेपत्ता झालेले आहेत त्यांचाही अद्याप पत्ता लागला नाही. कणकवली शहरातील कृष्णपंत वालावलकर नावाचा व्यापारी सुध्दा बेपत्ता झाला आहे, त्यांचाही शोध अद्याप लागला नाही, या सर्व बाबतीत गृह विभागाने करून शोध घ्यावा व गुन्हेगारांना शिक्षा करावी अशी माझी विनंती आहे.

महोदय, बाब क्र. 20, पृ.क्र. 18-महसूल विभागाच्या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, वनसंज्ञेमुळे आज अनेक प्रकल्प प्रलंबित राहिले आहेत. तसेच प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचेही प्रश्न निर्माण होत आहेत, ते अद्याप सुटले नाहीत. या वनसंज्ञेबाबत सभागृहात वारंवार प्रश्न उपस्थित होत असतो. यासंदर्भात मुख्य सचिवांनी सर्वोच्च न्यायालयात ॲफिडेव्हीट दाखल केलेले आहे. अद्यापही 42 हजार हेक्टरवरुन 1800 हेक्टरवर आणावयाचा जो वनसंज्ञेचा मुद्दा आहे तो निकालात निघाला नाही. वास्तविक 42 हजारावरुन 1800 हेक्टरवर हे क्षेत्र आणण्यासंबंधीची घोषणा झाली असली तरी प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नाही त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना आपल्या घरांची आवश्यक ती दुरुस्ती सुध्दा करता येत नाही. हा प्रश्न देखील लवकरात लवकर सुटावा तसेच आकारवाडीचा प्रश्नही तातडीने सोडवावा, अशी मी विनंती करतो.

महोदय, बाब क्र. 21, पृ.क्र. 18-सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळ या नावाने आंबोली या ठिकाणी 141 (अ) या 1500 चौरस मीटरच्या भूखंडावर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एका व्यापाऱ्याने छोटे छोटे उद्योगधंदे करण्यासाठी तसेच या जिल्ह्यातील मुलांच्या शिक्षणासाठी जागा घेतली पण त्या जागेवर एक हॉटेल सुरु केले, त्याबाबत जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त तसेच मुख्यमंत्र्यांकडे पत्रव्यवहार केले. अनेक तक्रारी सुध्दा केल्या पण अद्याप कोणतीच कारवाई झालेली नाही. तसेच या संचालक मंडळाने हमीपत्र दिले होते की, या जागेचा कोणत्याही प्रकारे दुरुपयोग होणार नाही.

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

तसेच या जागेवर एक कम्युनिटी सेंटर उभे केले जाईल पण त्याऐवजी तेथे बँक्विट हॉल आणि बिअर बार अशा प्रकारचे उद्योग सुरु झाले. त्यासंदर्भात शासन कोणती कारवाई करणार हे स्पष्ट होणे आवश्यक आहे.

महोदय, बाब क्र. 22, पृ.क्र. 19 देवस्थान जमिनींच्या अनुषंगाने मला अशी सूचना करावयाची आहे की, शासनाने 30 जुलै, 2010 रोजी "राज्यातील देवस्थान जमिनी बेकायदेशीर हस्तांतरित झालेल्या असल्याने त्या जमिनी पूर्ववत देवस्थानच्या नावे करण्याबाबत" अशा प्रकारचा आदेश काढलेला आहे. खऱ्या अर्थाने अशा प्रकारच्या जमिनी कोकणात जास्त प्रमाणात आहेत. बऱ्याच ठिकाणी तर गावेच्या गावे देवस्थानच्या जमिनीवरच आहेत. यासाठी खरे तर महसूल अधिनियम, 1963 नुसार अशा जमिनी हस्तांतरित करण्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागते. पण सन 1963 पासून या जमिनी कनिष्ठ कब्जेदारांच्याच ताब्यात असून चार-चार पिढ्यापासून ते या जमिनीचा उपभोग घेत आहेत. त्यात आचरे गाव आणि सारिस्तेसारख्या गावात जास्त प्रमाणात देवस्थानच्या जमिनी आहेत. माझी विनंती आहे की, कोकणातील पूर्णपणे कब्जे असलेली गावे उपरोक्त शासन निर्णयाचा आधार घेऊन अशा जमिनी शासन जमा होण्यासंबंधी शासनाने तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे. पश्चिम महाराष्ट्रात देवस्थानच्या जमिनी देवस्थान मंडळेच वापरतात पण कोकणात मात्र नागरीक व ग्रामस्थ वापरत आहेत, यादृष्टीने विचार होणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

सभापती महोदय, बाब क्रमांक 41, पृष्ठ क्रमांक 47, कोकण पॅकेजच्या संदर्भात मी येथे विचार मांडणार आहे. कोकणामध्ये मागील काही महिन्यापूर्वी मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती व या बैठकीमध्ये 5,232 कोटी रुपयांचे पॅकेज कोकणासाठी जाहीर करण्यात आले होते. या पॅकेजसाठी शासन निर्णय सुध्दा काढण्यात आला व तीन टप्प्यात निधी देण्याचे जाहीर करण्यात आले होते. राज्य शासनाचा व केंद्र शासनाचा निधी नियमित येतांना शासन निर्णयामध्ये सदर निधी कोकण पॅकेज समजावा असा वाक्प्रचार करुन कोकणाला फसवण्याचा प्रकार सुरु आहे.

कोकणातील अनेक पाटबंधा-यांची कामे प्रलंबित आहेत. 729, 447 व 346 कोटी रुपये पाटबंधा-यांच्या कामासाठी द्यावयाचे होते परंतु यातील अतिशय अल्प निधी कोकणातील पाटबंधा-यासाठी देण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, कोकणातील 48 बदंरातील गाळ काढण्यासाठी ड्रेझर खरेदी करण्याची घोषणा शासनामार्फत करण्यात आली होती. परंतु बंदरातील गाळ काढण्यासाठी शासनाने अद्याप ड्रेझरजची खरेदी केलेली नाही. ड्रेझरसाठी 60 कोटी रुपये दिले जाणार होते परंतु हे 60 कोटी रुपये ड्रेझरसाठी मिळालेले नाहीत. त्यामुळे कोकणातील बंदरातील गाळ कधी काढला जाणार आहे अशी विचारणा कोकणातील जनता या शासनाला करीत आहे.

सभापती महोदय, कोकणातील बीज भांडवल व सुवर्णजंयती योजनेतंर्गत अनुदान दिले गेले. डी प्लस जिल्हा असूनही छोटे उद्योजक हे कर्ज वेळेवर फेडू शकले नाहीत. यासंदर्भात उद्योग, उर्जा व कामगार विभागाचा 18.5.2007 रोजीचा जी.आर. निघालेला असून त्यामध्ये 31.3.2008 पर्यंत कर्जाच्या वनटाईम सेटलमेंटसाठी मुदत ठरवून दिली होती परंतु ही मुदत वाढवून देण्याची आवश्यकता आहे. आज या ठिकाणी जमिनींचा लिलाव करुन पैसे रिकव्हर केले जात आहेत त्यामुळे रिकव्हरी तातडीने थांबविण्यात यावी अशी मी आपल्या मार्फत शासनाला विनंती करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------- ...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ( नाम नियुक्त) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 100, बाब क्रमांक 85, सामाजिक न्याय विभागावर माझे विचार व्यक्त करणार आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी खालच्या समाजाला पिढयानपिढया मुख्य प्रवाहात येता आले नाही, लाभ मिळाला नाही अशा आशयाचा सामाजिक न्यायाचा अर्थसंकल्प सन 2003-04 मध्ये माननीय सुशीलकुमार शिंदे यांनी महाराष्ट्राला दिलेला आहे. त्यांनी भूमिहीनांना जमिनी दिल्या, गरीब दुर्बल घटकांच्या सर्व नोंदी प्रकल्पात केल्या. या समाजाचे जीवनमान उंचवण्यासाठी 5 वर्षाच्या कार्यक्रमासाठी तज्ज्ञांच्या समिती मार्फत अभ्यास गटाची स्थापना करावी व नियोजन बाबीवर तरतुदी कराव्यात व त्याचा अहवाल शासनास जाहीर करावा अशी विनंती आहे.

पृष्ठ क्रमांक 5, बाब क्रमांक 4, सामान्य प्रशासन विभाग सचिवालय सर्व साधारण सेवा. सभापती महोदय, मंत्रालय हे लोकशाहीचे मंदिर आहे. मंत्रालयामध्ये गरीब, होतकरु, सर्वसामान्य जनतेला प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी प्रवेश मिळत नाही. त्यामुळे सर्वसामान्यांना मंत्रालयात सहज प्रवेश मिळण्याच्या संदर्भात शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 104, बाब क्रमांक 89, नियोजन विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. श्री क्षेत्र परशुराम कुंड विकास कार्यक्रमासाठी या शासनाने गेल्या अर्थसंकल्पात 10 कोटी रुपयांचा निधी जाहीर केला होता. परंतु त्यासाठी शासनाने यावर्षी 4 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परशुराम हा रामाचा सहावा अवतार आहे. कोकणातील जनता अर्धपाटी राहील अशा प्रकारचा शाप परशुरामानी दिला होता. सन्माननीय मंत्री श्री. सुनील तटकरे हे वित्तमंत्री झाल्यानंतर त्यांनी कोकणातील परशुरामासाठी 10 कोटी रुपये देऊन कोकणाची भूमी शापमुक्त केली आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण ...

परंतु 10 कोटी ही रक्कम फार कमी आहे तेव्हा या कामासाठी त्वरित उर्वरित रक्कम देण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, 2011, संसद,राज्य, संघ राज्य क्षेत्र विधानमंडळे या लेखा शीर्षाखालील बाब क्रमांक 138,पान नंबर 167 संबंधी मला बोलावयाचे आहे.2010-2011 या वर्षासाठीचा अधिकचा खर्च भागविण्यासाठी 27 लाख 43 हजार रुपयांची पूरक मागणी विधान मंडळ सचिवालयाच्या संदर्भात करण्यात आली आहे. केन्द्रीय अर्थ मंत्री श्री प्रणव मुखर्जी यांनी खासदार निधीमध्ये 3 कोटी रुपयांची वाढ करुन हा निधी आता वर्षाला 5 कोटी रुपये केला आहे त्याप्रमाणे आपले सभागृह हे वरिष्ठ सभागृह असल्यामुळे या सभागृहातील सन्माननीय सदस्यांना व खालच्या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनासुध्दा केन्द्र सरकाराच्या धर्तीवर राज्यातील आमदाराचा निधी तीन कोटी रुपयांचा करण्यात यावा अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मला पान नंबर 167 बाब क्रमांक 139 संबंधी बोलावयाचे आहे. 2010-2011 या वर्षासाठीचा अधिक खर्च भागविण्यासाठी 14 कोटी 79 लाख 46 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे. लोकसभा आणि राज्यसभामध्ये ज्याप्रमाणे सेन्ट्रल हॉल आहे त्याच धर्तीवर विधानमंडळाच्या चौथ्या मजल्यावर सेन्ट्रल हॉल करावा. या ठिकाणी सर्व विचारवंत बसलेले आहेत. आपले वरिष्ठ सभागृह आहे त्यामुळे या सभागृहातील सन्माननीय सदस्यांना चहापाणी घेण्याकरिता, गप्पा मारण्याकरिता सेन्ट्रल हॉल करण्यात यावा असे मला सांगावयाचे आहे. त्यानंतर मला दुसरा एक महत्वाचा मुद्दा याठिकाणी मांडावयाचा आहे. विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी हा मुद्दा या पूर्वी अनेकदा मांडला आहे. एखाद्या आयएएस किंवा आयपीएस अधिका-यांची बदली झाल्याबरोबर त्याना वानखेडे क्लब किंवा एमआयजी क्लब किंवा इतर कोणत्याही क्लबचे सभासदत्व बहाल केले जाते. याबाबतीत पीठासीन अधिका-यांनी निदेश देऊन सुध्दा आमदारांना या क्लबचे सभासदत्व दिले जात नाही. आपल्या निदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी यापूर्वी माननीय मंत्र्यांकडे दोन तीन बैठकासुध्दा घेण्यात आल्या होत्या. माननीय महसूल मंत्र्यांकडे, त्याचबरोबर मुंबई आणि उपनगर जिल्हयाच्या पालक मंत्र्याकडे बैठक झाली होती. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांना या क्लबचे सभासदत्व देण्यात यावे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण ...

असे निदेशही देण्यात आले होते परंतु अजूनही त्याची अंमलबजावणी झालेली नाही तरी या निदेशाची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, कालच्या पूरक मागण्यांच्या निमित्ताने मी , सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले आणि इतरही काही सन्माननीय सदस्य बोलले होते. आम्ही बोलल्यानंतर माननीय मंत्र्यांनी उत्तर देत असतांना आमच्या नावाचा उल्लेख तरी करावयास पाहिजे होता परंतु त्यांनी आमच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. शेळी मेंढी विकास महामंडळाच्या संदर्भात मी काल अत्यंत पोटतिडकीने बोललो होतो .या महामंडळाची 80 हजार चौरस मिटर जागा एका मोठया बिल्डरने बळकावली होती असा मी मुद्दा मांडला होता परंतु त्या बाबतीत सन्माननीय मंत्री श्री गुलाबराव देवकर यांनी माझ्या नावाचा देखील उल्लेख केलेला नाही. सभापती महोदय, आपल्या माध्यमातून सन्माननीय मंत्र्यांना असे निदेश देण्यात यावे की , जे सन्माननीय सदस्य मुद्दे मांडतील त्या मुद्याच्या संदर्भात त्या त्या विभागाच्या प्रधान सचिवांनी नंतर पोहोच द्यावी. आम्ही जे काही बोललो आहेत त्याची काय अंमलबजावणी करण्यात आली याबाबतीत आम्हाला लेखी कळविण्यात आले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला शतश: आभारी आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.धन्यवाद.जयहिंद, जय महाराष्ट्र.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पूरक मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 15, पान नंबर 12 संबंधी मला प्रथम बोलावयाचे आहे.हुतात्मा झालेल्या पोलिसांच्या कुटुंबाकरिता निवास व्यवस्थेच्या जागेसाठी रक्कम प्रदान करण्याकरिता ही तरतूद करण्यात आली आहे. या 56 कुटुंबीयाकरिता घरे देण्याची एक योजना शासनाच्या माध्यमातून घेण्यात आली असून आता घरा ऐवजी त्यांना 12 कोटी 7 लाख 50 हजार रुपये देण्यात येणार आहेत. मी या पैशाचा हिशोब करीत होतो त्यानुसार एका कुटुंबासाठी फक्त 22 लाख 78 हजार 300 रुपये मिळणार आहेत. मुंबई सारख्या शहरामध्ये किंवा राज्यातील इतर कोणत्याही शहरामध्ये या किंमतीमध्ये घर उपलब्ध होणार नाही. मुंबईमध्ये म्हाडाच्या मार्फत 4 हजार घरे बांधण्याची एक योजना असून लॉटरी पध्दतीने ती घरे गरजू व्यक्तींना देण्यात येणार आहेत. म्हाडाच्या मार्फत किंवा इतर ठिकाणी जी काही घरे बांधण्यात येणार आहेत त्यातील 2 टक्के घरे या कुटुंबीयाकरता राखून ठेवण्यात आली व त्या घराचे पैसे डायरेक्ट म्हाडाकडे सरकारने भरले आणि घरे दिली तर या योजनेचा लाभ त्या कुटुंबापर्यंत पोहोचण्यास मदत होईल.

सभापती महोदय, यानंतर मला बाब क्रमांक 16 पान नंबर 13 संबंधी बोलावयाचे आहे. न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोग शाळा,कलिना, मुंबई येथे जीवरक्षक उपकरणाच्या चाचणी सुविधेसाठी तरतूद करण्याकरिता ही पूरक मागणी करण्यात आली आहे. अनेक वेळा या उपकरणाची मागणी केली जाते आणि आर्थिक तरतूद करुन शासनाच्या वतीने ही मागणी पूर्ण देखील केली जाते. अनेक वेळा सभागृहात चर्चा झालेली आहे की, ती उपकरणे वापरण्यासाठी जे मनुष्यबळ लागते ...

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे...

ते उपलब्ध नसते त्यामुळे अशा प्रकारची उपकरणे खरेदी करण्यापूर्वी त्यासाठी लागणारे मनुष्य बळ उपलब्ध आहे काय, ते उपकरण निश्चितपणे वापरले जाईल काय, त्याची युटिलिटी 100 टक्के होणार आहे काय याचा आपण विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 51 आणि पृष्ठ क्रमांक 47 मध्ये ऐतिहासिक वारसा प्राप्त झालेल्या इमारतींसाठी अनुदान देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. या मुंबई शहरामध्ये अनेक ऐतिहासिक इमारती आहेत ज्यांना हेरिटेज प्रॉपर्टीज म्हटले जाते. त्या खाजगी मालमत्ता असल्यामुळे त्यांची दुरुस्ती करणे मालकाला शक्य होत नाही. याचे कारण असे की, या राज्यामध्ये अनेक वर्षापासून भाडे नियंत्रण कायदा अस्तित्वात आहे. अनेक वर्षापासून इमारतींचे भाडे फ्रोजन झाले असल्यामुळे भाडयापोटी मिळणाऱ्या उत्पन्नामधून इमारतीच्या मालकाला दुरुस्ती व देखभाल करणे् शक्य होत नाही. मुंबईच्या फोर्ट भागामध्ये अशा अनेक सुंदर इमारती आपण पहातो. तेव्हा त्यांना सुध्दा या निमित्ताने आर्थिक पाठबळ देणे गरजेचे आहे. या इमारती सुंदर ठेवण्याचे काम सरकारने मालकांकडून कोणत्याही प्रकारे पैसे न घेता आपल्या माध्यमातून केले तर मुंबई शहर सुध्दा चांगले दिसेल अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 61 व पृष्ठ क्रमांक 70 मध्ये खार जमिनीच्या संदर्भात योजना करण्यात आली आहे. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये खार जमिनीच्या बाबतीत योजना लागू करण्यात आली आहे व त्यासाठी निधी उपलब्ध केला आहे. याबाबत माझ्या मनामध्ये एक शंका आहे की, खार जमिनीमध्ये आपण योजना राबविल्यानंतर त्या जमिनीतील क्षार कमी झाले आहेत काय, त्या जमिनीची पत वाढली आहे काय, त्या जमिनीचा योग्य उपयोग झाला आहे काय? या संदर्भातील अहवाल या सभागृहापुढे ठेवण्यात आला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

त्यानंतर, बाब क्रमांक 72 आणि पृष्ठ क्रमांक 86 च्या अनुषंगाने ऊर्जेच्या विषयावर अनेक वेळा सभागृहामध्ये चर्चा झाली आहे. राज्यामध्ये विजेचा तुटवडा आहे अशी विरोधी पक्षाच्या बाकावरुन नेहमी टीका केली जाते. त्यामुळे ऊर्जेच्या स्थितीबाबत आम्हाला नेहमी चिंता वाटत असते. या निमित्ताने सध्या आपल्याकडे उपलब्ध असलेल्या ऊर्जा स्त्रोताचा विचार केला तर ग्रामीण भागामध्ये सौर ऊर्जेचा वापर करुन रस्त्यावरील दिवे लावले गेले तर त्याचा निश्चितपणे फायदा होईल. सौर ऊर्जेचा वापर केल्यामुळे ऊर्जेची बचत होईल. परंतु त्याचबरोबर सौर ऊर्जेच्या एका

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे....

खांबाचा दर हा 29 हजार रुपयांपेक्षा जास्त लावण्यात आलेला आहे. यामध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या माध्यमातून 19 हजार रुपये अनुदानाच्या स्वरुपात मिळणार आहेत. म्हणजेच एका खांबासाठी ग्रामपंचायतीने 10 हजार रुपये खर्च करावयाचे आहेत. एका बाजूला आपण सौर ऊर्जेला प्रोत्साहन देत असतांना त्यासाठी येणारा 29 हजार रुपयांचा खर्च आणि ग्रामपंचायतीनी करावयाचा 33 टक्के खर्च पाहिला तर याबाबत शासनाने काही तरी विचार करणे गरजेचे आहे. आज पिण्याच्या पाण्याची योजना राबवीत असतांना त्यामध्ये जनतेचा सहभाग असावा म्हणून 10 टक्के लोकवर्गणी घेत होतो. त्याप्रमाणे याठिकाणी सौर ऊर्जेची योजना राबवीत असतांना ग्रामपंचायतींना 33 टक्के रक्कम भरण्यास सांगण्याऐवजी 10 टक्के रक्कम भरण्यास सांगावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 95 आणि पृष्ठ क्रमांक 109 मध्ये अनुसूचित जातीच्या लोकांसाठी मुंबई शहरातील स्लम भागामध्ये नागरी सुविधा पुरविण्याकरिता 36 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. शहरातील प्रत्येक नागरिकाला नागरी सुविधा शासनाने दिल्या पाहिजेत अशी आम्हा सर्व माननीय सदस्यांची भावना आहे. परंतु झोपडपट्टीमध्ये रहाणारे लोक आज नागरी सुविधांपासून वंचित आहेत त्यांना मोठया प्रमाणात नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला पाहिजे, त्यांना आपण सुविधांपासून वंचित ठेवता कामा नये.

सभापती महोदय, बाब क्रमांक 138, पृष्ठ क्रमांक 167 मध्ये आमदारांच्या भत्त्यांकरिता तरतूद करण्यात आली आहे. या अधिवेशनाच्या निमित्ताने सभागृहामध्ये नवीन माईक सिस्टीम बसविण्यात आलेली आहे. शासनाने आम्हा आमदारांना लॅपटॉप घेण्याची मुभा दिली आहे. त्याचबरोबर आम्हाला इंटरनेट कनेक्टिव्हिटी, आयपॉडची सुविधा उपलब्ध करुन दिली तर त्याच्या माध्यमातून या ठिकाणी अनेक प्रश्न उपस्थित करण्याच्या दृष्टीने विषयवार आम्हाला माहिती मिळू शकते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे . . . .

या चर्चेच्या माध्यमातून चांगल्या प्रकारचा रिझल्ट येऊ शकतील अशा पध्दतीने आपण केले तर या सदनातील चर्चेचा दर्जा चांगला राहू शकेल हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. सभापती महोदय, आपण मला याठिकाणी बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो. धन्यवाद.

---

. . . .3 सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, उद्या या ठिकाणी राज्याचा अर्थसंकल्प सादर होणार आहे आणि आज पुरवणी मागण्यांवर चर्चा होत आहे. पण खरे म्हणजे आपल्याला बाहेरचे लोक हसत आहेत.

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : आपल्याला का हसत आहेत ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, लोक आपल्याला का हसत आहेत हे जरा बाहेर जाऊन विचारावे म्हणजे कळेल.

सभापती महोदय, बाब क्र.5 बोलावयाचे तर उद्या बजेट जाहीर होत असताना देखील आज या सरकारला 12 कोटी 28 लाख रुपयांचे हेलिकॉप्टर घेण्याची तातडी आहे, इतकी घाई आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे साहेब यांनी भाषण करताना एक भाग वाचून दाखविला. पण बाब क्र.15 मध्ये "हुतात्मा झालेल्या पोलिसांच्या कुटुंबियांना द्यावयाची रक्कम ही 12 कोटी 07 लाख इतकी आहे. पण त्यासाठी आता 1000 रुपयांची लाक्षणिक पूरक मागणी करण्यात आली आहे, याची लाज वाटत नाही काय ? हेलिकॉप्टर घेण्यासाठी तातडीने 12 कोटी रुपये दिले जातात आणि हुतात्मा झालेल्या पोलिसांच्या कुटुंबियांच्या घरासाठी नाममात्र 1000 रुपये देत आहात. तेव्हा याठिकाणी जे सन्माननीय सदस्य बसलेले आहेत, त्यांनी हा प्रश्न विचारला पाहिजे.

ॲड.उषाताई दराडे (खाली बसून) : याठिकाणी सन्माननीय सदस्यांच्या वाक्यातील "लाज" हा शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकला पाहिजे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा शब्द का काढला पाहिजे ? मी हा शब्द काढणार नाही.

ॲड.उषाताई दराडे (खाली बसून) : तुम्ही हे कसे ठरविणार ? माननीय सभापती काय ते ठरवतील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी मघाशी जे सांगितले त्याप्रमाणे हेलिकॉप्टर साठी 12 कोटी रुपये देतात आणि जे हुतात्मा झाले त्यांच्या कुटुंबियांच्या निवासस्थानासाठी नाममात्र 1 हजार रुपये देतात. ते त्यांना चालते.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये जो शब्द वापरला आहे, त्या शब्दाबद्दल हरकत आहे, सन्माननीय सदस्यांबद्दल नाही

**उप सभापती** : ठीक आहे. मी तो शब्द कामकाजातून काढून टाकतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मग मला बोलावयाचे नाही. मी हा शब्द काढणार नाही. मी कधीच राजकीय बोलत नाही.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी भाषण करीत असताना "लाज"हा शब्द वापरलेला आहे आणि तो शब्द मी कामकाजातून काढून टाकत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, का ? याबाबत लाज वाटली पाहिजे. मग मी बोलत नाही. हे असे कसे ? उद्या बजेट सादर होणार आहे अशा वेळी हेलिकॉप्टरसाठी तरतूद करता येऊ शकते की नाही आणि याठिकाणी हुतात्म्यांच्या कुटुंबियांच्या निवासस्थानासाठी एक हजार रुपये देतात.

श्री.सय्यद ज़मा (खाली बसून) : ती सिम्बॉलिक रक्कम आहे.

श्री.विनोद तावडे : मग हेलिकॉप्टरसाठी सिम्बॉलिक रक्कम म्हणून एक हजार रुपये द्यावेत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

श्री.सय्यद ज़मा (खाली बसून) : सन्माननीय सदस्यांनी भावना लक्षात घ्याव्यात.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, शासनाला लाज वाटली पाहिजे.

**उप सभापती** : मी मघाशीच सांगितले आहे की, सदरहू शब्द कामकाजातून काढून टाकलेला आहे.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडेजी जे बोलत आहेत, ते अतिशय गंभीर आणि सिरिअस आहे. याचा शासनाने विचार केला पाहिजे. परंतु या सभागृहाच्या काही परंपरा आहेत, संकेत आहेत. आपण विधान सभेमध्ये किंवा विधान परिषदेमध्ये बोलत असताना काही शब्द वापरावयाचे नसतात.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, "लाज" या शब्दामध्ये काय आहे ?

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना सांगू इच्छितो. त्यांनी पाहिजे तर असे म्हणावे की, "याबाबत सरकारला काही वाटत नाही काय ?" मग संपले. मला अशी विनंती करावयाची आहे की, जर हा शब्द असंसदीय असेल तर तो कामकाजातून काढून टाकावा.

**उप सभापती** : मी मघाशी सांगितले आहे की, हा शब्द कामकाजातून काढून टाकावा. आता



**उप सभापती** . . . .

सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी भाषण सुरु करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, याठिकाणी असे असताना जर आपण या पुरवणी मागण्या पारित केल्या तर मग आपण बाहेर याला तोंड देऊ शकतो काय ? हे आपण सर्वांनी सांगावे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले साहेब, आपण बाहेर लोकांना तोंड देऊ शकाल काय ? आम्ही हेलिकॉप्टरसाठी 12 कोटी रुपये दिले आणि हुतात्म्यांच्या कुटुंबियांच्या घरासाठी 1000 रुपये दिले. मग तुम्ही बाहेर जाऊन लोकांना काय तोंड देणार आहात, आपल्याच पक्षाचे सरकार आहे म्हणून तुम्ही काहीही समर्थन करणार आहात काय, आपण याबाबत विचारावयास नको काय, हे आपण येथे वाचून सांगावयास नको काय ?

ॲड.उषाताई दराडे (खाली बसून) : याबाबतीत आपण जो प्रश्न उपस्थित केला, त्याबद्दल काही हरकत नाही. फक्त त्या शब्दापुरती हरकत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, याठिकाणी तुम्ही ज्या पध्दतीने बोलत आहात, त्यातून भावना कळतात. तुमच्या सारख्या चळवळीतील कार्यकर्त्याने म्हणावयास पाहिजे की, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे जे बोलत आहेत ते खरे आहे. पण शेवटी पक्षाचे एवढे ओझे आहे आणि शेवटी मग दादा आहेतच आणि तुम्हाला पुढची टर्म मिळाली पाहिजे. सभापती महोदय, . . . .

श्री.सचिन अहिर (खाली बसून) : आपल्या भाषणाची वेळ संपत आली आहे. त्यामुळे काही मुद्दे सांगावयाचे राहून जातील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्हाला पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी संधी आहे. नियमांचे लाल पुस्तक काढून दाखवितो. सन्माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव हे लाल मातीतील असल्याने लाल पुस्तकाच्या बाबतीत एक्सपर्ट आहेत हे मला माहिती आहे. त्यामुळे या गोष्टीचा मी निषेधच करीत आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

SMT/ प्रथम सौ. रणदिवे..... 17:15

श्री. विनोद तावडे....

सभापती महोदय, गृह खात्याची बाब क्रमांक 16, पान क्रमांक 13 च्या संदर्भात मी बोलू इच्छितो.

सभापती महोदय, वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलिना, मुंबई येथे केमिकल्स आणि बाकी गोष्टीसाठी पैसे नाहीत. ही वैज्ञानिक प्रयोगशाळा कर्जामध्ये आहे. कुर्ल्यातील नेहरुनगरच्या रेप व मर्डर केसमधील सॅम्पल्स घेऊन ताबडतोब पाठवा असे सांगितले होते. पण ते पाठवू शकले नाहीत कारण कलिना वैज्ञानिक प्रयोगशाळेत जे केमिकल्स इम्पोर्ट करावे लागतात, त्यासाठी त्यांच्याकडे पैसेच नव्हते. तेव्हा यासंबंधीची माहिती घेऊन वस्तुस्थिती सांगण्यात यावी. सभापती महोदय, गेल्या अधिवेशनात कामनकर नावाच्या युवतीचे नाव काढण्यात येईल असे सांगण्यात आले होते. ती दर आठवडयाला सी.आय.डी. ऑफिसमध्ये खेपा घालीत आहे. तिला अधिकारी असे सांगतात की, सभागृहात सांगितले असेल, वर्तमानपत्रात मी वाचले आहे पण माझ्याकडे लेख आलेले नसल्यामुळे मी काही करु शकणार नाही. त्यामुळे ती युवती अद्याप खेपा घालीत आहे. तिला तिच्या नवऱ्याच्या मित्रांनी, गुंडानी धमकी दिलेली आहे. मंत्री महोदयांनी सभागृहात जे उत्तर दिलेले आहे, त्याला शासनाचे अधिकारी धूप घालत नाहीत. ज्यावेळी डी.सी.पी.च्या सांगण्यावरुन पवई पोलीस स्टेशनमध्ये खोटी केस टाकली आणि त्या केसच्या संदर्भातील अहवाल इकॉनॉमिक ऑफेन्स विंगकडे पाठविला, त्यावेळी त्यांनी असे कळविले की, या केसला जो सावकारीचा कायदा लावला आहे तो काढून टाकला पाहिजे. मी या केसच्या संदर्भात पवई पोलीस स्टेशनचे सीनियर श्री. जाधव यांच्याशी चार वेळा बोललो आहे.

सभापती महोदय, मी याठिकाणी स्पेसिफिक प्रकरण सांगत आहे. बिडवाई नावाचे एक सज्जन ग्रहस्थ होते, त्यांनी मित्राला पैसे दिले. तो तेथील डी.सी.पी.कडे गेला. दुसरा म्हेत्रे नावाचा ग्रहस्थ आहे. तो माजी राज्य मंत्री श्री. म्हेत्रे यांचा नातेवाईक आहे काय, हे मला माहीत नाही. तो खोटी केस टाकतो. खोटी केस टाकली आहे तरी देखील त्याच्या विरुध्द कारवाई केली जात नाही. मी या संदर्भात स्वत: चार वेळा बोललो आहे. अशा प्रकारे मनमानी चाललेली आहे. अशा प्रकारची मनमानी करण्याची हिंमत का होते? आता मुंबईमध्ये पुजारीचे प्रस्थ वाढले आहे. पुजारीचे प्रस्थ वाढायला आणि त्या आधी मुंबईचे नवीन आयुक्त येण्याचा योगायोग आहे की, काही

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

कनेक्शन आहे, माहीत नाही. सोशल विंगची सगळी खाती डायरेक्ट डी.सी.पी.कडून कमिशरकडे येणार आहेत. क्राईमच्या जॉइंट सी.पी.कडे जाण्याची गरज नाही. याचे कारण माहीत नाही. पण डायरेक्ट थ्रो चालू व्हावा, अशा काही गोष्टी आहेत काय, माहीत नाही पण याबाबतीत जी चर्चा आहे ती या ठिकाणी निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 38, 41 अणि 44, पान क्रमांक 36, महनगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायत यांना केंद्र शासनाकडून मिळालेला निधी याबाबतीत मी बोलू इच्छितो. केंद्र शासनाकडून मिळालेला निधी वितरित करावयाला उशीर झाला म्हणून राज्य सरकारला व्याज द्यावे लागले. 1 कोटी 62 लाख 55 हजार आणि 1 कोटी 94 लाख 2 हजार एवढा निधी आहे. हा निधी वितरित करण्यासाठी कोणामुळे विलंब झाला, त्या संबंधित अधिकाऱ्यावर वित्त मंत्री कारवाई करणार आहेत काय?

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

सभापती महोदय, यानंतर मी वित्त विभागाच्या पृष्ठ क्रमांक 42 वरील बाब क्रमांक 49 बाबत बोलणार आहे. पुरवणी मागण्यांची एकूण जी रक्कम आहे त्यातील अर्धी रक्कम या एकाच बाबीसाठी ठेवलेली आहे. निवृत्तिवेतन विषयक खर्चासाठी अपुरी तरतूद होती म्हणून यामध्ये 2436 कोटी 9 लाख रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. आधी हे लक्षात आले नाही काय, आधी एवढ्या मोठ्या प्रमाणावर अपुरी तरतूद होण्याचे कारण काय, त्यानंतर हे लोक सेवानिवृत्त होत आहेत आणि त्यामुळे पैसे दिले पाहिजेत असे आपल्याला स्वप्न पडले काय ? याबाबत माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. काही सन्माननीय सदस्य सहाव्या वेतन आयोगाबाबत बोलत आहेत. त्याबाबत मी नंतर सांगतो.

सभापती महोदय, यानंतर मला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 47 वरील बाब क्रमांक 52 बाबत बोलावयाचे आहे. या ठिकाणी माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ तसेच श्री. जयदत्त क्षीरसागर उपस्थित आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने खुल्या बाजारातून बंधपत्रामार्फत निधी उभारला असून याबाबत राज्य शासनाने हमी घेतली आहे. त्यानुसार हमी फी, व्याज तसेच त्यावरील दंडरुप व्याज यासाठी 314 कोटी 56 लाख रुपये इतक्या रकमेचे भांड भांडवली अंशदान उपलब्ध करुन देण्याचे ठरविण्यात आले आहे आणि त्यापैकी 167 कोटी 67 लाख रुपयांची पुरवणी मागणी या ठिकाणी करण्यात आलेली आहे. तोट्यातील महामंडळाच्या कर्जासाठी शासनाने हमी द्यावयाची आणि शासनाला द्यावयाच्या हमी फी साठी शासनानेच अनुदान द्यावयाचे. आपण हमी दिली. त्याबद्दल जी हमी फी भरावयाची आहे त्याबाबत ते म्हणतात की, हमी फी भरण्यासाठी सुध्दा आमच्याकडे पैसे नाहीत. त्यासाठी अनुदान देण्याबाबत तरतूद केलेली आहे. मुळातच हमी फी आणि व्याज याबाबत आपल्या अर्थसंकल्पामध्ये कोणतीही तरतूद नाही. या महामंडळांने आपल्याला गृहीतच धरले आहे. त्यांचा जो रिपोर्ट आलेला आहे त्यावरुन हेच सिध्द झालेले आहे.

सभापती महोदय, यानंतर मला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 56 वरील बाब क्रमांक 58 बाबत बोलावयाचे आहे. माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ या ठिकाणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विनोद तावडे ....

उपस्थित आहेत. हा आपल्या जिल्ह्यातील विषय आहे. श्री. मोडके कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यांच्यावर शासनाची काय मेहरनजर आहे, माहीत नाही. श्री. गडकरी साहेब असताना यांनी गांधारी नदीवरील पुलाच्या कामामध्ये भ्रष्टाचार केला, तो पूल कोसळला, त्यामध्ये माणसे मेली म्हणून त्यावेळी त्यांना निलंबित केले. सार्वजनिक बांधकाम विभाग जव्हार येथे ते कार्यरत असताना लोकलेखा समितीने त्यांच्या कामाची तपासणी करुन आक्षेप घेऊन त्यांना दुसऱ्यांदा निलंबित केले. त्यानंतर शासनाने त्यांचे निलंबन रद्द करुन सेवेत रुजू करताना त्यांना पुन्हा जव्हारलाच पाठविले. यामध्ये या मोडके नावाच्या अधिकाऱ्याची जबरदस्त कमाल आहे. या नंतरही या मोडके नावाच्या अधिकाऱ्यामध्ये कोणतीही सुधारणा झालेली नाही. आपले परममित्र, परमस्नेही पालकमंत्री श्री. गणेश नाईक यांचे हेलिकॉप्टर भरकटले होते. जव्हारच्या दौऱ्याच्या वेळी त्यांनी अक्षांश आणि रेखांश चुकीचे दिले होते आणि त्यातून ते थोडक्यात वाचले. नाही तर नंतर अंधार झाला असता आणि त्या हेलिकॉप्टरचे काय झाले असते, हे माहीत नाही. त्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करुन तो प्रस्ताव जवळजवळ एक महिन्यापासून माननीय मंत्री महोदयांकडे प्रलंबित आहे. यामध्ये अशी आयडिया केली की, श्री. मोडके हे मे महिन्यामध्ये निवृत्त होणार आहेत, तोपर्यंत चालढकल करावयाची. यामध्ये काळ सोकावतो. माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ साहेब यांना सांगू इच्छितो की, आपल्यासारखा जबरदस्त मंत्री असताना कोणाच्या सांगण्यावरुन जर त्यांनी अक्षांश आणि रेखांश चुकीचे दिले असतील म्हणून त्यांना वाचवावयाचे असेल तर वाचवा. त्याबाबत आमचे काही म्हणणे नाही.

सभापती महोदय, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बारामती येथे इमारतीच्या बांधकामासाठी 3 कोटी रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. परिवहन कार्यालयाचे बांधकाम एवढे घाईत करावयाचे पण जे हुतात्मे झाले त्यांचे पैसे एक एक वर्ष आपण थांबवून ठेवता. अनेक गोष्टी अशा आहेत की या पुरवणी मागण्या मान्य करताना या सरकारची लाजच वाटते. इतके असंवेदनशील सरकार उद्या अर्थसंकल्प सादर होणार असताना आज पुरवणी मागण्या मांडते. त्या मागण्या आम्ही मान्य करावयाच्या. भुजबळ साहेबांच्या मनाला ते पटत नाही, हे त्यांच्या चेहऱ्यावरुन मला दिसते. त्यामुळे या पुरवणी मागण्या पाठिंबा देण्यासारख्या नाहीत. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सरकार संवेदनशील नाही, सरकारला लाज वाटली पाहिजे असे मत मांडले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ....

हुतात्म्यांसाठी शासनाने पैसे ठेवले नाहीत असे सांगताना ते प्रक्षुब्ध झाले होते. परंतु त्यांचे म्हणणे कसे चुकीचे आहे ते मी सांगू इच्छितो. पान क्रमांक 12 वरील गृह विभागाच्या बाब क्रमांक 15 मध्ये "हुतात्मा झालेल्या पोलिसांच्या कुटुंबांकरिता निवास व्यवस्थेच्या जागेसाठी रक्कम प्रदान करण्याकरिता तरतूद करणे." यासाठी रुपये 1 हजाराची लाक्षणिक मागणी केलेली आहे. ही मागणी कशासाठी करण्यात आली आहे ते सभागृहाच्या व सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो. "शासनाने, नक्षलविरोधी कारवाईमध्ये आपले प्राण गमावलेल्या हुतात्मा पोलिसांच्या कुटुंबीयांकरिता, शासन निर्णय क्रमांक....दिनांक 6 फेब्रुवारी. 2009 अन्वये मोफत जागा देण्याचे किंवा जागेऐवजी रक्कम देण्याचे ठरविले आहे. ही बाब विचारात घेऊन, शासनाने हुतात्मा पोलिसांच्या 53 कुटुंबीयांना जागेऐवजी रुपये 12 कोटी 7 लाख 50 हजार इतकी रक्कम देण्याचे ठरविले आहे. 2010-2011 च्या सुधारित अंदाजानुसार या प्रस्तावातील रुपये 12 कोटी 7 लाख 50 हजार रुपये इतका संपूर्ण खर्च मंजूर अनुदानातून भागविता येणे शक्य आहे." आता शासनाकडे जे पैसे शिल्लक आहेत त्याच्यातून हा खर्च भागविणे शक्य आहे. परंतु हा प्रस्ताव विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देण्याकरिता रुपये 1 हजाराची लाक्षणिक पूरक मागणी सभागृहाला सादर केलेली आहे. शासनाने मंजूर केलेल्या निधीपैकी शिल्लक असलेल्या निधीतून हा खर्च देता येईल. परंतु ही बाब विधानमंडळाच्या निदर्शनास आणावी यासाठी ही मागणी केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे मघाशी रागाने बोलले. मी त्यांच्या जागी असतो तर मी सुध्दा रागावलो असतो. परंतु यामध्ये थोडसा फरक आहे. शासनाने जी बचत केलेली आहे त्या बचतीमधून या कुटुंबीयांना निधी देण्याचे ठरविलेले आहे. म्हणून ही मागणी आलेली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जे रिमार्कस् मारले आहेत ते मागे घेतले तर बरे होईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मागील वर्षी अशाच पध्दतीने मागणी करण्यात आली होती. ती रक्कम त्या विभागाला मिळाली नाही. हा विषय आम्ही लोकलेखा समितीच्या बैठकीत उपस्थित केला होता. त्यावेळी आम्हाला असे सांगण्यात आले की, ते शासनाचे केवळ मत होते. ती रक्कम आवंटित केली गेली नव्हती तर निदर्शनास आणण्यासाठी तरतूद केली होती. निदर्शनास

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

आणली म्हणजे प्रत्यक्षात दिली असा त्याचा अर्थ होत नाही. ऐनवेळी दुसरी महत्वाची बाब समोर आली तर रक्कम वळती केली जाते. अशाचप्रकारे सन्माननीय श्री.अजित दादा यांची दादागिरी चालली की दणादण पैसे वळविले जातात. हा अनुभव आहे. जर शासन हेलिकॉप्टरवर खर्च करीत असेल तर या लोकांसाठी का तरतूद केली जात नाही असे मी म्हटले होते. हेलिकॉप्टरची बाब विधानमंडळाच्या निदर्शनास का आणली जात नाही ? त्यामुळे माझे रिमार्कस् मागे घेण्याचा प्रश्नच येत नाही.

श्री.छगन भुजबळ : यापुढे आपल्याला असा अनुभव येणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, पूर्वीचे माननीय श्री.भुजबळ साहेब राहिलेले नाहीत हे मी पदोपदी अनुभवत आहे. पूर्वी माननीय श्री.भुजबळ साहेबांचा थाट होता तो आता राहिलेला नाही, सध्या दादा आबा.....

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आता आपले भाषण सुरु करावे.



अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-11 च्या पूरक विवरणपत्राच्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर प्रथम मी माझे विचार मांडू इच्छिते. हे अधिवेशन चालू असताना आपला कर्मचारी वर्ग दिवसरात्र काम करीत असतो. पृष्ठ क्र.47, बाब क्रमांक 51 वर मुंबई येथील ऐतिहासिक वारसा प्राप्त असलेल्या इमारतींना वैभव प्राप्त करुन देण्यासाठी तरतूद केलेली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात पुणे, अहमदनगर, कोल्हापूर व नागपूर या सर्व भागामध्ये अशा ऐतिहासिक स्वरुपाच्या इमारती आहेत त्यांच्यासाठी सुध्दा निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. शासन ऐतिहासिक वारसा जपत आहे. त्याचवेळी जीती जागती माणसे वांद्रे येथील शासकीय वसाहतीत राहतात. त्यासंबंधी या सदनाचे तत्कालीन सदस्य ॲड.अनिल परब यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले होते. खालच्या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.बाळा सावंत हे स्वत: कर्क रोगाने आजारी आहेत. त्यांनी सुध्दा हा प्रश्न उपस्थित केला होता. सा.बां.विभागामार्फत ऐतिहासिक इमारतींचा वारसा जतन करण्यासाठी खर्च केला जात आहे.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे.....

जी माणसे वर्षानुवर्षे शासकीय कामकाज करतात, शासकीय वसाहतीमध्ये आयुष्य काढतात त्यांच्या निवासस्थानाच्या प्रश्नासाठी शासनाला काहीही तरतूद करावीशी वाटली नाही याची खंत वाटते.

सभापती महोदय, निगरगट्ट पणाच्या परिसीमेचे मी आणखी एक उदाहरण देते की, बाब क्रमांक 13 नुसार आपण आस्थापनांवरील खर्चाची व्यवस्था केलेली आहे, ही फार चांगली गोष्ट आहे. जिल्हावार आस्थापनांना खर्चाची व्यवस्था असणे आवश्यक आहे. परंतु कारागृहांच्या व्यवस्थापनाच्या बाबतीत मी सांगेन की, काल दिनांक 21 मार्च 2011 रोजी सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी विचारलेल्या ता.प्र.क्रमांक 12834ला सरकारने असे उत्तर दिलेले आहे की, कारागृहातील 14754 गुन्हेगार भूमिगत आहेत. या गुन्हेगारांना फेर अटक कधी करणार ? आज एका मुंबई कारागृहातील 14754 गुन्हेगार पॅरोलवर सुटून भूमिगत झाले आहेत. ते कुठे आहेत हे कोणालाच माहीत नाही.

सभापती महोदय, पुणे पोलिसांनी गेल्या 4 वर्षापासून बुलेटप्रूफ जॅकेटची मागणी केली होती. त्यासाठी देखील कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. पुण्यामध्ये पोलीस महानिरीक्षकाचे एक खास पद निर्माण केलेले आहे. महिलांवर होणा-या अत्याचाराचा पाठपुरावा करण्यासाठी हे पद निर्माण केलेले आहे. हे पद मुंबईहून पुण्याला स्थलांतरित केलेले आहे. या महानिरीक्षकांसाठी जीपचा ड्रायव्हर आणि एक टायपिस्ट एवढीच व्यवस्था करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त त्यांच्यासाठी कोणतीही साधनसामग्री देण्यात आलेली नाही.

नियोजन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 104 वरील बाब क्रमांक 88 मध्ये श्रीक्षेत्र जेजुरीसाठी तरतूद केलेली आहे ही फार चांगली गोष्ट आहे. मी माननीय नियोजन मंत्र्यांचे एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छिते की, जेजुरी येथे रोपवे बांधण्याची आवश्यकता आहे जेणेकरुन येणा-या भाविकांची चांगली सोय होऊ शकेल. परशुराम कुंड विकासाच्या संदर्भात बोलताना आमच्या विरोधी पक्षाकडून शाप, उ:शाप असे शब्द ऐकले गेले असते तर ते मी समजू शकले असते. कारण सश्रद्ध लोक हा सगळा विचार करीत असतात. परंतु जेथे जेथे तीर्थक्षेत्र आहे त्या क्षेत्रांचा विकास करीत असताना माजी न्यायमूर्ती राजन कोचर यांनी जो आपत्ती व्यवस्थापन आराखडा दिलेला आहे त्याची अंमलबजावणी केली पाहिजे याकडे मला शासनाचे लक्ष वेधावेसे वाटते. बाब क्रमांक 20 आणि 22 अनुसार आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे. पुण्यावरुन जी माहिती

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

आलेली आहे त्यामध्ये प्रधान महालेखाकार, महाराष्ट्र राज्य यांनी ताशेरे ओढलेले आहेत. 2002 ते 2007 या 5 वर्षाच्या कालावधीत आपत्ती व्यवस्थापनाला 87लाख रु. देण्यात आले होते. मुदतवाढ देऊन देखील जो निधी खर्च होऊ शकला नाही त्याचा तपशील माझ्याकडे आहे. खरे म्हणजे आपत्ती व्यवस्थापनाचा निधी खर्चच झालेला नाही. त्यामुळे मला असा प्रश्न पडतो की, आधीचा निधी नीट खर्च झालेला नसताना पुन्हा पुरवणी मागण्याद्वारे निधीची तरतूद केली जात असेल तर आधीच्या पैशाचे काय होते या दृष्टीने व्यवस्थित निगराणी करण्याची आवश्यकता आहे.

ग्रामविकास विभागाच्या बाब क्रमांक 72वर 10 हजार सौरदिव्यांची व्यवस्था केलेली असल्याचे म्हटलेले आहे. पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या सौरदिव्या पैकी 3 ते 4 हजार सौरदिवे न वापरता तसेच गोडाऊनमध्ये पडलेले आहेत. म्हणून या सौरदिव्यांचा उजेड कधी पडणार आहे असा प्रश्न मला विचारावासा वाटतो. हे सौरदिवे वेगवेगळ्या देवस्थानांना दिले तर त्याठिकाणी भाविकांची चांगली सोय होऊ शकेल. लेण्याद्री या ठिकाणी रात्रीच्या वेळी काकडा पेटवून आरती केली जाते. त्याठिकाणी दिव्याची व्यवस्था नाही. तेव्हा शासनाला थोडीशी जरी खंत वाटली तरी त्या दिव्यांचा चांगला उपयोग होऊ शकेल असे मला वाटते.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागा तर्फे सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. या योजनेसाठी 2005 पासून 2009 पर्यन्त दिलेला निधी पूर्ण खर्च झालेला नाही. तरी ही बाब क्रमांक 81 आणि बाब क्रमांक 82मध्ये निधीची तरतूद केलेली आहे. पुन्हा बाब क्रमांक 85 आणि 86 नुसार सामाजिक न्याय विभागाने वसतिगृहासाठी निधीची तरतूद केलेली आहे. वसतिगृहांसाठी तरतूद करुन सुध्दा अळया असणारी आमटी, ज्यामधून बदाबदा पीठ पडते अशा चपात्या अशा प्रकारचे जेवण वसतिगृहातील मागासवर्गीय मुलांना दिले जाते. याबद्दल शासनाला थोडी तरी खंत वाटावी अशी माझी नम्र अपेक्षा आहे.

विधी व न्याय विभागाने उच्च न्यायालयातील न्यायाधीशांकरिता निवृत्ती वेतनासाठी आणि बाब क्रमांक 67 नुसार विजेची बिले देण्यासाठी तरतूद केलेली आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधित प्रत / शुद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

सभापती महोदय, मुंबई उच्च न्यायालयाचे रजिस्ट्रार जनरल यांनी मुख्य न्यायमूर्तींना जो अहवाल दिला, त्यामध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्रातील सर्व न्यायालयांमध्ये ज्या सोयी सुविधा लागणार आहेत त्या पुरविण्यासाठी आणखी 15 वर्षे लागतील. विशेष म्हणजे न्यायमूर्तींनी सांगितले की, त्या अहवालाचे याचिकेमध्ये रुपांतर करावे. त्या याचिकेच्या माध्यमातून ते सरकारकडे निधी मागणार आहेत. या व्यवस्था प्रलंबित असताना नवीन न्यायालये स्थापन करावयाची असतील तर अपेक्षा अशी आहे की, विदर्भ आणि मराठवाड्यासाठी ज्याप्रमाणे खंडपीठ आहे तशा पध्दतीने पश्चिम महाराष्ट्रासाठी खंडपीठ स्थापन करण्यात यावे आणि ते पूर्ण खंडपीठ असावे अशी विनंती करते.

सभापती महोदय, ग्रामविकास विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून महिला बचत गट भवन उभारली जातील अशी अपेक्षा होती. परंतु दुर्दैवाने राज्यात कुठेही महिला बचत गट भवन उभारलेले नाही, याबाबत नाराजी व्यक्त करावीशी वाटते. आपण आम्हाला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मनापासून आभार मानते आणि वेळेबद्दल असाच उदार दृष्टीकोन ठेवाल अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपविते.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, नगरविकास विभाग बाब क्रमांक 40, पृष्ठ क्रमांक 36. पुणे शहराची वाढती लोकसंख्या आणि शहराचे मोठया प्रमाणात झालेले नागरीकरण, शहराचे चारही बाजूने झालेले विस्तारीकरण, लक्षात घेता नागरी सोयी सुविधांची आवश्यकता वाढली आहे. शहरे वाढत असताना लोकसंख्येच्या प्रमाणात अग्निशमन दल कक्ष आणि अत्याधुनिक रेस्क्यू व्हॅन, हायड्रॅलिक प्लॅटफॉर्म, वॉटर हायड्रॅलिक सिस्टीम इत्यादी सामुग्रीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रलंबित आहे. शहराच्या वाढत्या नागरीकरणामध्ये या सर्व गोष्टी असणे महत्वाचे आहे. याबाबत नगरविकास विभागाने विचार करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, गृह विभाग बाब क्रमांक 14, पृष्ठ क्रमांक 13. पुण्यामध्ये जर्मन बेकरी येथे बॉम्बस्फोट झाला. त्यावेळी पुणे शहरामध्ये पोलिसांसाठी ज्या गोष्टी आवश्यक होत्या त्यामध्ये बुलेटप्रूफ जॅकेट, बुलेटप्रूफ वाहने, हेल्मेट आणि इतर सुविधा पुरविण्यासाठी 3 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. तो प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे. त्याबाबत शासनाने विचार करावा. होमगार्डचा जो दर्जा आहे तो वाढविण्याची आवश्यकता आहे. आज पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी होमगार्डचे सहकार्य मिळते. परंतु त्यांना अपुरा भत्ता दिला जातो. त्यांना दर महिन्याच्या 5 तारखेपूर्वी भत्ता मिळण्याऐवजी दोन-दोन, तीन-तीन महिने भत्ता मिळत नाही. त्यांना गणवेश, बूट, पट्टा, काठी या सुविधा वेळेवर व चांगल्या दर्जाच्या उपलब्ध करुन देण्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 68, पृष्ठ क्रमांक 73. रस्ते सुरक्षा सप्ताह नेहमी साजरा केला जातो. आज अनेक महामार्गावर, एक्स्प्रेस हायवेवर मोठया प्रमाणात अपघात होत आहेत. त्याठिकाणी आवश्यक त्या सोयी करणे आवश्यक आहे. चारचाकी वाहनांची, अवजड वाहनांची तपासणी करणे आवश्यक आहे. अनेक वाहनांना टेल लँप नसल्यामुळे अपघात होतात. रात्रीच्या वेळी वाहन नादुरुस्त झाले असेल तर रस्त्याच्या कडेला उभे केले जाते आणि अशा वाहनाला टेल लँप नसल्यामुळे मागून येणारी वाहने अशा उभ्या असलेल्या वाहनांवर आदळून अपघात होत असतात. त्यामुळे टोल नाक्याच्या ठिकाणी आवश्यक ती सुविधा निर्माण करण्याचा गृह विभागाने विचार करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

नंतर 3आय.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-11 च्या पूरक मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, बाब क्र.8, पृ.क्र.10-रस्ते सुरक्षासंबधीची ही मागणी आहे. त्या अनुषंगाने मला असे निदर्शनास आणावयाचे आहे की, महामार्ग क्र. 17 वरुन मोठमोठे मालवाहू व रेती वाहणारे ट्रक जातात, त्यातील काही वाहनांना तर टेल लाईट नसल्याने तसेच रहदारीच्या नियमांचे पालन होत नसल्याने अनेक वेळा तर कधी कधी दररोज अपघात होतात, इतकी त्या रस्त्याची वाईट परिस्थिती आहे. हा रस्ता चौपदरी होणार असे मी ऐकले होते पण गेल्या दहा वर्षांपासून त्याकडे लक्ष दिले जात नाही. या रस्त्यावर फक्त दोन्ही बाजूला किमान पाच पाच फूट रुंदी वाढवावी, त्यामुळे अपघात तरी कमी होतील व त्यासाठी जास्त निधी सुध्दा लागणार नाही. याकडे मंत्री महोदयांनी लक्ष दिले पाहिजे. मंत्री महोदयांना मी वारंवार सांगत असतो की, रात्रीचा या रस्त्यावरुन प्रवास करु नये, पण कामानिमित्ताने त्यांना जावेच लागते, तेव्हा त्यांनीच या रस्त्याकडे लक्ष द्यावे व त्याची दुरुस्ती करण्यासाठी मंत्री महोदयांनी तरतूद करावी, अशी मी विनंती करतो.

महोदय, बाब क्र. 11, पृ.क्र.11, गृह विभागाच्या संदर्भात बोलत असताना श्री. बोरुडेसंबंधीचा प्रश्न मी उपस्थित केला होता. तसेच याच प्रकरणातील अन्य चार आरोपींचा अद्यापही पत्ता लागला नाही. यामध्ये बोरुडे यांनी खरोखरच आत्महत्या केली की त्याला कोणी मारले याचाही तपास लागला नाही. ही वस्तुस्थिती सभागृहासमोर आली पाहिजे, अशी मी विनंती करतो. तसेच आयपीएस अधिकारी श्री. पांडे याला शासनाने तीन महिन्यापासून केवळ बसवून ठेवलेले आहे, बसूनच त्याला पगार दिला जातो. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना ड्युटी देत नाहीत तर त्याचा राजीनामा सुध्दा घेतला जात नाही. मला माहीत नाही की, त्या अधिकाऱ्यासंबंधी कोणाचा एवढा राग आहे. याबाबत माननीय राज्य मंत्री महोदयांनी लक्ष घालावे.

यानंतर बाब क्र.42 व 43, पृ.क्र.37-अग्निशमन सेवांच्या बळकटीकरणासाठी जी मागणी करण्यात आली ती गेल्या बऱ्याच वर्षांपासूनची आहे. माझ्याकडे यासंबंधीची कागदपत्रे आहेत, ती मी आपल्यामार्फत शासनाकडे पाठवितो. यासंबधी शासन नेहमीच दुर्लक्ष करीत आहे की काय हे माहीत नाही पण लवकरात लवकर यासंसबंधीचा निर्णय घ्यावा, अशी माझी सूचना आहे.

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई .....

बाब क्र. 53, पृ.क्र.48, पनवेल तहसील कार्यालयाची स्थिती अत्यंत वाईट आहे, त्यात सुधारणा होणे आवश्यक आहे. तसेच शिधावाटप कार्यालय, वांद्रे (पूर्व) याबाबत मी प्रश्न उपस्थित केला होता, त्यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही. आज या कार्यालयाची अशी अवस्था आहे की, ते कधीही कोसळून कर्मचाऱ्यांना इजा होण्याचा संभव आहे, अशा अवस्थेत हे कर्मचारी काम करीत आहेत. तसेच ते दृश्यही भयंकर दिसते. मला सुध्दा त्या कार्यालयात जाण्याची भीती वाटते, यासाठी ताबडतोब उपाययोजना करण्याची गरज आहे.

महोदय, ठाणे जिल्ह्यातील 32 ग्रामपंचायती पत्र्याच्या शेडमध्ये कार्यरत आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील 29 ग्रामपंचायतींना इमारतीच नाहीत, त्याचाही विचार होणे आवश्यक आहे.

बाब क्र. 53, पृ.क्र.48-सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनुषंगाने मला ही बाब लक्षात आणून द्यावयाची आहे की, दापोली येथील याकूब सरदार दर्गा जवळील अरुंद रस्ता दुरुस्त करावा. छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरु म्हणून हे याकूब सरदार ओळखले जात होते. तसेच त्यांच्या सल्ल्यानुसार शिवाजी महाराज काम करीत होते, असे म्हणतात. या दर्ग्याला जाण्यासाठी अरुंद रस्ता आहे, तो रुंद करण्यासाठी विशेष तरतूद करावी.

तसेच बाब क्र. 51, पृ.क्र.47-दाभोळ मशीद हेरिटेज करण्यासंबंधीची बाब शासनाच्या निदर्शनास आणून देताना मला अशी विनंती करावयाची आहे की, ही मशीद एका रात्रीतच बांधली आहे. तसेच कोंबडीच्या अंड्याचे जेवढे पैसे येतील तेवढ्याच पैशात ती बांधण्यात आली, अशी आख्यायिका या मशिदीची आहे. तसेच कर्नाटक राज्यापासून लोक येथे दर्शनासाठी येतात व येथूनच ते पुढे हज यात्रेला जात असतात.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई...

एकेकाळी हजला जाण्यापूर्वी कर्नाटकापासूनचे सर्व लोक या मशिदीमध्ये नमाज पढत असत व त्यानंतर बोटीने हजला जात असत. या मशिदीची अवस्था चांगली आहे परंतु या मशिदीमध्ये आज गुरे-ढोरे राहतात. त्यामुळे ही मशीद हेरिटेज समजून तिचे संरक्षण करण्यात यावे अशी मी शासनास विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 23, पृष्ठ क्रमांक 19 च्या संदर्भात विचार व्यक्त करणार आहे. दाभोळ येथील मशीद उध्वस्त करुन त्या ठिकाणी पोलीस स्टेशन बांधण्याची तयारी पोलीस विभाग करीत आहे. त्यामुळे यासंदर्भात येथील मुस्लीम जनतेच्या भावना अतिशय तीव्र झालेल्या आहेत. हा प्रश्न मी सभागृहात वारंवार उपस्थित केलेला आहे त्यामुळे मशिदीच्या जागेवर पोलीस स्टेशन बांधण्यात येऊ नये अशी माझी कळकळीची विनंती आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील एकंदर 45 हजार हेक्टर जमीन फॉरेस्ट डिपार्टमेंटकडे गेलेली आहे. त्या ठिकाणी आलेल्या एका कलेक्टरने सिंधुदुर्ग जिल्हयाची 45 हजार हेक्टर जमीन फॉरेस्ट डिपार्टमेंटला दिली. यासंदर्भात तेथे मोठया प्रमाणात चर्चा आहे. या ठिकाणची जमीन फॉरेस्टची झाल्यामुळे त्या ठिकाणी कोणतेही काम करता येत नाही. महाराष्ट्रातील एकूण 62 हजार हेक्टर जमीन फॉरेस्टची आहे परंतु त्यातील 45 हजार हेक्टर जमीन ही एकटया सिंधुदुर्ग मधील आहे त्यामुळे यासंदर्भात निर्णय होण्याची आवश्यकता आहे. ब-याच लोकांनी यासंदर्भात आवाज उठवलेला आहे परंतु यासंदर्भात काही एक निर्णय झालेला नाही. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 109, बाब क्रमांक 95, गृह निर्माण विभागाच्या संदर्भात मी विचार व्यक्त करणार आहे. विशेष घटक योजनेअंतर्गत झोपडपट्टयांमध्ये राहणा-या अनुसूचित जातीच्या लोकांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. विशेष घटक योजनेअंतर्गत झोपडपट्टयांमध्ये राहणा-या अनुसूचित जातीच्या लोकांना सार्वजनिक शौचालये, गटारे, मल:निस्सारण वाहिनी, मार्ग, सामाजिक कल्याण केंद्र इत्यादी सारख्या नागरी सुविधा पुरविण्यासाठी 36 कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकने गेल्या अनेक वर्षापासून राहणा-या झोपडपट्टीतील लोकांसाठी 36 हजार शौचकूप बांधण्यासाठी 15 कोटी रुपयांची प्रोव्हीजन केली होती. आता पुन्हा जवळपास 30-32 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने सुध्दा यासंदर्भात 36 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मुंबईतील 65 लाख जनता ही झोपडपट्टयांमध्ये राहते. मुंबईमध्ये तुम्ही रेल्वेने किंवा रोडने आलात तर सकाळी लोक सर्रासपणे रस्त्यावर टॉयलेटला बसलेले दिसतात. या संदर्भात महाराष्ट्र शासनाने दखल घेण्याची आवश्यकता आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे परंतु यासंदर्भात मुंबई महानगरपालिकेकडे पाहिजे तेवढा स्टाफ नाही, ओएसडी व इंजिनियर्स देखील नाहीत. कर्मचा-यांना शिक्षा म्हणून या डिपार्टमेंटमध्ये पाठवले जात असते त्यामुळे या ठिकाणचा स्टाफ काहीही काम करीत नाही. मुंबईमध्ये एमएमआरडीए जवळपास 350 सुलभ शौचालये बांधून देणार होते परंतु महानगरपालिका आणि एमएमआरडीएचा नेहमीचा जो वाद असतो त्या वादामुळे मुंबईतील झोपडपट्टीतील जनतेला टॉयलेट मिळालेले नाहीत. आमदार निधीतून म्हाडाच्या मार्फत टॉयलेट बांधले जातात परंतु यासंदर्भात कारणे सांगितली जातात की, अनेक झोपडपट्टया एसआरए योजनेत जाणार असल्यामुळे या ठिकाणी टॉयलेट देण्याची गरज नाही व हा प्रश्न कायमस्वरुपी प्रलंबित ठेवला जातो. आपण महाराष्ट्र हगणदारीमुक्त करणार आहोत असे म्हणतो परंतु मुंबई आपण केव्हापर्यंत हगणदारीमुक्त करणार आहोत हा फार महत्वाचा प्रश्न आहे. मुंबई महानगरपालिका सिव्हरेज टॅक्स पाणी पट्टीच्या रुपात आकारते. परंतु मुंबईमध्ये कोणत्याही प्रकारची सिव्हरेजची व्यवस्था नाही परंतु असे असतांनाही मुंबईतील जनतेकडून पैसे घेतले जात आहेत. झोपडपट्टीतील लोकांना टॉयलेटची गरज असताना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ...

सुध्दा त्यांना टॉयलेट उपलब्ध करुन दिले जात नाही. झोपडपट्टीत टॉयलेटची फार मोठी समस्या असल्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले असून यापासून मलेरिया, चिकनगुणिया अशा अनेक प्रकारचे साथीचे रोग घाणीच्या साम्राज्यामुळे पसरत आहेत.

मुंबईमध्ये अतिशय गरीब आणि अतिशय श्रीमंत अशा दोन्ही प्रकारचे लोक राहत आहेत. मुंबईमध्ये घरांचे भाव फार मोठया प्रमाणात वाढलेले आहेत व असे असतांनाही मुंबईचा विकास मोठया प्रमाणात होत आहे. त्यामुळे मुंबईच्या विकास कामामध्ये झोपडपट्टीतील शौचालयाच्या कामाला प्राधान्य द्यावे असे मला वाटते.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

36 कोटी रुपयांची तरतूद शौचालय बांधण्याकरता करण्यात आली आहे, ही रक्कम अतिशय कमी असल्यामुळे प्रत्येक झोपडपट्टीमध्ये किमान टॉयलेट , युरिनल व गटारांची सोय करण्यात आली पाहिजे. तसेच ती स्वच्छ ठेवण्यात आली पाहिजे. या कामासाठी जेवढी रक्कम लागेल तेवढी देण्यात यावी. महाराष्ट्राचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांना आपण मूलभूत सुविधा देऊ शकत नाही. झोपडपट्टीवासीयांना या सुविधा उपलब्ध करुन देणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे, त्यासाठी लागणारी सर्व रक्कम देण्यात यावी, असे मी सुचवते आणि माझे भाषण संपविते.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. या मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्याकरिता आपण मला संधी दिल्याबद्दल मी प्रथम आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 26, पान नंबर 24 सबंधी मला प्रथम बोलावयाचे आहे. पीक विमा निधी दाव्यापोटी देण्यात येणा-या नुकसानभरपाई बाबतच्या अंशदानासाठी 94 कोटी 96 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. 1999-2000 साला पासून राष्ट्रीय पीक विमा योजना संपूर्ण देशात सुरु करण्यात आली होती. 2009साली अन्याय करणारा एक शासन निर्णय काढण्यात आला होता. यात असे नमूद केले होते की, ज्यांनी पीक विमा योजनेचा लाभ घेतला आहे व ज्यांना महाराष्ट्र शासनाने कर्ज माफी दिली,त्यांना या योजनेचा फायदा मिळणार नाही. संपूर्ण महाराष्ट्रासाठी हा निर्णय असतांना तो फक्त बीड जिल्ह्यामध्ये अंमलबजावणी करण्यात आली होती. काही दिवस लातूर जिल्हयाचे पैसे अडविण्यात आले होते. त्यावेळी राज्य सरकारने कर्ज माफी जाहीर केली होती. ज्याला पीक विमा योजनेचा फायदा मिळाला आहे, त्याला राज्याच्या कर्ज माफी योजनेचा फायदा मिळणार नाही अशा प्रकारचा शासन निर्णय काढण्यात आला असून त्या जीआरचा क्रमांक देखील मी वाचून दाखवू शकतो. सभापती महोदय,बीड जिल्हयातील 16 हजार 456 शेतकरी या योजनेपासून वंचित राहिले आहेत. या शेतक-यांना पीक विमा योजनेचा लाभ मिळाला आहे. वास्तविक पीक विमा योजना आणि कर्ज माफीची योजना या दोन्हीही वेगवेगळया योजना आहेत. केन्द्र सरकारची योजना वेगळी आहे आणि राज्य सरकारची योजना वेगळी आहे. परंतु आमच्या जिल्हयातील 16 हजार 456 शेतक-यांना मात्र पीक विमा योजनेचा फायदा घेतला असल्यामुळे त्यांना कर्ज माफी योजनेचा लाभ मिळू शकत नाही. या शेतकऱ्यांना देखील फायदा मिळणे आवश्यक आहे. म्हणून मी शासनाकडे मागणी करतो की, या 16 हजार 456 शेतक-यांना देखील कर्ज माफी योजनेचा फायदा देण्यात यावा. याच पीक विमा योजनेच्या संदर्भात आणेवारी ठरविण्याचे जे काही निकष आहेत, त्यात बदल करणे आवश्यक आहे, असे मला सांगावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल मंडळामध्ये आणेवारी काढत असतांना मी सांगू इच्छितो की, दोन्ही शेत एकच असते आणि मध्ये फक्त बांध असतो. एका महसूल मंडळाची आणेवारी एक येते

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे..

आणि दुस-या महसूल मंडळाची आणेवारी वेगळी येते. दोन्ही महसूल मंडळाची वेगवेगळी आणेवारी आली असल्यामुळे एकाच शेतक-याची दोन शेते असल्यामुळे एका शेतीसाठी पीक विम्याचा फायदा मिळतो आणि दुस-या शेतासाठी पीक विमा योजनेचा फायदा मिळत नाही. अशी परिस्थिती आणेवारी संबंधीची आहे. आणेवारीचा विषय हा राज्य सरकारशी संबंधित आहे. पीक विमा योजनेसंबंधी ज्यावेळी आणेवारी काढण्यात येते, त्यावेळी शेतक-यांना पीक विमा योजनेचा फायदा व्हावा याकरिता सहानुभूतीपूर्वक आणेवारी काढण्यासंबंधीचा निर्णय घेण्यात यावा, असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, ग्राम विकास विभागाची बाब क्रमांक 77,पान नंबर 88 सबंधी मला बोलावयाचे आहे. जिल्हा परिषदांना मुद्रांक शुल्क अनुदानाच्या थकबाकीची रक्कम प्रदान करण्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, राज्यामध्ये जिल्हा परिषदा शिल्लक आहेत किंवा नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.वित्त आयोगाचे पैसे केन्द्र सरकारकडून देण्यात येतात. वित्त आयोगाच्या पैशाचे वाटप करीत असतांना जिल्हा परिषदांना 10 टक्के पैसे दिले जातात. बाकीची सर्व रक्कम ग्रामपंचायती आणि पंचायत समित्यांना दिली जाते. जिल्हा परिषदेच्या हातात मुद्रांक शुल्क अनुदानाचा एकच विषय राहिलेला आहे व त्यासाठी 106 कोटी 85 लाख रुपयांची तरतूद या पूरक मागणीमध्ये करण्यात आली आहे. याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, जिल्हा परिषदांना तीन-तीन वर्षे मुद्रांक शुल्काचे अनुदान दिले जात नाही. अशा प्रकारे जर तीन - तीन वर्षे मुद्रांक शुल्काचे अनुदान जिल्हा परिषदांना मिळत नसेल व वित्त आयोगाचे पैसे जर मिळत नसतील तर जिल्हा परिषदांचा कारभार कसा चालेल ?

नंतर श्री.सरफरे .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

आज आमच्या बीड जिल्हा परिषदेचे वार्षिक अंदाजपत्रक 70 ते 80 लाखाचे सुध्दा नाही तर मग 60 सभासद संख्या असलेल्या जिल्हा परिषदेने आपला कारभार कसा करावयाचा? याकरिता प्रत्येक जिल्हा परिषदेला मुद्रांक शुल्काची रक्कम दरवर्षी वेळेवर देण्यात आली तर जिल्हा परिषदेला त्यामुळे नक्कीच आधार मिळेल.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्र. 84 आणि पृष्ठ क्र. 99 मध्ये महाराष्ट्रामध्ये अपंगासाठी मान्यताप्राप्त असलेल्या 9 विना अनुदानित अशासकीय शाळांना परवानगी देण्यात आली आहे. परंतु गेल्या 12 वर्षापासून त्या शाळा मान्यतेसाठी प्रयत्न करीत आहेत. याकरिता त्या शाळांचे कर्मचारी 1 तारखेपासून आझाद मैदानामध्ये उपोषणाला बसले असून त्यांच्यापैकी 5 जणांची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे त्यांना जी.टी. रुग्णालयामध्ये हलविण्यात आले आहे. शासनाने त्यांची मागणी मान्य करुन त्यांना न्याय द्यावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, या राज्यावर शंभू महादेवाची फार कृपा दिसते. संपूर्ण देशामधील 12 ज्योर्तिलिंगापैकी 5 ज्योर्तिलिंग या महाराष्ट्रामध्ये आहेत, त्यापैकी एक ज्योर्तिलिंग परळी वैजनाथ येथे आहे. माझा जन्म या तालुक्यामध्ये झाला आहे. अनेक वर्षापासून या तीर्थस्थानाला पर्यटन स्थळाची मान्यता असतांना गेल्या दहा-पंधरा वर्षापासून त्यांना कोणत्याही प्रकारे तीर्थ क्षेत्र विकास निधी देण्यात आलेला नाही. पर्यटन विभागाच्या मागण्यांचा मागोवा घेतला तर एकूण 85 कोटींपैकी केवळ एका जिल्ह्याला पर्यटन विकासासाठी 51 कोटी रुपये देण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने परळी वैजनाथ या तीर्थस्थळाच्या विकासासाठी 5 कोटींचा निधी देण्यात यावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांपासून मी चर्चेला सुरुवात करु इच्छितो. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 53 व बाब क्रमांक 56 मध्ये गोंदिया जिल्ह्यातील बाई गंगाबाई महिला रुग्णालयाच्या बांधकामाकरिता 43 कोटी 48 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या रुग्णालयाच्या बांधकामाचा अंदाजित खर्च 4 कोटी 92 लाख 94 हजार इतका असून सध्याचे वाढलेले सीएसआरचे दर लक्षात घेता येत्या अर्थसंकल्पामध्ये तेवढी तरतूद केली तर या महिला रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण होईल व महिलांना देखील न्याय मिळेल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 58 व पृष्ठ क्रमांक 56 मध्ये राज्यातील विविध ग्रामीण रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या बांधकामासाठी तरतूद करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने या ठिकाणी राज्यामधील ज्या जिल्ह्यांमध्ये ग्रामीण रुग्णालये आणि कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या इमारतीचे बांधकाम करावयाचे आहे त्याची यादी देण्यात आली आहे त्यामध्ये गोंदिया जिल्हयातील एकाही ग्रामीण रुग्णालयाचा समावेश करण्यात आलेला नाही. सभापती महोदय, गोंदिया आणि वाशिम या दोन जिल्हयांना दोन मोठी रुग्णालये देण्यात आल्यामुळे मी संभ्रमित झालो आहे. गोंदिया जिल्ह्यामध्ये 200 खाटा असलेले केटीएस रुग्णालय मंजूर करण्यात आले आहे. त्या रुग्णालयाच्या बांधकामाकरिता 147 कोटी 20 लाख 10 हजार इतका खर्च येणार असतांना या ठिकाणी फक्त 10 हजाराची तरतूद करण्यात आली आहे. याबाबत मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, या एका रुग्णालयाच्या बांधकामासाठी एवढा खर्च लागण्याचे कारण काय याचे उत्तर माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी द्यावे अशी मी विनंती करतो. जर आपल्याला खरोखर या गोंदिया जिल्ह्याला न्याय द्यावयाचा असेल तर येत्या अर्थसंकल्पामध्ये संपूर्ण निधी देण्यात यावा. या राज्यामध्ये गोंदिया आणि वाशिम हे दोन नवीन जिल्हे झाले आहेत. वाशिम जिल्ह्याकरिता 100 खाटांच्या रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी 205 कोटी 20 लाख 8 हजार रुपये इतका खर्च अपेक्षित धरतांना या ठिकाणी फक्त 20 हजाराची अत्यल्प तरतूद केली आहे. याठिकाणी एवढया मोठया प्रमाणावर निधी देतांना आपण त्याचे नियोजन कसे केले हे एकदा सांगितले पाहिजे. या दोन्ही रुग्णालयांच्या बांधकामाकरिता भरीव आर्थिक तरतूद करुन आपण या रुग्णालयांना न्याय द्यावा अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. केशवराव मानकर....

सभापती महोदय, मागील वर्षी राज्यामध्ये भरपूर पाऊस पडल्यामुळे खराब झालेले रस्ते दुरुस्त करण्याकरिता गृह विभागाने रस्ते विकास कार्यक्रम हाती घेतला. परंतु विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक रस्ते खराब झाले, त्यांची दुरवस्था झाली.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असे असतानाही अजूनपर्यंत त्यांची दुरुस्ती केलेली नाही. म्हणून यासंबंधात मोठया प्रमाणात कार्यक्रम हाती घेण्यात यावा अशी मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्र.15 बाबत सांगावयाचे तर शासनाने नक्षलवादी एरियामध्ये जे पोलीस हुतात्मा झालेले आहे, त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोफत जागा किंवा त्याऐवजी रक्कम देण्याचे ठरविलेले आहे. त्याकरता 12 कोटी 7 लाख 50 हजार एवढा निधी देण्यात येणार आहे. पण तो निधी अपूरा आहे. परंतु शासनाने याबाबतीत 1000 रुपयांची पूरक मागणी केलेली आहे हे बरोबर नाही. हुतात्मा झालेल्या पोलिसांच्या 53 कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी 31 मार्च पूर्वी निधी देण्यात यावा अशी विनंती मी यानिमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्र.22 बाबत सांगावयाचे तर अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने जे वित्तीय सहाय्य दिलेले आहे, ते स्वागतार्ह आहे आणि ते शेतकऱ्यांना तातडीने मिळावयास पहिजे.तसेच गोंदिया, भंडारा, गडचिरोली आणि चंद्रपूर मधील शेतकऱ्यांचे अवकाळी पावसामुळे धान्याच्या पिकाचे नुकसान झालेले आहे.कापणी झाल्यानंतर पाऊस आल्यामुळे पिकाचे नुकसान झाले, ते पीक सडले. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांना न्याय द्यावा आणि या अनुषंगाने माननीय सभापतींनी केलेली सूचनाही मान्य करण्यात यावी अशी मी विनंती करतो.याठिकाणी बोलण्यासाठी बरेच मुद्दे आहेत.पण भरपूर वेळ झालेला असल्यामुळे मी एक-दोन मुद्दे सांगून भाषण संपविणार आहे.

सभापती महोदय, बाब क्र.30 बाबत सांगावयाचे तर गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यांसाठी अनुक्रमे सहा, चार आणि तीन असे श्रेणी-एक चे नवीन पशुवैद्यकीय दवाखाने स्थापन करण्यासाठी 13 नवीन पदे निर्माण केलेली आहेत, त्याचे मी स्वागत करतो आणि शासनाला विनंती करतो की, त्या ठिकाणी तात्काळ अधिकाऱ्यांची नेमणूक करुन या जिल्ह्यांना न्याय देण्यात यावा. जेणेकरुन शेतकऱ्यांकडील जे पशुधन आहे,ते व्यवस्थित ठेवण्यासाठी आणि त्यांना संसर्गजन्य रोगापासून वाचविण्यासाठी अधिकाऱ्यांची मदत होईल.

सभापती महोदय, बाब क्र.133, पान क्र.158 पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या बाबत सांगावयाचे तर ग्रामीण विभागामध्ये पाणी पुरवठा करण्यासाठी 1000 रुपयांची मागणी करण्यात आली आहे. तसेच 17.12 कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात असला तरी तो अपूरा आहे. मला असे सांगावयाचे आहे की, ग्रामीण भागामध्ये ज्या फिल्टरच्या योजना बंद आहेत,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . ..

विशेषत:आमगाव येथील लोक आज घाणेरडे पाणी पीत आहेत. तेथील ग्राम पंचायती आर्थिकदृष्टया कमकुवत आहेत, त्यामुळे ते या योजना चालवू शकत नाहीत. त्यामुळे त्यांनाही निधी देण्यात यावा. तसेच वनगाव आणि 48 गावांची योजना, लटोरीच्या सालेकसा आदिवासी क्षेत्रातील जी योजना आहे, त्यासाठी निधीबाबत अडचणी येत आहे त्यामुळे या योजनांकरता विशेष निधी देण्यात यावा. तसेच संपूर्ण महाराष्ट्रातील पाण्याच्या बाबतीत फिल्टर योजना सुरळीत सुरु होतील यादृष्टीने प्रयत्न करावा अशी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्र.114 पान क्र.139 बाबत सांगावयाचे तर सहकारी पत संस्थेच्या संदर्भात राज्य सहकारी बँकांना 270 कोटीचे अनुदान सरकारने दिलेले आहे.मला असे सांगावयाचे आहे की, या बँका आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत. माझी अशी सूचना आहे की, ग्रामीण भागामध्ये या बँका तालुका स्तरावर असल्या पाहिजेत. जेणेकरुन शेतकऱ्यांना सुलभरित्या त्याचा लाभ मिळू शकेल.आमगाव येथील सहकारी बँक बंद करुन ती गोंदियाला जोडण्यात आली आहे.त्यामुळे आमगाव, सालेकसा आणि देवरीच्या भागातील शेतकऱ्यांना अडचणी निर्माण झालेल्या आहेत. म्हणून राज्य सहकारी बँका तालुक्याच्या ठिकाणी असाव्यात अशी मी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र.4, 5 व 6 मध्ये हेलिकॉप्टर खरेदीबाबत तरतूद केली आहे.गृह विभागाने नक्षलवादी एरियासाठी आश्वासन दिलेले होते की, आम्ही तेथे हेलिकॉप्टर देऊ.पण अजूनपर्यंत मिळाले नाही. यापूर्वी एकच हेलिकॉप्टर मिळाले असून दुसरे देखील तातडीने द्यावे अशी आग्रहाची विनंती करतो.

श्री.रणजित कांबळे (खाली बसून) : यापूर्वी एक हेलिकॉप्टर दिले असून आता नवीनसाठी तरतूद केलेली आहे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, ही बाब सामान्य प्रशासन विभागाची आहे. याबाबत गृह विभागाने आम्हाला सांगितले होते. मी गृह विभागाला विनंती करतो की नक्षलवादी एरियासाठी आपण हेलिकॉप्टर द्यावे अशी आग्रहाची विनंती आहे जेणेकरुन तेथील समस्या सोडविता येतील. आपण मला बोलण्यासाठी भरपूर वेळ दिला त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. भारतमाता की जय.

---

. . . .3 एम-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, बाब क्र.51, पान क्र.47 सार्वजनिक बांधकामाबाबत सांगावयाचे तर सागरी महामार्ग 1980 मध्ये बांधण्यास सुरुवात झाली. त्यावेळी 500 कोटी रुपयांमध्ये हा महामार्ग पूर्ण झाला असता. पण दुर्दवाने अजूनही सागरी महामार्गाचे काम अपूर्ण आहे म्हणून या सागरी महामार्गासाठी लवकरात लवकर कसे पैसे मिळतील यासाठी प्रयत्न करावे. कोकणामध्ये एस.आर.चे रस्ते भरपूर झाले आहेत मी रस्ते झाले नाही असे म्हणणार नाही. परंतु जे जुने रस्ते झालेले आहेत, त्यांच्या दुरुस्तीसाठी तेथील पावसाचे प्रमाण बघता जास्तीत जास्त पैसे मिळणे आवश्यक आहे. तशा प्रकारचा निधी द्यावा अशी विंनती करतो. तेथे ब्रिटीश कालीन बरेच पूल आहेत, त्यांना 100 वर्षापेक्षा जास्त वर्षे झाली आहेत. त्याचाही सर्व्हे करुन ते लवकरात लवकर दुरुस्त करण्या साठी प्रयत्न करावेत.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली....

सभापती महोदय, गेल्या वेळी आंबोली घाट रस्ता कोसळला होता तो दोन महिन्यात सुरु करण्यात येईल अशी घोषणा केली होती. त्याला पर्यायी केसरी-फनसोडे रस्ता त्या ठिकाणी करण्यात यावा व त्यासंदर्भात जॉइंट मिटिंग घ्यावी अशा प्रकारची विनंती मी करतो.

सभापती महोदय, नगरविकास विभागाची बाब क्रमांक 38, पृष्ठ क्रमांक 36 च्या बाबतीत मी बोलू इच्छितो.नगरोत्थान योजनेमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी आणि मालवण या दोन नगरपालिका घेतलेल्या आहेत. उर्वरित कणकवली आणि वेंगुर्ला या नगरपालिका सुध्दा या योजनेमध्ये घेण्यात याव्यात. कणकवली नगरपंचायत आहे. त्यामुळे त्याठिकाणी नवीन विकास कामे करण्यासाठी पैसे मिळत नाहीत. त्याठिकाणचे नवीन रिझर्व्हेशन डेव्हलप करण्यासाठी निधी देण्यात यावा, अशा प्रकारची विनंती करतो.

सभापती महोदय, विधी व न्याय या विभागाची बाब क्रमांक 67, पृष्ठ क्रमांक 77 च्या बाबतीत मी बोलू इच्छितो. दिनांक 2/10/2009 आणि दिनांक 3/10/2009 रोजी कोकणात ढगफुटी झाली होती. त्यावेळी प्रचंड प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले होते, बऱ्याच घरांचे नुकसान झालेले होते. त्यावेळी 2 कोटी 62 लाख, 50 रुपयांची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे मागणी आली होती. बरीच घरे पडलेली आहेत, त्या घरांना मदत मिळावी, अशा प्रकारचा प्रयत्न सिध्दीविनायक ट्रस्टच्या मार्फत प्रयत्न सुरु झाला होता. ती मदत अद्याप देण्यात आलली नाही. विधी व न्याय विभागात ती फाईल प्रलंबित आहे. तेव्हा या घरांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशा प्रकारची विनंती मी या माध्यमातून करतो.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची बाब क्रमांक 81, पृष्ठ क्रमांक 88 च्या बाबतीत मी बोलू इच्छितो. वैश्य समाज एका केसच्या संदर्भात हायकोर्टात अडचणीत आला होता. त्यांना ओ.बी.सी.चे सर्टिफिकेट मिळण्याच्या दृष्टिकोनातून शासनाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात यावेत, अशा प्रकारची मी विनंती करतो. ग्रामीण भागात विशेष करुन कोकणातील दलित वस्त्या लहान आहेत, त्या छोटया आहेत. दलित वस्त्यांच्या विकासाच्या बाबतीत निकष आहेत. 150 लोकसंख्या असली तरच दलितवस्त्यांमध्ये विकासाची कामे करता येतात. कोकणासाठी ही अट शिथिल करण्यात यावी, कारण कोकणामध्ये 50 ते 60 लोकांची लोकवस्ती असते. म्हणून कोकणासाठी ही 150 लोकसंख्येची अट शिथिल करुन ती 50 करावी अशा प्रकारची विनंती मी या माध्यमातून करतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

सभापती महोदय, नियोजन विभागाची बाब क्रमांक 90, पृष्ठ क्रमांक 105 च्या बाबतीत मी बोलू इच्छितो. दोडामार्ग तालुका होऊन बरेच वर्षे झालेले आहेत पण त्या ठिकाणी डोंगरी विकासाचे पैसे मिळत नाहीत. माजी अर्थमंत्र्यांनी कोकणात येऊन घोषणा केली होती की, डोंगरी विकासाचे पैसे या वर्षापासून मिळतील ते अद्याप मिळालेले नाहीत. ते पैसे या दोडामार्ग तालुक्याला मिळावेत अशा प्रकारची मी विनंती करतो.

सभापती महोदय, सहकार विभागाची बाब क्रमांक 114, पृष्ठ क्रमांक 139 च्या बाबतीत मी या ठिकाणी बोलू इच्छितो. महामँगोच्या संदर्भात लक्षवेधी सूचना सभागृहात आली होती. त्यावेळी माननीय राज्य मंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, दोन महिन्याच्या आत 88 चा प्रस्ताव करुन संबंधितावर कारवाई करु आणि महामँगो पुनरुज्जीवित करु. परंतु दुर्दैवाने यातील काहीच झालेले नाही. या माध्यमातून माझी अशी विनंती आहे की, महामँगोमध्ये ज्यांनी भ्रष्टाचार केला त्यांच्यावर कारवाई करावी. महामँगो कोकणाच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्वाची असल्यामुळे ती पुनरुज्जीवित करण्यात यावी, अशा प्रकारची विनंती मी या माध्यमातून करतो.

सभापती महोदय, सातरी पथसंस्थेत फार मोठा गोंधळ आहे, त्याची चौकशी करावी, सुरई दळवी त्या ठिकाणी बोगस सभासद झाले आहेत, त्यांच्यावरही कारवाई करावी, अशा प्रकारची मागणी मी या माध्यमातून करतो.

सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची बाब क्रमांक 132 पृष्ठ क्रमांक 158 च्या बाबतीत मी बोलू इच्छितो. जल स्वराज योजनेच्या बऱ्याचशा योजना अडचणीत आलेल्या आहेत त्यांची मुदत देखील संपलेली आहे. माननीय मंत्र्यांनी जिल्हानिहाय फेर आढावा घ्यावा आणि झालेली चुकीची कामे दुरुस्त करावित अशा प्रकारची मी विनंती करतो.

सभापती महोदय, महसूल व वन विभागाची बाब क्रमांक 22, पृष्ठ क्रमांक 19 च्या बाबतीत मी बोलू इच्छितो. मी या बाबतीत राज्य सरकारला मनापासून धन्यवाद देईन. गेल्यावेळी अवकाळी पावसामुळे ज्या शेतकऱ्यांचे 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाले होते त्यांना 737 कोटी 9 लाख रुपयाची आर्थिक मदत केलेली आहे. कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील एक मोठा

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

प्रश्न निर्माण झालेला आहे. देवस्थान इनामाखाली सिंधुदुर्ग जिल्हयातील जवळ जवळ 13 गावे आलेली आहेत. त्यामुळे तेथे त्यांना काहीही करता येत नाही. पश्चिम महाराष्ट्रातील विषय वेगळा असतो. देवस्थानच्या ताब्यात जागा असते पण कोकणात अशी परिस्थिती नाही. वर्षानुवर्षे लोक त्या ठिकाणी जमीन कसत आहेत म्हणून या 13 गावांच्या बाबतीत वेगळा निकष लावण्यात यावा, अशा प्रकारची विनंती मी करतो. सभापती महोदय, ती जागा ज्यांच्या ताब्यात आहे, त्यांना ती देण्यात यावी. यासंदर्भात मी एक उदाहरण देतो. सन 1720 मध्ये आचरा गाव त्यावेळच्या राजकीय नेत्यांनी देवस्थानसाठी बक्षीस दिलेले आहे. त्यांची ही सातत्याने मागणी आहे ती पूर्ण करण्यात यावी, अशा प्रकारची मी विनंती करतो. त्याचप्रमाणे बरेचसे दस्तऐवज मोडी लिपीमध्ये आहेत. 1800 सालपासूनचे दस्तऐवज आहेत. म्हणून मी महसूल मंत्र्यांना विनंती करतो की, मोडी लिपीतील दस्तऐवजासाठी कायम स्वरुपी निधी देण्यात यावा आणि हे मोडी लिपीतील दस्तऐवज मराठीतून कसे करता येतील या दृष्टिकोनातून प्रयत्न करावेत.

सभापती महोदय, वन विभागाची बाब क्रमांक 23, पृष्ठ क्रमांक 19 च्या बाबतीत मी बोलू इच्छितो. वन सज्ञेचा प्रश्न सातत्याने मांडला जात आहे. सन 1997 मध्ये हा वनसज्ञेचा प्रश्न निर्माण झाला. अद्यापर्यंत याबाबतीत काही झालेले नाही त्यामुळे कोकणात इरिगेशन व रस्त्याच्या संबंधात फार मोठया प्रमाणात अडचणी निर्माण झालेल्या आहेत

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत / मुद्रणेसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

नाशिक जिल्ह्यातील विणकरांचा एक प्रश्न मांडू इच्छितो. येवला तालुक्यामध्ये जगप्रसिध्द पैठणी तयार केली जाते. या विणकरांना जे कर्ज उपलब्ध होते, त्या रकमेमध्ये वाढ करुन विणकरांचा प्रश्न सोडविला पाहिजे. त्याचप्रमाणे त्यांच्या मालाला बाजारपेठ मिळावी यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये जर चांगली दुकाने उपलब्ध करुन दिली तर त्यांना त्याचा उपयोग होऊ शकेल. त्याप्रमाणे शासनाने व्यवस्था करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये 469 पतसंस्था बुडालेल्या आहेत. त्यामध्ये नाशिक जिल्ह्यातील अनेक पतसंस्था आहेत. या पतसंस्थांना शासनाने 200 कोटी रुपयांचे अनुदान देऊ केलेले आहे. सहकार कायद्यामध्ये शासनाने आमूलाग्र बदल केले पाहिजेत. पतसंस्थांमधील संचालक या परिस्थितीला कारणीभूत आहेत, जबाबदार आहेत. या संचालकांना शासनाने शास्ती लावली पाहिजे. या संचालकांनी अपहार केलला आहे, त्यासाठी शासन 200 कोटी रुपयांचा भुर्दंड सोसणार असेल तर त्याबाबत शासनाने विचार केला पाहिजे. यासाठी सहकार खात्यामार्फत त्वरित कडक उपाययोजना करुन संबंधित सर्व संचालकांना शास्ती लावली पाहिजे. शासन या पतसंस्थांना 200 कोटी रुपये उपलब्ध करुन देणार आहे. या 200 कोटी रुपयांमधून ज्यांचे 50 हजार रुपये बुडाले आहेत अशा सभासदांना केवळ 10 हजार रुपये दिले जाणार आहेत आणि ज्यांनी अपहार केला आहे ते संचालक मात्र उजळ माथ्याने बाहेर फिरत आहेत ही शरमेची बाब आहे असे मला वाटते. या मुद्याकडे शासनाने लक्ष द्यावे अशी मी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2010-11 च्या विवरण पत्रावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 85 वर मी माझे विचार मांडणार आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या असलेल्या वसतिगृहांच्या अंतर्गत सजावटीकरिता 34 कोटी 90 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. या अंतर्गत सजावटीमध्ये काय अंतर्भूत आहे ते समजलेले नाही. मागासवर्गीय विद्यार्थ्यांची जी वसतिगृहे आहेत ती प्रामुख्याने अनुदानित आहेत. या वसतिगृहांची संख्या 2 हजार इतकी आहे. या वसतिगृहांमध्ये 8 हजार कर्मचारी काम करीत आहेत. हे कर्मचारी 15 ते 25 वर्षांपासून 2 हजार, 3 हजार इतक्या कमी मानधनावर काम करीत आहेत. या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीनुसार वेतन देण्याबाबत शासनाने सहानुभूतीने विचार करावा अशी मी विनंती करतो.

यानंतर बाब क्रमांक 84 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. राज्यात अपंगांसाठी विना अनुदानित तत्वावर शाळा सुरु आहेत. त्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी 1 कोटी 88 लाख 41 हजार रुपयांची मागणी केलेली आहे. या शाळांमधील शिक्षक 12-12 वर्षांपासून विनावेतन काम करीत आहेत. त्यामुळे त्यांची हलाखीची परिस्थिती झाली आहे. शासनाने शिक्षणाचा हक्क कायदा लागू केलेला आहे. या सर्व प्राथमिक शाळा आहेत. त्यामुळे या शाळांना तातडीने अनुदान देणे आवश्यक आहे. शासनाने सर्वसाधारण मुलांना शिक्षणाचा हक्क दिलेला आहे, त्याप्रमाणे या अपंग मुलांना सुध्दा दिला पाहिजे. त्यामुळे या विना अनुदानित प्राथमिक शाळांना तातडीने अनुदान दिले पाहिजे अशी मी मागणी करतो. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि याठिकाणी थांबतो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्रीमती दिप्ती चवधरी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सभागृहात सन 2010-11 च्या पूरक विवरणपत्रांवर चर्चा सुरु आहे, त्यामध्ये भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या पान क्र.163 वरील बाब क्रमांक 137 वर मी माझे विचार मांडते. महाराष्ट्र राज्यामध्ये बेरोजगारीचा प्रश्न अतिशय गंभीर झाला आहे. यासंदर्भात माझ्याकडे काही आकडेवारी आहे. ही आकडेवारी पाहिली तर हा प्रश्न किती महत्वाचा आहे ते दिसून येते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी....

माध्यमिक शालांत परीक्षेपेक्षा जे कमी शिकलेले आहेत अशा 4,16,991 उमेदवारांची नोंदणी झालेली आहे. त्यामध्ये जवळपास 34 टक्के म्हणजे 1,42,799 इतक्या महिला आहेत. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या, पदवी तसेच अभियांत्रिकी पदवी घेतलेल्या उमेदवारांची संख्या पाहिली तर त्यामध्ये महिलांची संख्या मोठी असल्याचे दिसून येते. मार्गदर्शन केन्द्रावर जाण्याच्या निमित्ताने महिलांना वेगवेगळया गावी जावे लागते. त्या ठिकाणी महिलांसाठी वसतिगृहे नसल्यामुळे त्यांची राहाण्याची गैरसोय होते. महाराष्ट्र राज्यामध्ये महिलांसाठी असलेल्या वसतिगृहांची संख्या फार कमी आहे आणि त्यासाठी केलेली तरतूद फार तुटपुंजी आहे हे मला येथे आवर्जून सांगावेसे वाटते. स्वयंरोजगार मार्गदर्शन केन्द्राच्या माध्यमातून बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने जी काही पावले उचललेली आहेत त्यासंबंधीची माहिती मला हवी आहे. त्यासंदर्भातील आकडेवारी माझ्याकडे आहे. परंतु चालू वर्षामध्ये शासनाने या दृष्टीने काय काय उपाययोजना केलेल्या आहेत याची माहिती मिळाली तर बरे होईल, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते.

---

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2010-2011च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 13 वरील बाब क्रमांक 14मध्ये राज्य गुप्तवार्ता विभागासाठी कार्यात्मक प्रयोजनार्थ 5 बुलेटप्रूफ वाहने खरेदी करण्यासाठी 2 कोटी 90 लाख रुपयाची तरतूद केलेली आहे. ही पुरवणी मागणी करताना असे म्हटलेले आहे की, ज्यांच्यासाठी चांगली सुरक्षा व्यवस्था ठेवली पाहिजे अशा व्यक्तींची महाराष्ट्रामध्ये वाढ होत चालली आहे. त्यामुळे बुलेटप्रूफ गाड्या घेण्यासाठी तरतूद केलेली आहे. मला याची कल्पना आहे की आपल्या राज्यामध्ये व्हीव्हीआयपी पर्सनालिटीज वाढत आहेत. पण त्याच बरोबर सामान्य माणसाला जीवन जगणे असह्य झालेले आहे. रात्रीच्या घरफोड्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. माननीय गृह राज्यमंत्री हे आमच्याच जिल्ह्यातील असल्यामुळे त्यांना रात्रीच्या घरफोड्यांची आकडेवारी माहीत आहे. एका बाजूला 2.90 कोटीच्या बुलेटप्रूफ गाड्या व्हीव्हीआयपीसाठी घेत असताना रात्रीची गस्ती पथके आणि त्या गस्ती पथकांना आवश्यक असणारी शस्त्रास्त्रे यासाठी मोठया प्रमाणावर तरतूद करण्याची आवश्यकता आहे. या बुलेटप्रुफ गाड्यांसाठी केलेल्या 2.90 कोटीच्या तरतुदीला पाठिंबा देत असताना सर्वसामान्य माणसाच्या सुरक्षेकडेही गृह विभागाने लक्ष द्यावे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा आणि त्याच बरोबरीने ठाणे जिल्ह्यातील आदिवासी, वनवासी भागामध्ये नक्षलवाद वाढत आहे. हे लक्षात घेता आज बाजारात येत असलेली अत्याधुनिक साधने पोलिसांना पुरवून पोलीस दल सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, प्रत्येक जिल्ह्याच्या नियोजनामध्ये पर्यटन "ब" आणि "क"चे प्रावधान आहे. त्यामुळे जिल्हा नियोजनाच्या बैठकीमध्ये पर्यटन "क"मध्ये आपल्या जिल्ह्यातील एखादे चांगले क्षेत्र देण्याचा लोकप्रतिनिधींचा प्रयत्न असतो. परंतु ती बाब केवळ कागदावर रहाते. पर्यटन "क"मध्ये येणा-या क्षेत्रांच्या विकासासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद केली जात नाही. त्यामुळे त्या त्या जिल्ह्यातील जी जी पर्यटन क्षेत्रे "क"मध्ये येतात त्यांच्या विकासासाठी निधीची तरतूद केली पाहिजे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, आज पतसंस्थांच्या माध्यमातून सर्वसामान्य माणूस लुबाडला गेला आहे. शासनाने त्याबाबतीत 200 कोटी रु.चे पॅकेज घोषित करुन दोन वर्षे झाली. एकंदरीत आढावा घेतला तर असे दिसून येते की, साधारणपणे 48 कोटी पेक्षा जास्त निधीचे अद्याप वाटप झालेले नाही. राज्यात सगळयात मोठी असलेली भुदरगड नागरी पतसंस्था बुडण्यातून इतरही पतसंस्था बुडण्याची परंपरा सुरु झाली. या भुदरगड पतसंस्थेच्या बुडीत ठेवींना या पॅकेजमधून वगळण्यात आलेले असल्यामुळे त्यांना या पॅकेजचा कोणताही दिलासा मिळालेला नाही.

सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 4 वरील बाब क्रमांक 2 मध्ये स्पर्धा परीक्षांवरील अत्यावश्यक खर्च भागविण्यासाठी 1.65 कोटीची तरतूद केलेली आहे.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील.....

परंतु मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, 13 फेब्रुवारी, 2011 रोजी लोकसेवा आयोगाच्या परीक्षा झाल्या. त्या परीक्षेमध्ये मोठया प्रमाणात गोंधळ झाला. नंबर चुकीचे मिळाले, उमेदवारांचे फोटो आणि नाव यामध्ये गल्लत झाली होती. पुरवणी मागण्यांमध्ये स्पर्धा परीक्षांसाठी तरतूद केली जात असली तरी स्पर्धा परीक्षांमध्ये वर्षानुवर्षे गोंधळ सुरुच आहे. अशा प्रकारे पुरवणी मागण्यांमध्ये अधिक निधी मागण्याबरोबर परीक्षा नीट कशा होतील याचा विचार झाला पाहिजे.

सभापती महोदय, क्रीडा विभागाची महाराष्ट्रात जी प्रगती सुरु आहे ती पाहता शासनाने पुरस्काराची रक्कम वाढविली पाहिजे, एवढे बोलून मला मुद्दे मांडण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानून माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, आष्टी तालुक्यात गेल्या आठ वर्षात 62 गावात स्वजलधारा, 11 गावात जलस्वराज, 10 गावात मराठवाडा एकात्मिक विकास योजना, 23 गावात भारत निर्माण योजना आहेत. 11 गावात एकही पाणीपुरवठा योजना नाही. 62 पैकी 40 गावे जलस्वराजचे पाणी पित असताना 22 गावात पाणीच मिळत नाही. ज्या तालुक्यात ग्रामपंचायती आहेत त्यापैकी 22 गावात स्वजलधारा योजनेचे काम अर्धवट अवस्थेत रखडले आहे. कापसी, नांदा, मोरेवाडी, कुंबेफळ, धोंगडेवाडी, पिंपळसुटी, रुटी, हिवरा, वाघळुज, सुंबेवाडी, धनगरवाडी या गावात अद्यापपर्यंत एकही पाणीपुरवठा योजना अंमलात आलेली नाही.

सभापती महोदय, आष्टा हरिनारायण, जळगाव, देवळाने, पिंपरखेड, कुंभारवाडी, हाकेवाडी, लाटेवाडी, महाजनवाडी, पिंपरीघाट, फत्तेवडगाव धिर्डी, कारखेल (बु), दरेवाडी, बावी, चिंचपूर, तवलवाडी, सांखवी, चिखली मंगरुळ, इमनगाव, हिंगणी, ढोबळ सांगवी अशा 22 गावात स्वजलधारा योजनेचे काम रखडले आहे. बहुतांश गावात बिले उचलली गेली आहेत. काही बिले देणे बाकी आहे. तालुक्यातील 147 गावे, 633 वाड्या वस्त्यामधील कामे प्रगतीपथावर आहेत. 11 गावे व 384 वाड्या वस्त्यांवर अद्याप कोणतीही पाणीपुरवठा योजना राबविली गेली नाही. 2012 साली गावे टंचाईमुक्त करण्यात यावीत.

सभापती महोदय, मांडवरवेल हे नकेनूरजवळ (बडिता) येथे पाणीटंचाई निर्माण झाली असून महिलांनी नेकनूर बस स्थानकासमोर रास्ता रोको केला होता. हिवरापहाडी येथील पाणीपुरवठा योजनेचे पाणी शेतीला वापरतात त्यामुळे गावाला प्यायला पाणी मिळत नाही. केज धारुर संयुक्त पाणीपुरवठा करणा-या योजनेच्या पाईपमधून पाणी लिकेज केले जाते. ते पाणी शेतीला वापरले जाते. त्यामुळे केज धारुर वगळता 12 गावांना पाणी मिळत नाही. मांगवडगाव, सातेफळ, सुकळी या गावांनी भारत निर्माण योजनेंतर्गत स्त्रोत शोधले आहेत. मात्र शेलगाव, गांजी, बोबडेवाडी गावांना मात्र कुठेच पाणी मिळत नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 53, पृष्ठ क्रमांक 48. मंजरथ, ता.माजलगाव येथील गोदापात्रातून बेसुमार वाळू उपसा होत आहे. रात्रीच्या वेळी जेसीबीचा राजरोस वापर होतो. रात्रौ नदी पात्रात पाच फुटापेक्षा जास्त खोल पात्र खोदून वाळू उपसा केला जात आहे. जिल्हयात

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सर्वत्र गोदापात्रात हाच प्रकार चालू आहे. कृत्रिम वाळू टंचाई निर्माण केली जात आहे. या वाहतुकीमुळे मंजरथ ते माजलगाव या 10 कि.मी.च्या मार्गावर रस्त्यात खड्डे पडले आहेत. शहराबाहेरुन वाहतूक करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रशासनाने खास रस्ता तयार करावा अशी मी शासनाला विनंती करते. त्याचबरोबर गेवराईच्या गोदावरी नदीतून अवजड वाहनांची ये जा होत आहे. त्यामुळे रस्त्यावर खड्डे पडून बसेचची वाहतूक बंद होत आहे. तालुक्यातील कुरणपिंपरी, गोंदी, सावळेश्वर, मालेगाव, बोरगाव, राजापूर, पांढरी, करचिंचोली, नागझरी, शहागड, सुरळेगाव, रामपुरी, मनुबाई जवळा आदी पट्टयातून वाळू उपसा केला जात आहे. राक्षसभुवन, धोंडराई, मालेगाव, तलवाढा गोंदी, सुरळेगाव आदी मार्गावर एस.टी.महामंडळाने बस सेवा बंद केली आहे. वाळू उपसाबाबत अजून काही नवीन निविदा निघणार आहेत.

सभापती महोदय, बाब क्रमांक 132, पृष्ठ क्रमांक 158. प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांची पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी केंद्राच्या भारत निर्माण योजनेतून 2007-08 मध्ये जिल्हयातील 717 ठिकाणच्या शाळांना जलकुंभ किंवा विंधण विहिरींना मंजुरी मिळाली होती. तीन वर्षानंतरही 369 कामे अपूर्ण आहेत. पूर्ण झालेल्या 348 जलकुंभापैकी अनेक कुंभात पाणी नाही. विंधण विहिरी किंवा जलकुंभासाठी प्रत्येकी 30 हजार रुपयांचा निधी दिला होता. या योजनेतून पाटोदा तालुक्यातील 79 शाळातील कामांना मंजुरी मिळाली होती. यातील 66 कामे पूर्ण झाली आहेत. 13 कामे अपूर्ण आहेत. 184 शाळांपैकी बोटावर मोजण्याइतक्या शाळेत पिण्याचे पाणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 53, पृष्ठ क्रमांक 48. पाटोदा तालुक्यात रामेश्वर तलाव आहे. त्याबाजूला 300 लोकवस्तीची शिंदे वस्ती आहे. शिंदे वस्तीमध्ये पहिली ते चौथी पर्यंतची शाळा आहे. पण पाचवी ते दहावीसाठी थर्माकोलच्या मदतीने चापू वापरुन तलावातून मुलांना प्रवास करावा लागत आहे. जमिनीवरुन जायचे झाल्यास सौताडा, धुलेवाडी, लांबरवाडी ते शिंदे वस्ती असा 12 कि.मी.चा प्रवास पायी करावा लागतो. त्यामुळे शिंदे वस्ती येथे पूल बांधण्यात यावा.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, बाब क्रमांक 19, पृष्ठ क्रमांक 18. पापनाशी, बोभाटी, मांजरा नदीकाठी मागील सहा महिन्यांपासून राजरोस बेसुमार वाळू उपसा बेकायदेशीरपणे केला जात आहे. त्यामुळे ठेके घेण्यास ठेकेदार धजावत नाहीत. याकडे महसूल विभागाने लक्ष द्यावे अशी विनंती करते आणि माझे भाषण संपविते.

---

नंतर 3एस.1..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, पूरक मागण्यांवर बोलत असताना प्रामुख्याने बाब क्र. 84, पृ.क्र.99-अपंगांसाठी विना अनुदानित अशासकीय संस्था, विशेष शाळा यांना अतिरिक्त सहाय्यक अनुदान व विकलांग व्यक्तीसाठी असलेल्या 9 विना अनुदानित अशासकीय संस्था व अपंगांसाठी विशेष शाळा यासाठी अनुदान मिळण्याबाबत ही 1.88 कोटीची मागणी करण्यात आली आहे. मात्र सन 2012 पूर्वी सुरु असलेल्या आणि कायम शब्द काढलेल्या 138 विशेष शाळांसाठी देखील आर्थिक तरतूद करण्याची गरज आहे, कारण या शाळांमधील शिक्षक आपल्या मागण्यांसाठी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच आझाद मैदानावर आंदोलन करीत आहे, त्या अनुषंगाने विशेष तरतूद करावी अशी माझी मागणी आहे.

बाब क्र. 82, पृ.क्र.98 च्या अनुषंगाने शासनाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या माध्यमातून 34.63 कोटीची तरतूद वेतन व भत्ते यांचे प्रदान करण्यासाठी केलेली आहे. राज्यात अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार 28 केंद्रीय आश्रमशाळा 8 वर्षांपासून विना अनुदान तत्वावर चालविल्या जात आहेत. त्यासाठी आर्थिक तरतूद करण्याची गरज आहे. या शाळातील शिक्षक सुध्दा आझाद मैदानावर आंदोलन करीत आहेत.

बाब क्र. 114, पृ.क्र.139, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकरिता तदर्थ प्रदानासाठी 270 कोटीची तरतूद शासनाने सहकार विभागाच्या माध्यमातून केली आहे. दिवाळखोरीत मशगूल असलेल्या सहकारी साखर कारखान्यांना या ठेवी प्रदान करु दिल्या जाऊ नये याकडे शासनाने विशेष लक्ष द्यावे मात्र अल्पभूधारक शेतकऱ्यांना यातून वगळण्यात यावे, अशी मागणी करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

---

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : महोदय, बाब क्र. 51, पृ.क्र.47-मुंबई येथील ऐतिहासिक वारसा प्राप्त इमारतीकरिता अतिरिक्त अनुदान मिळण्यासाठी ही मागणी करण्यात आली आहे. तसेच या निमित्ताने ज्या गोष्टीकडे संपूर्ण राज्यातील जनतेचे लक्ष लागले त्या छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे करण्यासाठी शासनाने आराखडा तयार केला आहे, त्यासाठी तातडीने तरतूद करण्याची गरज आहे, अशी मला सूचना करावयाची आहे.

महोदय, बाब क्र. 53, पृ.क्र.55-इमारत दुरुस्तीसाठी ही मागणी करण्यात आली आहे. राज्यात खरोखरच विकास करावयाचा असेल तर रस्त्यांची नितांत गरज आहे. म्हणून जिल्ह्यातील व तालुक्यातील रस्त्यांचे चौपदरीकरण ताबडतोबीने झाले पाहिजे, अशी मी विनंती करतो.

महोदय, बाब क्र. 72, पृ.क्र.86-ग्रामीण भागात सौर दिव्यांचे खांब उभे करण्यासाठी ही तरतूद केली आहे. राज्यातील अपुऱ्या वीज पुरवठ्यामुळे तसेच लोड शेडिंगचा विचार केला तर प्रत्येक गावात सोलर दिवे उभे करण्याची गरज आहे, त्यासाठी तरतूद करण्यात यावी.

यानंतर बाब क्र. 84, पृ.क्र.99-सन्माननीय सदस्यांनी अपंग शाळांच्या बाबतीतील मुद्दा उपस्थित केला. माझी देखील अशी सूचना आहे की या शाळांना तातडीने अनुदान मिळाले पाहिजे कारण गेल्या 15 दिवसांपासून अशा शाळातील शिक्षक आझाद मैदानावर धरणे व आंदोलन करण्यासाठी बसलेले आहेत, त्यातील चार शिक्षकांना दवाखान्यात भरती करावे लागले म्हणून यासंबंधी शासनाने ताडीने निर्णय घेतला पाहिजे. त्याचबरोबर केंद्रीय आश्रमशाळांचाही उल्लेख करण्यात आला. त्यासंदर्भात माझी अशी विनंती आहे की, अशा 288 आश्रमशाळांना केंद्र शासन व राज्य शासनाच्या माध्यमातून परवानगी देण्यात आली असून या सर्व शाळा आपल्याच राज्यात चालत आहेत म्हणून हे दायित्व आपल्याच शासनाचे जास्तीचे आहे, यासाठी शासनाने तातडीने तरतूद करण्याची गरज आहे. इतकेच नव्हे तर जे 3 हजार अपंग कर्मचारी अतिरिक्त ठरविले आहेत त्यांनाही इतरत्र सामावून घेतले पाहिजे. कारण हे सर्व शिक्षक अपंग शाळांमध्ये काम करणारे आहेत. तसेच व्हीजेएनटी शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी शाळा संहितेचे प्रारुप तयार आहे पण अद्यापही त्याला मान्यता दिली जात नाही, याचाही विचार व्हावा अशी विनंती करुन मला बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---

यानंतर श्री. जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यावरील गृहनिर्माण व सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.ज़मा यांनी विचार व्यक्त केले असून त्यांनी मुंबई शहरामध्ये गिरणी कामगारांच्या संदर्भात जशी योजना राबवली गेली तशी योजना इतर शहरामध्ये सुध्दा राबवण्यात यावी अशी सूचना केलेली आहे. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, मुंबई शहरातील गिरणी कामगारांसाठी जशी योजना राबविण्यात आलेली आहे तशी योजना संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्याची भूमिका शासन निश्चितपणे घेणार आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी एस.सी, एस.टी. यांच्यासाठी स्पेशल कॉम्पोनंट प्लॅन आहे तसाच स्पेशन कॉम्पोनंट प्लॅन एन.टी. च्या बाबतीत सुध्दा मिळावा असे विचार व्यक्त केलेले आहेत. याविषयाच्या संदर्भात केंद्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. तसेच त्यांनी एन.टी.च्या जनतेसाठी घरकुल योजना राबविण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले असून यासंदर्भातील बाब निश्चितपणे तपासून पाहिली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याची भावना व्यक्त केलेली आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी वसतिगृहाच्या बाबतीत, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी झोपडपट्टीच्या संदर्भात व विशेष करुन शौचालयाच्या बाबतीत विचार व्यक्त केलेले आहेत. ग्रामीण भागात दलित वस्ती योजना आहे व तीच योजना नगरविकास विभागाच्या माध्यमातून सुध्दा आहे. परंतु एक स्वतंत्र योजना झोपडपट्टीच्या लोकांसाठी व विशेष करुन मागासवर्गीयांसाठी पहिल्यांदाच गृहनिर्माण विभागाच्या माध्यमातून करीत आहोत व त्यासाठी 36 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

सन्माननीय सदस्य डॉ. तांबे यांनी वसतिगृहाच्या संदर्भात विचार व्यक्त केलेले आहेत. सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून वसतिगृहासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. यामध्ये फर्निचर व इन्फ्रास्ट्रक्चर्स लागणार आहेत. कम्युनिटी हॉल किंबहुना वेगवेगळया महामंडळाचे कार्यालय स्थलांतर झाल्यानंतर ज्या काही सुविधा लागतात त्यासाठी तरतूद करण्यात आलेली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर....

आहे. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी अपंगाच्या व व्हीजेएनटीच्या बाबतीत विचार व्यक्त केलेले आहेत. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, अपंगाच्या व व्हीजेएनटीच्या बाबतीत नवीन निर्णय घेतले जाणार आहेत. ज्या अपंगाच्या शाळा विना अनुदानित आहेत त्यांना अनुदानित तत्वावर आणण्याची भूमिका घेतली जाणार आहे. पुढील काळात अपंगाच्या शाळांना सहकार्य करण्याचा प्रयत्न शासनामार्फत केला जाणार आहे. अपंगाच्या शाळा हया काही आर्थिक उत्पन्न वाढवण्यासाठी तयार केल्या जात नाहीत. सामाजिक बांधिलकी ठेवून हे काम केले जात असते. त्यामुळे शासन याकडे निश्चितपणे लक्ष देणार आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. या विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे, सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी आपल्या सूचना दिलेल्या असून त्यांच्या सूचनांचा प्रामाणिकपणे विचार करुन त्यांचा समावेश पुढील अर्थ संकल्पात करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. आपल्या वतीने मी सभागृहाला विनंती करतो की, गृहनिर्माण विभागाची बाब क्रमांक 93, 94, 95 यासाठी 47 कोटी 11 लक्ष 30 हजार रुपये व सामाजिक न्याय विभागाची बाब क्रमांक 81 ते 86 यासाठी 82 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यास सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करतो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात यासाठी मी उभी आहे. पुरवणी मागण्यांच्या चर्चेमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतलेला आहे त्यांचे प्रश्न व त्यांच्या सूचनांची दखल आम्ही घेतलेली आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री सुभाष चव्हाण, विनोद तावडे, विक्रम काळे, केशवराव मानकर यांनी चर्चेत भाग घेतलेला आहे. त्यामुळे मी सभागृहाला विनंती करते की, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 1 ते 7 मान्य कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करते.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यावरील चर्चेला सुरुवात करीत असताना सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रमेश शेंडगे, रामनाथ मोते, प्रकाश बिनसाळे, परशुराम उपरकर, मोहन जोशी, हुसेन दलवाई, राजन तेली डॉ. नीलम गो-हे तसेच अन्य सदस्यांनी भाग घेतला आहे. या सन्माननीय सदस्यांनी आपल्या चर्चेत काही महत्वाचे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. नगरविकास विभागाच्या बाबतीत बाब क्रमांक 38 ते 45 मध्ये विशेष करुन केंद्र सरकारकडून 13 व्या वित्त आयोगानुसार या वर्षा मध्ये 295 कोटी रुपये मिळणार आहेत. हे पैसे देत असताना केंद्र सरकारने महानगरपालिका, नगरपालिका आणि नगर पंचायतीमध्ये यासंदर्भात स्वतंत्र हेड ओपन करावे अशी विशेष सूचना केली आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ...

प्रत्येक हेड प्रमाणे महानगरपालिका, नगरपालिका आणि नगर पंचायती यांना किती निधी देण्यात आला हे स्पष्टपणे व स्वतंत्रपणे दाखवले गेले पाहिजे. याकरिता हे हेड ओपन करण्यात आले आहे. त्याचबरोबर अग्निशमनाची व्यवस्था चांगली करण्याकरिता केन्द्र सरकारकडून निधी मिळणार आहे. त्याकरिता स्वतंत्र हेड ओपन करण्यात यावे, असे सांगण्यात आलेले असल्यामुळे त्यासाठी सुध्दा स्वतंत्र हेड ओपन करण्यात आलेले आहेत व त्या अंतर्गत तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, केन्द्र सरकारकडून आलेला निधी हा आपल्या राज्याच्या खात्यात आरबीआयमध्ये जमा असावयाचा. त्यातून मिळणारे व्याज राज्याच्या तिजोरीमध्ये जमा व्हावयाचे आणि राज्याच्या विकासाकरिता त्या पैशाचा उपयोग होत असे. परंतु या संदर्भात केन्द्र सरकारने आता स्पष्टपणे गाईडलाईन्स दिलेल्या आहेत की, हे मिळणारे व्याज राज्य सरकारला वापरता येणार नाही. तर ज्या कामासाठी हा निधी आलेला आहे आणि तो निधी ज्या ज्या विभागाचा आहे, त्या त्या विभागालाच हा निधी दिला पाहिजे. त्यामुळे तशा प्रकारचे हेड ओपन करण्यात आलेले आहे. नगर विकास विभागाच्या पूरक मागण्यांच्या निमित्ताने सान्माननीय सदस्यांनी जे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याचा गांभीर्याने विचार केला जाईल.

सभापती महोदय, वन विभागाच्या संदर्भात मला सांगावयाचे आहे की, मेळघाटमध्ये व्याघ्र प्रकल्प करावयाचा असून त्यासाठी केन्द्र सरकार 100 टक्के निधी देणार आहे. या प्रकल्पामुळे विस्थापित होणा-या प्रत्येक कुटुंबासाठी दहा लाख रुपये देण्यात येणार असून या पैशातून त्याने स्वत:ची व्यवस्था करावयाची आहे अशा प्रकारे स्वत:च स्वत:चे पुनर्वसन करण्यासाठी केन्द्र सरकारकडून दहा लाख रुपयांचे पॅकेज देण्यात येणार आहे किंवा दहा लाख रुपयापर्यंत होणा-या पुनर्वसनाचा खर्च केला जाणार आहे. अशा प्रकारचा हा विषय असल्यामुळे केन्द्र सरकारकडून जो निधी देण्यात आला आहे, त्या अनुषंगाने 7कोटी 31 लाख 95 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे.

सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयातील वन संज्ञेविषयी एक मुद्दा या ठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री राजन तेली परशुराम उपरकर, हुसेन दलवाई यांनी उपस्थित केला आहे. या बाबतीत सभागृहामध्ये यापूर्वी अनेकदा चर्चा झालेली आहे. आता हा विषय सुप्रीम कोर्टात गेला

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ...

असून मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, फेब्रुवारी महिन्यामध्ये या संदर्भातील अंतिम प्रतिज्ञापत्र व ड्राफ्ट समिती मार्फत तयार करुन ते सुप्रीम कोर्टात वन विभागामार्फत दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला प्रश्न लवकरच निकाली निघेल. यामुळे 1800 हेक्टर जमीन वन संज्ञेखाली जाईल आणि उरलेली 42 हजार हेक्टर जमीन वन संज्ञेतून मोकळी करुन मिळणार आहे. या ठिकाणी वन पर्यटनाच्या संदर्भात देखील मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, चराऊ कुरणाच्या संबंधी खुलासा करावा.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी चराऊ कुरणाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे. पाच वर्षापर्यंत जर वन वाढले तर त्या ठिकाणी शेळया मेंढयाना चरण्यासाठी सोडण्यास परवानगी देण्यात यावी. असा मुद्दा मांडला होता तेव्हा या संदर्भात एक समिती नेमण्यात आली असून ती समिती असा सर्व्हे करीत आहे. ज्या ठिकाणी मेंढपाळांना शेळया मेंढयाना चराण्यासाठी कोण कोणत्या ठिकाणी झोन करता येतील, याबाबतीत ही समिती सर्व्हे करीत आहे. तेव्हा अशा प्रकारे झोन करण्याचा विचार गांभीर्याने करण्याची आवश्यकता आहे. शेळी मेंढी विकास महामंडळाच्या पुणे येथील कार्यालयाच्या जागेसंबंधी एक मुद्दा या ठिकाणी मांडण्यात आला होता. या बाबतीत अहवाल तयार करण्याचे काम वन विभागाच्या मार्फत सुरु असल्यामुळे त्या बाबतीत अंतिम निर्णय लवकरच घेण्यात येईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, 31 मार्च पर्यत ही जागा रिक्त करण्यास आम्हाला सांगण्यात आलेले असल्यामुळे ही मुदतवाढ देण्यात येणार आहे काय

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ही बाब मी तपासून पाहीन. तसेच या बाबतीत आपल्याला रिलिफ देण्याच्या दृष्टीने जी काही उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे, ती करण्याचा महाराष्ट्र शासनाकडून निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. अशा प्रकारे मी आपल्याला आश्वासन देऊ इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

सभापती महोदय, खार जमिनीच्या संदर्भात या ठिकाणी मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. कोकणामध्ये समुद्र किनारा असल्यामुळे त्या ठिकाणच्या खार जमिनीचा हा मुद्दा आहे. खार जमिनी संबंधी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी बेसिक प्रश्न उपस्थित केला होता व त्यांनी असे सांगितले की खार जमिनीसाठी जे पैसे खर्च केले जातात, त्यामुळे जमिनीचा पोत सुधारतो किंवा नाही याची कधी तपासणी करण्यात आली होती काय ?

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

अशा पध्दतीने खार जमिनीचे संरक्षण करण्यासाठी मोठया प्रमाणात मोहिम राबवावयास पाहिजे होती तेवढया प्रमाणात ती राबविली गेली नाही. म्हणून शासनाने त्याकडे विशेष लक्ष दिले आहे, आणि कोकण पॅकेज अंतर्गत निधी उपलब्ध करुन देऊन त्यासाठी विशेष तरतूद केली आहे. त्यामध्ये मालवणमधील पाच योजनांचा समावेश असल्यामुळे त्याकरिता 1 हजाराची टोकन तरतूद करण्यासाठी ही मागणी सभागृहापुढे मांडण्यात आली आहे.

सभापती महोदय, याठिकाणी वन औषधी तयार करण्यासंदर्भात विचार व्यक्त करण्यात आले. त्याकरिता एक मंडळ तयार केले असून त्याच्या अखत्यारीत वन औषधींचा विकास करणे, संवर्धन करणे व प्रसार करणे यासाठी मंडळ स्थापन केले आहे. त्या मंडळाच्या माध्यमातून यापुढील काळात काम केले जाईल. वन पर्यटनाच्या बाबतीत सुध्दा एमआयडीसी आणि वन विभाग यांचे एकत्रितपणे एमओयू करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने 12 आणि 13 व्या वित्त आयोगाकडून आपल्याला मोठया प्रमाणात निधी मिळणार आहे. सद्या 12 व्या वित्त आयोगाकडून आपल्याला 262 कोटींचा निधी प्राप्त झाला असून त्या माध्यमातून वन पर्यटनासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होण्याकरिता याठिकाणी तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या बाब क्रमांक 67 व 68 च्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, शासनाच्या कार्यालयामध्ये वेगवेगळया प्रकारची लाईट बील, फोन बीलांची देणी देण्याकरिता थोडीशी वाढीव तरतूद करावी लागली म्हणून ही बाब सभागृहासमोर आली आहे. त्याचप्रमाणे वाहन खरेदी करण्यासाठी व कर्मचाऱ्यांना कर्ज देण्याकरिता थोडी रक्कम कमी पडत असल्यामुळे त्या संदर्भात ही बाब सभागृहासमोर आणली आहे. विशेष करुन माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी कल्याण-डोंबिवली येथील न्यायालयाच्या 30-40 वर्षा पूर्वीच्या जुन्या इमारतीची दुरुस्ती करण्यात यावी अशी सूचना केली. परंतु तशा प्रकारचा प्रस्ताव अजून माझ्या विभागाकडे आलेला नाही. माननीय सदस्यांना मी या निमित्ताने आश्वासित करतो की, सदर न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव माझ्याकडे आल्यानंतर त्याकरिता महाराष्ट्र शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.भास्कर जाधव...

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी कोकणामध्ये अचानकपणे मोठया प्रमाणावर ढगफुटी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे, त्याकरता सिध्दी विनायक ट्रस्टमार्फत कोकणामध्ये मदत दिली जात असल्याचे सांगितले. ही वस्तुस्थिती खरी असून मी त्याबाबत अभ्यास केला असून काही तांत्रिक बाबीमुळे हा प्रस्ताव अडकून पडला आहे म्हणून त्या संदर्भात अजून अंतिम निर्णय होऊ शकलेला नाही. त्याकरिता मी पुन्हा एकदा माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करुन त्यांच्या लक्षात ही बाब आणून देईन आणि लवकरात लवकर निर्णय होण्यासाठी प्रयत्न करीन. अशाप्रकारे सभागृहामध्ये माझ्या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेतलेल्या प्रत्येक माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांची मी गांभीर्याने दखल घेतली आहे. त्यामुळे बाब क्रमांक 23, 61, 67, 68 आणि 38 ते 45 या माझ्या विभागाच्या मागण्या सभागृहाने एकमताने संमत कराव्यात अशी आग्रहाची विनंती करतो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर बोलतांना अनेक माननीय सदस्यांनी सूचना केल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर भवन ही ऐतिहासिक वास्तू जाहीर करण्याबाबत सूचना केली.त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी शहरामधील खाजगी मालकीच्या हेरिटेज बिल्डिंगच्या दुरुस्ती व देखभालीकरिता शासनाने अनुदान द्यावे अशी सूचना केली. सभापती महोदय, शासनाने कोणत्या इमारतीच्या दुरुस्तीचे काम करावे हे ठरविण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली असून त्या समितीकडे प्रस्ताव आल्यानंतर त्याला मंजुरी दिली जाते. सद्यस्थितीत शहरामधील कोणत्याही खाजगी मालकीच्या हेरिटेज इमारतीच्या देखभाल आणि दुरुस्तीसाठी शासनाकडून अनुदान दिले जात नसून शासकीय इमारतीसाठी दिले जाते. माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी ठाणे जिल्ह्यातील विक्रमगडच्या पुनर्बांधणीची मागणी केली. त्यासंबंधीचा प्रस्ताव महसूल विभागाकडे पाठवून देण्यात आला असून आमच्या विभागाचा संबंध केवळ बांधकाम करण्यापुरता आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी एक्झीक्युटीव्ह इंजिनिअरच्या संबंधात मुद्दा उपस्थित केला होता, पण ते आता सभागृहात उपस्थित नाहीत. परंतु यासंबंधातील जे प्रकरण आहे त्यामध्ये तेथील ज्युनिअर इंजिनिअर आणि डेप्युटी इंजिनिअरला सस्पेंड केलेले आहे.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : हेलिकॉप्टरचे प्रकरण आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, आता हा प्रश्न लवकरच सुटणार आहे, कारण संबंधित अधिकारी रिटायरच होणार आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, संबंधितांना सस्पेंड केले आहे.पण नंतर तो रिटायर झाला की विषय संपला.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, जोपर्यंत चौकशी पूर्ण होणार नाही, तोपर्यंत आपण त्यांच्यावर ॲक्शन घेऊ शकत नाही. यासंबंधातील चौकशी प्रगतीपथावर आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, संबंधित अधिकारी रिटायर होण्यापूर्वी चौकशी पूर्ण करु असे सांगावे. आपण तिकडे काय पहात आहात ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आपल्याकडे पाहूनच उत्तर देणार आहे की विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडे पाहून देणार हा प्रश्न आहे. सभापती महोदय, मी फक्त आपल्याकडे पाहून उत्तर देणार, हे माझे म्हणणे बरोबर आहे ना?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, येथे राज्यमंत्र्यांचे राज्य आहे, जास्त विरोध केला तर आम्हाला जास्त दमबाजी करु नये.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, अशी दादागिरी करणेही बरोबर नाही. सन्माननीय सदस्य हे ज्येष्ठ सदस्य आहे. त्यामुळे याबाबतीत लवकरात लवकर कार्यवाही करु आणि याबाबतीत शासन निश्चितपणे प्रयत्नशील रहाणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर साहेब यांनी सांगितले की, गोंदिया जिल्ह्यातील फ्लड डॅमेजमुळे रस्ते खराब झालेले आहेत.मी याबाबतीत एवढेच सांगू इच्छितो की, यासंबंधातील एस.आर.चा प्रस्ताव सी.ई.कडे आलेला आहे आणि त्या प्रस्तावाला मान्यता देऊन निधी दिलेला आहे.तसेच सन्माननीय सदस्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाबतीत असा मुद्दा उपस्थित केली की,तेथील हॉस्पिटलसाठी 50 लाख रुपये प्राप्त झाले आहेत. पण तातडीने मदत करण्यासाठी सी.एफ.मधून ॲडव्हान्स घेण्यात आला होता.तसेच यावर्षी आरोग्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे . . . .

तसेच यावर्षी आरोग्य विभागाच्या बजेटमध्ये उर्वरित तरतूद करण्यात आलेली आहे.

श्री.अशोक मानकर : सभापती महोदय, रिपेअरच्या बाबतीत मोठया प्रमाणात निधी दिलेला आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण रिपेअरसाठी सर्वांना सारखाच निधी देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली साहेब यांनी दोन मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यामध्ये त्यांनी सागरी मार्गाच्या बाबतीत उल्लेख केला. मी एवढेच सांगू इच्छितो की, सागरी मार्गाची एकंदर लांबी 786 कि.मी.आहे आणि आतापर्यंत 759 कि.मी.पर्यंतचे काम झालेले असून 29 कि.मी.चे काम राहिलेले आहे, आम्ही ते काम देखील लवकरात लवकर करु. तसेच सन्माननीय सदस्यांनी पुलांच्या कामाचा देखील उल्लेख केला. एकंदर 7 पूल आहेत आणि त्यापैकी 3 पुलांची कामे नाबार्ड अंतर्गत घेतलेली आहेत. बाणकोटच्या पुलाचे काम देखील बजेटमध्ये मंजूर केलेले आहे उर्वरित पुलांची कामे देखील आम्ही लवकरात लवकर करु. यापूर्वी सन्माननीय सदस्यांनी अंबोली घाटातील दरडी कोसळण्याच्या बाबतीत उल्लेख केला होता. तेथील दुरुस्तीचे काम पी.डब्ल्यु.डी.मार्फत करण्यात आलेले आहे. सदरहू काम होण्यामध्ये जो डिले झाला, त्याचे कारण एवढेच होते की, काही भागातील कामासाठी फॉरेस्ट विभागाकडून क्लिअरन्स् यावयाचा आहे. त्याठिकाणी बायपास रस्ता किंवा आल्टरनेट रस्ता करण्याच्या बाबतीत आपण निश्चितपणे एक बैठक घेऊ. पण सन्माननीय सदस्यांना एक गोष्ट सांगू इच्छितो की, त्यामध्ये सुध्दा फॉरेस्टच्या ॲक्वीझिशनचा प्रश्न येतोच. पण निश्चितपणे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबतीत आम्ही बैठक घेऊ.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे साहेबांनी एक प्रश्न उपस्थित केला. 2021 च्या आराखड्यानुसार प्रत्येक तहसील हेड क्वार्टरला आपण चारपदरी रस्ते करणार आहोत. याबाबतीत निश्चितपणे दोन पदरी रस्त्यांच्या बाबतीत कार्यक्रम ठरलेला आहे.

सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी तहसील ऑफीसच्या नवीन बांधकामाच्या संबंधात सांगितले. तसेच दोन नवीन पुलांच्या बाबतीत सांगितले तर सी.ई.ला तशा प्रकारचे आदेश देऊ.

सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी पनवेल येथील तहसील ऑफीस बी.ओ.टी. बेसिसवर घेण्यात यावे असा प्रस्ताव दिला आहे. त्याच्या फिजिबिलीटी बाबतचा प्रस्ताव विचाराधीन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांना अशी विनंती करतो की, बाब क्र. 51 ते 58 याला मान्यता द्यावी.

सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य सर्वश्री. केशवराव मानकर, राजन तेली आणि जयवंतराव जाधव साहेब यांनी जे प्रश्न मांडले आहेत किंवा ज्या सूचना केल्या आहेत. त्या बाबतीत निश्चितपणे योग्य ती कार्यवाही करु. मी सभागृहाला अशी विनंती करतो की, मागणी क्रमांक 132,133,134,135 व 136 याला मान्यता द्यावी.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, हेरिटेजच्या इमारतींच्या संदर्भात मी बाब क्रमांक 51 चा उल्लेख केला होता, ही बाब जरी सार्वजनिक बांधकाम विभागाची असली तरी सरकारी इमारतींच्या बाबतीतील तो प्रस्ताव आहे. माझा सांगण्याचा उद्देश असा होता की, खाजगी इमारती हेरिटेजच्या सदराखाली मोडतात, खरे म्हणजे नगरविकास विभागाने या विषयाच्या बाबतीत प्रतिसाद द्यावयास पाहिजे होता कारण त्या इमारतींनाही मदत देण्याची गरज आहे. सन्माननीय मंत्री श्री. भास्कर जाधव यांनी याबाबतचे उत्तर द्यावे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, विशेष करुन शहरातील हेरिटेज इमारतींचे जतन करण्याच्या संदर्भात नगरविकास विभाग पुढाकार घेत आहे. या इमारतींचे असलेले अस्तित्व अत्यंत चांगल्या प्रकारे टिकविणे आणि सुशोभीकरण करणे या संदर्भातील धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे.

सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांचे म्हणणे आहे की, माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या बाबतीत सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात कोणीही पुढाकार घेतलेला नाही. त्या संदर्भात नगरविकास विभाग पुढाकार घेण्याचा प्रयत्न करीन असे मी या ठिकाणी सांगातो. कारण दोन्ही बाजूला सातत्याने लटकत पडलेले हे प्रकरण आहे. या संदर्भात निर्णय काय होईल, हे मी सांगत नाही पण पुढाकार घेण्याचा प्रयत्न निश्चितपणे केला जाईल.

सभापती महोदय,शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या बाबतीत वेगवेगळया उपाययोजना करण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांचा एक प्रश्न होता. या संदर्भात शासनाने नवनवीन धोरणे आखलेली आहेत आणि कायदे करण्याचे काम सुरु आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ( वित्त राज्य मंत्री ) : सभापती महोदय, वित्त, ऊर्जा, नियोजन, जलसंपदा, संसदीय कार्य आणि राज्य उत्पादन शुल्क या विभागशी संबंधित जी चर्चा झालेली आहे त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री रमेश शेंडगे, रामनाथ मोते, परशुराम उपरकर, सुभाष चव्हाण, विनोद तावडे, राजन तेली आणि डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या ठिकाणी अत्यंत चांगल्या सूचना केलेल्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी निवृत्ती वेतनाच्या संदर्भात जो उल्लेख केला त्यासंबंधी मी सांगू इच्छितो. निवृत्त वेतन धारकांच्या संख्येत 32,000 ने वाढ झालेली आहे. सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार ए.जी. मुंबई आणि नागपूर यांनी त्यांच्या कार्यालयीन 48,500 निवृत्ती वेतन प्रकरणांमध्ये सुधारित निवृत्ती वेतन मंजुरीचे आदेश निर्गमित केलेले आहेत. सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीमुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ झालेली आहे, त्यामुळे त्यांची रजा, रोखीकरण, निवृत्ती वेतनाचे अंशदायीकरण व सेवा उपदानाच्या रकमांमध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. सोबतच रजेचे वेतन, ग्रॅच्युईटी, डी.ए., पेन्शनमध्ये सुध्दा वाढ झालेली आहे. या सर्व बाबींचा एकत्रित परिणाम होऊन निवृत्ती वेतनाच्या खर्चात मूळ अंदाजापेक्षा 2438.10 कोटी रुपये इतकी वाढ झालेली आहे.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी श्रीक्षेत्र परशुराम कुंड विकासाकरिता तरतुदीमध्ये वाढ करण्यासंबंधी सूचना केली आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण देखील या बाबतीत बोलले. या कामा करिता रुपये 10 लाख या वर्षाकरिता मंजूर करावयाचे असून सन 2011-2012 करिता पुरेशी तरतूद करण्यात येईल. परशुराम कुंड येथे न्यायमूर्ती कोचर आयोगाच्या शिफारशीनुसार आपत्ती व्यवस्थापनाचा समावेश करावा, अशा प्रकारची विनंती सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली होती. या संदर्भात गृह विभागाकडे विधानपरिषद तारांकित प्रश्न आला होता आणि या संदर्भात गृह विभागाने उत्तरही दिलेले आहे. भाविक व पर्यटक यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या सूचनेचा विचार निश्चित स्वरुपात करण्यात येईल. यामध्ये जेजुरीच्या देवस्थाना संबंधीचीही नोंद घेतलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी दोडामार्ग तालुक्याचा समावेश डोंगरी तालुक्यामध्ये करुन निधी देण्यासंबंधीचा उल्लेख केला. या तालुक्याच्या विभाजनानंतर

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्री. राजेंद्र मुळक.....

निर्माण झालेल्या नवीन तालुक्यांचा समावेश डोगरी विकास कार्यक्रमामध्ये करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे परंतु सद्य:स्थितीत सदर तालुका ज्या तालुक्यातून निर्माण झालेला आहे त्या तालुक्याच्या निधीतून लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात अनेक चांगल्या सूचना इतरही सन्माननीय सदस्यांनी केल्या आहेत.

श्री. रमेश शेंडगे : पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या बाबतीत मी माझ्या भाषणात उल्लेख केला होता, त्यासंबंधात सांगण्यात यावे.

श्री. राजेंद्र मुळक : त्याही बाबतीत नोंद घेतलेली आहे. निश्चित स्वरुपात खात्रीने सांगतो की, या महामंडळाला मदत होईल अशा प्रकारचा निर्णय घेण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ...

सभापती महोदय, वित्त विभागाच्या पृष्ठ क्रमांक 41 व 42 वरील बाब क्रमांक 46, 47, 48, 49 व 50 वरील प्रस्तावित एकूण रुपये 2440 कोटी 50 लाख 86 हजार खर्चाच्या पूरक मागण्या मंजूर करण्यात याव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो. त्याचबरोबर नियोजन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 102 आणि 105 वरील बाब क्रमांक 87, 88, 89, 90, 91, 92 वरील प्रस्तावित एकूण रुपये 4 कोटी 33 लाख 3 हजार खर्चाच्या पूरक मागण्यांनाही सभागृहाने मंजुरी द्यावी अशी मी विनंती करतो. तसेच उत्पादन शुल्क विभागाच्या पृष्ठ क्रमांक 13 वरील बाब क्रमांक 18 वरील प्रस्तावित एकूण रुपये 1 कोटी 40 लाख 76 हजार खर्चाच्या पूरक मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, आमदारों के फंड को खर्च करने संबंधी नये रुल फरवरी 2011 में बनाए गए हैं. उसमें कुछ संशोधन करने के लिए मैंने यहां पर विनती की थी. लेकिन उसका कोई जिक्र माननीय मंत्री महोदय ने अपने भाषण में नहीं किया है. मुझे उम्मीद है कि उस बारे में माननीय मंत्री महोदय कोई उत्तर देंगे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.जमा यांनी आपल्या भाषणात जीवनदायी योजनेअंतर्गत पात्र न ठरणाऱ्या रुग्णांना मोठ्या आजारावरील उपचारांसाठी आमदार स्थानिक विकास निधीतून मदत करण्यात यावी अशा प्रकारची विनंती केली होती. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमातून व्यक्तिगत लाभ देता येत नसल्याने ही मागणी मान्य करता येणार नाही.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर ( रोजगार व स्वयंरोजगार, कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, रोजगार व स्वयंरोजगार आणि कृषी विभागाच्या मागण्यांच्या संदर्भात या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेऊन आपल्या सूचना केल्या. त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, रामनाथ मोते, धनंजय मुंडे, श्रीमती दिप्ती चवधरी यांनी सूचना केलेल्या आहेत. रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राच्या माध्यमातून काय उपाययोजना केल्या जातात या संदर्भात आम्हाला माहिती द्यावी अशी सूचना केली. या ठिकाणी रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून आपण रोजगार मेळावे आयोजित करतो. जागेवरच रोजगार कसा दिला जाईल या संदर्भातील प्रयत्न रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या माध्यमातून करतो. उमेदवारांना त्याच ठिकाणी रोजगाराची संधी देण्याच्या संदर्भात मेळाव्यांचे आयोजन केले जाते. आदिवासी मुलांना रोजगाराच्या संधी देण्यासाठी प्रशिक्षण आयोजित करुन त्यांना प्रशिक्षित करण्याच्या संदर्भातील वर्ग सुरु केलेले आहेत. सेवा सोसायट्या स्थापन करणाऱ्या संस्थांना विभागाकडून अनुदान दिले जाते. 5 लाख रुपयांपर्यंतची कामे या संस्थांना विना टेंडर देण्याची व्यवस्था शासनाच्या माध्यमातून केलेली आहे. रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून कुशल प्रशिक्षण देण्याचे धोरण लवकरात लवकर रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या माध्यमातून आपण करीत आहोत.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी एक सूचना केली. आणेवारी लावताना महसूल मंडळाप्रमाणे आणेवारी करु नये त्यामुळे अधिक शेतकऱ्यांना लाभ मिळेल अशी त्यांनी सूचना केली. यामध्ये खासकरुन राष्ट्रीय कृषी विमा योजना ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राबविण्यात येते. या योजनेच्या माध्यमातून क्षेत्र घटक धरुन मंडळ किंवा तालुका यामध्ये योजना राबविण्यात येते. अधिसूचित क्षेत्रात घेण्यात येणाऱ्या पीक कापणी प्रयोगाच्या आधारे येणाऱ्या सरासरी उत्पन्नाची तुलना उंबरठा उत्पन्नाशी केली जाते आणि त्या पध्दतीने सरासरी उत्पन्न उंबरठा उत्पन्नापेक्षा कमी आल्यास नुकसानभरपाई देण्याची व्यवस्था आहे. यामध्ये अधिक सुधारणा करण्यासाठी एक नवीन प्रस्ताव तयार करीत आहोत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर .....

सभापती महोदय, अन्न व तेलबियाप्रमाणे आंबा, काजू यासाठी विमा संरक्षण द्यावे अशी सूचना सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी केली. यामध्ये आंबा, संत्रा, द्राक्षे, केळी, काजू या पिकांसाठी हवामान आधारित पीक विमा योजना लागू करण्याबाबत आपल्या विभागाच्या माध्यमातून प्रस्ताव तयार करुन विस्तार व प्रशिक्षणाच्या संदर्भात माननीय कृषी मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एका अभ्यासगटाची स्थापना केलेली आहे. या अभ्यासगटाच्या आतापर्यंत तीन बैठका झालेल्या आहेत. अंतिम शिफारशीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. लवकरात लवकर या संदर्भातील धोरण कृषी विभागाच्या माध्यमातून आपण तयार करीत आहोत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर....

सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी कृषी विद्यालयांना अनुदान देण्याची मागणी केली आहे. त्या विद्यालयातील कर्मचाऱ्यांना सुध्दा काही लाभ देता येईल काय असा मुद्दा मांडलेला आहे. राज्यातील ही कृषी विद्यालये विना अनुदान तत्वावर सुरु आहेत. शासनाकडून विना अनुदान तत्वावरच विद्यालये सुरु करण्यासाठी मान्यता दिली जाते. त्यामुळे शासनाच्या माध्यमातून या विद्यालयांना अनुदान देण्याची तरतूद नाही. त्या विद्यालयांच्या कर्मचाऱ्यांना संस्थाच पगार देत असतात. त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या मागणीचा पुढील काळामध्ये विचार करता येईल.

श्री.रामनाथ मोते : या संस्था कर्मचाऱ्यांना वेतन देत नाहीत, त्यामुळे सर्व संस्थांना हे बंधनकारक केले पाहिजे.

श्री.गुलाबराव देवकर : संस्थांवर हे बंधनकारकच आहे.

श्री.रामनाथ मोते : संस्था शासनाचे नियम पाळत नाही, सर्व नियम धाब्यावर बसवितात. त्यामुळे शासनाने त्यांच्यावर अंकुश ठेवला पाहिजे.

श्री.गुलाबराव देवकर : यासाठी शासनाला कडक धोरण स्वीकारावे लागेल.

सभापती महोदय, रोजगार व स्वयंरोजगार विभागाची मागणी क्रमांक 137 तसेच कृषी विभागाच्या मागण्या क्र.25 ते 29 सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

---

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2010-11 च्या पूरक विवरणपत्रावरील चर्चेत सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे, विनोद तावडे मोहन जोशी, चंद्रकांत पाटील, धनंजय मुंडे, हुसेन दलवाई, केशवराव मानकर, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व इतर सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी रस्ते सुरक्षा पंधरवड्यासंबंधी मुद्दा मांडला आहे. केंद्र शासनाने रस्ते सुरक्षासंबंधी एक आठवडा साजरा करण्याच्या सूचना केल्या होत्या. परंतु महाराष्ट्र शासनाने पंधरवडा साजरा केला. यामागील कारण असे होते की, रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे. यासाठी लोकांचे प्रबोधन व्हावे असा उद्देश होता. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी बुलेटप्रूफ जॅकेट घेतल्यानंतर ते तपासण्याची प्रयोगशाळा चंदीगड येथे आहे, असे सांगितले. मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यामुळे आपल्याकडे अशी प्रयोगशाळा सुरु केली जाणार आहे. ही प्रयोगशाळा करण्यासाठी 24 कर्मचाऱ्यांची पदे भरण्याची कार्यवाही केली जात आहे. त्यामुळे या प्रयोगशाळेसाठी कर्मचारी नाहीत असे होणार नाही. एमपीएससीच्या माध्यमातून ही पदे लवकरात लवकर भरण्यात येतील.

सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी मघाशी जोरजोरात एक मुद्दा मांडला होता. परंतु त्या मुद्याला माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी उत्तर दिले आहे. ही तांत्रिक व टोकनच्या स्वरुपात तरतूद केलेली आहे. शहीद झालेल्यांच्या कुटुंबीयांसाठी 12 कोटी 7 लाख 50 हजार रुपयांची तरतूद केली असून ती यावर्षीच दिली जाणार आहे. यासाठी आजपर्यंत शहिदांसाठी कोणतीही तरतूद नव्हती. परंतु मला मुद्दाम सांगितले पाहिजे की, शासनाने गेल्या 2 वर्षामध्ये दहशतवाद्यांच्या व नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद झाले आहेत त्यांच्या कुटुंबीयांना जास्तीत जास्त मदत करण्याचे धोरण स्वीकारले आहेत. बऱ्याच शहिदांच्या कुटुंबीयांना मदत करण्याचे प्रामुख्याने धोरण स्वीकारलेले आहे. हा निधी मार्च महिन्यातच खर्च होणार आहे.

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील.....

पवई पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.जाधव यांच्यासंबंधी एक मुद्दा मांडला आहे. त्याही मुद्याबाबत चौकशी केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी एक मुद्दा मांडला आहे. अधिकारी शासनाच्या निर्णयाच्या विरोधात न्यायालयात जातात यासंबंधीचा तो मुद्दा होता. याबाबत विधी व न्याय विभागाकडून सल्ला घेऊन यासंबंधी योग्य तो निर्णय घेतला जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी जॅकेट व हेल्मेटचा मुद्दा मांडला होता. ज्या ज्या भागामध्ये जॅकेट्स, हेल्मेटस्ची आवश्यकता आहे ती त्या त्या जिल्ह्यात व शहरांमध्ये देण्याचे धोरण राबविले जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी नक्षलवादी भागामध्ये हेलिकॉप्टरची सोय करावी असे म्हटले होते. यासंबंधी शासनाने यापूर्वीच 6 कोटींची तरतूद केलेली आहे. त्यामुळे ज्या ज्यावेळी त्या भागात हेलिकॉप्टर लागेल त्यावेळी हेलिकॉप्टर उपलब्ध होईल.

यानंतर श्री.शिगम...

अशुद्धीत प्रत / परिशुद्धीपत्र नाही

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील...

आपले राज्याचे स्वतंत्र हेलिकॉप्टर असावे या दृष्टीने शासनाचे निश्चितपणे प्रयत्न राहाणार आहेत. सन्माननीय सदस्य डॉ. नीलमताई गो-हे यांनी पुणे येथे महिलांवर होणा-या अत्याचाराच्या संदर्भात पाठपुरावा करण्यासाठी पुणे येथे महानिरीक्षकाचे पद निर्माण करण्यात आलेले आहे असे सांगितले. त्यांना योग्य तो स्टाफ देण्याचे धोरण शासन स्वीकारील. तसेच महिलांवर होणा-या अत्याचाराचा विषय शासनाने गांभीर्याने घेतलेला आहे. न्यायमूर्ती धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमलेली असून सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे ह्या देखील त्या कमिटीच्या सदस्या आहेत. त्यांचा अंतरिम अहवाल आलेला आहे. अंतिम अहवाल आल्यानंतर शासन त्यासंदर्भातील धोरण निश्चित करील. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी व्हीव्हीआयपी व्यक्तींची संख्या वाढत चालली असून त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने नवीन गाड्या घेण्याची आवश्यकता आहे असे सांगितले. प्रत्येक शहराच्या ठिकाणी रात्रीची गस्त वाढविण्याच्या सूचना दिलेल्या आहे. जीपीएसच्या माध्यमातून रात्रीची गस्त व्यवस्थित चालू आहे की नाही यावर देखरेख ठेवण्याचे काम चालू आहे. तसेच प्रत्येक पोलीस स्टेशनच्या पोलीस इन्स्पेक्टरला त्यांच्या हद्दीतील पॅरोलवर सुटलेल्या गुन्हेगारांची माहिती संकलित करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मांडलेल्या मुद्यांचा शासन गांभीर्याने विचार करील. फॉरेन्सिक लॅबच्या केमिकल्ससाठी देखील तरतूद करण्यात आलेली आहे. तेव्हा गृह विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, ग्रामविकास विभागाच्या मागण्यासंदर्भात काही सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी सांगितले की, मुद्रांक शुल्कामधील रक्कम वर्षाच्या वर्षाला मिळाली पाहिजे. त्या दृष्टीने शासन प्रयत्न करील. सौर ऊर्जेसंबंधी काही मुद्दे या ठिकाणी मांडण्यात आले. पुणे जिल्हा परिषदेकडे सौर ऊर्जेच्या दिव्यांची खरेदी केलेली असेल तर त्यासंबंधीची माहिती घेऊन त्यांना योग्य त्या सूचना दिल्या जातील. पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने सौर दिव्यांचा वापर करण्याची सूचना सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी केली. या संदर्भात केन्द्र शासन 1/3, राज्य शासन 1/3 आणि ग्रामपंचायत 1/3 या प्रमाणे निधी उपलब्ध होतो. या योजनेतून स्ट्रीट लाईट नसलेल्या ठिकाणी लाईटची व्यवस्था होऊ शकेल. ग्राम विकास विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2010-2011च्या पुनर्वसन व मदत कार्य आणि भूकंप पुनर्वसन तसेच महसूल विभागाच्या मागण्यावरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, संजय केळकर, एस.क्यू.जमा, केशवराव मानकर, राजन तेली, जयंवत जाधव, धनंजय मुंडे, सन्माननीय सदस्य ॲड. उषा दराडे आणि डॉ.नीलम गो-हे यांनी भाग घेऊन अतिशय चांगल्या सूचना केलेल्या आहेत.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके.....

या विभागाचा राज्यमंत्री म्हणून मी त्यांचे मनापासून आभार मानतो. माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी कोकण विभागातील आंबा, काजू आणि नारळ या फळ पिकांबाबत राज्यातील इतर फळ पिकांना दिल्या जाणाऱ्या नुकसान भरपाईपेक्षा वेगळे निकष लावावेत अशी मागणी केली आहे. दोन वर्षापूर्वी कोकण विभागाला वेगळे निकष लावून आर्थिक मदत देण्यात आली होती. यावर्षीच्या वाटपामध्ये निश्चितपणे राज्यामध्ये सर्व विभागांना एकच निकष लावले गेले आहेत. कोकणातील परिस्थिती वेगळी आहे. म्हणून भविष्यकाळात आंबा, काजू आणि नारळ या फळ पिकांचे नुकसान झाल्यास वेगळे निकष लावण्याबद्दल निश्चित विचार केला जाईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी ठाणे तहसील कार्यालय येथील इमारत अपुरी पडत असून कार्यक्षेत्र मोठे असल्यामुळे नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यात यावी तसेच विक्रमगड येथे तहसील कार्यालय व्हावे अशी मागणी केली आहे. मी माननीय सदस्यांना विनंती करतो की, या दोन्हीबाबत प्रस्ताव शासनापर्यंत आले तर त्या प्रस्तावांना मान्यता देण्याचे काम प्राधान्याने केले जाईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.सय्यद ज़मा यांनी विदर्भातील सहा प्रमुख प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबतचा मुद्दा मांडला आहे. प्रामुख्याने मिहान कार्गो हब, गोसीखूर्द व इतर प्रकल्पांचा त्यांनी उल्लेख केला आहे. दोन दिवसांपूर्वी मी सभागृहात सांगितले होते की, यांसंबंधीचे प्रस्ताव शासनास प्राप्त झालेले आहेत. त्यामध्ये काही त्रुटी आहेत. निश्चितपणे या सर्व प्रस्तावांची छाननी करुन प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये मान्यता देण्याचे काम केले जाईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर आणि राजन तेली यांनी कोकणातील देवस्थान जमिनी मोठया प्रमाणात कब्जेदारांच्या ताब्यात असून त्या ग्रामस्थांच्या वापराखाली आहेत असे सांगितले आहे. याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची त्यांनी मागणी केली आहे. निश्चितपणे या संदर्भात कोकणातील जे जे आमदार या विषयाशी संबंधित आहेत त्यांची अधिवेशन संपण्यापूर्वी शासन स्तरावर एक बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या तीन जिल्हयामध्ये अवकाळी पावसामुळे जे नुकसान झाले त्याबाबत आर्थिक मदत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके.....

देण्याची विनंती केली आहे. पंचनामे झालेले आहेत. या तीनही जिल्हयामध्ये जे जे पंचनामे झाले त्यानुसार मागील वर्षी जी मदत दिली गेली त्याबाबत आता काही करता येत नसले तरी भविष्यकाळात जरुर विचार करता येईल. त्यांनी राज्य सहकारी बँकेची तालुका स्तरावर शाखा असावी अशी महत्वपूर्ण मागणी केली आहे. मला याठिकाणी सांगावयाचे आहे की, राज्य सहकारी बँक, जिल्हा बँक आणि सेवा सहकारी सोसायटी अशी त्रिस्तरीय व्यवस्था आहे. तालुका स्तरावर व्यवस्था केलेली नाही. पीक कर्ज वाटप केले जाते त्यासाठी तालुका स्तरावर व्यवस्था नाही. जिल्हा स्तरावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि गाव पातळीवर सेवा सोसायट्यांमार्फत पीक कर्ज वाटप केले जाते. त्यामुळे तालुका स्तरावर शाखा निर्माण करुन काही फायदा होईल असे मला वाटत नाही.

नंतर 4सी.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके .....

सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी महा मँगोच्या माध्यमातून कोकणात हापूस आंब्याचे मार्केटिंग किंवा प्रक्रियेत बरेच काही करण्यासारखे आहे. तसेच ही संस्था पुनरुज्जीवित करावी अशी सातत्याने त्यांची मागणी आहे. याबाबत मी असे सांगू इच्छितो की, अधिवेशन काळात सन्माननीय सदस्य व त्या भागातील संबंधित अधिकारी यांच्यासोबत बैठक घेऊन यातून मार्ग काढण्यात येईल. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी नाशिक जिल्ह्यातील कांदा उत्पादनाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. या अनुषंगाने मी त्यांना असे सांगू इच्छितो की, कांदा चाळीसाठी एनसीडीसी योजनेमार्फत अनुदान मिळते. तसेच ही योजना संपूर्ण राज्यभर राबविली जाते व या योजनेतून आजही मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध आहे. म्हणून नाशिक जिल्ह्यातून कांदा चाळीसाठी जेवढे प्रस्ताव येतील त्यासाठी मुबलक निधी शिल्लक असून या प्रस्तावांना मंजुरी दिली जाईल. त्याचबरोबर राज्यात कांद्याला हमी भाव मिनिमम एक्स्पोर्ट प्राईज प्रमाणे मिळावा अशी त्यांनी मागणी केली. मागील दोन वर्षांपासून आधारभूत किंमत कांद्यालाही लागू करावी, जेणेकरुन शेतकऱ्यांच्या पदरात किमान आधारभूत किंमत तरी पडेल यासाठी केंद्र शासनाकडे आपण प्रस्ताव पाठविला होता. त्या प्रस्तावाचा पाठपुरावा सुध्दा केला होता पण अद्याप केंद्राकडून त्याला होकार मिळाला नाही. तसेच पत संस्थांबाबत बोलताना सहकार कायद्यात बदल करावा, अशीही अपेक्षा सभागृहात व्यक्त केली गेली. तसेच राज्यातील जवळपास 469 पतसंस्था आज आर्थिक कोंडीत सापडलेल्या आहेत. अशा पतसंस्था अडचणीत आणणारे अधिकारी व पदाधिकारी यांना शिक्षा व्हावी म्हणून या कायद्यात बदल करण्याची मागणी केली. यासंदर्भात मला असे विदित करावयाचे आहे की, महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक-2010, दि. 16.12.2010 रोजी विधान मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे. हे विधेयक चर्चेला येईल तेव्हा याबाबतची सविस्तर चर्चा होणारच आहे. तसेच यासंदर्भात राज्य स्तरावर एक नियामक मंडळ स्थापन करण्याची तरतूद देखील या कायद्यात करण्यात आली. हे विधेयक पास झाल्यानंतर कदाचित आपली अपेक्षा पूर्ण होईल, असे वाटते. यापैकी 145 पत संस्थांच्या लेखा परीक्षणात गंभीर दोष आढळून आले असून 1112 कर्मचारी व संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके .....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी भुदरगड पत संथेच्या ठेवीदारांसाठी शासनाने पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून मागणी केलेल्या 200 कोटी रुपयातून तरतूद करावी अशी मागणी केली आहे. मी सभागृहाला या निमित्ताने असे सांगू इच्छितो की, शासनाने भुदरगड ठेवीदारांसाठी याच 200 कोटीतून 15.50 कोटीची मदत करण्यासाठी तरतूद केली असून त्या माध्यमातून 10 हजार रुपयापर्यंच्या ठेवी परत केल्या जातील. या पत संस्थेचे एकूण 1 लाख 70 हजार सभासद असून त्यांना या तरतुदीचा लाभ होणार आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांना पीक विमा योजनेमधून फायदा मिळाला त्यांना कर्ज माफीचा फायदा मिळाला नाही. याबाबत मी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, ज्या शेतकऱ्यांनी दि. 31.3.2007 पूर्वी कर्ज उचलले असेल त्यांची तपासणी करुन अशा सर्व शेतकऱ्यांना कर्ज माफीच्या बाबतीत सहकार्य करता येईल.

महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या जवळजवळ सर्वच मुद्यांना मी स्पर्श करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तेव्हा सभागृहाने महसूल व वन विभागाच्या बाब क्र. 24, मुद्रांक शुल्क विभागाची बाब क्र. 19, मदतकार्य व पुनर्वसन विभागाच्या बाब क्र. 20, 21 व 22, सहकार विभागाच्या बाब क्र. 111 ते 117, पणन विभागाच्या बाब क्र. 119 ते 123 या सर्व मागण्या मंजूर कराव्यात, अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : सन 2010-11 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

सभा□हापुढील □ाम□ाज संपलेले आहे. सभा□हाची बैठ□ आता स्थ□ित होऊ□ उद्या बुधवार, दि□ां□ 23 मार्च, 2011 रोजी दुपारी 12.00 वाजता पु□: भरेल.

( सभा□हाची बैठ□ रात्री 7 वाजू□ 25 मि□टां□ी, बुधवार, दि□ां□ 23 मार्च, 2011च्या दुपारी 12.00 वाजेपर्य□ा स्थ□ित झाली )

---

अप्रमाणित प्रत / मुद्रणासाठी नाही